


भारतीय ग्रंथ भवन

अमर विश्व साहित्य

: ६ :

फ्रेंच, इंग्लिश, अमेरिकन, रशियन, जर्मन, स्पॅनिश, आयरिश व झेकोस्लोवाक मिळून चोवीस कादंबऱ्या आणि दोन अमेरिकन काव्यें, अशा एकंदर सव्वीस जगप्रसिद्ध ग्रंथांचें सारांश

अनुवादक
स. ह. मोडक

भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मेसर्स हार्पर अँड ब्रदर्स, न्यू यॉर्क,
यांनीं प्रकाशित केलेल्या
मास्टरपीसेस ऑफ वर्ल्ड लिटरेचर इन् डायजेस्ट फॉर्म
या ग्रंथावरून अनुवादित

पहिली मूळ इंग्रजी आवृत्ति : १९४९
दुसरी मूळ इंग्रजी आवृत्ति : १९५२
पहिली मराठी आवृत्ति : सप्टेंबर, १९६२

प्रकाशक :
कृ. रा. सामंत,
संचालक,
भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मुद्रक :
चिंतामणि रघुनाथ देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४

अनुक्रमणिका

द ब्रदर्स कारामाझोव

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : फ्योदोर मिखाइलोविच दस्तयेव्स्की (१८२१-१८८१). कथानकाचा प्रकार : शीघ्रसंस्कारी वास्तववाद. काळ : एकोणिसावें शतक. स्थळ : रशिया. प्रथम प्रकाशन : १८८०.

प्रमुख पात्रें : फ्योदोर कारामाझोव, एक बदफैली व्यापारी. द्मीत्री, त्याचा कामुक ज्येष्ठ पुत्र. इवान, त्याचा नास्तिक, बुद्धिजीवी पुत्र. अलेक्सी (अल्योशा), त्याचा कनिष्ठ पुत्र. ग्रूशेन्का, फ्योदोर आणि द्मीत्री यांची मारक प्रेयसी असलेली तरुण स्त्री. स्मिर्याकोव, फ्योदोरचा नोकर; याला फेफऱ्याचा विकार असतो. झोसिमा, वृद्ध पुरोहित. कातेरीना, द्मीत्रीची वाग्दत्त वधू.

समीक्षण : मानवाच्या दुहेरी स्वभावामुळें होणाऱ्या तीव्र मनस्तापाचें प्रचंड स्पंदन या सामर्थ्यशाली कादंबरींतून सर्वत्र पुन्हां पुन्हां प्रत्ययाला येतें. एक पिता व त्याचे तीन पुत्र यांच्या या कथेसाठीं मानसशास्त्रवेत्ता कादंबरीकार दस्तयेव्स्की यानें निवडलेला विषय असा : कामुकता आणि आनुवंशिक कामुकता यांचा एका कुटुंबावर आणि ज्यांच्याशीं त्या कुटुंबाचा संबंध येतो त्या सर्वांवर काय परिणाम होतो? दस्तयेव्स्कीच्या समाजावर पाश्चात्य संस्कृतीचें जें झिरझिरीत आवरण होतें, त्या आवरणाखालीं दडलेली झारशाही रशियांतील रानवट बर्बरता हींत दिसून येते. नीट गुंफण न केलेलीं कित्येक प्रदीर्घ उपकथानकें या कादंबरीच्या एकसूत्रीपणाला बाध आणतात. त्यांवरून असें वाटतें कीं याहूनहि मोठी कादंबरी लिहिण्याची लेखकाची मूळ योजना असावी, परंतु तिचें प्रथम प्रकाशन नियतकालिकांत हप्त्याहप्त्यानें झाल्यामुळें ती पूर्ण होऊं शकली नाहीं.

कथानक : रशियाच्या एका प्रांतांतील स्कतोप्रिगोन्येव्स्की या गांवीं एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर फ्योदोर कारामाझोव हा तीन मुलांचा बाप झाला. त्यांतला ज्येष्ठ मुलगा द्मीत्री हा त्याच्या प्रथम पत्नीचा, आणि इवान व अलेक्सी हे बाकीचे दोघे त्याच्या द्वितीय पत्नीचे. फ्योदोर चांगला व्यापारी होता, परंतु स्वभावानें तो बदमाश होता. या मुलांच्या दोघी आया वारल्यानंतर त्यानें हीं मुलें टाकून दिलीं. घरचा नोकर ग्रिगोरी यानें या मुलांना पालन-पोषणार्थ नातेवाईकांच्या हवालीं केलें.

आईच्या इस्टेटींतून आपल्याला वारसाहक्कानें भरपूर वांटा मिळणार अशा भरंवशावर द्मीत्री लहानाचा मोठा झाला. त्यानें लष्करांत नोकरी केली आणि तिथें त्याच्या स्वभावाला वाईट वळण लागलें. तो उधळ्या निघाला. वडिलांना भेटून त्यानें आपल्या हक्काच्या पैशांची त्यांजकडे मागणी केली. इवान दुर्मुखलेला असला तरी भित्रा नव्हता. शालेय शिक्षण संपल्यावर तो मॉस्को शहरांतील एका कॉलेजांत दाखल झाला. गरिबीमुळें त्याला शिकवण्या पतकरणें व नियतकालिकांसाठीं लेख लिहून देणें भाग पडलें. धार्मिक कोर्टांच्या भूमिकेला अनुलक्षून त्यानें एक लेख लिहिला व यामुळें त्याला बऱ्यापैकीं लौकिक मिळाला. कनिष्ठ पुत्र अलेक्सी ऊर्फ अल्योशा हा स्वप्नाळू व एकांतप्रिय स्वभावाचा मुलगा होता. तो एका स्थानिक मठांत दाखल झाला; तिथें ऑर्थॉडॉक्स रशियन खिस्ती धर्मपंथाचा प्रख्यात गुरुश्रेष्ठ झोसिमा याचें शिष्यत्व त्यानें पतकरलें. आपल्याला जोगी व्हायला परवानगी मिळावी म्हणून अल्योशानें वडिलांकडे विचारणा केली. फ्योदोरच्या लेखीं पावित्र्य कशांतच नव्हतें; म्हणून तो प्रथम मुलावर गुरकावला, पण मागाहून त्यानें ही परवानगी दिली.

तिघे भाऊ सज्ञान झाले, तेव्हां ते निरनिराळ्या मार्गांनीं पुन्हां आपल्या जन्मगांवीं एकत्र आले. आपली वारसाहक्काची मिळकत वसूल करायला द्मीत्री गांवीं परत आला. निष्ठावंत नास्तिक इवान हा आर्थिक कारणांपायीं स्वगृहीं परतला.

वडील आणि तिघे पुत्र यांची भेट मठांत झाली. त्या वेळीं माननीय गुरुश्रेष्ठ झोस्सिमा यांच्या देखत मूर्खासारखें वर्तन करून फ्योदोरनें आपल्या मुलांना लाजेनें खालीं माना घालायला लावल्या. द्मीत्री या भेटीचे वेळीं तिथें उशीरां येऊन पोंचला. त्याच्यावर फ्योदोरनें आरोप केला कीं "माझं स्वतःचं प्रेमपात्र असलेल्या स्थानिक छबेलीबरोबर रंगढंग करायला मिळावेत म्हणून तुला तुझा वारसाहक्काचा पैसा हवा आहे." या वेळीं कातेरीना हिच्याशीं द्मीत्रीचा वाङ्निश्चय झालेला होता. ती एका कर्नलची कन्यका होती आणि त्यानें तिला एका बेअब्रूकारक प्रसंगांतून वांचविलेलें होतें. वडिलांचा हा आरोप ऐकून द्मीत्री संतापला आणि म्हणालाः "तुमचं येवढं वय झालेलं आहे तरी तुम्ही मोठमोठीं पापकर्मे करतां आहांत. तुम्हांला माझ्या बाबतींत असलं कांहीं बोलायला तोंडच उरलेलं नाहीं." गुरुश्रेष्ठ झोस्सिमा हे तिथल्या

तिथें द्मीत्रीसमोर जमिनीवर कोसळले आणि त्याच्या पुढ्यांत त्यांचें डोकें जमिनीवर आपटलें. त्यांचें हें त्या वेळचें पतन म्हणजे ज्येष्ठ पुत्रावर ओढवणाऱ्या भावी संकटाचें दुश्चिन्ह आहे असें सगळ्यांना वाटलें. कारामाझोव कुटुंबांतले हे सगळे लोक एकजात कामुक आहेत हें गुरुश्रेष्ठांच्या ध्यानीं आलें आणि त्यांनीं अल्योशाला असा सल्ला दिला कीं "मी मेल्यानंतर तूं मठ सोडून दे आणि जगाच्या धकाधकींत सामील हो." द्मीत्रीची वाग्दत्त वधू कातेरीना हिच्यावर इवानचें प्रेम होतें, म्हणून या भावांभावांमध्यें व बापलेकांमध्यें आणखी भांडाभांडी झाली.

फ्योदोरचा इमानी नोकर ग्रिगोरी याची बायको मार्फा हिच्या पोटीं एक विद्रूप मूल जन्माला आलें. तिचें हें विद्रूप अर्भक ज्या रात्रीं मेलें त्याच रात्रीं गांवांतली एक वेडसर तरुणी लिझावेता ही बाळंत झाली व एका पुत्राला जन्म देऊन मरून गेली. याच मुलाचें नांव पुढें स्मिर्द्याकोव असें ठेवलें. त्याला ग्रिगोरी व मार्फा यांनीं आपल्या घरीं नेऊन लहानाचा मोठा केला आणि फ्योदोरच्या घरींच त्याला नोकरी मिळाली. त्या भागांतले सगळे लोक या मुलाचा खरा बाप फ्योदोरच आहे असें समजत होते.

द्मीत्रीनें आपल्या दुर्वर्तनाचा कबुलीजबाब अल्योशाजवळ दिला. त्यानें आपल्या या कनिष्ठ भावासमोर आपलें अंतःकरण उघडें केलें. तो म्हणाला : "मी कातेरीनाचे तीन हजार रूबल घेतले आणि ते गांवांतली छेलछबेली ग्रूशेन्का हिच्याशीं वाटेल ते रंगढंग करण्यांत उधळून टाकले. ही स्त्री जरी बदचालीची असली तरी हिच्यावर माझं भलतंच प्रेम बसलं म्हणून हा प्रकार घडला. आतां कातेरीनाचे पैसे तर परत द्यायला हवेत. तेव्हां तूं कसंहि करून बाबांकडून तेवढे पैसे मला आणून दे."

अल्योशा घरीं गेला. तिथें त्याचे वडील व त्याचा भाऊ इवान हे टेबलाशीं बसलेले होते. फेंफऱ्याच्या विकारानें आजारी असलेला नोकर स्मिर्द्याकोव त्यांच्या सेवेला हजर होता. तेवढ्यांत द्मीत्री अचानक तिथें आला. तो ग्रूशेन्का हिचा शोध करीत होता. आल्याबरोबर त्यानें वडिलांवर हल्ला केला. तिथून अल्योशा उठला आणि कातेरीना हिच्या घरीं गेला. तिथें त्याला ग्रूशेन्का आलेली दिसली. तिनें लांच घेऊन द्मीत्रीचा नाद सोडावा अशी कातेरीनाची खटपट चाललेली होती. पण ग्रूशेन्का आपल्या प्रेमाचा असा

सौदा करायला तयार होईना. तो तसाच मठांत परत गेला. गुरुश्रेष्ठ झोस्सिमा मरायला टेंकले आहेत असें त्याला दिसून आलें. तो परत वडिलांकडे गेला. झीत्री व इवान या दोघांचीहि आपल्या वडिलांनीं धास्ती घेतली आहे हें त्याच्या निदर्शनास आलें. झीत्रीनें ग्रूशेन्काशीं लग्न करावें, म्हणजे आपल्याला कातेरीनाशीं लग्न करायला मिळेल असा इवानचा विचार होता. खुद्द पिताश्री फ्योदोर यांना स्वतःलाच ग्रूशेन्काशीं लग्न करायचें होतें. त्यांनीं झीत्रीसाठीं आपण एक छदामहि देणार नाहीं असें अल्योशाला सांगून टाकलें.

झीत्रीनें धुडकावून लावल्यावर कातेरीना हिनें त्याच्या पाळतीवर राहण्या-साठीं आपली सगळी हयात कामीं लावण्याचा निर्धार केला. वस्तुतः तिचें खरें प्रेम इवानवरच होतें. हिनें आपलें सगळें आयुष्य आत्मक्लेशार्थ समर्पण करण्याचें ठरविलें आहे असें पाहून बिचाऱ्या इवाननें धीरोदात्त मनानें तिच्या या निर्णयाला मान्यता दिली.

पुढें एका खानावळींत अल्योशा व इवान यांची गांठ पडली. त्या वेळीं इवान म्हणाला : “ माझी परमेश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा आहे. परंतु परमे-श्वराचें जग मला मान्य करतां येत नाहीं.” या दोघां तरुणांनीं मानवाच्या दुहेरी स्वभावाची चर्चा केली. इवान म्हणाला : “ मला त्या स्मिर्द्याकोवची भारी चीड आहे. झीत्री व आपले बाबा फ्योदोर या दोघांच्या पिसाट वासनांच्या कात्रींत तो सांपडलेला आहे. परंतु केवळ भीतीमुळं तो दोघांच्या हिताप्रीत्यर्थ एकमेकांच्या विरुद्ध एकमेकांना मदत करतो. ”

मृत्युशय्येवर पडलेले गुरुश्रेष्ठ झोस्सिमा यांना पुन्हां थोडें बळ आलें. त्याचा फायदा घेऊन त्यांनीं आपल्या पट्टशिष्याशीं पुन्हां एकदां शेवटचें बोलणें केलें. त्यांच्या मृत्यूच्या वेळीं कांहीं तरी चमत्कार घडणार अशी अपेक्षा होती. परंतु तसा चमत्कार घडण्याऐवजीं गुरुश्रेष्ठांचा पार्थिव देह फार लवकर कुजला आणि त्याला घाण येऊं लागली. हें पाहून कांहीं जोग्यांना आनंदच झाला. कारण ऑर्थॉडॉक्स रशियन ख्रिस्ती धर्मपीठांतील गुरुश्रेष्ठांची ही संस्था बदनाम व्हावी यासाठीं ते फार उत्सुक झालेले होते. गुरुश्रेष्ठांचें शव ज्या अर्थीं कुजलें, त्या अर्थीं त्यांची शिकवणूक खोटी असल्याचें सिद्ध होतें, असा त्यांनीं युक्तिवाद चालविला.

मठांतील घडामोडींना हें असें वळण मिळाल्यामुळें अल्योशाचा विरस झाला. त्याच मनःस्थितींत तो असतांना त्यानें ग्रूशेन्काकडे जावें म्हणून त्याचें मन वळविण्यांत आलें. त्याला फशीं पाडून कामक्रीडेंत गुंतवावें असा तिचा मानस होता. ग्रूशेन्का त्याला म्हणाली : “ मी माझ्या एका माजी प्रियकराबरोबर पळून जायची तयारी करत्यें आहे. या कारामाझोव लोकांच्या पिसाटपणांतून सुटका करून घ्यायला मला हा एकच मार्ग दिसतोय. ” साधुवृत्तीच्या अल्योशाला ग्रूशेन्का ही साध्वी आहे असें वाटलें. तिच्या परीनें तिलाहि असें वाटलें कीं आपलें मनोगत समजून घेणारा असा हा एकच उदारात्मा आहे.

कातेरीनाकडून घेतलेले पैसे लौकर फेडून टाकावेत म्हणून द्मीत्रीनें कर्जाऊ पैसे मिळवायचे निरनिराळे प्रयत्न केले, पण ते सारे निरर्थक ठरले. ग्रूशेन्का तिच्या स्वतःच्या घरीं नाहीं असें पाहून तो मत्सरानें वेडापिसा झाला आणि पिताश्री फ्योदोर यांच्याकडे तर ती गेली नसेल ना हें पाहण्यासाठीं तो वडिलांच्या घरीं गेला. तिथें ती सांपडली नाहीं. पण संतापाच्या भरांत त्यानें वडिलांना ठार मारण्यासाठीं उगारलेलें मुसळ म्हातारा नोकर ग्रिगोरी याच्या पेकाटांत बसून त्याला जबर दुखापत झाली. ग्रूशेन्का दुसऱ्याच एका इसमाकडे पळून गेली आहे असा पत्ता लागल्याबरोबर तो शस्त्रसज्ज होऊन तिचा पाठलाग करूं लागला. दुसऱ्या एका खेड्यांतील खानावळींत दोघां पोलिश इसमांच्या संगतींत ग्रूशेन्का त्याला सांपडली. द्मीत्रीला बघतांक्षणीं तिनें त्याचें स्वागत केलें आणि “ केवळ तुझ्यावरच माझं अढळ प्रेम आहे ” अशी त्याला ग्वाही दिली. या प्रेमिकांनीं मग मद्यपानाचा हैदोस मांडला. तेवढ्यांत पोलिस आले आणि त्यांनीं पितृहत्येच्या आरोपावरून द्मीत्रीला अटक केली. त्याच्या वडिलांच्या घरीं चोरी झालेली होती आणि ते घरांत मरून पडलेले सांपडले होते. द्मीत्रीच्या अंगांतल्या कपड्यांवर रक्ताचे डाग होते, त्याच्याजवळ पुष्कळसे पैसेहि होते आणि त्यानें तावातावानें वडिलांच्या विरुद्ध वाटेल तशीं विधानें केलेलीं होतीं. हा सगळा पुरावा त्याच्याविरुद्ध उपयोगी पडला. “ मी निरपराधी आहें; मी आतां ज्या पैशांतून ही मद्यपानाची मैफल केली ते मी कातेरीनाकडून उसन्या घेतलेल्या रकमेंतले निम्मे शिल्लक राहिलेले होते; ग्रूशेन्कानं जर पुढंमागं माझा स्वीकार केला तर त्या वेळीं मला उपयोगी पडावेत म्हणून हे पैसे मुद्दाम शिल्लक ठेवलेले होते.”—असा युक्तिवाद द्मीत्रीनें परोपरीनें

करून पाहिला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, कारण साक्षीदारांनीं दिलेल्या जबाबांवरून त्याचा बचाव करण्याची आशाच उरलेली दिसेना. त्याला पोलिसांनीं आपल्या ताब्यांत घेतलें व खटला होईपर्यंत गांवच्या तुरुंगांत ठेवून दिलें.

झीत्रीला अटक झाल्यानंतर ग्रूशेन्का आजारी पडली. एकमेकांविषयींच्या मत्सरानें दोघें एकमेकांविरुद्ध जळूं लागलीं. झीत्रीला एक विलक्षण स्वप्न पडलें. त्यामुळें मानवजातीच्या गुन्ह्यांबद्दल परमेश्वरानें हाल सोसायला लावलेला एक निरपराधी माणूस आपण आहोंत अशी तो स्वतःविषयीं समजूत करून घेऊं लागला. दरम्यान इवान व कातेरीना यांनीं झीत्रीला अमेरिकेला पळून जातां यावें म्हणून एक योजना तयार करून ठेवली.

खटला सुरू होण्यापूर्वीं इवाननें घरचा नोकर स्मिर्द्याकोव याची तीन वेळां मुलाखत घेतली. " मला फेंफऱ्याचा झटका आल्याचं सोंग करतां येतं " असें या नोकरानें एकदां इवानला सांगितलेलें होतें. फ्योदोरचा खून करणाऱ्याचा शोध करतांना, अशा प्रकारचा फेंफऱ्याचा झटका हा स्मिर्द्याकोवचा निरपराधीपणा सिद्ध करायला उपयोगी पडण्याजोगा होता. तिसऱ्या मुलाखतीच्या अखेरीस स्मिर्द्याकोवनें आपण स्वतःच हा खून केला असल्याचा कबुलीजबाब दिला. पण त्याचबरोबर इवानला त्यानें असेंहि सांगितलें कीं " मी हा जो खून केला तो तुमचा हस्तक म्हणून केला. तुम्ही आपल्या कांहीं उद्‌गारांच्या व कृत्यांच्या योगानं माझी अशी समजूत करून दिली कीं फ्योदोरसाहेबांचा मृत्यु हें घरांतल्या सगळ्या लोकांना वरदानच ठरेल. तुमच्या मनांतल्या गुन्हेगारीच्या भावनेवर अवलंबून राहून मी माझ्या धन्याचा खून करायला अशी वेळ साधली कीं तीमुळं सगळा पुरावा थेट झीत्री याच्या विरुद्ध जावा. मला असं वाटलं कीं तुम्ही मला संरक्षण द्याल आणि मला सुखांत राहायला मिळेल अशी तरतूद करून ठेवाल. " या तिसऱ्या मुलाखतीच्या अखेरीस त्यानें आपल्या जवळचे चोरलेले पैसे इवानच्या हवालीं केले. इवान घरीं परत आला आणि त्याच्या अंगांत सपाटून ताप भरला व त्याला वात झाला. आपल्या आत्म्यामध्यें जो सैतान घर करून बसलेला आहे त्याची आकृति आपल्या बोकांडी बसली आहे असें या वातामध्यें त्याला वाटत होतें. त्याच रात्रीं स्मिर्द्याकोवनें गळफांस लावून घेऊन आत्महत्या केली.

या कारामाझोव खटल्याचा बोलबाला साऱ्या रशियाभर झाला. अनेक प्रतिष्ठित लोक या खटल्याची सुनावणी ऐकायला आले. फिर्यादी पक्षानें झीत्रीच्या विरुद्ध अगदीं बिनतोड दिसणारा असा पुरावा उभा केला. परंतु आरोपीच्या बाजूनें लढणाऱ्या एका शहरी वकिलानें फिर्यादी पक्षाचा सगळा पुरावा एकेक मुद्दा घेऊन खोडून काढला. डॉक्टर लोकांनीं झीत्रीचें डोकें ठिकाणावर नाहीं असें मत दिलें; परंतु शेवटीं या बाबतींत त्यांचें एकमत होऊं शकलें नाहीं. कातेरीना हिनें झीत्रीचें तिला आलेलें एक पत्र कोर्टांत हजर करून स्त्रीजातीला शोभेशा सूडबुद्धीचें प्रदर्शन केलें. त्या पत्रांत त्यानें लिहिलें होतें : " तुला मी देणें असलेले पैसे मिळविण्यासाठीं बाबांचा खून करायचा निर्धार केलेला आहे. " इवान अजून तापानें फणफणतच होता. पण तशाच अवस्थेंत त्यानें साक्ष दिली आणि सांगितलें कीं " स्मिर्द्याकोवनं आपण स्वतः हा खून केल्याचा कबुलीजबाब माझ्यासमोर दिला होता. " इवाननें ते पैसेहि कोर्टाच्या स्वाधीन केले. पण मागाहून त्याचा स्वतःवरील तोल सुटला आणि त्यानें आपली साक्ष परत घेतली आणि आपल्याला आपला खासगी सैतान आपल्या बोकांडी बसून कसा सतावतो याची हकीगत कोर्टाला सांगितली.

झीत्रीच्या वतीनें बचाव पक्षानें वक्तृत्वपूर्ण रीतीनें आपली बाजू मांडली असली तरी ज्यूरीनें आरोपीला दोषी ठरविलें. त्या वेळीं कोर्टांत प्रचंड खळबळ माजली.

आपण झीत्रीचें पत्र उघडकीस आणलें याबद्दल कातेरीनाला तिचें मन खाऊं लागलें. आपणच या दोघां भावांमधील हेव्यादाव्याला जबाबदार आहोंत असें तिच्या मनानें घेतलें. ती इवानला आजारी अवस्थेंत तसाच सोडून झीत्रीला भेटायला इस्पितळांत गेली. झीत्रीलाहि ताप आल्यामुळें त्याला तिथें नेलें होतें. या मुलाखतीच्या वेळीं अल्योशा व ग्रूशेन्का हीं दोघेंहि तिथें हजर होतीं. त्यांच्यासमक्ष कातेरीना हिनें झीत्रीजवळ क्षमेची याचना केली.

मागाहून झीत्री याची शुश्रूषा करायला ग्रूशेन्काला तिथेंच ठेवून अल्योशा आपल्या एका शाळकरी मित्राच्या स्मशानयात्रेला गेला. या मृत मुलासाठीं दुखवटा करायला त्याचे बहुतेक शाळा-सोबती तिथें जमलेले होते. मरणा-विषयींचा शोक आणि जीवनातलें दुःख याविषयींच्या दयेनें व अनुकंपेनें अल्योशाचें अंतःकरण भरून आलेलें होतें. त्यानें जमलेल्या मुलांना प्रेमळ

शब्दांत सदुपदेश केला आणि भल्यासाठीं जगा आणि मानवाच्या जगावर प्रेम करा असा त्यानें त्यांना संदेश दिला. तो म्हणाला : " मी स्वतः स्त्रीसमवेत सैबेरियाला हद्दपारीवर जायची तयारी करतों आहें. कारण निरपराधीपणा व सत्य यांसाठीं माझं स्वतःचं जीवित सर्वस्वीं अर्पण करायला मी तयार आहें. "

बुडेनब्रूक्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : थॉमस मॅन (१८७५-१९५५). कथानकाचा प्रकार : सामाजिक बखर. काळ : एकोणिसावें शतक. स्थळ : जर्मनी. प्रथम प्रकाशन : १९०१.

प्रमुख पात्रें : जियां बुडेनब्रूक, जर्मन व्यापारी संस्थेचा प्रमुख. फ्राऊ बुडेनब्रूक, जियां याची पत्नी. आन्टनी (टोनी), जियां याची कन्या. ख्रिस्तियन, जियां याचा पुत्र. टॉम, जियां याचा पुत्र. हेर्र ग्रूनलिख, टोनी हिचा पहिला पति. एरिका, टोनी व ग्रूनलिख यांची कन्या. गेर्डा, टॉम याची पत्नी. हान्नो, टॉम व गेर्डा यांचा पुत्र. हेर्र पेर्मानेडर, टोनी हिचा द्वितीय पति.

समीक्षण : भौतिकवादी समाजाचा अधःपात या कादंबरींत स्पष्टपणें उघड करून दाखविलेला आहे. हिची तुलना गाल्सवर्दींच्या 'फोरसाइट सागा' या कादंबरीशीं झालेली होती. कथेची धाटणी वस्तुनिष्ठ असली तरी त्याच-बरोबर तींत स्वतःच्या लोकांचा धिःकार केलेला आहे. बुडेनब्रूक घराण्यांतले लोक स्वभावतः प्रामाणिक आणि चांगले होते; कौटुंबिक जिव्हाळा आणि स्व-वर्गनिष्ठा त्यांच्या अंगीं बाणलेली होती. परंतु त्यांनीं आपल्यामध्यें नवें रक्त यायला मुळींच वाव दिला नाहीं. त्यांचा विकास म्हणा किंवा अधिक समर्पक शब्दांत सांगायचें म्हणजे त्यांचा अधःपात म्हणा, एक प्रकारच्या सगोत्र विवाहामुळें झाला; म्हणजे रक्ताच्या नात्यांतला सगोत्र विवाह नव्हे, तर वर्गीय नात्यांतला. श्रीमंती हा त्यांचा एकमेव आधार होता. ती घालविल्याबरोबर त्यांचा नाश झाला.

कथानक : १८७५ या वर्षीं बुडेनब्रूक घराणें वैभवाच्या शिखरावर होतें. वडिलांच्या वारशामुळें आपल्याकडे आलेला धंदा व श्रीमंती योहान्न यानें

जशीच्या तशी कायम राखली. या घराण्याला लोकांनीं मोठें मानाचें स्थान दिलें. वृद्ध योहान्न याच्या मृत्यूनंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र जियां याच्याकडे हा धंदा वारसाहक्कानें आला. मेंगस्ट्रासवरील या घराण्याच्या जुन्या घरांत जियां याचें पहिलें अपत्य जन्मलें. ही आन्टनी ऊर्फ टोनी स्वभावानें व वृत्तीनें सरदारी बाण्याची होती. दुसरें अपत्य म्हणजे पुत्ररत्न टॉम. त्याच्या पाठोपाठ ख्रिस्तियन झाला; जन्मापासून याची चालचलणूक विशिष्ट प्रकारची दिसत होती. घराण्याच्या धंद्यामध्यें आपल्याला गोडी असल्याचें टॉमनें फार लौकर दर्शविलें. परंतु ख्रिस्तियन मात्र सगळ्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या बाबतींत बेफिकीर दिसला.

टोनी लहानाची मोठी होऊन आतां एक सुंदर स्त्री झाली. एके दिवशीं हेर ग्रूनलिख हा या कुटुंबाला भेटायला आला. टोनीविषयीं त्याला गोडी वाटत होती हें उघड दिसलें. म्हणून तिच्या वडिलांनीं त्याच्या आर्थिक दर्जाची तपासणी केली. परंतु या हट्टी कन्यकेला त्याचा आणि त्याच्या लाचार वागणुकीचा तिरस्कार वाटला. तो पुन्हां भेटायला आला तेव्हां त्याला टाळण्यासाठीं ती समुद्रकांठीं राहायला गेली आणि तिथें ती मॉर्टेन शार्ट्झ-कॉफ नामक वैद्यकीय विद्यार्थ्याच्या प्रेमांत सांपडली. या विद्यार्थ्याविषयीं तिला गोडी वाटते असें कळतांक्षणीं तिच्या आईवडिलांनीं तिला घाईघाईनें घरीं आणलें. ग्रूनलिख यानें तिला मागणी घातली. त्याच्या तर्फेनें तिच्या आईवडिलांनीं केलेल्या युक्तिवादांकडे दुर्लक्ष करण्याइतकी तिची कौटुंबिक कर्तव्यांची जाणीव लेचीपेची नव्हती. लग्नाचा मुहूर्त ठरला. जांवईबापूला ऐंशी हजार मार्क येवढ्या हुंड्याचें अभिवचन मिळालें.

आपल्या वीस वर्षें वयाच्या नववधूला घेऊन जांवईबापू खेडेविभागांत राहायला गेले. पत्नीच्या शहरी मित्रमैत्रिणींपैकीं कुणाकडेहि ते तिला जाऊं देईनात. आईवडिलांना लिहिलेल्या पत्रांतून तिनें याबद्दल तक्रार केली. परंतु पतिराजांच्या इच्छांचें पालन करण्यांतच तिनें संतोष मानून घेतला.

घराण्याच्या धंद्यामध्यें टॉम महत्त्वाच्या पदावर होता. धंद्यामधून अजून अमाप पैसा जमा होत होता. ख्रिस्तियन याला अगोदरपासूनच धंद्याची नावड होती आणि त्याची प्रकृतीहि बरी नसे; म्हणून त्याला दक्षिण अमेरिकेला जाण्याची खास सवलत मिळाली.

जांवईबापूंना आपल्या धंद्यामध्यें खोट बसत असल्याचें आढळून आलें. त्यांच्या घेणेकऱ्यांनीं त्यांना सासरेबुवांकडून मदत मागविण्याचा आग्रह केला. आपल्या मुलीशीं लग्न करण्यामागील जांवईबापूंचा खरा हेतु काय होता हें सासरेबुवांना आतां कळलें; सासऱ्याच्या लौकिकामुळें जांवयाची घसरलेली पत सांवरून तिला अधिक मजबुती आलेली होती. वस्तुत: जांवईबुवांची परिस्थिती गरिबीचीच होती; कन्येच्या काळजीमुळें आपले श्वशुर आपल्याला आर्थिक दिवाळखोरींतून वांचवितील हाच त्यांचा मुख्य आधार होता. खुद्द कन्येनें आपल्याला पतिराजांविषयीं द्वेषच वाटतो असें वडिलांना निक्षून सांगितलें. तथापि दिवाळखोरीमुळें येणाऱ्या हालअपेष्टा सहन करायची तिची तयारी नव्हती.

वडिलांनीं आपल्या कन्येला आपली नात एरिका हिच्यासह आपल्या घरीं परत आणलें. जांवईबापूंनीं त्यांना मिळालेल्या हुंड्याबाबत अफरातफर केल्याच्या मुद्यावर कन्येला काडीमोड सहज मिळूं शकली.

जियां बुड्डेनब्रूक याचें आपल्या घराण्यावर नितांत प्रेम होतें. घराण्याच्या थोर परंपरेवर त्याची दृढ श्रद्धा होती. टोनी माहेरच्या वातावरणांत पुन्हां सुखी झाली. मात्र क्रूसाची आकृति जशी सगळ्यांनीं मुद्दाम पाहावी व तिच्याविषयीं भक्तिभाव दर्शवावा, तशीं आपलीं कौटुंबिक दुःखें तिनें सर्वांसमोर मिरवत सहन केलीं. टॉमला आपल्या बहिणीविषयीं नितान्त जिव्हाळा वाटूं लागला. माहेरच्या घराण्याच्या धंद्याचा विकास व प्रगति याविषयीं तिलाहि मोठा अभिमान वाटत होता.

दक्षिण अमेरिकेंतील आपल्या व्यवहारांमध्यें खोट खाऊन ख्रिस्तियन घरीं परत आला. वडिलांनीं त्याला एक काम दिलें व ऑफिस थाटून दिलें. त्या कामाचा त्याला तिटकारा वाटे आणि तो कामाची टाळाटाळ करूं लागला. त्याच्या चालचलणुकींतला विशिष्टपणा अजून तसाच होता आणि त्याची तब्बेतहि बरी नसे. गंभीर वृत्तीचा टॉम वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून धंदा चांगला करी. आणि घराण्याच्या चालीरीतींविषयींची आपुलकी त्यानें कायम राखली. वडिलांनीं मरतांना त्याच्याच हातीं धंदा सोंपविला. वडिलांच्या मृत्यूमुळें घराण्याचें सगळ्यांत मोठें शक्तिशाली बंधन हरपलें असें कन्यका टोनी हिला वाटलें. या गोष्टीचा टॉमवर देखील फार परिणाम झाला. परंतु

आपल्या आर्थिक ओझ्यांची जबाबदारी त्याच्या लेखीं सगळ्यांत जास्त महत्त्वाची ठरली.

घराण्याच्या हितसंबंधांशीं जुळतें करून घेणें ख्रिस्तियन याला जमेना. म्हणून सतत धीरानें वागणाऱ्या टॉमनें त्याला त्याची तब्बेत सुधारण्यासाठीं म्युनिक शहरीं धाडून दिलें. तिथें एका कुप्रसिद्ध दुर्वर्तनी नटीच्या सहवासांत तो अनेकदां दिसला अशा बातम्या येऊं लागल्यामुळें त्याच्या घरच्या मंडळींना फार दुःख झालें. पुढें एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या कन्येशीं टॉमनें समाधानकारक सोयरीक जमविली. गेर्डा जो हुंडा घेऊन सासरीं आली, त्याची या घराण्याच्या वैभवांत भर पडली. ती दिसायला मोहक होती. तिला संगीताची आवड होती. मेंगस्ट्रासवरील या कुटुंबाच्या प्रासादामध्यें पुन्हां मेजवान्या झडल्या.

टोनी एका सफरीवरून परत आली. प्रवासांत परिचय झालेला एक गृहस्थ आपल्याला घरीं भेटायला येईल अशी तिनें उमेद धरलेली होती. लवकरच हेर्र पेर्मानेडेर यांची स्वारी खरोखरीच तिला भेटायला आली. म्युनिक शहरीं हा बीयर मद्याचा यशस्वी व्यापारी होता. त्याची रासवट वागणूक व विचित्र प्रादेशिक बोली या मंडळींना आवडत नसली तरी टॉम आणि आईसाहेब यांना हा टोनीसाठीं समाधानकारक वर ठरेल असें वाटलें. दुसऱ्या लग्नांत पहिल्यापेक्षां कमी हुंड्याची मजबुती करून घेऊन टोनी आतां फ्राऊ पेर्मानेडेर होऊन म्युनिक शहरीं पतिगृहीं राहायला गेली. प्रथम पतीपासून झालेली आपली कन्यका एरिका हिला तिनें एका बोर्डिंग-शाळेंत शिकायला धाडून दिलें.

पुन्हां आपल्या वैवाहिक जीवनाविषयीं गाऱ्हाणीं गाणारीं हृदयद्रावक पत्रें ती माहेरीं धाडूं लागली. आपल्या पतीनें एका मोलकरणीवर प्रेम करून आपल्याला दगा दिला म्हणून रडत रडत ती माहेरीं परत आली. दुसऱ्यांदां घटस्फोट घेण्याच्या मनसुब्याचा टॉमनें निषेध केला पण टोनी आपला आग्रह सोडीना. तिनें यासंबंधांत आपल्या पतिराजांना पत्र लिहायला भावाचें मन वळविलें. पण आपले पतिराज या दाव्यामध्यें आपल्याला विरोध करायला तयार नाहींत इतकेंच नव्हे तर त्यांच्या मतें हें लग्न म्हणजे एक चूकच झाली असून

" मी घेतलेला हुंडा मला नको असल्यामुळें तो परत करीन " असें त्यांच्याकडून लिहून आलेलें कळल्यावर तिला आश्चर्यच वाटलें.

घराण्याचें नांव पुढें चालविण्यासाठीं टॉम आणि गेर्डा यांनीं एक पुत्र जन्माला घातला. छोटा योहान ऊर्फ हान्नो यानें आईचा संगीतप्रेमाचा वारसा घेतलेला होता, परंतु तो जन्मतःच पिकुटलेला व रोगिष्ट होता. मुलाच्या मनामध्यें घराण्याच्या धंद्याची आवड बाणविण्याचा प्रयत्न टॉमनें करून पाहिला, पण हान्नो फारच भिडस्त असल्यामुळें त्यानें वडिलांना प्रतिसाद दिला नाहीं.

आईसाहेबांच्या मृत्यूनंतर ख्रिस्तियन, टोनी व टॉम हीं तिघें एकत्र जमलीं आणि वारसा हक्कावरून त्यांनीं एकमेकांशीं खूप घासाघीस केली. ख्रिस्तियननें आपल्या हिश्शाचे पैसे मागितले, परंतु कारभारी या नात्यानें ते द्यायचें टॉमनें नाकारलें. ख्रिस्तियन संतापला. भावाशीं त्याचें कडाक्याचें भांडण झालें. आदल्या सगळ्या वर्षांचा सांठवून ठेवलेला त्याचा राग या वेळीं उसळून वर आला. भावनाशून्य, द्रव्यनिष्ठ टॉमवर त्यानें शिव्यांची लाखोली वाहिली.

टॉम तसा द्रव्यनिष्ठ नव्हता. तो इमानें इतबारें खूप मेहनत करी. परंतु आर्थिक फेरफारांमुळें गेल्या कांहीं वर्षांमध्यें धंद्याची घसरगुंडी झालेली होती. खूप प्रयत्न करूनहि ती त्याला सांवरतां आली नाहीं. त्याची प्रकृतीहि हल्लीं बरी नव्हती. रोगिष्ट ख्रिस्तियन हाच आपल्यापेक्षां अधिक जगणार असें त्याला वाटत होतें.

टोनीनें जांवई फार छान शोधून काढला. तरीहि एरिका आणि हेर विएनश्चेक यांच्या या लग्नाचा शेवटीं बट्ट्याबोळ होणार असें विधिलिखितच ठरलेलें होतें. जांवईबुवा कसले तरी गैरकायदा धंदे करीत असतांना मुद्देमालासकट सांपडले आणि त्यांना तीन वर्षें कैदेची शिक्षा झाली. जाहीर बदनामीची टोनीला आतां संवय झालेली होती. तिनें जांवयामुळें ओढवलेली ही नवी आपत्ति शांतपणें सहन केली. कन्या एरिका हिनेंहि आपल्या आईचीच वृत्ति अंगिकारली.

टॉमला अकस्मात् मरण आलें. तो बर्फांत घसरून पडला, त्याला घरीं आणून बिछान्यावर निजविलें आणि कांहीं तासांनीं त्यानें विचूकपणें बडबडत प्राण सोडला. त्याच्या मृत्यूमुळें इतर कुणापेक्षांहि टोनीची हानि अधिक झाली.

भावाच्या अंत्यसंस्कारासाठीं म्युनिक शहराहून ख्रिस्तियन आला खरा, परंतु त्याला स्वतःच्याच हालअपेष्टांची एवढी काळजी वाटत होती कीं, तिच्यापुढें भावाच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करायला त्याला वावच मिळाला नाहीं. त्याची भावजय गेर्डा ही कमालीची शोकाकुल झाली; कारण तिचा टॉमशीं झालेला विवाह हा खराखुरा प्रीतिविवाह होता.

मृत्युपत्राचें वाचन झाल्यानंतर ख्रिस्तियन आपल्या रखेलीशीं लग्न करायला म्युनिक शहराकडे चालता झाला. टॉमचें नियंत्रण होतें तोंपर्यंत त्याला या लग्नापासून अलिप्त राहावें लागलें होतें. त्यानंतर त्याच्या पत्नीचें लवकरच आपल्या नणंदेला पत्र आलें. त्यांत तिनें लिहिलें होतें : "तुमच्या बंधुराजांच्या आजारीपणाचा त्यांच्या मनावर फार वाईट परिणाम झाला. त्यामुळं मी त्यांना वेड्याच्या इस्पितळांत ठेवून दिलं आहे."

बुड्डेनब्रूक कुटुंबाच्या वडिलार्जित घरांतील व्यवहार यथाक्रम चालू होते. छोटा हान्नो स्त्रियांच्या परिवारांतच लहानाचा मोठा झाला. त्याला विशेष बळ असें कधीं लाभलेंच नाहीं. पंधरा वर्षांच्या वयाला किडकिडीत व रोगिष्ट अवस्थेंत तो विषमज्वराच्या सांथीमध्यें मरून गेला.

बुड्डेनब्रूक वंशाचा शेवटचा दिवा अशा प्रकारें मालवला. पहिला योहान यानें आपल्या हुशारीच्या व सामर्थ्याच्या बळावर फार छान धंदा व आरोग्य-संपन्न आणि तडफदार वंशवृक्ष निर्माण केला. त्या काळापासून तों हान्नोच्या मृत्यूमुळें खलास झालेल्या शेवटच्या अनुकंपनीय चिमुकल्या पिढीपर्यंतचा आढावा घेतला तर बुड्डेनब्रूक घराण्याचा ऱ्हास होत होत तें शेवटीं शून्यामध्यें विलीन झालें असाच निष्कर्ष निघतो.

द कबाला

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : थॉर्नटन वाइल्डर (१८९७-). कथानकाचा प्रकार : कल्पनेची स्वैर भरारी. काळ : सुमारें १९२०. स्थळ : रोम. प्रथम प्रकाशन : १९२६.

प्रमुख पात्रें : सॅम्युएले, तरुण अमेरिकन विद्यार्थी; हा लेखक असतो. जेम्स ब्लेअर, त्याचा मित्र. द डचेस द'आक्किलानेरा, कबाला पंथाची अनुयायी (कबालिस्ट). मार्कान्टोनियो, तिचा पुत्र. कार्डिनल व्हैनी,

माजी चिनी मिशनरी. आस्त्रेये-ल्यूचे द मॉफॉन्तें, धर्मवेडा. लिक्स-द' एस्पोली, ही जेम्स ब्लेअर याच्या प्रेमांत सांपडलेली असते.

समीक्षण : थॉर्नटन वाइल्डर याचें बहुतेक सगळें वाङ्मय कमी अधिक प्रमाणांत अपूर्व याच सदरांत पडतें. 'द कबाला' ही कादंबरी देखील वरील विधानाला अपवाद नाहीं. वस्तुतः ही शब्दचित्रांची एक मालिका आहे. स्थलविशेष आणि समानशील लोकांचा एक गट यांच्या योगानें या मालिकेला एकसूत्रीपणा आलेला आहे. बिनखिस्ती रानटी लोकांचे वृद्ध व दुबळे झालेले देव यांच्या संबंधांतील कथा निवेदन करणारी ही कल्पनेची अद्‌भुतरम्य भरारी आहे. खिस्ती धर्म आणि आधुनिक समाज यांच्यामुळें या देवांच्या कपाळीं निराशा, वेड आणि मृत्यु हेंच भवितव्य वाढून ठेवलेलें आहे. प्यूरिटन-पंथीय पूर्वसंस्कार असलेला एक अमेरिकन तरुण त्यांच्या पराभवाची हकीगत सांगतो. त्यांच्या रानटी सामर्थ्याचा व अभिमानाचा अशा प्रकारें उपरोधिक शेवट होतो.

कथानक : आपला मित्र जेम्स ब्लेअर याजसमवेत सॅम्युएले हा रोम शहरीं गेला. तिथें कबाला नामक विशिष्ट गट अस्तित्वांत आल्याचें त्याला कळलें. या गटाचे सदस्य श्रीमंत सरदार घराण्यांतले असून बुद्धिमान व कर्मकांडामध्यें कुशल आहेत आणि धर्मपीठ व राज्यसंस्था या दोन्ही क्षेत्रांतील घडामोडींवर त्यांचा विलक्षण प्रभाव असतो, अशी माहिती त्याला मिळाली. ब्लेअर याचें पुस्तकी ज्ञान बरेंच होतें आणि या गटांतील कांहीं लोकांशीं त्याचा परिचय होता. रोमन समाजांतील या विचित्र वर्तुळामध्ये त्यानें आपल्या मित्राला आणून सोडलें. सॅम्युएले हा लवकरच या कबालिस्ट मंडळींचा आवडता झाला.

या मंडळीपैकीं एक होती, डचेस द'आक्किलानेरा. तिच्या मनाला एक मोठी समस्या भंडावून राहिलेली होती. तिचा सोळा वर्षें वयाचा पुत्र मार्कान्टोनियो याचीं निरनिराळ्या स्त्रियांसंबंधांत पांचसहा प्रेमप्रकरणें चाललेलीं होतीं. मुलाच्या अंगवळणीं पडलेल्या अस्थिर वृत्तीमुळें ती चिंताक्रांत झालेली होती. त्याचें तिनें लग्न ठरवून ठेवलें होतें, परंतु त्यानें वागणूक बदलल्या-खेरीज हें लग्न होणार नव्हतें. ती सॅम्युएले याला आग्रहपूर्वक म्हणाली : "तुम्ही आठवड्याच्या सुटीदिवशीं माझ्या हवेलींत राहायला या. माझ्या मुलाशीं चार शब्द बोला. तो ज्या प्रकारचं जीवन जगतो आहे त्यांत त्याच्या हातून

काय काय चुका होत आहेत त्या त्याला दाखवून द्यायचा प्रयत्न करा. " हा सगळाच प्रकार हास्यास्पद आहे असें समजून सॅम्युएले यानें ही गोष्ट करायला नकार दिला. यानंतर डचेसचा एक मित्र कार्डिनल व्हैनी याजबरोबर त्याचें याच विषयावर बोलणें झालें. कार्डिनल म्हणाला : " आपल्या अधिक वयस्कर मित्रांचं अनुकरण करीत करीतच मार्कान्टोनियो यानं आपल्या विलक्षण कर्तबगारीला प्रारंभ केला. मागाहून त्याला या दुर्वर्तनाची संवय लागली आणि शेवटीं ही अनैतिकता त्याच्या स्वभावामध्यें दृढमूल झाली. " मुलाच्या स्वभावाचें हें वर्णन ऐकून सॅम्युएले याला तर हादराच बसला. डचेसच्या विनंतीनुसार तिच्या हवेलीवर जायला तो एकदांचा कबूल झाला.

मोटारी जास्तींत जास्त वेगांत चालविण्याची मार्कान्टोनियो याला फार आवड होती. " मी ऑलिम्पिक खेळांच्या सामन्यांत भाग घेण्यासाठीं शिक्षण घेऊं इच्छितों, " असेंहि त्यानें सॅम्युएले याला सांगितलें. प्रेमसंबंधांतील त्याच्या उल्लूपणाला अनुलक्षून सॅम्युएले यानें त्याची अत्यंत कठोर शब्दांत कानउघाडणी केली. दुसऱ्या दिवशीं मार्कान्टोनियोनें गॅलरींतून उडी टाकून जीव दिला.

या प्रकारामुळें सॅम्युएले याला धक्का बसला आणि दुःख झालें. परंतु लवकरच दुसऱ्या एका कबालिस्टाच्या विलक्षण वागणुकीच्या भानगडींत तो गुंतला. ही होती प्रिन्सेस आलिक्स द'एस्पोली. ज्या पुरुषांना आपल्याविषयीं आकर्षण वाटण्याची सुतराम शक्यता नाहीं, अशा पुरुषांच्या हमखास प्रेमांत पडायची तिला संवय लागलेली होती. ती सुंदर होती; मोहक होती; पण तिला अक्कल फारच कमी होती. ही उणीव भरून काढण्यासाठीं तिनें बोलण्याची एक विशिष्ट धाटणी प्रयत्नपूर्वक आत्मसात केली. ऐकणाऱ्याला तिचें हें बोलणें चटकदार व प्रभावी वाटे. भोजनप्रसंगीं तिचा सहवास लोकांना आनंददायक होत असे. परंतु ती फारच थोडीं निमंत्रणें स्वीकारी.

एके दिवशीं ती सॅम्युएले याला भेटायला त्याच्या बिऱ्हाडीं गेली. तिथें तिला जेम्स ब्लेअर भेटला. हा माणूस उर्मट होता, तरी देखील ती त्याच्यावर फिदा झाली आणि तिनें त्याचें प्रेम जिंकून घेण्यासाठीं जय्यत तयारी केली. सहज बोलण्याच्या ओघांत ब्लेअरनें एका पुस्तकाचा निर्देश एकदां केलेला होता. तें त्यानें तिला दिलें. आपला विजय झाला अशी तेवढ्या एका गोष्टी-

वरून तिची खात्री पटली. त्यानें बोलावलें नसतांनाच ती त्याच्या खोलीवर जाऊं लागली. या प्रकारामुळें तो बेचैन झाला. तेव्हां सॅम्युएले यानें त्याला सुचविलें: " यांतून सुटका करून घ्यायला तुला एकच मार्ग उपलब्ध आहे. तूं हें शहर सोडून निघून जा. " त्याप्रमाणें तो स्पेनच्या दौऱ्यावर निघून गेला. त्यानंतर तिनें शहरांतील जीवनाशीं समरस होऊन स्वतःला विसरण्याला क्रम चालू केला. ती सर्व प्रकारचीं निमंत्रणें स्वीकारूं लागली. निरनिराळ्या लोकांशीं आपल्या ओळखी करून घेण्याच्या कामीं ती स्वतः देखील पुढाकार घेऊं लागली. निरनिराळ्या प्रकारच्या आनंदांचा एकसारखा उपभोग घेण्यांत तिला सुख वाटत असल्याचें दिसलें. ब्लेअरचा तिला विसर पडला तर फार बरें होईल असें सॅम्युएले आपल्या मनाशीं म्हणत होता.

एक महिन्यानंतर ब्लेअरचें आपल्या मित्राला पत्र आलें. त्यांत त्यानें लिहिलें : " मी रोम शहरीं परत येत आहे. " " येवढ्यांत तूं इकडे येऊं नकोस. तिकडेच राहा. " सॅम्युएले यानें असा इशारा देणारें पत्र त्याच्याकडे धाडलें. परंतु " प्राचीन गुप्त संस्थांचें मी जें संशोधन चालविलेलें आहे, त्याच्यासाठीं मला रोम शहरीं परत येणें भाग आहे, " असा ब्लेअरनें आग्रह धरला. तो परत आल्यावर एके रात्रीं दोघे मिळून एका प्रख्यात ऋषीला भेटायला गेले. एका प्राचीन रोमन राजवाड्यामध्यें हा ऋषि परलोकविद्येचा प्रयोग करीत होता. ते दोघे तिथें असतांना नखशिखान्त बुरखा घेतलेली एक स्त्री आंत आली आणि तिनें त्या ऋषीकडे धांव घेऊन कसल्या तरी बाबतींत तिनें त्याच्याकडे मदतीची याचना केली. ती आलिक्स बाईच आहे अशी तिची ओळख पटल्याबरोबर सॅम्युएले व ब्लेअर या दोघांनीं तिथून सटकण्याचा प्रयत्न केला, पण खोलींतून बाहेर जाणें त्यांना साधायच्या अगोदरच त्या बाईनें त्यांना पाहिलें. तेवढ्यांत ती स्वतःच एकाएकीं रागारागानें तिथून निघून गेली. मागाहून सॅम्युएले याच्या कानावर अशी बातमी आली कीं तिला आतां ललित कलांविषयीं गोडी वाटूं लागली असून ती संगीताचा अभ्यास करीत आहे. ती ग्रीसच्या सफरीवरहि निघाली, परंतु कांहीं एक खुलासा न करतां अचानक परत आली. प्रियकर शोधायचा तिचा खटाटोप अजून चालूच आहे असें कांहींजण म्हणाले. लोक तिच्याविषयीं भलभलत्या गोष्टी अधिकाधिक प्रमाणांत बोलूं लागले.

एके दिवशीं तिच्यासमक्ष एक डॅनिश पुराणवस्तुसंशोधक म्हणाला : "माझी व ब्लेअरची भेट झाली." त्याचें नांव ऐकतांक्षणीं ती बेशुद्ध होऊन पडली.

आस्ट्री-ल्यूचे द मॉर्‌फॉन्तेन या अत्यंत धर्मनिष्ठ बाईच्या सहवासांतहि सॅम्युएले यानें बराच वेळ घालविला. आयरीन एच्‌. स्पेन्सर या अमेरिकन शिक्षिकेच्या नांवांतील आद्याक्षरांमध्यें कसला तरी दैविक अर्थ आहे असें तिनें मत दिलें. "पेलिकन" (पाणगरुड) या पक्षिविशेषाविषयीं कुणी तरी तुच्छतादर्शक उद्गार काढलेले एका प्रसंगीं तिनें ऐकले. त्याबरोबर तिला भलताच राग आला. कारण हा पक्षी म्हणजे पावित्र्याचें प्रतीक आहे असें तिचें मत होतें. प्रार्थनेवर तिची नितान्त श्रद्धा होती. एके दिवशीं कार्डिनल महाशय यांनीं प्रार्थनेचा उपहास करणारे उद्गार काढले, त्याबरोबर तिला रडूं कोसळलें. कार्डिनल महाशय यावर तिला म्हणाले : "तूं क्लेश असे कधींच सहन केलेले नाहींस. तुला क्लेश सहन करणं म्हणजे काय हें मुळीं ठाऊकच नाहीं." हें ऐकून तिच्या श्रद्धेला जबरदस्त हादरा बसला. तिनें कार्डिनल महाशयांना आपल्या घरीं भोजनाला येण्याचें आमंत्रण दिलें. ते घरीं आल्यावर तिनें त्यांच्यावर "तुम्ही सैतान आहांत" असा आरोप केला, पिस्तुल बाहेर काढलें आणि त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांना कसलीच इजा झाली नाहीं. पण मागाहून त्या उभयतांची दिलजमाई होणें अशक्य ठरलें. कार्डिनल महाशयांनीं आपल्या मिशनरी कार्यासाठीं चीनला परत जाण्याचें ठरविलें. वाटेंत त्यांना कसला तरी ताप आला. त्यांतच ते मरण पावले. त्यांचें दफन समुद्रांत करण्यांत आलें.

या कब्बाला संस्थेची एक अमेरिकन सदस्या होती. तिचें नांव मिस एलिझाबेथ प्रायर. रोम शहर सोडून निघून जाण्यापूर्वी सॅम्युएले या बाईला भेटायला गेला. या कब्बाला संस्थेचे हे स्त्रीपुरुष सदस्य आहेत तरी कोण, हे त्याला तिच्याकडून शेवटीं एकदांचें कळलें. हे लोक म्हणजे युरोपखंडांतील जुन्या काळचीं रानटी दैवतें होतीं. हीं दैवतें आतां वृद्ध झालेलीं होतीं. प्राचीन ज्ञानविज्ञानाचें चिंतन तीं करीत राहिलीं. सर्वसामान्य मानवजातीला जीं दुःखें भोगावीं लागतात, जो मूर्खपणा तिच्या वांट्याला येतो, या सगळ्यांच्या तावडींतून सुटण्यासाठीं हें चिंतन त्यांच्या कामीं येणें अशक्य झालें. ती

म्हणाली: "तूं स्वतः नव्या मर्क्युरी (बुध) देवाचा अवतार आहेस असं माझं श्रद्धाळू मन मला सांगतंय." हें ऐकून सॅम्युएले भलताच गोंधळून गेला. न्यू इंग्लंडमधील कुलपरंपरेंत लहानाचा मोठा झालेला हा अमेरिकन तरुण या कल्पनेच्या श्रवणानें बेचैन झाला. त्याला यावर काय बोलावें हेंच सुचेना.

सीझर ऑर नथिंग : "खाईन तर तुपाशीं !"

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : पायो बारोजा (१८७२-). कथानकाचा प्रकार : राजकीय उपहासिका. काळ : विसाव्या शतकाचा आरंभ. स्थळ : स्पेन, इटली, फ्रान्स. प्रथम प्रकाशन : १९११.

प्रमुख पात्रें : लॉरा, मार्शसा ऑफ वाक्कारोने, हिचें पूर्वीचें नांव लॉरा मोन्काडा असें होतें. सीझर मोन्काडा, लॉराचा भाऊ. आम्पारो, सीझरची पत्नी. इग्नाशियो आल्झुगारे, सीझरचा स्नेही.

समीक्षण : सामान्य माणसाच्या सुधारलेल्या सामाजिक दर्जाला लेखक बारोजा याच्या मतें स्पॅनिश समाज जीवनांतील ज्या घटकांचा विरोध होता, त्यांचा वक्रोक्तिपूर्ण उपहास करण्यासाठीं त्यानें 'सीझर ऑर नथिंग' ही राजकीय कादंबरी लिहिली. हे घटक म्हणजे सरदार घराण्यांतले लोक आणि धर्ममार्तंड. तीस वर्षांपूर्वीं ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या कांहीं घडामोडी स्पेनमध्यें घडल्या त्यांच्या अनुरोधानें ही कादंबरी चित्तवेधक ठरते.

कथानक : युआन गुइलेन वाटमारीचा धंदा करी. तो व्हिल्लानुएवा येथील राहणारा. त्याची कनिष्ठ कन्या व्हिसेन्टा ही माणसांतून उठली. मग ती व्हॅलेन्सिया शहरीं गेली आणि तिथें किराणा मालाचा दुकानदार आन्टोनियो फोर्ट याच्याशीं तिनें लग्न केलें. युआनचा ज्येष्ठ पुत्र फ्रान्सिस्को हा धर्मोपदेशक झाला आणि त्यानें आपलें नांव बदलून फ्रे जोस द कालासांझ द व्हिल्लानुएवा हें नवें नांव धारण केलें. व्हिन्सेन्टा हिचा पुत्र युआन फोर्ट हाहि धर्मोपदेशक झाला आणि त्यानें फादर व्हिन्सेंट द व्हॅलेन्सिया हें नांव धारण केलें. मागाहून त्याला बढती मिळून तो कार्डिनल फोर्ट झाला. त्याची बहीण इसाबेल हिनें कार्लोस मोन्काडा या सैनिकाशीं लग्न केलें. इसाबेल व कार्लोस यांना दोन अपत्यें झालीं. मुलगा सीझर मोन्काडा आणि मुलगी लॉरा. या लॉराला मागाहून मार्शसा ऑफ वाक्कारोने हें नामाभिधान मिळालें.

कौटुंबिक परंपरेला धाब्यावर बसवून सीझरनें धर्मोपदेशक होण्याच्या कल्पनेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. त्यानें निरनिराळ्या शाळांमध्यें हजेरी लावली, परंतु तिथें ज्या विषयांचें शिक्षण मिळत होतें त्यांची त्यानें मुळीं पर्वाच केली नाहीं. आपण एका निश्चित कामासाठीं जन्माला आलेलों आहोंत अशी त्याला स्वतःला खात्री वाटली आणि या कार्याप्रीत्यर्थ त्यानें स्वतःची तयारी आरंभली. त्याच्या योजनांमध्यें विद्वत्ता संपादण्यास योग्य अशा विषयांना थारा नव्हता. माद्रिद् येथील शाळेंत त्याला इग्नासियो आल्झुगारे भेटला. हा त्याचा आजीव जीवश्च कंठश्च स्नेही झाला. पॅरिस शहरांतील एका बँकेंत नोकरीला असलेला एक स्पॅनिश लेखक कार्लोस याझ्री याच्याशींहि त्याची गांठ पडली. त्याच्या मार्फत सीझरला सट्टेबाजीची गोडी लागली. शेअर बाजारांत सट्टे खेळण्यासाठीं उपयुक्त अशी एक रीत सीझरनें तयार केली. ती रीत काय आहे या विषयींचा खुलासा त्याला ठामपणें करतां येत नव्हता. या रीतीचा प्रयोग करून पाहायला त्या वेळीं त्याच्याजवळ पैसाहि नव्हता.

सीझर आणि लॉरा हीं बहीणभांवडें रोम शहरीं गेलीं. तिथें फॅशनेबल समाजांत लॉरा लोकप्रिय झाली. सीझरला मात्र सामाजिक भेटीगांठींचे कार्यक्रम, कला आणि प्राचीन रोम शहरांतील ऐतिहासिक अवशेष यांपैकीं कशाचीच पर्वा नव्हती. कांहीं काळानंतर त्याची कांहीं महत्त्वाच्या व्यक्तींशीं जानपछान ही झालीच. त्यांपैकींच कौंटेस बेन्डा ही एक होती. हिच्याशीं त्यानें लगट केली.

त्यांचा मामा कार्डिनल फोर्टे यानें त्यांच्या बरोबर वाटाड्या म्हणून हिंडण्यासाठीं ॲबे प्रेसिओझी याला धाडून दिलें. सीझरला आपल्या मामा-विषयीं अजिबात आदर नव्हता. मामाच्या उच्च पदाविषयीं भाच्याचीं स्पष्ट मतें काय आहेत हें जर कार्डिनलच्या कानावर ॲबेनें जाऊन घातलें तर त्याची त्याला मुळींच पर्वा नव्हती. आपल्याला आर्थिक क्षेत्रांतील हुकुमशहा होण्यासाठीं मदत करायला तयार होतील असे लोक शोधून काढायची खटपट त्यानें चालविली. या कामीं त्यानें ॲबेच्या मध्यस्थीचा उपयोग केला. फादर देरेंओस आणि फादर मीरो यांचा या बाबतींत विचार घ्यावा असें त्याला मार्गदर्शन मिळालें. परंतु त्याच्या या कारस्थानाची कुणकुण मामाच्या कानावर गेली आणि मामानें त्याची ही खटपट बंद पाडली.

आर्चिबाल्ड मार्चमॉन्ट याचें लॉराशीं प्रेम जमलें. उभयतांचें लग्न झालें पण त्यांत त्यांना सुख लागलें नाहीं. मार्चमाँटची प्रथम पत्नी सुसान्ना हिचें इकडे सीझरवर मन बसलें. ती व सीझर या दोघांनीं मिळून पतिपत्नी म्हणून एक सफर केली. रोम शहरांतील मुक्कामांत केनेडी नामक एका इंग्रज गृहस्थाशींहि सीझरची ओळख झाली. त्याच्याकडून त्याला रोमच्या इतिहासाविषयीं आणि बोर्गिया घराण्याच्या इतिहासाविषयीं बरीच माहिती मिळाली. "सीझर ऑर नथिंग" हें सीझर बोर्गियाचें ब्रीदवाक्य ऐकून सीझर मोन्काडा याच्या सुप्त महत्त्वाकांक्षेला प्रतिसाद मिळाला. रोम शहरीं "ब्लॅक पार्टी" (मुसोलिनीचा फॅसिस्ट पक्ष) या पक्षाच्या ज्या सभासदांचे ऋणानुबंध स्पेनशीं आहेत त्यांची माहिती टिपून घेण्याचें काम सीझरनें आरंभलें. आपण हें कां करतों आहोंत, याचें कारण मात्र त्याचें त्यालाच कळेना.

एके दिवशीं सिस्टिने चॅपेल या प्रार्थनामंदिरांतून बाहेर येतां येतां सीझर व केनेडी यांना एक स्पॅनिश चित्रकार भेटला. त्यानें स्पेनमधील झामोरा प्रांताचा आमदार व राजकीय पुढारी डॉन कॅलिक्स्टो याच्याशीं त्या दोघांची ओळख करून दिली. या आमदाराचें जेवणाचें निमंत्रण सीझरनें स्वीकारलें आणि रोम शहरांतील प्रेक्षणीय स्थळें दाखविण्यासाठीं त्याचा वाटाड्या होण्याचेंहि कबूल केलें. या आमदाराला त्याचें कौतुक वाटलें आणि त्यानें सहज थट्टेनें "मला आमदारकी मिळवून द्यायचा विचार कराल का?" अशी विचारणा केल्याबरोबर त्याला होकार देऊन सांगितलें : "तुम्ही स्पेनला केव्हांहि परत याल त्या वेळीं कॅस्ट्रो डुरो या जिल्ह्याच्या वतीनं तुमचं नांव मी उमेदवार म्हणून सुचवीन."

स्पेनला परत गेल्यावर त्यानें या आमदाराला आपल्या आश्वासनाची आठवण करून दिली. हुजूरपक्षीय उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्याचें ठरवून सीझरनें मतदारांच्या भेटीगांठी घेण्यासाठीं आणि जिल्ह्यांतील राजकीय क्षेत्रांतल्या सगळ्यांत महत्त्वाच्या व्यक्ति कोण कोण आहेत हें निश्चितपणें माहीत व्हावें म्हणून आपल्या मतदारसंघांतून एक दौरा काढला. डॉन प्लॅटोन पेरिबानेझ आणि आन्टोनियो सान रोमान हे दोन गृहस्थ चांगलेच वजनदार आहेत असा त्याला पत्ता लागला. त्याचप्रमाणें एका मठाचे प्रायर (अधिपति) फादर मार्टिन लाफुरेन्झा यांचेंहि त्या जिल्ह्यामध्यें आणि आसपासच्या

भागांत बरेंच राजकीय वजन आहे असें त्याला कळून आलें. सीझरचा स्नेही इग्नाशियो आल्झुगारे हा स्वतः जिल्ह्यांत येऊन हजर झाला आणि यानें आपल्या मित्राला अनेक मार्गांनीं मदत केली. आमदार डॉन कॅलिक्स्टो याच्या घरीं त्याची पुतणी आम्पारो हिच्याशीं सीझरचा परिचय झाला. परंतु आरंभीं आरंभीं त्या दोघांचें नीट जमेना. मात्र पुढें तीं दोघें एकमेकांच्या प्रेमांत सांपडलीं आणि त्यांनीं लग्न करायचा बेत योजून ठेवला.

निवडणुकींत सीझरनें आपले दोघे प्रतिस्पर्धी गार्सिया पाडिला आणि सान रोमान यांचा पराभव केला आणि तो आमदार म्हणून माद्रिदला जाण्या-साठीं जिल्ह्याचें ठिकाण सोडून रवाना झाला. राजधानींत राजकारणाचीं सूत्रें मागें राहून हालविणाऱ्या मडळींत त्याचें वजन बरेंच वाढलें. अर्थमंत्र्यावर एक अरिष्ट ओढवलें तेव्हां मंत्रिमहाशयांनीं सीझरला एका आर्थिक तज्ज्ञाची भेट घ्यायला पॅरिसला धाडून दिलें. आलेल्या गंडांतरांतून मंत्रिमंडळाला वांचविण्याची एक योजना या तज्ज्ञाजवळ तयार होती. मंत्र्याच्या कारभारा-विषयीं सीझरला संशय आला आणि त्यानें सट्टेबाजीची अशी एक पक्की योजना तयार केली कीं जेणेंकरून त्याला स्वतःला खूप श्रीमंत होतां यावें आणि मंत्र्याची मात्र अधिकारपदावरून हकालपट्टी व्हावी.

सट्टयाच्या व्यवहारांत मिळविलेल्या पैशाचा विनियोग जिल्ह्यांत अनेक सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं तो करूं लागला. त्यानें पाणीपुरवठ्याची सोय अधिक चांगली करून दिली आणि त्यानें पूर्वींच स्थापन केलेल्या कामगारांच्या क्लबासाठीं एक ग्रंथालयहि चालू केलें. यांत भरीला भर म्हणून त्यानें हुजूरपक्षाला टांग मारली आणि नेमस्त पक्षाचें सभासदत्व पतकरलें. दरम्यान जिल्ह्यांतील प्रतिगामी गट कांहीं स्वस्थ बसलेला नव्हता. काम-गारांच्या क्लबाशीं प्रतिस्पर्धी अशा अनेक संस्था व संघटना या गटानें स्थापन केल्या आणि कामगारांची संघटना मोडून काढण्यासाठीं सूक्ष्मासूक्ष्म अशा सर्व प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला. याचा परिणाम असा झाला कीं सीझरचे अनुयायी आणि हा प्रतिगामी गट यांच्या दरम्यान शीतयुद्ध सुरू झालें. या ताणामाणीच्या परिस्थितींतच सीझर आणि आम्पारो यांनीं लग्न केलें.

सीझरच्या गटांतील त्यांतल्या त्यांत भित्र्या लोकांना दमदाटी देऊन नामोहरम करण्यासाठीं "ड्रिव्हेलर" नामक इसमाला फादर मार्टिनच्या

अनुयायांनीं पैसे देऊन कामावर नेमलें. या " ड्रिव्हेलरनें " " द क्लब-स्लट " नामक इसमाच्या "लेन्दी" नामक मुलाशी आणि "गॅफर" नामक दुसऱ्या एका इसमाशीं भांडण उकरून काढलें. या मारामारींत " लेन्दी " ठार झाला. हा प्रकार फादर मार्टिन पुरस्कृत प्रतिगाम्यांच्या सांगीवरून झाला असला पाहिजे अशी कामगारांची खात्री असल्यामुळें कामगारांनीं या खुनाचा बदला घेण्यासाठीं गिल्ला चालविला. " क्रब-स्लट " आणि " ड्रिव्हेलरची " आई यांनीं " ड्रिव्हेलरचे " प्राण वांचविण्यासाठीं सीझरजवळ रदबदली केली. मात्र त्यांचीं कारणें वेगवेगळीं होतीं. " क्रब-स्लट " याला स्वतःच त्याच्यावर सूड उगवायला हवा होता, आणि आईला आपल्या मुलाला वांचवायला हवें होतें. या प्रकारामुळें सीझर बुचकळ्यांत पडला आणि म्हणून तो आम्पारोला बरोबर घेऊन लॉराची भेट घ्यायला इटलीला निघून गेला. तो राजकारणांतून निवृत्त होऊं इच्छितो हेंच ही त्याची कृति दर्शविते असा सगळ्यांचा समज झाला.

खुद्द स्पेनमध्यें राजकीय परिस्थिति अधिकच चिघळली. डॉ. ऑर्टिगोसा, आन्टोनियो सान रोमान आणि सामागो या आपल्या उदारमतवादी मित्रांचें एक पत्र मिळाल्यावर सीझरनें राजकारणांतून निवृत्त होण्याचें रहित केलें. तो आपल्या जिल्ह्यांत परत आला आणि पुन्हां लढ्याच्या धुमश्चक्रींत सामील झाला.

ही लढाई थेट पुढच्या निवडणुकीपर्यंत चालू राहिली. एके दिवशीं "क्रब-स्लट "नें एक चिठी सीझरकडे धाडली आणि ही त्यानें भ्रांतचित्त मनःस्थितींत आपल्या खिशांत ठेवून दिली. तसाच तो जिल्ह्यांत दौऱ्यावर निघाला आणि त्याची गाडी एका चव्हाठ्यावर आली असतांना एका मारेकऱ्यानें त्याला जखमी केलें. " क्रब-स्लट " ची चिठी जर त्यानें अगोदर वाचली असती तर त्याच्यावर हा गोळीबार झाला नसता. त्याच्या खुनाचा हा प्रयत्न झाल्यानंतर उदारमतवादी पक्षाचें सामर्थ्य घटूं लागलें; विरोधी पक्षानें त्याचा पराभव करण्यासाठीं शक्य त्या सर्व मार्गांचा अवलंब केला. मतपेट्या फोडून त्यांत खोट्या मतपत्रिका भरण्यांत आल्या. मतपेट्या घेऊन जाणाऱ्या सरकारी नोकरांवर वाटेंत हल्ले करून त्या मतपेट्या त्यांच्याकडून हिसकून घेऊन त्यांच्याऐवजीं खोट्या मतपत्रिका असलेल्या मतपेट्या ठेवण्यांत आल्या. मतदानाच्या जागा मतदारांना कळूं नयेत आणि त्या जागा फक्त प्रतिगामी मतदारांनाच माहीत

होतील अशी तजवीज करण्यांत आली. याचा परिणाम असा झाला कीं पाडिल्ला यानें निवडणुकींत विजय मिळविला. सीझर मोन्काडा राजकारणांतून निवृत्त झाला आणि विचित्र प्रकार असा कीं त्यानें पुरातन वस्तूंचा संग्रह करणें आणि प्राचीन कॅस्टिलियन चित्रांचा अभ्यास करणें या कार्यांना स्वतःला वाहून घेतलें. जिल्ह्याची सुधारणा करण्यासाठीं त्यानें तयार केलेल्या योजनांचा सगळ्यांना विसर पडला. कारण प्रतिगामी गटांचें आतां जिल्ह्यामध्यें वर्चस्व प्रस्थापित झालें होतें आणि त्यांनीं तें कायम ठेवलें. सीझर हा सीझर झालाच नाहीं. तो "नथिंग" (शून्यवत्) झाला.

केक्स अँड एल : रोट्या आणि मद्य

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : सॉमरसेट मॉम (१८७४-). कथानकाचा प्रकार : वाङ्मयीन उपहासिका. काळ : विसाव्या शतकाचा आरंभ. स्थळ : लंडन आणि केंट परगणा. प्रथम प्रकाशन : १९३०.

प्रमुख पात्रें : ॲशेन्डेन, एक लेखक. अल्रॉय कीयर, एक लोकप्रिय कादंबरीकार. एडवर्ड ड्रिफफील्ड, व्हिक्टोरिया राणीच्या काळांतील एक थोर व्यक्ति. रोझी, ड्रिफफील्ड याची प्रथम पत्नी. ॲमी ड्रिफफील्ड, ड्रिफफील्ड याची द्वितीय पत्नी. जॉर्ज केंप, रोझीचा प्रियकर.

समीक्षण : या कादंबरीच्या लेखनांतील विनोदाची छटा वर्णनातीत आहे. ॲशेन्डेन याला माहीत असलेला खरा ड्रिफफील्ड आणि कादंबरीकार अल्राय कीयर याचें ड्रिफफील्डविषयींचें मत या दोहोंतील तुलनात्मक भेद सादर करून लेखकानें साहित्य-क्षेत्रांतील बनवाबनवीचे प्रकार उघड करून दाखविले आहेत आणि ड्रिफफील्डच्या स्वभावाचें सखोल निरीक्षण सादर केलें आहे. अधूनमधून कथेच्या निवेदनांत खंड पाडून लेखक साहित्यिक प्रश्नांवर निखट टीकास्त्र सोडतो. साहित्यिक लोक आणि वाङ्मयीन दुनिया यांच्याविषयीं गोडी असणाऱ्या वाचकाला 'केक्स अँड एल' ही कादंबरी विशेषतः वाचनीय ठरते.

कथानक : आपल्या काळांतील सगळ्यांत जास्त लोकप्रिय कादंबरीकार अल्रॉय कीयर यानें आपला स्नेही व दुसरा एक लेखक ॲशेन्डेन याच्या सहवर्तमान दुपारच्या भोजनाचा कार्यक्रम मुक्रर केला. तशी कीयर याजवर

ॲशेन्डेन याची भक्ति होती, परंतु आपल्याला मिळालेलें हें भोजनाचें निमंत्रण कांहीं तरी हेतु मनांत ठेवून दिलेलें आहे असा त्याला संशय आला. त्याचा हा संशय खरा ठरला. मागल्या शतकांतील एक प्रख्यात इंग्रज लेखक परलोकवासी एडवर्ड ड्रिफ्फील्ड याजविषयीं कीयरला बोलायचें होतें. या वृद्ध लेखकाच्या ग्रंथांची कीयरनें खूप स्तुति केली. परंतु ॲशेन्डेन म्हणाला : " मला ड्रिफ्फील्ड हा असामान्य लेखक असा कधींच वाटला नाहीं." " ड्रिफ्फील्डच्या आयुष्यांतल्या शेवटच्या कांहीं वर्षांच्या काळांत माझी त्याच्याशी फार चांगली जानपछान होती. त्याची विधवा द्वितीय पत्नी हिच्याशीं माझा अजूनहि स्नेह आहे, " अशी हकीगत कीयरनें मोठ्या उत्साहानें सांगितली. कसलीहि खास कामगिरी करण्याची विनंति कीयरकडून न येतांच भोजन आटोपलें. या प्रकारामुळें ॲशेन्डेन बुचकळ्यांत पडला.

आपल्या बिऱ्हाडीं परत आल्यानंतर ॲशेन्डेन चिंतन करूं लागला. ड्रिफ्फील्ड याची व आपली पहिली भेट कशी झाली हें त्याला आठवलें. त्या वेळीं ॲशेन्डेन किशोर वयांत होता. केंट परगण्यांतील समुद्रकांठीं असलेल्या ब्लॅकस्टेबल या गांवीं तो सुटींत घरीं आलेला होता. त्याचा मामा या गांवचा पुरोहित होता आणि त्याच्याचकडे तो राहत होता. मामाच्या हाताखालचा उपपुरोहित याच्याशीं ड्रिफ्फील्ड बोलत बसलेला असतांना ॲशेन्डेन त्याला भेटला. हा लेखक तसा अगदींच सामान्य माणूस आहे असें त्या मुलाचें मत झालें. ड्रिफ्फील्डनें तरुणपणीं घरांतून निघून जाऊन बराच उल्लूपणा केला आणि त्यानंतर गांवच्या गुत्त्यांतील एका मोलकरिणीशीं लग्न केलें अशी त्याच्या पूर्वचरित्राविषयींची माहिती आपल्या मामाकडून या मुलाला कळली.

कीयर बरोबर भोजन केल्यानंतर दोनतीन दिवसांनीं ड्रिफ्फील्डच्या विधवा पत्नीकडून ॲशेन्डेन याला एक चिठी आली. ब्लॅकस्टेबल या गांवीं आपली भेट घ्यायला येण्याविषयीं तिनें त्याला लिहिलें होतें. ती चिठी पाहून तो बुचकळ्यांत पडला. त्यानें कीयरला टेलिफोन केला. मी समक्ष भेटून या बोलावण्याचा खुलासा करतों, असें कीयरनें त्याला सांगितलें.

मिसेस ड्रिफ्फील्ड हिला ॲशेन्डेन फक्त एकदांच भेटलेला होता. ड्रिफ्फील्ड हयात असतांना कित्येक वर्षांपूर्वीं कांहीं साहित्यिक मंडळीसमवेत

तो तिच्या घरीं गेलेला होता. दुसऱ्या पत्नीशीं ड्रिफफील्डनें उतार वयांत लग्न केलें होतें आणि ती त्याची शुश्रूषा करीत असे. म्हातारा ड्रिफफील्ड आपल्याला उद्देशून कित्येकदां डोळा मिचकावतो आहे, जणूं काय आपलें व त्याचें कांहीं तरी विनोदी रहस्य असल्याचें तो दर्शवितो आहे, हें पाहून त्या भेटीच्या वेळीं ॲशेन्डेनला जरा आश्चर्यच वाटलें होतें.

ड्रिफफील्डनें आपल्याला अनेक वर्षांपूर्वी सायकल चालवायला शिकविलें होतें याची ॲशेन्डेनला त्या भेटीनंतर आठवण आली. ड्रिफफील्ड व त्याची पत्नी रोझी या दोघांनींहि त्याला ही विद्या शिकविली आणि अनेक सहलींच्या वेळीं त्याला आपल्याबरोबर नेलें. हें ड्रिफफील्ड जोडपें त्याला आवडत असे, परंतु आपल्यापेक्षां वरच्या व खालच्या सामाजिक थरांतील लोकांविषयीं या जोडप्याचे फारच फटकळ उद्गार ऐकून त्याला त्या वेळीं धक्काच बसलेला होता.

एके दिवशीं सायंकाळीं त्याच्या मामाच्या घरीं रोझी आलेली त्याला दिसली. मामांचा स्वयंपाकी तिचा बालमित्र होता आणि त्याला भेटायला ती आलेली होती. तिथून ती गेली आणि स्थानिक कंत्राटदार जॉर्ज कैंप याला ती भेटली असें त्याला दिसतें. ही जोडी गांवांतून बाहेर पडून खुल्या बावराकडे गेली. रोझी आपल्या पतीशीं अशी बेइमान कशी होऊं शकते याची ॲशेन्डेनला कांहीं कल्पनाच होईना.

सुटी संपल्यावर ॲशेन्डेन परत शाळेला जाऊं लागला. नाताळच्या सुटींत तो अनेकदां ड्रिफफील्ड मंडळींच्या घरीं चहापान करी. केंप तिथें नेहमीं हजर असे, पण तिथें तो आणि रोझी प्रेमिकांसारखें वर्तन करीत नसत. ड्रिफफील्ड मद्यप्यांविषयींचीं गाणीं म्हणे, पियानोवादन करी आणि साहित्यासंबंधांत क्वचित्च बोले. त्यानंतरच्या उन्हाळ्यांत ॲशेन्डेन पुन्हां त्या गांवीं परत आला त्या वेळीं त्याला असें कळलें कीं पुष्कळांचीं बिलें न देतां ड्रिफफील्ड मंडळींनीं गांवांतून पोबारा केला. अशा लोकांशीं आपण स्नेह ठेवला याची त्याला शरम वाटूं लागली.

ॲशेन्डेनच्या बिऱ्हाडीं कादंबरीकार कीयर हजर झाला आणि म्हणाला : "ड्रिफफील्डचं अधिकृत चरित्र लिहायचा मी विचार चालवलाय. या लेखकाच्या तरुणपणींच्या काळांतली तुम्हांला जी माहिती आहे ती तुम्ही मला द्या." यावर ॲशेन्डेननें त्याला जें सांगितलें तें त्याला समाधान-

कारक वाटलें नाहीं; कारण त्याच्या मतें ड्रिफफील्डच्या विधवा पत्नीची ज्यामुळें चमत्कारिक अवस्था होईल असें कांहींहि त्या चरित्रांत येऊं देणें इष्ट नव्हतें. " तुम्हांला ड्रिफफील्डविषयीं जें जें काय आठवत असेल तें तें लिहून काढा आणि ब्लॅकस्टेबल गांवीं जाऊन मिसेस ड्रिफफील्ड हिची भेट घ्या, " असा कीयरनें आग्रह धरला. ॲशेन्डेन यानें हें मान्य केलें.

आपण तरुण वयांत वैद्यक व्यवसाय शिकण्यासाठीं लंडन शहरीं होतों तेव्हां आपली व ड्रिफफील्ड याची भेट कशी झाली याची ॲशेन्डेनला आठवण झाली. रोझी त्याला सहज रस्त्यांत भेटली. ब्लॅकस्टेबल गांवचा कुणी माणूस आपल्याला भेटला म्हणून ती शरमली कशी नाहीं याचें त्याला आश्चर्य वाटलें. तथापि त्यानें एखाद्या शनिवारीं सायंकाळीं ड्रिफफील्ड मंडळींच्या ठराविक बैठकीला हजर राहण्याचें कबूल केलें. लवकरच तो त्यांच्या बिऱ्हाडीं नियमितपणें जाऊं लागला. ड्रिफफील्ड रात्रपाळीला कामावर असे, आणि म्हणून रोझी अनेकदां आपल्या मित्रांसमवेत बाहेर जाई. तिचा सहवास लोकांना हवाहवासा वाटे, आणि ती सुंदर आहे हें त्याला आतां दिसून येऊं लागलें. एके सायंकाळीं त्यानें तिला आपल्या बिऱ्हाडीं बोलावलें. ती त्याला आपण होऊन वश झाली आणि रात्रौ त्याच्याकडेच राहिली. त्या रात्रीनंतर रोझी त्याच्या बिऱ्हाडीं नियमितपणें येऊं लागली.

ड्रिफफील्ड याची आश्रयदाती साहित्यप्रेमी महिला मिसेस बार्टन ट्रॅफोर्ड हिनें एके दिवशीं ॲशेन्डेनला आपल्याकडे चहाला बोलावलें. रोझी आपला ब्लॅकस्टेबल गांवचा जुना प्रियकर केंप याजबरोबर घरांतून पळून गेली, ही बातमी त्याला या महिलेकडून कळली. आपल्यापेक्षां दुसऱ्याच एका इसमाविषयीं रोझीला अधिक आस्था असल्याचें कळल्याबर त्याचा चांगलाच विरस झाला.

त्यानंतर त्याचा ड्रिफफील्डशीं संपर्क राहिला नाहीं. त्या कादंबरीकारानें रोझीपासून घटस्फोट घेतल्याचें त्याला कळलें. ती आतां केंपसह न्यूयॉर्कला गेलेली होती. कादंबरीकाराची कीर्ति जसजशी वाढूं लागली तसतशी त्याची आश्रयदाती महिला त्याच्याविषयीं अधिक आस्था दाखवीत राहिली. नंतर त्याला न्युमोनिया झाला. तो हवा पालटायला खेडोपाडीं गेला आणि तिथें त्यानें आपली शुश्रूषा करणाऱ्या परिचारिकेशीं लग्न केलें. तिला त्याच्या आश्रयदात्या महिलेनेंच पगार देऊन त्याच्या शुश्रूषेसाठीं धाडून दिलेलें होतें.

कादंबरीकार कीयर याजबरोबर ॲशेन्डेन आपल्या गांवीं ब्लॅकस्टेबल येथें मिसेस ड्रिफ्फील्ड हिला भेटायला गेला. त्याच्या पूर्वायुष्याविषयीं तिघांचें आपसांत बोलणें झालें. रोझीचें वर्णन करतांना "चवचाल बाई" असा शब्दप्रयोग कीयर व मिसेस ड्रिफ्फील्ड यांनीं केला. यावर ॲशेन्डेन म्हणाला : "छट्! ती तशी मुळींच नव्हती. ती फार चांगली आणि मनानं उदार होती. कुणाच्याहि प्रेमयाचनेला नकार देणं तिच्या जिवावर येई. येवढंच फार तर तिच्याविषयीं म्हणावं." स्वतःच्या जुन्या अनुभवाकडे इतक्या वर्षांनीं आतां विहंगम दृष्टीनें पाहिल्यावर हीच गोष्ट सत्य असल्याचें ॲशेन्डेनला माहीत होतें. इतरांना त्याचें हें म्हणणें पटलें नाहीं आणि "तिचं काय राहिलंय आतां? ती तर मरूनच गेलेली आहे" असें म्हणून त्यांनीं हा विषयच सोडून दिला.

परंतु रोझी मेलेली नव्हती. ॲशेन्डेन अगदीं अलीकडे न्यूयॉर्कला गेला होता त्या वेळीं तिनें त्याला पत्र धाडलें आणि भेटायला बोलावलें. आतां ती एक श्रीमंत विधवा असल्याचें त्याला आढळून आलें. केंपला मरून कित्येक वर्षें लोटलेलीं होतीं. ती आतां म्हातारी झालेली असली तरी तिची जगायची हौस टिकून राहिलेली होती. जुन्या काळाविषयीं उभयतांच्या गप्पा झाल्या; आणि ती आपल्याशीं बेइमानीपणें वागत असल्याचें ड्रिफ्फील्ड याला ठाऊक असून देखील तिच्या स्वभावाची पारख त्याला देखील झालेली होती हें ॲशेन्डेनला या वेळीं कळून आलें.

रोझी म्हणाली : "आतां माझं पुन्हां लग्न करायचं वय राहिलेलं नाहीं. जीवनाचा भरपूर आस्वाद मीं अगोदरच घेतलाय." ॲशेन्डेननें तिला विचारलें : तुला खरोखरी ज्याच्याविषयीं आस्था वाटत होती असा केंप हा एकटाच माणूस होता ना?" ती उत्तरली "खरं आहे तें." भिंतीवर टांगलेला केंपचा फोटो होता त्याच्याकडे त्याची सहज नजर गेली. त्या फोटोंत त्याची भपकेदार पोशाख केलेली मूर्ति दिसत होती. त्याच्या मिशांचे आंकडे पोमेड लावून वळविलेले होते. त्याच्या एका हातांत वेताची काठी होती आणि दुसऱ्या हातांत त्यानें ऐटींत चिरूट धरून ठेवलेला होता. ॲशेन्डेन रोझीकडे वळून म्हणाला : "इतर सगळ्या प्रियकरांपेक्षां हा केंप तुला अधिक कां आवडला?" तिचें उत्तर साधें होतें. ती म्हणाली : "तो सदैव आदर्श सभ्य गृहस्थाला शोभेसा वागला."

कॅलेब विल्यम्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : विल्यम गॉडविन (१७५६-१८३६). कथानकाचा प्रकार : रहस्यमय अद्‌तरम्य कथा. काळ : अठरावें शतक. स्थळ : इंग्लंड. प्रथम प्रकाशन : १७९४.

प्रमुख पात्रें : कॅलेब विल्यम्स. फर्डिनान्डो फॉकलँड, कॅलेबचा मालक. कॉलिन्स, फॉकलँडचा नोकर. बार्नाबास टिरेल, फाकलँडचा वैरी. गिनेस, कॅलेबचा वैरी. एमिली मेल्व्हिल, टिरेलची कझिन (चुलत वा मामे वा आते वा मावस बहीण).

समीक्षण : गॉडविननें आपल्या कादंबरीला दिलेला मथळा असा : " थिंग्ज ॲज दे आर, ऑर द ॲडव्हेन्चर्स ऑफ कॅलेब विल्यम्स " (यथार्थ घटना, अथवा कॅलेब विल्यम्स याचीं साहसें). आतां ही कादंबरी तिच्या नायकाचें नांव घेऊन लेखकाच्या पश्चात् तग धरून राहिली आहे. समाजावर टीका करणें आणि एका साहसकथेचें निवेदन करणें या दोन उद्देशांनीं ती लिहिलेली असल्यामुळें ती वाचतांना या दोन्ही विषयांमध्यें वाचकाचें लक्ष विभागलें जातें. अठराव्या शतकांतील इंग्लिश कायद्यानुसार श्रीमंत जमीनदारांना गरीब नागरिकांवर सत्ता गाजविण्याची मुभा होती. कॅलेबच्या दुःखाला कारणीभूत होणाऱ्या सगळ्या घटना त्या कायद्यांतील या उणीवांचाच परिणाम होत.

कथानक : देशांतील सगळ्यांत श्रीमंत आणि अत्यंत आदरणीय असा सरदार मिस्टर फर्डिनान्ड फॉकलँड यानें आपला सेक्रेटरी म्हणून कॅलेब विल्यम्स याला नोकरीवर ठेवलें. हा मालक तसा विचारी माणूस असला तरी त्याला संतापाचे झटके येत असत आणि त्यामुळें कॅलेब दिङ्‌मूढ होऊन जाई. मालकाच्या नेहमींच्या सौजन्यशील स्वभावाशीं हे संतापवायूचे झटके अगदींच विसंगत असल्यामुळें कॅलेबनें घरांतला विश्वासू नोकर कॉलिन्स याजकडे याबाबत लौकरच विचारणा केली आणि उत्तरादाखल त्याच्याकडून त्याला फॉकलँड याच्या पूर्वायुष्याची हकीगत कळली.

तरुणपणीं फॉकलँड अभ्यासू व रोमॅन्टिक होता. वडिलोपार्जित इस्टेटीवर येऊन राहण्यासाठीं इंग्लंडला परतण्यापूर्वीं अनेक वर्षें त्याचें वास्तव्य

परदेशामध्यें होतें. बार्नाबास टिरेल हा त्याच्या शेजाऱ्यांपैकीं एक. हा माणूस चढेल व लढाऊ वृत्तीचा. फाकलँड आपल्या वडिलार्जित इस्टेटीवर परत येऊन राहिला त्या वेळीं टिरेल आसपासच्या वस्तीत प्रमुख व्यक्ति म्हणून मान्यता पावलेला होता. लवकरच फॉकलँड याची सफाईदार चालचलणूक आणि स्नेहशील शहाणपण या गुणांचें कौतुक शेजारीपाजारी करूं लागले. टिरेल मत्सरानें जळूं लागला आणि उक्तींत व कृतींत आपल्या भावनांचें त्यानें प्रदर्शन केलें. फॉकलँडनें समेटाचा प्रयत्न केला पण तिरसट टिरेल यानें हें मैत्रीचें आवाहन झिडकारलें.

मिस् एमिली मेल्व्हिल ही टिरेल याची कझिन. त्याच्या घरीं तिचा दर्जा म्हणजे कांहीं अंशीं एखाद्या मोलकरणीचाच होता. एके रात्रीं ती एका जळत्या इमारतींत अडकून पडली आणि फॉकलँडनें तिला जळून मरतां मरतां वांचविलें. त्यानंतर आपल्या उपकारकर्त्याचें गुणगान करण्याखेरीज तिला दुसरें काय करतां येणार ? तिच्या या कृतज्ञतेची तिच्या कझिनला मात्र चीड आली आणि त्यानें ती फॉकलँडचें कौतुक करते या गोष्टीबद्दल तिच्यावर सूड उगविण्याचा बेत आंखला. त्याच्या कुळांपैकीं एक जण ग्राइम्स नामक अगदींच अर्बुज, अशिष्ट मवाली होता, त्याच्याकडून तिच्याशीं लग्न करायला अनुमति मिळविली. ज्या इसमावर आपण कधींच प्रेम करणें शक्य नाहीं त्याच्याशीं लग्न करायला एमिलीनें नकार दिला, तेव्हां टिरेलनें तिला तिच्याच खोलींत स्थानबद्ध करून ठेवलें. याच कटाचा एक भाग म्हणून खुद्द ग्राइम्सनेंच तिला तिथून निसटायला मदत केली आणि मागाहून त्यानें तिला फशीं पाडण्याचा प्रयत्न केला. तिच्यावर आलेल्या या दुर्धर प्रसंगांतून फॉकलँड यानें तिला सोडविलें आणि अशा प्रकारें तो दुसऱ्यांदां तिचा उपकारकर्ता ठरला. पुढें टिरेलनें तिच्यावर अनेक क्रूरपणाचे अत्याचार केले आणि त्यांपायींच शेवटीं ती प्राणांस मुकली, आणि यामुळें समाजामध्यें टिरेल हा लोकनिंदेचा विषय होऊन बसला.

एके संध्याकाळीं फॉकलँडवर एका जाहीर सभेंत टिरेलनें हल्ला चढविला आणि यामुळें बिचाऱ्या फॉकलँडची फारच मानहानि झाली. त्याच रात्रीं टिरेल रस्त्यांत मरून पडलेला आढळला. टिरेलचा खून होणाऱ्या थोडाच वेळ आधीं किती तरी लोकांनीं उभयतांचे भांडण समक्ष पाहिलेलें होतें, म्हणून

"त्या खुनाच्या रात्रीं तूं कुठें होतास याचा खुलासा कर" अशी समजी देऊन पंचांनीं फॉकलँड याला आपल्यासमोर हजर राहायला फर्मावलें. तो दोषी असेल असें खरोखरी कुणाचेंच मत नव्हतें, परंतु आपल्या बाबतींत अशा प्रकारची लाजिरवाणी चौकशी व्हावी ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली. त्या गुन्ह्याबद्दल टिरेलचें एक माजी कुळ असलेला इसम मागाहून फांसावर लटकला खरा, परंतु आपल्या या मानहानींतून फॉकलँडला पुन्हां कधींच डोकें वर काढतां आलें नाहीं. तो आपल्या इस्टेटीवर जाऊन निवृत्त स्थितींत राहूं लागला. तो विरक्त झाला. नेहमीं आपल्याच नादांत असे. त्याचें मन कशांतच रमेना.

हे सगळे तपशील कळल्यानंतर बराच काळपर्यंत कॅलेब आपल्या धन्याच्या वरकरणी दुःखी मनःस्थितीचा विचार करीत होता. त्याच्या दुर्मुखल्या व्यक्तित्वाचें आकलन करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. खुनाचा आळ आल्यामुळें आपल्या माथीं नको तो दुर्लौकिक बसला म्हणून फॉकलँड याला मनस्ताप होत होता, का त्याच्या अपराधी मनाला स्वतःच्या सदसद्विवेक-बुद्धीची टोंचणी लागलेली होती, यांपैकीं सत्य काय असेल याचा तो विचार करूं लागला. या रहस्याचा उलगडा करून घेण्याच्या निश्चयानें त्यानें आपल्या धन्याशीं सूचक स्वरांत बोलणें आरंभलें. खून आणि न्याय यासंबंधांतील प्रश्नां-बाबत त्याचीं मतें काय असावींत हें काढून घेण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. त्याचप्रमाणें फॉकलँड दोषी आहे का निर्दोषी आहे हें सिद्ध करणारा पुरावा शोधायचें काम कॅलेबनें सुरू केलें. आपल्या सेक्रेटरीचा उद्देश शेवटीं या दुर्मुखलेल्या माणसाला कळून चुकला. आपलें सांगणें अगदीं गुप्त राखण्याची कॅलेबला शपथ घ्यायला लावून फॉकलँडनें आपणच बार्नाबास टिरेल याचा खून केल्याचा कबुलीजबाब देऊन टाकला आणि त्याला अशी धमकी देऊन ठेवली कीं "जर का कधींमधीं तूं या बाबतींत आपल्या धन्याला दगा दिलास तर तुझी मी कधींहि भरून न येण्याइतकी हानि केल्याशिवाय सोडणार नाहीं."

फॉकलँडचा वाडा म्हणजे आतां कॅलेबला एक तुरुंगच होऊन बसला. आणि काय वाटेल ते परिणाम होवोत, आपण इथून पळून जाणारच, असा त्यानें निर्धार केला. त्याप्रमाणें तो पळाला आणि एका खानावळींत जाऊन राहिला. तिथें त्याला एक पत्र मिळालें. "तुझ्यावर चोरीचा आरोप आहे.

स्वतःच्या बचाव करण्यासाठीं तूं परत ये," असा आदेश त्या पत्रांत होता. कॅलेबच्या सामानांतून आपलें बेपत्ता झालेलें कांहीं जडजवाहीर आणि कांहीं बँक नोटा असें साहित्य फॉकलँडनें काढून दाखविलें. तेवढ्यावरून कॅलेबची नाचक्की होऊन त्याची तुरुंगांत रवानगी झाली. आपला निर्दोषीपणा सिद्ध करण्यासाठीं त्याच्या हातांशीं एकच संधि होती. ती म्हणजे फॉकलँडचा उद्देश उघड करून दाखविणें. पण या गोष्टीवर विश्वास कुणीच ठेवला नसता.

कॅलेबनें अनेक महिने तुरुंगांत काढले. त्याच्या पायांत बेड्या ठोक-लेल्या होत्या आणि एका उदासवाण्या घाणेरड्या अंधारकोठडींत त्याला डांबून ठेवलेलें होतें. फॉकलँडचा एक नोकर आणि कॅलेबच्या वडिलांचा पूर्वीचा शेजारी थॉमस त्याला या कोठडींत भेटायला आला. कॅलेबची ती तशी दुर्दशा पाहिल्यावर थॉमसच्या मनांत विचार आला: "कसला हा इंग्लिश कायदा! आपल्यावर खटला होण्याची वाट बघत कित्येक महिने माणसाला अशा रीतीनं तुरुंगांत रखडत राहावं लागावं!" थॉमसला त्याची दया आली आणि त्या उद्वेगाच्या भरांत त्यानें कॅलेबला तुरुंगफोडीचीं हत्यारें आणून दिलीं. कॅलेब कोठडी फोडून पसार झाला. त्याला पुन्हां स्वातंत्र्य मिळालें खरें, परंतु भोंवतालचें सगळें जग त्याला प्रतिकूल होतें आणि आधार असा त्याला कसलाच नव्हता.

प्रथम तो चोरांच्या टोळींत सामील झाला. परंतु गाइन्स नामक एका इसमाचें शत्रुत्व पतकरल्यानंतर त्यानें ही टोळी सोडली. मग तो लंडनला गेला. तिथें आपण लपून राहूं अशी त्याला उमेद होती. गाइन्सनें त्याचा पाठलाग केला आणि लवकरच त्याला पकडून त्याची पुन्हां तुरुंगांत रवानगी झाली. फॉकलँड त्याला भेटला आणि म्हणाला: "तूं तुरुंगांतून पळून गेल्या-पासूनच्या तुझ्या एकूण एक हालचाली मला ठाऊक आहेत. अतःपर मी तुझ्यावर चोरीबद्दल खटला करणार नसलों तरी मी तुला तुझा जीव नकोसा करायचं काम चालूच ठेवीन." कॅलेब कुठेंहि गेला तरी गाइन्स त्याच्या पाठोपाठ तिथें जाई आणि त्याची सगळी हकीगत तिथल्या लोकांसमोर सांगे. हॉलंडला पळून जायचा त्यानें प्रयत्न केला. पण त्या स्वतंत्र देशाच्या भूमीवर तो पाय ठेवणार येवढ्यांत गाइन्स तिथें दत्त म्हणून हजर झाला आणि त्यानें त्याला अडविलें.

तो इंग्लंडला परत आला आणि त्यानें फॉकलँडवर खुनाचा आरोप केला. फॉकलँडला कोर्टासमोर हजर करा अशी मागणी त्यानें मॅजिस्ट्रेटकडे केली. या आरोपाचा जबाब देण्यासाठीं फॉकलँडवर समन्स बजावायचेंच प्रथम मॅजिस्ट्रेटनें नाकारलें. पण कॅलेबनें आपल्या हक्कांचा आग्रह धरला आणि फॉकलँड कोर्टांत हजर झाला. आतां या सरदाराचा चेहरामोहरा भयंकरच दिसत होता. तो आतां फार दिवस जगणार नाहीं हें त्याच्या हाडाडलेल्या व भुतासारख्या अवतारावरून दिसत होतें.

आयुष्यभर होणारा छळ व हालअपेष्टा यांतून स्वतःला वांचविण्याचा एक प्रयत्न म्हणून कॅलेबनें आपल्या मालकावरील आरोपांचा हिरीरीनें पाठपुरावा केला. त्यानें आपल्या दुर्दशेचें आणि सगळ्या बाजूंनीं झालेल्या कोंडमाऱ्याचें इतकें छान वर्णन केलें कीं तें ऐकून मुमूर्षु फॉकलँडचें अंतःकरण भरून आलें. त्याच्या प्रेमळ स्वभावाचें व प्रामाणिकपणाचें कॅलेबनें प्रथम फार कौतुक केलेलें होतें, आणि या स्वभावाला अनुसरून फॉकलँडनें आपण त्याच्यावर केलेले अन्याय कबूल केले आणि कॅलेबची बेअब्रू धुवून काढली.

थोड्याच दिवसांनीं हा आजारी मालक मरण पावला. आपण त्याच्या मृत्यूला कारण झालों म्हणून कॅलेबला पस्तावा झाला, परंतु आतां आपल्या आयुष्याचें ' पुनश्च हरिः ओम् ' करायचा त्यानें निर्धार केला.

द कॉल ऑफ द वाइल्ड : रानलांडग्याची साद

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : जॅक लंडन (१८७६-१९१६). कथानकाचा प्रकार : साहसमय अद्‌भुतरम्य कथा. काळ : १८९७. स्थळ : आलास्का (उत्तर अमेरिकेच्या उत्तर भागांतील वन्य प्रदेश). प्रथम प्रकाशन : १९०३.

प्रमुख पात्रें : बक, एक कुत्रा. स्पिट्झ, त्याचा वैरी. जॉन थॉर्नटन, त्याचा स्नेही.

समीक्षण : जॅक लंडन याच्या ग्रंथांपैकीं सगळ्यांत जास्त लोकप्रिय ग्रंथ म्हणजे ' द कॉल ऑफ द वाइल्ड. ' यांतला थोर मनाचा कुत्रा बक हा पशु-कोटींतला नसून मानवी प्राणी वाटतो. जनावरें व ज्याचें वर्णन त्यानें केलें आहे तो प्रदेश व ते प्राणी यांविषयीं जॅक लंडनच्या मनांत नितांत प्रेम

असलेलें उघड दिसतें. आणि या प्रेमालाच त्यानें कथांचें रूप दिलें. या कथा प्रथम प्रसिद्ध झाल्या त्या वेळीं जितक्या व्यापक प्रमाणांत त्यांचें वाचन होत होतें तितक्याच प्रमाणांत तें आतांहि होत आहे. साहस आणि खळबळजनक प्रसंग ज्यांना आवडतात, त्यांना 'द कॉल ऑफ द वाइल्ड' ही कादंबरी करमणुकीची उत्कृष्ट मेजवानी ठरते.

कथानक : कॅलिफोर्निया राज्यांतील जज्ज मिलर यांच्या इस्टेटीवरील सगळ्या कुत्र्यांचें निर्विवाद पुढारीपण बक या कुत्र्याकडे होतें. सेंट बर्नार्ड आणि स्कॉटिश मेंढपाळ या दोन जातींची तो मिश्र संतति. पहिल्याचा बांधा आणि दुसऱ्याचें बुद्धिचापल्य त्याच्या अंगीं वंशपरंपरेनें आलें होतें. देशांतल्या मानवी प्राण्यांना सोन्याच्या मोहानें झपाटलेलें असून उत्तरेकडील बर्फमय थंड प्रदेशामध्यें घसरगाड्या ओढण्यासाठीं त्याच्या जातीच्या कुत्र्यांना फार मागणी आहे हें बिचाऱ्या बकला ठाऊक असणें शक्य नव्हतें. याचा परिणाम असा झाला कीं इस्टेटीवरील कामगारांपैकीं एकानें त्याला एके रात्रीं आपल्याबरोबर फिरायला नेलें. त्या वेळीं त्याला कसलाच संशय आला नाहीं. त्या माणसानें बकला रेल्वे स्टेशनावर नेलें आणि तिथें या कुत्र्याला पैशाचा विनिमय ऐकायला मिळाला. मग त्याच्या मानेला दावें लागलें. त्यांतून सटकण्यासाठीं त्यानें धडपड केली, तेव्हां तें दावें त्याच्या गळ्याभोंवतीं इतकें घट्ट बसलें कीं त्यामुळें त्याचा श्वास कोंडला जाऊन तो बेशुद्ध झाला.

सामानाच्या डब्यांत तो शुद्धीवर आला. गाडी सिएट्टल स्टेशनावर पोंचली, तेव्हां त्याला खालीं उतरवीत असतांना त्यानें आपल्या पिंजऱ्यांतून सटकून जाण्याचा प्रयत्न केला. लाल शर्ट अंगांत असलेल्या एका माणसानें त्याची शुद्धि नाहींशी होईपर्यंत त्याला दांडक्याचा मार दिला. दांडक्याशीं सामना करतांना आपल्याला कधींच यश मिळणें शक्य नाहीं हें त्यानंतर बकला कळून चुकलें. पुढें उपयोगी पडावें म्हणून त्यानें हें ज्ञान गांठीं बांधून ठेवलें.

त्याच्याच जातीच्या इतर कुत्र्यांसमवेत बकला एका कोंडवाड्यांत घातलें. रोजच्या रोज त्यांतले कांहीं कुत्रे पैसे घेऊन येणाऱ्या त्रयस्थ लोकांसमवेत निघून जात होते. एके दिवशीं बकची विक्री झाली. दोघां फ्रेंच-कॅनेडियनांनीं (कॅनडांत स्थायिक झालेल्या मूळच्या फ्रेंचांनीं) त्याला आणि इतर कांहीं

कुत्र्यांना विकत घेतलें आणि आलास्काकडे जाणाऱ्या बोटीवर त्यांना नेलें. हे धनी लोक कठोर असले तरी गोरे होते आणि बक त्यांच्याशीं आदरानें वागे. बोटीवरचें जीवन विशेषसें आनंददायक नव्हतें. तरी पण बोट आलास्काला पोंचल्यानंतर पुढें वाढून ठेवलेल्या जीवनाशीं तुलना करतां तें स्वर्गतुल्यच होतें. तिथले लोक आणि कुत्रे सर्वस्वीं रानटीच आहेत असें त्याला आढळून आलें. बळी तो कान पिळी या कायद्याखेरीज अन्य कसलाच कायदा त्यांना लागू नव्हता. कुत्रे आपसांत लांडग्यांसारखे लढत असत आणि त्यांतला एक जमीनदोस्त झाला कीं सगळी टोळी त्याच्यावर तुटून पडून त्याचा फन्ना उडवीत असे. बोटींतून आपल्याबरोबर आलेला एक सोबती लढाईत हरल्याबरोबर त्याचे इतरांनीं फाडफाडून कसे तुकडे तुकडे केले हें बकनें नीट पाहून घेतलें. त्यांतल्या त्यांत, या हरलेल्या कुत्र्याचे राई राई येवढे तुकडे होत असतांना स्पिट्झ नामक एक कुत्रा हें दृश्य कावेबाज नजरेनें कसें निरखून पाहत होता याचा त्याला कधींहि विसर पडला नाहीं. त्या वेळेपासून हा स्पिट्झ त्याचा वैरी ठरून गेला.

दूर दूरच्या प्रदेशांत सोन्याचा शोध करणाऱ्या लोकांकडे टपाल पोंचविण्याचें काम ते दोघे फ्रेंच-कॅनेडियन इसम घसरगाड्यांतून करीत असत. बक आणि इतर कुत्र्यांना त्यांनीं या घसरगाड्यांना जुंपलें. हें नव्याच प्रकारचें जीवन होतें. परंतु त्याला तें असुखकारक वाटलें नाहीं. ते लोक कुत्र्यांना नीट वागवीत असत; आणि ज्या गोष्टींमुळें आपण घसरगाडी ओढणारा चांगला कुत्रा होऊं त्या गोष्टी चटकन शिकून घेण्याइतकी पुरेशी बुद्धिमत्ता त्याच्या अंगीं होती. झोंपायसाठीं ऊबदार जागा हवी म्हणून हिमाच्या राशीखालीं उकराउकरी कशी करायची हें तो शिकला. गाडी ओढायला अधिक सोपें जावें म्हणून बाजूचे पट्टे मोकळे कसे ठेवावेत हेंहि त्यानें शिकून घेतलें. भूक लागली म्हणजे तो अन्नाची चोरी करी. घसरगाडीचा प्रवास जसजसा उत्तर दिशेला अधिकाधिक दूरवर होऊं लागला तसतसे त्याच्या पूर्वजांचे उपजत गुण त्याच्या अंगीं अवतरले. ओसाड बर्फमय जंगलांतील लांडगे हे त्याचे पूर्वज होते आणि त्यांचा कमालीचा धूर्तपणा कसल्या तरी मोघम रीतीनें त्यानें अंगीं बाणवून घेतला.

बकचे स्नायु भक्कम आणि टणक झाले. त्याचें बळ कधीं नव्हतें येवढें

वाढलें. पण त्याचे पाय सोलवटले, म्हणून त्याला हरणाचीं चामडीं पायांना गुंडाळून घ्यावीं लागलीं. अधूनमधून एखादा कुत्रा मरून जाई, किंवा मारामारींत मारला जाई; आणि एका कुत्रीला वेड लागलें. अतःपर सगळे कुत्रे टोळी म्हणून काम करीतनासे झाले. आणि कुत्र्यांच्या आपसांत मारामाऱ्या होऊं न देण्यासाठीं त्या दोघां इसमांना सतत पाळत ठेवावी लागे. एके दिवशीं बकला हवी होती ती संधि मिळाली. त्यानें घसरगाडीचा सगळ्यांत पुढचा कुत्रा स्पिट्झ याच्यावर हल्ला केला आणि त्याला ठार मारलें. त्यानंतर आपल्याला सगळ्यांत पुढचा कुत्रा व्हायला देईपर्यंत त्यानें स्वतःला गाडीला जुंपून घेण्याचेंच नाकारलें. बंडखोर कुत्र्यांना काबूंत आणून त्यानें आपलें कर्तृत्व सिद्ध केलें, आणि त्या लोकांनीं कधीं पाहिला नव्हता इतका उत्कृष्ट पुढारी कुत्रा म्हणून तो कामगिरी करूं लागला. घसरगाडीनें आपल्या खेपांचे उच्चांक गांठले आणि लवकरच बक सर्वभर प्रसिद्धि पावला.

स्कागुए या गांवीं पोंचल्यावर त्या दोघां फ्रेंच-कॅनेडियनांना असा अधिकृत आदेश मिळाला कीं कुत्र्यांच्या या टोळीचें पुढारीपण एका स्कॉटिश हाफब्रीड जातीच्या कुत्र्याकडे द्यावें. घसरगाडी अधिक जड झाली होती आणि डॉसन गांवीं परत येईपर्यंतचा दूरचा पल्ला गांठतांना हवा फारच वाईट होती. रात्रींच्या वेळीं शेकोटीशेजारीं पडल्या पडल्या आपल्या रानटी पूर्वजांचीं स्वप्नें बक पाहूं लागला. लांडग्याच्या आरोळीसारखी आरोळी दुरून कुठून तरी ऐकूं येत आहे असें त्याला वाटूं लागलें.

डॉसन येथें दोन दिवस आराम केल्यानंतर या टोळीनें स्कागुएच्या रोखानें दूरचा परतीचा प्रवास सुरू केला. कुत्र्यांची जवळ जवळ दमछाक झाली. कांहीं मेले आणि कांहींच्या जागीं दुसरे घेणें भाग पडलें. टोळी पुन्हां स्कागुए या मुक्कामीं येऊन दाखल झाली तेव्हां आपल्याला विश्रांति मिळेल अशी कुत्र्यांची अपेक्षा होती. परंतु तीन दिवसांनीं त्यांची विक्री झाली. त्यांचे नवे मालक म्हणजे दोन पुरुष व एक स्त्री होती. त्यांना कुत्र्यांची किंवा उत्तरेकडील ओसाड प्रदेशांत घसरगाड्या कोणत्या परिस्थितींत चालवितात याची कांहीं एक माहिती नव्हती. बक आणि इतर कुत्रे पुन्हां प्रवासाला निघाले. ते इतके थकून गेले होते कीं हालचाल करायची म्हणजे देखील त्यांना खूप श्रम पडत होते. पुन्हां पुन्हां या शूर कुत्र्यांनीं अडखळून

पडावें आणि स्वस्थ पडून राहावें, आणि चाबकाचा फटका बसतांक्षणीं त्यांनीं पुन्हां कांहीं मैल पाय ओढत पळावें, असा प्रकार चालला. शेवटीं बक देखील हरला. जॉन थॉर्नटन याच्या केबिनजवळ घसरगाडी थांबलेली होती. त्या दोघां पुरुषांनीं व त्या बाईनें पुढें चालू लागायची तयारी केली, तेव्हां बक जागचा हलायलाच कबूल होईना. त्या दोघां पुरुषांपैकीं एकानें बकला दांडक्यानें बदडलें, आणि त्यानें त्याला ठारच केलें असतें, पण तेवढ्यांत थॉर्नटन मध्यें पडला आणि त्यानें त्या मारणाऱ्या माणसालाच ठोसा मारून खालीं पाडलें, आणि त्याला व त्याच्या जोडीदारांना पुढचा रस्ता सुधारायला फर्मावलें. थॉर्नटनजवळ त्यांनीं बकला ठेवून दिलें.

थॉर्नटननें शुश्रूषा करून बकला ठीक केलें. उभयतांमध्यें एकमेकां-विषयीं प्रेमाची व आदराची भावना वाढीस लागली. थॉर्नटनचे भागीदार त्याच्या केबिनवर परत आले, त्यांना या आपुलकीचा उमज पडला, आणि आपल्या कोणत्याहि अवजड कामासाठीं बकचा उपयोग करायच्या फंदांत ते पडले नाहींत.

थॉर्नटनचा जीव बकनें दोनदां वांचविला आणि आपल्या स्नेह्यानें केलेल्या उपकाराची परतफेड करायला मिळाल्याबद्दल त्याला आनंद वाटला. डॉसन मुक्कामीं थॉर्नटनप्रीत्यर्थ बकनें एक हजार डॉलरची पैज जिंकून दिली. एक हजार पौंडांचें ओझें लादलेली एक घसरगाडी बर्फांत रुतून पडलेली होती. ती बकनें ओढून बाहेर काढून ही पैज जिंकली. पैजेंत मिळविलेल्या या पैशाच्या बळावर थॉर्नटन आणि त्याचे भागीदार सोन्याचा शोध करायच्या मोहिमेवर निघाले. ते अलास्काच्या पूर्वभागांत दूरवर गेले आणि तिथें त्यांना सोन्याच्या रंगानें पिवळाधमक झालेला एक निर्झर आढळला.

बकच्या रानटी मनांत दांडक्यानें शिकार करणाऱ्या एका केंसाळ माणसाचें चित्र उभें राहू लागलें. लांडग्यांच्या आरोळ्या त्याला ऐकूं आल्या. कधीं कधीं तो तीन तीन चार चार दिवस एकसारखा कुठें तरी भटकत राही, पण तो थॉर्नटनकडे परत यायला कधीं चुकत नसे. एका प्रसंगीं त्यानें एका लांडग्याशीं दोस्ती केली. त्याला तो आपल्या भावासारखा वाटला.

एकदां बकनें एका भल्या मोठ्या रानरेड्याचा पाठलाग करून त्याला ठार मारलें. कॅंपाकडे परत येतांना कांहीं तरी घोंटाळा झाला असावा

असें त्याच्या मनानें घेतलें. वाटेंत कित्येक कुत्रे मरून पडलेले दिसले. कँपांत परत येऊन पाहतो तों कुत्र्यांची व थॉर्नटनच्या दोघां भागीदारांचीं प्रेतें तिथें पडलेलीं आहेत आणि त्यांच्या भोंवतीं रेड इंडियन लोक फेर धरून नाचत आहेत. थॉर्नटनचा माग काढीत तो नदीकांठापर्यंत गेला. तिथें त्याच्या स्नेह्याचें शव त्याला सांपडले. बाणांनीं त्याच्या देहाची चाळण झालेली होती. बक संतापानें येवढा बेभान झाला कीं त्यानें रेड इंडियनांच्या टोळीवर हल्ला चढविला आणि त्यांतल्या कांहीं जणांना तिथल्या तिथें ठार केलें आणि इतरांना पळवून लावलें.

मानवी प्राण्याशीं असलेलें त्याचें शेवटचें स्नेहबंधन तुटलें. त्याचे भाऊबंद रानलांडगे यांच्या टोळ्यांना तो जाऊन मिळाला. रेड इंडियन लोक तर त्याला कुत्रा न समजतां कुत्र्याचें भूतच समजूं लागले. कारण त्यांना तो क्वचितच दिसत असे. त्याची सांवलीच तेवढी फार तर त्यांना दिसे. इतक्या झपाट्यानें त्याच्या हालचाली होत असत. परंतु रेड इंडियनांनीं त्याच्यावर जर बारकाईनें पाळत ठेवली असती तर त्यांना तो जवळून पाहतां आला असता. थॉर्नटनचें शव ज्या नदीनें आपल्या पोटांत घेतलें तिच्या कांठीं बक वर्षांतून एकदां येत असे. तिथें नदीकांठावर उभा राहून तो मोठा गळा काढून रडे. त्याची प्रदीर्घ हृदयभेदक आरोळी म्हणजे आपल्या मानवी स्नेह्याला एका रानटी पशूनें दिलेली मानवंदना होती.

कान्डिडे

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : मारीय आरूए द व्हॉल्टेअर (१६९४-१७७८). कथानकाचा प्रकार : सामाजिक उपहासिका. काळ : अठरावें शतक. स्थळ : युरोप आणि दक्षिण अमेरिका. प्रथम प्रकाशन : १७५९.

प्रमुख पात्रें : कान्डिडे, बॅरोनेस थंडर-टेन-ट्रॉंख हिचा अनौरस पुत्र. मादमोसील क्यूनेगोन्डे, बॅरन थंडर-टेन-ट्रॉंख याची कन्या. पॅन्ग्लॉस, कान्डिडे याचा स्नेही आणि शिक्षक. काकाम्बो, कान्डिडे याचा नोकर.

समीक्षण : व्हॉल्टेअरच्या ग्रंथांपैकीं सगळ्यांत अधिक लोकप्रिय अशी ही " कान्डिडे " कादंबरी म्हणजे मानवांच्या हातून होणारे मूर्खपणाचे प्रकार

आणि त्यांचीं दुर्व्यसनें यांचा उपहास करणारी हातखंडा कलाकृति. मानवांचें जीवन व्यापून राहणारें आणि त्यावर प्रभुत्व गाजविणारें जें जें कांहीं आहे, मग तो रोमान्स असो, तें विज्ञान असो, तत्वज्ञान असो, आणि सरकार असो, —त्या सगळ्यांची या कथेमध्यें सडकून हजेरी घेतलेली आहे. "कान्डिडे" ही अशी टीका आहे कीं तिला काळाची मर्यादा नाहीं. कारण आजच्या वर्तमानपत्राइतकीच ती समकालीन आहे.

कथानक: कान्डिडे याचा जन्म वेस्टफॅलिया प्रांतांत झाला. बॅरन थंडर-टेन-ट्रॉख याच्या बहिणीचा तो अनौरस पुत्र. त्याचा शिक्षक डॉ. पॅन्ग्लॉस हा लीब्नीत्झ या तत्त्वविशारदाचा एकनिष्ठ अनुयायी होता. त्यानें आपल्या शिष्याला मेटॅफिझिको-थिऑलॉगो-कॉस्मॉलॉनिगॉलॉजी (अध्यात्म-धर्मशास्त्र-विश्वरचनाशास्त्र) या विषयांचें शिक्षण दिलें आणि हें जग सगळ्या संभाव्य जगांमध्यें सर्वोत्तम जग आहे असें त्याला ठासून सांगितलें. बॅरनची कन्या क्यूनेगोन्डे हिनें एके दिवशीं एका पडद्याआड कान्डिडेचें चुंबन घेतलें. म्हणून या घरंदाज बॅरनच्या घरांतून कान्डिडेची हकालपट्टी झाली.

बल्गेरियाच्या राजाच्या फौजेंत सक्तीनें भरती झाल्यावर हा राजा व आबारेसचा राजा यांची आपसांत लढाई चालू असतांना कान्डिडेनें फौजेंतून पळ काढला. पुढें आनाबॅप्टिस्ट पंथाचा जेम्स यानें त्याच्याशीं दोस्ती केली. त्याचा जुना स्नेही डॉ. पॅन्ग्लॉस याचीहि त्याच्याशीं भेट झाली. हा स्नेही आतां भिकारी झालेला होता. मग जेम्स, पॅन्ग्लॉस आणि कान्डिडे असे तिघे स्नेही पोर्तुगालची राजधानी लिस्बन या शहराकडे निघाले. वाटेंत वादळ होऊन पोर्तुगालच्या किनाऱ्यालगत त्यांचें जहाज फुटलें. जेम्स समुद्रांत बुडून मेला. परंतु कान्डिडे व पॅन्ग्लॉस हे दोघे पोहत पोहत किनाऱ्याला लागले. तेवढ्यांत भूकंप होऊन सगळें शहर हादरलें. ज्यांच्या दुष्टपणामुळें ही भूकंपाची आपत्ति ओढवली, त्या लोकांना शासन करायचें असें लिस्बनच्या राज्यकर्त्यांनीं ठरविलें. या बाबतींत राजघराणें आणि धर्मपीठ या दोहोंचें एकमत होतें. पकडलेल्या आरोपींमध्यें कान्डिडे आणि पॅन्ग्लॉस हे दोघेहि सांपडले. पॅन्ग्लॉस फांशी गेला आणि कान्डिडेला भरपूर फटके खायला मिळाले.

जखमांच्या वेदनांनीं तो विव्हळत असतांनाच एका म्हातारीनें त्याला गांठलें आणि सांगितलें : " धीर सोडूं नकोस आणि माझ्या मागोमाग ये. "

ती त्याला एका घरांत घेऊन गेली. तिनें त्याला खाऊं पिऊं घातलें आणि कपडे घालायला दिले. मग क्यूनेगोन्डे तिथें अवतरली. तिला बघून तो थक्कच झाला. कारण तिच्या मृत्यूची वार्ता पॅन्ग्लॉसनें त्याला अगोदरच सांगितलेली होती. त्याची शेवटची भेट झाल्यापासून आतां त्यांचें सुखद पुनर्मीलन होईपर्यंतची आपली जीवनकथा तिनें त्याला सांगितली. तिला एका यहुद्यानें आणि एका इन्क्विझिटरनें (पाखंड्यांना शिक्षा देणाऱ्या कॅथोलिकपंथीय धर्माधिकाऱ्यानें) डांबून ठेवलें होतें. पण त्या दोघांनाहि तिनें आपल्यापासून चार हात दूर ठेवलें. पुढें ते दोघे तिला भेटायला आले, तेव्हां तिनें त्या दोघांनाहि ठार मारलें.

म्हातारीला बरोबर घेऊन त्या जोडप्यानें तिथून पळ काढला आणि काडिझ शहर गांठलें. तिथें त्यांना चोरांनीं लुटलें. हताश मनःस्थितींत हीं तिघें जहाजांतून दक्षिण अमेरिकेला पॅराग्वे शहराकडे रवाना झालीं. तिथल्या बंडखोर जेसुइटपंथीयांशीं लढत असलेल्या स्पॅनिश फौजेंत दाखल व्हावें असा कान्डिडेचा बेत होता. या प्रवासांत म्हातारीनें आपली कहाणी त्या जोडप्याला सांगितली. ही म्हातारी म्हणजे पोप दहावा उर्बान आणि पॅलेस्ट्रिनाची राजकुमारी यांची कन्या आहे असें तिच्याकडून त्यांना कळलें.

दक्षिण अमेरिकेंतील ब्यूएनोस आयरेस या शहराच्या गव्हर्नराला क्यूनेगोन्डेविषयीं फार प्रेमा वाटूं लागला. त्यानें एक कारस्थान रचून असा बनाव घडवून आणला कीं जेणेंकरून स्पेनमध्यें असतांनाच दरवडेखोरीचा गुन्हा केला असल्याचा आरोप कान्डिडेवर यावा. हें गंडांतर निवारण्यासाठीं आपला नोकर कॅकॅम्बो याला बरोबर घेऊन कान्डिडेनें तिथून पळ काढला. क्यूनेगोन्डे आणि म्हातारी अशा दोघीच तेवढ्या मागें राहिल्या. मग कान्डिडेनें असें ठरविलें कीं आपण जेसुइटांच्या बाजूनें लढाईत भाग घ्यावा. तेव्हां त्याला कळलें कीं या बंडखोर जेसुइटांचा सेनापति हा खरोखरी क्यूनेगोन्डे हिचा भाऊच आहे. परंतु या भावाला आपल्या बहिणीनें कान्डिडेशीं लग्न करावें हा विचार मुळींच पसंत पडला नाहीं. दोघांचें भांडण झालें. या भांडणांत तो भाऊ आपल्या हातून मारला गेला असावा अशी धास्ती घेऊन कान्डिडे पुन्हां तिथूनहि पळाला. त्याच्याबरोबर त्याचा नोकर कॅकॅम्बो हा होताच. त्यानंतर लवकरच ऑरेइलॉन नामक आदिवासी रेड इंडियन लोकांच्या

जमातीनें त्यांना पकडून ठेवलें. परंतु आपण जेसुइटपंथीय नाहीं अशी कॅकॅम्बोनें त्यांची खात्री पटविल्यावर त्यांना त्यांनीं सोडून दिलें व पुढें जायला मोकळीक दिली. ते दोघे तसेच प्रवास करीत करीत एल्डोरॅडो येथें जाऊन पोंचले. तिथलें जीवन सुखाचें व सर्वांगपरिपूर्ण होतें. परंतु क्यूने-गोन्डेच्या विरहामुळें कान्डिडेला तिथें राहण्यांत गोडी वाटेना.

शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं एल्डोरॅडो येथील निरुपयोगी रत्नांचे खडे व सोन्याची माती असा थोडासा माल बरोबर घ्यावा आणि क्यूनेगोन्डे हिचा शोध करण्यासाठीं ब्युएनोस आयरेस या शहराकडे परत जावें. म्हणून तो आणि कॅकॅम्बो यांनीं आपली संपत्ति शंभर मेंढरांवर लादली व तो मेंढरांचा कळप घेऊन ते इष्ट स्थळाकडे निघाले. परंतु वाटेंत दोन मेंढरें सोडून बाकीचीं सगळीं मेंढरें व त्यांच्यावर लादलेला माल त्यांनीं गमावला.

मग कान्डिडे एका डच व्यापाऱ्याकडे गेला आणि त्याच्या मदतीनें ब्यूएनोस आयरेस शहराकडे जहाजांतून जाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यानें खटपट केली. तो व्यापारी कान्डिन्डेचे पैसे व माल घेऊन जहाजांतून पुढें निघून गेला व त्याला त्यानें तिथेंच सोडून दिलें. तेव्हां क्यूनेगोन्डेचा शोध करावा आणि तिला कान्डिडेला भेटविण्यासाठीं इटलींतील व्हेनिस शहरीं जावें असा बेत करून कॅकॅम्बो एकटाच ब्यूएनोस आयरेस शहराकडे चालता झाला. नंतर कान्डिडेवर साहसाचे अनेक प्रसंग ओढवले. त्यांत एका प्रसंगीं त्यानें सागरी लढाईतहि भाग घेतला. एका बुडत्या जहाजांतून त्याचें एक हरवलेलें मेंढरूं अचानक त्याला परत मिळण्याचा एक चमत्कारहि घडला. शेवटीं तो फ्रान्सच्या किनाऱ्यावरील बोर्डो या शहरीं येऊन दाखल झाला. पॅरिसच्या मार्गानें व्हेनिसला जावें असा त्याचा बेत होता. परंतु पॅरिस शहरीं पोलिसांनीं त्याला पकडलें, आणि आपल्या जवळचे हिरे लांच म्हणून देऊन त्याला आपली सुटका करून घ्यावी लागली. मागाहून तो एका डच जहाजांतून इंग्लंडमधील पोर्ट्समाउथ बंदरांत येऊन पोंचला आणि तिथें एका इंग्लिश ॲडमिरलला (दर्यासारंगाला) फांशीं देण्याचा कार्यक्रम त्याला समक्ष पाहायला मिळाला. पोर्ट्समाउथ येथून तो व्हेनिसला गेला. तिथें त्याला न कॅकॅम्बो भेटला, न क्यूनेगोन्डे भेटली. परंतु तिची दासी पाक्वेट ही मात्र त्याला तिथें भेटली. त्यानंतर लवकरच त्याचा नोकर कॅकॅम्बो हाहि त्याला अचानक

दिसला. तो आतां गुलाम झालेला होता. त्यानें अशी बातमी दिली कीं क्यूनेगोन्डे ही कॉन्स्टान्टिनोपल या शहरांत आहे. ते दोघे व्हेनिसहून जहाजांत बसून कॉन्स्टान्टिनोपलकडे निघाले. याच जहाजावर वल्हीं मारणाऱ्या गुलामांच्या टोळीमध्यें पॅन्ग्लॉस आणि क्यूनेगोन्डेचा भाऊ हे दोघे असल्याचें त्याला आढळून आलें. पॅन्ग्लॉसनें त्याला सांगितलें : " लिस्बन शहरीं फांशीं जातां जातां एक चमत्कार घडून माझी फांशी चुकली. फांसाची गांठ फांशी देणाऱ्या धांदरट मांगाला नीट मारतां आली नाहीं. म्हणून माझा जीव बचावला." क्यूनेगोन्डेच्या भावानें त्याला सांगितलें : " तूं मला जखमी केलंस आणि त्या जखमेपायीं मी मेलों असणार असा तुझा समज झाला. परंतु मी मेलों नाहीं. माझी जखम बरी झाली आणि मी वांचलों." गुलामगिरींतून त्या दोघांची सुटका करण्यासाठीं व्हेनिसवासीयांना पैसे देऊन कान्डिडेनें त्यांना पुन्हां स्वतंत्र केलें.

ही टोळी कॉन्स्टान्टिनोपल येथें एकदांची पोंचली. तिथें ती म्हातारी व क्यूनेगोन्डे यांच्या मालकांना पैसे भरून कान्डिडेनें त्या दोघींची सुटका करून घेतली. त्यानें एक लहानसा मळाहि खरेदी केला आणि ही सगळी मंडळी त्या मळ्यावर जाऊन राहिली. तिथें प्रत्येकानें आपलें विशिष्ट नेमलेलें काम करावें अशी व्यवस्था झाली. जगांतली सगळ्यांत उत्तम गोष्ट म्हणजे आपल्या बगीच्याची मशागत करणें हीच होय असें कान्डिडेनें ठरवून टाकलें.

कॅप्टन होरॅशियो हॉर्नब्लोअर

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : सी. एस्. फॉरेस्टर (१८९९-). कथानकाचा प्रकार : ऐतिहासिक अद्भुतरम्य कथा. काळ : एकोणिसाव्या शतकाचा आरंभ. स्थळ : पॅसिफिक महासागर, दक्षिण अमेरिका, भूमध्य समुद्र, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड आणि अॅटलांटिक महासागर. प्रथम प्रकाशन : १९३७, १९३८, १९३९.

प्रमुख पात्रें : कॅप्टन होरॅशियो हॉर्नब्लोअर, एच्. एम्. एस्. 'लिडिया' व एच्. एम्. एस्. 'सडरलँड' या बोटींचा कप्तान. बुश, फर्स्ट लेफ्टनंट. ब्राऊन, कप्तानाचा कॉक्सस्वेन. डॉन ज्युलियन अल्वाराडो (एल् सुप्रीमो),

मध्य अमेरिकेंतील एक श्रीमंत मळेवाला. मारीया, हॉर्नब्लोअरची पत्नी. लेडी बार्बारा वेलस्ली, ड्यूक ऑफ वेलिंग्टन याची बहीण. ॲडमिरल लीटन, हॉर्नब्लोअरच्या वरचा हुद्दा असलेला वरिष्ठ अधिकारी आणि लेडी बार्बारा हिचा पति.

समीक्षण : कादंबरीकार सी. एस्. फॉरेस्टर यानें कॅप्टन हॉर्नब्लोअरच्या रूपानें व्यापक सार्वत्रिक आकर्षण असलेलें व्यक्तिचित्र निर्माण केलें असून सागरी युद्धासंबंधांत लेखकाला असलेल्या तांत्रिक ज्ञानाची गुंफण या कथेंत अशा कौशल्यानें केलेली आहे कीं नाविकांची भाषा, लढाऊ जहाजांचे निरनिराळे भाग आणि अंशतः आरमारी तोफखाना याचें ज्ञान आपल्याला अभावितपणें होत जातें. लेखकाच्या "बीट टु क्वार्टर्स," "फ्लाइंग कलर्स" आणि "अ शिप ऑफ द लाइन" या तीन अन्य कादंबऱ्यांचा नायकहि हॉर्नब्लोअर हाच असून या सगळ्या कादंबऱ्या सर्व वर्गांचे व सर्व वयांचे वाचक गोडीनें आणि उत्साहानें वाचत आले आहेत.

कथानक : एच्. एम्. एस्. "लिडिया" हें छत्तीस तोफांचें फ्रिगेट जातीचें लढाऊ जहाज होतें. याचा कमांडर कॅप्टन होरॅशियो हॉर्नब्लोअर यानें इंग्लंडहून गुप्त हुकूम घेऊन हें जहाज दक्षिण अमेरिकेचें शेवटचें टोंक केपहॉर्न याला वळसा घालून स्पॅनिश अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील फोन्सेकाच्या आखाताकडे चालविलें होतें. तिथला बडा जमीनदार डॉन ज्युलियन अल्वाराडो याच्या मदतीनें स्पेनविरुद्ध बंडाचा उठाव करण्यासाठीं त्याच्याशीं दोस्तीचा तहनामा करावा असा हुकूम कॅप्टनला मिळालेला होता. या क्रान्तीची सुरवात करण्यास आवश्यक तेवढा दारूगोळा "लिडिया" जहाजावर लादलेला होता. याच्या जोडीला बंडाला पाठिंबा देण्यासाठी हॉर्नब्लोअरच्या हातीं पन्नास हजार सुवर्ण गिनींचा खजिना होता. मात्र इंग्रजांकडून मिळणाऱ्या या सोन्याच्या पाठिंब्याअभावीं बंड फसण्याचा धोका असला तरच या आमिषाचा उपयोग करण्याची त्याला मुभा होती. अन्यथा त्याच्यावर लष्करी कोर्टात खटला होणार होता. पन्नास तोफा असलेलें "नाटिविडाड" नामक स्पॅनिश लढाऊ जहाज पॅसिफिक महासागरांत हजर आहे असा ओझरता निर्देशहि कॅप्टनला मिळालेल्या आदेशांमध्यें होता. पहिली

संधि मिळतांक्षणी हें जहाज पकडायचें, बुडवायचें, जाळून टाकायचें वा नष्ट करायचें अशी कामगिरी त्याच्याकडे होती.

कॅप्टनचें जहाज फोन्झेकाच्या आखातांत नांगरून उभें राहिल्यावर एक लहान होडी त्याच्याजवळ आली. डॉन आल्वाराडो याचे जासूद या होडींत होते. डॉन आल्वाराडो यानें आतां एल् सुप्रीमो असा किताब धारण केलेला होता. या जासुदांनीं हॉर्नब्लोअरला सांगितलें : " एल् सुप्रीमो साहेबांनीं आपल्याला भेटीसाठीं बोलावलं आहे."

एल् सुप्रीमो याच्या जुलमशाहीचे दाखले पाहून हॉर्नब्लोअर नाराज झाला. त्यानें जें निरीक्षण केलें त्यावरून त्याला अधिकच सावधगिरी ठेवावीशी वाटली. आपल्या जहाजावर खाद्यपदार्थ आणि पाणी यांची बेगमी पूर्ण होई-पर्यंत आपण आपल्या ताब्यांतील हत्यारें व दारूगोळा देणार नाहीं असें त्यानें एल् सुप्रीमो याला सांगून टाकलें. जहाजाला लागणारी रसद शक्य तितक्या लवकर त्याच्यावर चढविण्यांत आली, आणि हें काम भर वेगांत चालू अस-तांनाच, डोंगरावरून टेहेळणी करणाऱ्यानें अशी बातमी आणली कीं " नाटिविडाड " हें जहाज इकडेच चाल करून येत आहे.

हें जहाज या उपसागरांतच पकडायचें असें ठरवून हॉर्नब्लोअरनें आपलें " लिडिया " जहाज एका बेटाआड दडवून ठेवलें आणि " नाटिविडाड " जहाजाला आंत येऊं दिलें. आपल्याला जास्तींत जास्त अनुकूल अशा क्षणीं हॉर्नब्लोअरनें आपलें " लिडिया " जहाज " नाटिविडाड " जहाजाशीं नेऊन भिडविण्याचा हुकूम दिला आणि त्या जहाजाच्या डेकवर ग्रेपशॉटचा (कुलपी गोळ्यांचा) भडिमार करण्यास नाविकांना फर्माविलें. ब्रिटिश नाविकांनीं दोन्ही जहाजांची सांगड घातली आणि ते " नाटिविडाड " या जहाजावर चढून गेले. हें पकडलेलें जहाज आपलें आहे असें म्हणून एल् सुप्रीमो त्याच्यावर आपला हक्क सांगूं लागला. आपण येवढ्या शिताफीनें पकडलेलें हें जहाज एल् सुप्रीमोच्या स्वाधीन करायला हॉर्नब्लोअर काचकूच करूं लागला, परंतु त्याला मिळालेल्या आदेशांची तामिली करायची असल्यामुळें त्या हुकुमशहाशीं वांकडेपणा येऊं देण्याची त्याला हिंमत झाली नाहीं.

हॉर्नब्लोअर आपलें जहाज घेऊन तिथून निघून गेला आणि त्यानंतर

लवकरच त्याला कळलें कीं नेपोलियननें स्पेनचा राजा फर्डिनान्ड याला पदच्युत केल्यामुळें आतां इंग्लंड हें स्पेनचें दोस्त राष्ट्र झालें आहे. त्याला आणखी नवे हुकूमहि मिळाले. एक हुकूम त्याच्या ॲडमिरलचा (आरमारी प्रमुखाचा) होता आणि दुसरा पनामा येथील एका इंग्रज बाईचा होता. ही इंग्रज बाई म्हणजे ड्यूक ऑफ वेलिंग्टन याची बहीण लेडी बार्बारा वेलस्ली. तिनें आपल्याला इंग्लंडला पोंचतें करावें अशी त्याला विनंति केली. या मुदतींत "लिडिया" जहाजानें आतां एल् सुप्रीमो याच्या नेतृत्वाखालीं असलेल्या "नाटिविडाडे" या जहाजाला गांठून त्याचा पराभव केला. लेडी बार्बारा आणि हॉर्नब्लोअर यांना एकमेकांच्या सहवासांत जो प्रदीर्घ काळ घालवायला मिळाला, त्याची परिणति एकमेकांचें प्रगाढ प्रेम जमण्यांत झाली. परंतु तिच्यावर प्रेम करायला त्याचें मन घेईना; कारण घरीं त्याची पत्नी मारीया ही होती आणि तो स्वतः स्त्रियांविषयीं आदर बाळगणारा माणूस होता. त्यानें लेडी बार्बारा हिला सुरक्षितपणें इंग्लंडला पोंचती केली.

यानंतर चौऱ्याहत्तर तोफा असलेलें लढाऊ जहाज एच्. एम्. एस्. सदरलँड याचें नेतृत्व करण्याचा हुकूम कॅप्टन होरॅशियो हॉर्नब्लोअर याला मिळाला. त्यानें "प्लूटो" व "कॅलिग्युला" हीं दोन जहाजें मदतीला घेऊन व्यापारी जहाजांच्या काफिल्याला संरक्षण देण्याची कामगिरी केली आणि या काफिल्याला उत्तर आफ्रिकेच्या अक्षांश रेषेपर्यंत सोबत केली. वाटेंत त्यांना फ्रेंच सरकारचा परवाना असलेल्या खासगी लढाऊ जहाजांनीं गांठलें, आणि या जहाजांचा हल्ला त्यांनीं परतविला. व्यापारी जहाजांच्या काफिल्याला निरोप देण्यापूर्वीं या काफिल्यांतील खलाशांवर हॉर्नब्लोअरचा चांगलाच प्रभाव पडला.

किनाऱ्या किनाऱ्यानें आगेकूच करतां करतां त्यानें "आमेलिये" हें फ्रेंच जहाज पकडलें, ल्लान्झा येथील तोफांच्या मोर्चेबंदीवर हल्ला चढविला, फ्रेंचांना रसद पोंचविणारीं जहाजें जाळून खाक केलीं आणि समुद्रकिनाऱ्यावरील हमरस्त्यानें कूच करीत चाललेल्या फ्रेंच घोडदळाच्या दोन डिव्हिजनांवर तोफांची मारगिरी केली.

फ्रेंचांच्या ताब्यांतील रोझास या गांवाला स्पॅनिश फौजांनीं वेढा दिला. या फौजांमध्यें दाखल होऊन त्यांचें नेतृत्व करण्याचा आदेश आतां लेडी बार्बारा

हिचा पति झालेला ॲडमिरल लीटन यानें हॉर्नब्लोअरला दिला. परंतु हा वेढा फसला; कारण स्पॅनियर्ड लोकांनीं या कामीं इंग्रजांना सहकार्य दिलें नाहीं. तिथून माघार घेतल्यानंतर हॉर्नब्लोअर याला "कॅस्सान्ड्रा" हें फ्रिगेट जातीचें ब्रिटिश लढाऊ जहाज भेटलें. त्याला असें कळलें कीं चार फ्रेंच जहाजें आपल्यावर चाल करून येत आहेत. या सामन्यांत चारास एक येवढ्या प्रमाणांत शत्रूचें संख्याबळ अधिक असतांना देखील त्यानें लढा देण्याचें ठरविलें. त्यानें "कॅस्सान्ड्रा" जहाजाला "प्लूटो" व "कॅलिगुला" या जहाजांच्या शोधार्थ धाडून दिलें. "कॅस्सान्ड्रा" जहाज परत आलें आणि येतांना त्यानें वरिष्ठांकडून हॉर्नब्लोअरला उद्देशून शत्रूशीं सामना करण्यास मुभा देणारा आदेश आणला. ॲडमिरलचें ध्वजधारी जहाज तिथेंच हजर असल्याचें या आदेशावरून सूचित झालें. हॉर्नब्लोअरनें फ्रेंचांचें एकेक जहाज अलग अलग गांठून त्यांच्याशीं सामना दिला. परंतु तो तिसऱ्या दोन-डेकवाल्या फ्रेंच जहाजाशीं लढत असतांनाच चौथ्या फ्रेंच जहाजानें त्याच्यावर हल्ला चढविला आणि त्याला शरणागति पतकरण्यास भाग पाडलें.

शरणागतीनंतर हॉर्नब्लोअर आणि बुश हे दोघे रोझास येथील तुरुंगांत डांबले गेले. ॲडमिरल लीटन हा "प्लूटो" आणि "कॅलिगुला" या लढाऊ जहाजांनिशीं त्या उपसागरांत घुसला आणि त्यानें तिथल्या फ्रेंच आरमारी स्क्वॉड्रनचा (दलाचा) धुव्वा उडविला. तुरुंगाच्या भिंतीवरून हॉर्नब्लोअर या लढाईचें निरीक्षण करीत होता, तेवढ्यांत त्याला "सदरलँड" ही ब्रिटिश युद्धनौका किनाऱ्यावरील वाळूंत घुसलेली दिसली. या युद्धनौकेला ब्रिटिश नाविकांनीं किनाऱ्यावर घुसून आग लावून दिली; हेतु हा कीं फ्रेंचांना तिचा उपयोग करतां येऊं नये. या लढाईत नौकेचें उडालेलें फळकुट लागून ॲडमिरल लीटन जखमी झाला अशी बातमी त्याला एका नाविकाकडून कळली.

नेपोलियनचा एडीसी (शरीररक्षक) कर्नल कॅलिआर्द स्वतः रोझास येथें येऊन दाखल झाला. जखमी झालेला बुश व खुद्द हॉर्नब्लोअर या दोघां युद्धकैद्यांना पॅरिसला घेऊन जाण्याची कामगिरी त्याजकडे होती- लढाईत एक पाय तुटल्यामुळें बुश आजारी स्थितींत पडून होता. म्हणून लांबच्या प्रवासांत त्याची शुश्रूषा करायला एक नोकर आपल्या-

बरोबर असावा अशी हॉर्नब्लोअरनें फ्रेंचांना विनंति केली. भरपूर शरीरबळ, व्यवहारज्ञान आणि कोणत्याहि परिस्थितीशीं मिळतें करून घेण्याची हातोटी हे गुण अंगीं असलेला आपला कॉक्सस्वेन (मुख्य दुय्यम) ब्राऊन याची त्यानें या कामासाठीं निवड केली. फ्रान्समधून प्रवास करतांना त्यांची बगी हिमाच्या वादळांत सांपडल्यामुळें नेव्हर्स या गांवीं अडकून पडली. तिथेंच नदीकांठीं एक होडी नांगरून उभी असलेली हॉर्नब्लोअरनें हेरून ठेवली. अडकून पडलेली बगी बर्फांतून बाहेर काढायच्या प्रयत्नांत तो आणि ब्राऊन असे दोघे फ्रेंचांना मदत करीत होते. त्याच वेळीं त्यानें शत्रूच्या तावडींतून निसटून जाण्याची आपली योजना आंखली. त्यानें स्वतः कर्नल कॅलिआर्डवर हल्ला चढविला आणि ब्राऊननें दुसऱ्या फ्रेंच इसमाचे हातपाय बांधून त्याला बगीच्या तळाशीं डांबून ठेवलें. मग दोघांनीं मिळून बुश याला बगींतून उचलून होडींत नेऊन ठेवलें. हा सगळा कार्यक्रम उरकायला अवघीं सहा मिनिटें लागलीं.

रात्रींच्या काळोखांतून ऐन थंडींत हे तिघे होडींतून नदीच्या प्रवाहाबरोबर चालले. हॉर्नब्लोअर वल्हीं मारत होता आणि ब्राऊन होडींतलें बर्फासारखें गार पाणी बाहेर काढून टाकत होता. जातां जातां होडी एका खडकावर आपटून फुटली. हॉर्नब्लोअर याला वाटलें कीं या अपघातांत बुश व ब्राऊन बुडून मेले असावेत. तो स्वतः अंधारांतून पोहत पोहत किनाऱ्यावर आला. इकडे ब्राऊननेंहि स्वतः पोहत पोहत बुश याला सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणून सोडलें. थंडीनें कुडकुडत हे तिघे जवळच्या एका शेतकऱ्याच्या घरीं गेले. आपण युद्धकैदी आहोंत अशी त्यांनीं ओळख दिल्यावर त्यांना त्या घरांत प्रवेश मिळाला.

या घराचा मालक कौंट द ग्रासे हा होता. त्याची सूनहि त्याच्या सोबत तिथेंच राहत होती. या मालकाचे पाहुणे म्हणून या तिघांनीं सारा हिंवाळा तिथेंच काढला. त्या मुदतींत ब्राऊननें एक कृत्रिम पाय तयार केला आणि तो बसवून घेऊन बुश याला नीट हिंडतां फिरतां येऊं लागलें. मग दोघांनीं मिळून एक होडी बांधली. या होडींतून लॉइर नदीच्या प्रवाहाबरोबर त्या तिघांनीं प्रवास करायचें ठरविलें.

उन्हाळ्याच्या सुरवातीला हॉर्नब्लोअरनें डच कस्टम इन्स्पेक्टरचा

बनावट वेष धारण केला. या बनवाबनवीला पूर्तता आणण्यासाठीं कौंटनें आपल्या दिवंगत पुत्राची ‘ लेजन ऑफ ऑनर ’ या बहुमानाच्या किताबाची फीत त्याला दिली. या थाटामुळें त्याला बेमालुमपणें सटकून जायला चांगली मदत झाली.

हॉर्नब्लोअर आणि त्याचे दोघे साथी नान्टेस बंदरांत दाखल झाल्यावर त्यानें मोठ्या शिताफीनें ‘ विच ऑफ एन्डॉर ’ हें जहाज ताब्यांत घेतलें आणि त्यावर काम करण्यासाठीं युद्धकैद्यांची एक टोळी मागविली. अशा प्रकारें सगळ्या लोकांनीं दिमाखांत इंग्लंड गांठलें. तिथें गेल्यावर हॉर्नब्लोअरचा त्याच्या अनेक पराक्रमांबद्दल गौरव झाला, त्याला ‘ सर ’ हा सरदारकीचा किताब बहाल करण्यांत आला, आणि शत्रूच्या तावडींत सांपडल्याबद्दल त्याच्यावर आलेला आक्षेप आरमारी कोर्टानें साफ धुवून काढला. त्याच्या गैरहजेरींत त्याच्या रोगिष्ट पत्नीचें निधन झालें होतें आणि लेडी बार्बारा हिनें त्याच्या छोट्या पुत्राचें पालकत्व पतकरलें होतें. पुत्राला भेटण्यासाठीं तो लेडी बार्बारा हिच्या घरीं गेला. तिला भेटणें हाहि यांत त्याचा उद्देश होताच. ॲडमिरल लीटन याला जिब्राल्टर येथें लढाईतील जखमांपायीं मरण आल्यामुळें ती आतां विधवा झाली होती. ज्या संयमशील आपुलकीनें तिनें त्याचें स्वागत केलें, तीवरून ती अगोदरच आपली झालेली आहे हें त्याला कळून चुकलें. जीवनानें आपल्याला कीर्ति मिळवून दिली आणि भाग्याचा लाभहि करून दिला, असें त्याला वाटलें. बार्बारा ही खरोखरीच त्याची भाग्यश्री ठरली.

कॅप्टन्स करेजियस (धैर्यशीलराव)

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : रूडयार्ड किप्लिंग (१८६५-१९३६). कथानकाचा प्रकार : साहसपूर्ण अद्भुतरम्य कथा. काळ : १८९०–९७. स्थळ : उत्तर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील न्यू फाउंडलँडचीं ग्रँड बँक्स. प्रथम प्रकाशन : १८९७.

प्रमुख पात्रें : हार्वे चेनी, फाजील लाडांमुळें बिघडलेला तरुण लक्ष्मीपुत्र. डिस्को ट्रूप, ‘ वुई आर हिअर ’ या जहाजाचा मालक व कप्तान. डान ट्रूप, त्याचा पुत्र. मिस्टर चेनी, हार्वेचे वडील.

समीक्षण : सागर-साहित्यप्रेमी जनांच्या अत्यंत आवडत्या कथांमध्यें 'कॅप्टन करेजियस' या कादंबरीची गणना होते. कारण वाफेच्या इंजनांवर चालणाऱ्या ट्रॉलर जहाजांमधून मोठ्या प्रमाणावर व्यापारी धर्तीचा मच्छीमार व्यवसाय सुरू होण्यापूर्वीच्या काळांत ग्रँड बँक्सच्या सागरी प्रदेशांत मच्छीमारीसाठीं ज्यांनीं आपले जीव धोक्यांत घातले त्या शूर वीरांचा बाणा या कथेंत यथातथ्य सादर केलेला आढळतो. तथापि या कथेचें एक उपांग अनेकदां उपेक्षिलें जातें. तें म्हणजे या कथेंत अमेरिकन लक्ष्मीपुत्राचें किप्लिंगनें केलेलें चित्रण हें होय. त्याचीहि गणना अशा धैर्यशीलरावांमध्यें होते. अधिकार आणि सामर्थ्य यांचा चाहता या नात्यानें लेखकानें मच्छीमार जहाजाच्या कप्तानाचा जसा गौरव केला तसाच या भांडवलदाराचाहि गौरव केला.

कथानक : हार्वे चेनी हा फाजील लाडांमुळें बिघडलेला पंधरा वर्षें वयाचा लक्ष्मीपुत्र. एका वेगवान जहाजांतून तो युरोपच्या सफरीवर निघाला. त्याला वाटेंत बोट लागली. इतकी लागली कीं एका प्रचंड लाटेनें जहाजाच्या कठड्यावरून त्याला समुद्रांत लोटून दिलें तरी आपल्यावर हा काय प्रसंग आला हें त्याच्या ध्यानांतच आलें नाहीं. सुदैवानें एका होडग्यांतून चाललेल्या कोळ्यानें त्याला उचलून वर घेतलें आणि 'वुई आर हिअर' नामक मच्छीमार जहाजावर आणून सोडलें. जहाजाचा मालक आणि कप्तान डिस्को ट्रूप याला या मुलाचें जहाजावरचें वास्तव्य आवडलें नाहीं. तरी परंतु "पुढच्या सप्टेंबरांत जहाज ग्लॉस्टर बंदरांत दाखल होईपर्यंतच्या मुदतींत तुला जेऊन खाऊन दरमहा दहा डॉलर पगार देईन" असें त्यानें त्याला सांगितलें. हा प्रसंग जेव्हां घडला, ती मे महिन्याची पंधरा तारीख होती. परंतु हार्वेनें असा हट्ट धरला कीं "मला ताबडतोब न्यूयॉर्कला घेऊन चला. तुमच्या सफरीचा सगळा खर्च माझे वडील तुम्हांला मोठ्या आनंदानं देतील." हार्वेचे वडील करोडपति असतील या गोष्टीवर कप्तानाचा विश्वास बसेना. म्हणून त्यानें आपल्या कार्यक्रमांत बदल करण्याचें नाकारलें; आणि मच्छीमारीच्या मोसमांतला आपला नफा धोक्यांत घालायला तो तयार नव्हता. यावर हार्वेनें त्याला अपशब्द बोलून त्याचा अपमान केला. तेव्हां डिस्कोनें तत्काळ त्याला शिष्टाचारांचा धडा देण्यासाठीं त्याच्या नाकावर ठोसा लगावला.

या निराधार मुलाची लवकरच कप्तानाचा पुत्र डान याच्याशीं दोस्ती

जमली. मच्छीमार जहाजावर आपल्या बरोबरीच्या वयाचा कुणी तरी मुलगा सोबतीला मिळाला म्हणून त्याला आनंद झाला. राजप्रासाद, खासगी गाड्या, भोजन समारंभ, यांविषयीं हार्वे सांगत असलेल्या गोष्टींचें त्याला विलक्षण आकर्षण वाटलें. तो स्वतः लहान मुलगा असल्यामुळें आपल्या समवयस्क लक्ष्मीपुत्र मित्राचा प्रांजळपणा त्याला पटला आणि श्रीमंत माणसाच्या जीवनांतले येवढे तपशील त्याला बनवून सांगतां आले नसते ही गोष्ट या कप्तानपुत्राला जाणवली.

जहाजावरच्या जीवनाशीं हार्वे जसजसा समरस होऊं लागला तसतसे सगळे कोळी त्याला दर्यावर्दी व्यवसायाचें शिक्षण देण्यांत रमूं लागले. नाविकांपैकीं एक जण लॉंग जॅक यानें त्याला सगळें जहाज दाखविलें आणि दोरखंडांचीं नांवें व वेगवेगळीं जलयानसाधनें यांची माहिती दिली. हार्वे सगळ्या गोष्टी झटपट शिकला. याचीं कारणें दोन. पहिलें कारण : तसा तो चलाख पोऱ्या होता. दुसरें कारण : त्यानें चुकीचीं उत्तरें दिलीं तर हा नाविक त्याला दोरखंडाच्या टोंकानें निर्दयपणें झोडपून काढी. दिवसभर जमा केलेले मासे भरून आलेलीं होडगीं जहाजाला येऊन लागल्यावर तीं खेचून वर कशीं घ्यायचीं, कॉड मासे साफ करणें व त्यांमध्यें मीठ भरून ते डेकाखालच्या बमताडांत सांठवून ठेवणें या कामीं मदत कशी करायची आणि ग्रॅंड बॅंक्स विभागांतील एका मासेमारीच्या ठिकाणाहून दुसऱ्या मासेमारीच्या ठिकाणीं जातां जातां जहाजाच्या सुकाणूशेजारीं पाहरा कसा द्यायचा—या गोष्टीहि तो शिकला. पावसाळ्यांत ग्लॉस्टर बंदरांत दाखल व्हायच्या अगोदरच हा पोऱ्या फार छान शिकून तयार होईल असें डिस्को ट्रूप देखील कबूल करूं लागला.

हळू हळू हार्वे सागरी जीवनाला सरावला. या जीवनांत जसें काम करायचे प्रसंग होते तसे मजा करायचेहि प्रसंग होते. दररोज संध्याकाळच्या वेळीं, किंवा समुद्र फार खवळलेला असल्यामुळें कॉड मासे पकडायला होडगीं खालीं सोडणें अशक्य असेल अशा दिवशीं जहाजावरचे इतर आठ खलाशी गप्पा मारत असत आणि एक हात लांकूड सात हात ढलपी अशा प्रकारच्या सागरी कथा सांगत असत. त्या ऐकतांना त्याला फार मौज वाटे. हे खलाशी जगाच्या सगळ्या भागांतून आलेले आहेत असा या गप्पांतून त्याला पत्ता लागला. डिस्को

ट्रूप आणि त्याचा पुत्र हे ग्लॉस्टरचे रहिवासी होते. लॉंग जॅक हा आयर्लंड-वासी होता. मॅनुएल हा पोर्तुगीज होता. साल्टर्स हा शेतकरी होता. पेन्सिल्व्हानिया हा पूर्वी धर्मोपदेशक असून जॉन्सटाउनच्या महापुरांत त्याचा परिवार बुडून मेलेला होता. आणि स्वयंपाकी होता नीग्रो. त्याला नोव्हा स्कोशिया येथून आणलेलें होतें आणि तो गेलिक भाषेंत (आयरिश व स्कॉटिश केल्ट लोकांच्या भाषेंत) शिव्या देई. या सगळ्या लोकांनीं हार्वेवर एक प्रकारची विलक्षण मोहिनी घातली. कारण आतांपर्यंत त्याला ठाऊक असलेल्या कोणाहि माणसापेक्षां हे लोक अगदीं वेगळे होते. या सगळ्या मंडळींनीं आपल्या गुणांची परीक्षा घेऊन आपल्याला एका करोड-पतीचा वारस म्हणून नव्हे तर एक कामगार व खलाशी म्हणून खलाशी दलांत सामील करून घेतलें या गोष्टीवर हा मुलगा अत्यंत खूष झाला. सगळ्या खलाशी मंडळींपैकीं डान आणि नीग्रो स्वैपाकी या दोघांनाच तेवढी त्याची कहाणी विश्वसनीय वाटली. एके दिवशीं एका फ्रेंच ब्रिग§ जहाजानें 'वुई आर हिअर' या जहाजाला हांक दिली. उभय जहाजांनीं आपलीं शिडें आंखडतीं घेतलीं आणि हार्वे व लॉंग जॅक या दोघांना तंबाकू खरेदीसाठीं ब्रिगवर धाडण्यांत आलें. फ्रेंच जहाजांवरील खलाशांना आपली शाळकरी फ्रेंच भाषा जवळ जवळ मुळींच समजली नाहीं, परंतु लॉंग जॅक याची करपल्लवी त्यांना तंतोतंत कळली, हें उघडकीस आल्यावर हार्वेचा फार विरस झाला.

हार्वेच्या या सफरींतील आणखी एका साहसाच्या प्रसंगीं या फ्रेंच ब्रिग जहाजाचा संबंध आला. या दुसऱ्या प्रसंगीं एका मयत फ्रेंच खलाशाच्या मालकीचा सुरा खरेदी करायला म्हणून तो आणि डान असे दोघे या जहाजावर गेले. डान यानें सुरा खरेदी केला आणि तो हार्वे याच्या हातीं दिला. या सुऱ्यानें त्या फ्रेंच इसमानें एका माणसाला ठार केलें होतें म्हणून याचें मोल वाढलेलें आहे असा डान याचा समज होता. त्यानंतर कित्येक दिवसांनीं एका होडग्यां-तून मासे पकडायचें काम करीत असतांना हार्वे याला आपल्या हातांतला

§ ब्रिग : ऐसपैस आकाराचें दोन डोलकाठ्यांचें जहाज. याच्या खालच्या अंगाला जादा शिडें असतात. मूळ ब्रिगॅन्टिने या फ्रेंच नमुन्यानुसार हें जहाज तयार झालें म्हणून 'ब्रिग' हें संक्षिप्त नांव त्याला मिळालें.

जाळ्याचा दोर जड वाटूं लागला आणि त्यानें दोर खेंचून त्या फ्रेंच इसमाचें प्रेत होडग्याजवळ ओढून घेतलें. हा फ्रेंच इसम आपला सुरा परत मागायला आला आहे कीं काय असें वाटून या दोघां मुलांनीं दोर तोडून टाकला आणि सुरा समुद्रांत फेंकून दिला.

हार्वे आणि डान हे दोघे समवयस्क असले तरी जहाजावर म्हणा अगर होडग्यांत म्हणा, डान जितक्या हुशारीनें काम करी तितकी हार्वेला जमत नसे. कारण मच्छीमार होड्या व कोळी यांच्या परिसरांतच डान लहानाचा मोठा झालेला होता. परंतु कोन-मापक यंत्राचा वापर करायच्या कामांत हार्वे वरचढ होता. त्याचा गणित-शास्त्राशीं परिचय आणि त्या आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची त्याची कर्तबगारी त्या साध्यासुध्या खलाशांना प्रचंड वाटे. त्याच्या या ज्ञानानें डिस्को ट्रूप तर इतका प्रभावित झाला कीं तो नौकानयन शास्त्राविषयीं आपल्याला असलेली माहिती हार्वेला शिकवूं लागला.

सप्टेंबरच्या सुरवातीला ' वुई आर हिअर ' हें जहाज अन्य मच्छीमार जहाजांच्या तांड्यांत सामील झालें. पाण्यांत बुडालेल्या एका खडकाजवळ कॉड मासे फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. या ठिकाणीं सगळ्या जहाजांवरील कोळ्यांनीं कॉड व हॅलिबुट या दोन जातींचे मासे आपापल्या जहाजांच्या घमताडांमध्यें भरण्याचें काम अहोरात्र अखंड चालविलें. जें जहाज हें काम सगळ्यांच्या अगोदर संपवील त्याचा त्या तांड्यांतील इतर जहाजांकडून गौरव होई इतकेंच नव्हे, तर या मालाचा पहिला सांठा बंदरांत पहिल्या प्रथम आणल्यामुळें त्याला किंमतहि सगळ्यांत जास्त मिळे. आदलीं चार वर्षें ' वुई आर हिअर ' या जहाजानें हें काम सर्वप्रथम संपविलें होतें, आणि हार्वे त्या जहाजावर हजर असलेल्या या वर्षींहि त्याला हा मान पुन्हां मिळाला. सगळीं शिडें उभारलीं, झेंडा फडकावला, आणि अशा थाटांत या जहाजानें सगळ्या तांड्याभोंवतीं एक विजयी प्रदक्षिणा घातली आणि त्यानें इतरांची घरीं धाडायची पत्रें बरोबर घेतलीं. सर्वांच्या अगोदर घरीं जायला मिळत असलेल्या या खलाशांचा इतर सगळ्या कोळ्यांना हेवा वाटला.

' वुई आर हिअर ' हें जहाज ग्लॉस्टर बंदरांत येऊन दाखल होतांक्षणीं हार्वे यानें आपल्या वडिलांना तार केली आणि आपण बुडालेलों नसून चांगले धडधाकट आहोंत असें तींतून त्यांना कळविलें. मिस्टर चेनी यांनीं या तारेला

उत्तरादाखल लगेच तार धाडून कळविलें कीं "मी कॅलिफोर्नियाहून फुरसत मिळतांक्षणीं स्वतःची गाडी घेऊन जास्तींत जास्त त्वरेनें ग्लॉस्टर मुक्कामीं येत आहे." हार्वेनें स्वतःविषयीं केलेला दावा खरा असल्याचें अशा रीतीनें उघडकीस आल्यावर डान व नीग्रो स्वयंपाकी यांखेरीज डिस्को ट्रूप व इतर सगळे खलाशी यांना मोठें नवल वाटलें.

मिस्टर चेनी व हार्वेची आई यांना आपल्या पुत्राची भेट झाल्यावर कमालीचा हर्ष झाला; आणि त्या मच्छीमार जहाजावरील कामगिरीमुळें त्याचा किती छान फायदा झालेला आहे याचें निरीक्षण केल्यावर तर त्यांचा आनंद गगनांत मावेना. या कामामुळें त्याचें उच्चभ्रू कुमारावस्थेमध्यें परिवर्तन होऊन तो आतां स्वावलंबी जवान झालेला होता. स्वतःच्या हातांनीं काम करून स्वतःचा चरितार्थ कसा चालवावा हें त्याला माहीत झालेलें होतें. लोकांचें मूल्य त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीवरून करण्यापेक्षां त्यांच्या खऱ्या योग्यतेवरून करणेंच अधिक इष्ट होय, हा सिद्धांत त्यानें आत्मसात् केलेला होता. बालपणीं दारिद्र्यावस्था सहन करून मागाहून स्वतःच्या कर्तबगारीनें कोट्याधीश झालेले मिस्टर चेनी यांना आपल्या मुलामधील हें परिवर्तन पाहून विशेष आनंद वाटला.

डिस्को ट्रूप आणि 'वुई आर हिअर' या जहाजावरील इतर खलाशी यांनीं स्वतःसाठीं कसलीहि बक्षिशी घेण्यास नकार दिला. मिस्टर चेनी यांच्या मालकीच्या वेगवान् जहाजांच्या तांड्यावरील अधिकारपद भूषविण्याची संधि डान याला मिळाली. नीग्रो स्वयंपाकी सागरी जीवनाला रामराम ठोकून हार्वेचा शरीररक्षक झाला. पुढें कांहीं वर्षांनीं चेनी कुटुंबाच्या व्यवहाराचें नियंत्रण हार्वे याच्या हातीं आलें. त्या वेळीं हार्वे याच्या मालकीच्या जहाजांपैकीं एकावर डान हा 'मेट' या अधिकारपदावर होता. डान याला उद्देशून नीग्रो म्हणाला : "तुला आठवतं ? कित्येक वर्षांपूर्वी तुम्ही दोघे लहान बच्चे होतां त्या वेळीं मी तुला आणि हार्वे याला काय सांगितलं होतं ? एक काळ असा येईल कीं त्या वेळीं हार्वे हा डान याचा धनी होईल असं मी सांगितलं होतं ना ?" आपलें हें भविष्य खरें ठरल्याबद्दल नीग्रोला निरतिशय समाधान वाटलें.

द कॅप्टन्स डॉटर : कॅप्टनची कन्यका

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : अलेक्झांडर पुश्किन (१७९९-१८३७). कथानकाचा प्रकार : ऐतिहासिक अद्‌भुतरम्य कथा. काळ : सुमारें १७७४. स्थळ : रशिया. प्रथम प्रकाशन : १८३६.

प्रमुख पात्रें : प्येत्र आन्द्रेइतिच ग्रिन्येव, एक तरुण रशियन अधिकारी. मारीया इवानोव्ना, त्याची प्रियतमा. आलेक्सेइ इवान्यिच श्वाब्रिन, प्येत्र याचा सहकारी अधिकारी. साव्येल्यिच, प्येत्र याचा नोकर. येमेल्यान पुगाच्येव, बंडखोर कोसाक नेता.

समीक्षण : रशियन वास्तववादाच्या पहिल्यावहिल्या विशुद्ध नमुन्यांमध्यें गणना होणारी ' द कॅप्टन्स डॉटर ऑर द जनरॉसिटी ऑफ द रशियन युझर्पर पुगाच्येव ' (कॅप्टनची कन्यका अथवा रशियन दंडेलशहा पुगाच्येव याचें औदार्य) ही संक्षेपानें व खळबळजनक रीतीनें निवेदन केलेली कहाणी आहे. सिद्धहस्त प्रतिभावंताचें कौशल्य उपयोगांत आणून साध्यासुध्या मारीयापासून ते क्रूरकर्मा बंडवाला पुगाच्येव याच्यापर्यंत स्वभावचित्रांची एक मालिकाच्या मालिका पुश्किननें या कथेंत चितारली. पुश्किन याची नेमणूक झारशाही दरबाराचा इतिहासकार म्हणून झाली, आणि म्हणून त्याच्या हातून ही कादंबरी लिहून तयार झाली. या अधिकारामुळें सरकारी कागदपत्रांची ऐतिहासिक दप्तरें व महाराणी दुसरी कॅथरीन हिचीं खासगी पत्रें त्याला अभ्यासतां आली.

कथानक : प्येत्र आन्द्रेइतिच ग्रिन्येव हा फार लहान वयांत सार्जंट म्हणून सिमिनोव्स्की रेजिमेंटमध्यें भरती झाला असला तरी त्याला आपला अभ्यास पूर्ण होईपर्यंत घरीं राहण्यासाठीं रजा मिळाली. वयाचीं सतरा वर्षें पूर्ण व्हायच्या सुमारास त्याच्या वडिलांनीं असें ठरविलें कीं आतां याची लष्करी कामगिरी सुरू करायची वेळ झालेली आहे. आपला इमानी सेवक साव्येल्यिच याच्या समवेत तो आईवडिलांचा आशीर्वाद घेऊन दूर अंतरावरील ओरेन्बुर्ग या गांवाकडे रवाना झाला.

या प्रवासांत अगदींच कांहीं घडलें नाहीं असें कसें होणार ? एका रात्रीं या दोघांचा मुक्काम सिम्बिर्स्क या गांवीं झाला. तिथें त्याचा नोकर बाजारांत कांहीं खरेदी करायला गेला. तोंवर इकडे त्याचा एक सह-सैनिक झूरिन याच्या

बरोबर बिलियर्ड खेळायच्या मोहांत तो सांपडला आणि सपाट्यासरशीं शंभर रूबल हरला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळच्या सुमारास हे दोघे हिमाच्छादित मैदानांतून चालले असतांना वादळ येऊं घातलेलें त्यांना दिसलें. अंधार पडला. हिमवर्षाव वाढूं लागला. शेवटीं घोड्यांना पुढचा मार्ग सांपडेना आणि कोचमननें आपला रस्ता चुकला म्हणून कबूल केलें. त्यांची सुटका एका वाटसरूनें केली. या वाटसरूचें घ्राणेंद्रिय येवढें तीक्ष्ण होतें कीं दूर अंतरावरील एका खेड्यांतला धुराचा वास त्याला आला आणि त्या वासाच्या अनुरोधानें त्यानें त्यांना तेथें नेऊन पोंचविलें. ते तिघे आणि तो वाटाड्या अशा चौघांनीं ती रात्र त्या खेड्यांत घालविली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्येत्र यानें आपला ससाच्या कातडीचा कोट त्या वाटाड्याला बक्षीस दिला. वाटाड्याच्या अंगावर धड कपडेहि नव्हते. सेवक साव्येल्यिच यानें मात्र आपल्या धन्याला बजावून ठेवलें कीं "हा कोट बहुधा दारू पिण्यासाठीं गहाण पडणार."

त्याच दिवशीं बऱ्याच उशीरां आपला तरुण प्रवासी ओरेन्बुर्ग येथें पोंचला आणि आपल्या सेनेच्या जनरलपुढें हजर झाला. त्या वेळीं असें ठरलें कीं या तरुणानें कॅप्टन मिरोनोव याच्या नेतृत्वाखालील बाइलोगोर्स्के किल्ल्याच्या शिबंदींत सामील व्हावें. कारण ओरेन्बुर्ग येथील नीरस जीवनापायीं हा तरुण उधळेपणाच्या मोहाला बळी पडण्याचा संभव आहे असें त्याच्या वरिष्ठाला वाटलें.

बाइलोगोर्स्के किल्ला हा किरघीज लोकांच्या स्तेप प्रदेशाच्या सीमेवर होता. ओंडक्यांचें कुंपण असलेलें एक खेडें, असेंच या किल्ल्याचें रंगरूप होतें. या किल्ल्याचा खरा प्रमुख कॅप्टन मिरोनोव हा नसून इथला सगळा कारभार त्याची पत्नी वासीलिसा येगोरोव्ना हिच्या हातीं होता. स्वतःचा घरसंसार चालविणें आणि आपल्या पतीच्या हाताखालील लोकांना शिस्तींत वागविणें हीं दोन्ही कामें तीच करीत होती.

द्वंद्व युद्ध केल्याच्या अपराधाबद्दल स्तेप प्रदेशांत हद्दपारीची शिक्षा भोगण्यासाठीं आलेला एक सह-अधिकारी श्वाब्रिन याच्याशीं प्येत्र याची चटकन दोस्ती जमली. प्येत्र याचा बहुतेक वेळ आपल्या कॅप्टनच्या कुटुंबांतील मंडळीसमवेतच जात असे. कॅप्टन, त्याची पत्नी व त्याची कन्या मारीया इवानोवना यांच्याशीं त्याचा ऋणानुबंध वाढत गेला. त्याला अधिकारी-पद

मिळाल्यावर लष्करी शिस्त इतकी ढिली झालेली त्याला आढळली कीं आपल्या वाङ्मयीन अभिरुचींत त्याला दंग होऊन राहतां येऊं लागलें.

त्याच्या या प्रशान्त नित्यक्रमांत श्वाब्रिनबरोबर झालेल्या अनपेक्षित भांडणानें व्यत्यय आणला. प्रकार असा झाला : मारीयाला अनुलक्षून लिहिलेलें एक प्रेमगीत त्यानें एके दिवशीं आपल्या मित्राला दाखविलें. श्वाब्रिननें या कवितेवर कडाडून टीका केली आणि टीकेच्या ओघांत तो मारीयाविषयीं तिला कमीपणा आणणारे उद्गार काढून मोकळा झाला. यावरून दोघांचें भांडण झालें आणि आपल्या मित्राला 'खोटें बोलणारा' असें विशेषण लावल्याबद्दल प्येत्र याला त्याच्याकडून द्वंद्व युद्धाचें आव्हान मिळालें.

त्यानंतरच्या सकाळीं हे दोघे सैनिक एका मैदानांत द्वंद्व युद्धासाठीं उभे ठाकले. परंतु शिबंदींतील कांहीं लोकांनीं त्यांना अडविलें. कारण या द्वंद्व युद्धाची कुणकुण वासीलिसा येगोरोव्ना हिच्या कानावर गेलेली होती. प्येत्र आणि त्यांचा वैरी या दोघांची वरकरणीं दिलजमाई झालेली दिसली. तरी पण आपला द्वंद्व युद्धाचा बेत लौकरांत लौकर अनुकूल संधि मिळतांक्षणीं अंमलांत आणायचा असें उभयतांनीं ठरवून टाकलें. या भांडणाची चर्चा मारीया-बरोबर करतांना प्येत्र याला असें कळून आलें कीं श्वाब्रिन यानें तिला पूर्वी मागणी घातलेली होती आणि तिनें ती धुडकावून लावली असल्यामुळेंच तो अशा प्रकारें वागला असावा.

आपल्यावर कुणाचेंहि लक्ष नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर श्वाब्रिन आणि प्येत्र यांनीं दुसऱ्याच दिवशीं आपला द्वंद्व युद्धाचा कार्यक्रम उरकून टाकला. या वेळीं प्येत्र याच्या छातीवर वार लागला आणि पुढचे पांच दिवस तो बेशुद्धावस्थेंत पडून होता. त्याला जरा बरें वाटूं लागल्यावर त्यानें मारीयाला आपल्याशीं लग्न करायची विनंति केली. श्वाब्रिन याची तुरुंगांत रवानगी झालेली होती. मग प्येत्र याच्या वडिलांचें पत्र आलें. त्यांत त्यांनीं लिहिलें: "कॅप्टन मिरोनोव यांच्या कन्येशीं तूं लग्न करावेंस ही गोष्ट मला मुळींच पसंत नाहीं. तुझी या किल्ल्यांतून अन्यत्र बदली करवून घ्यायच्या विचारांत मी आहे. म्हणजे तुझ्या डोक्यांतल्या या खुळचट कल्पनांचा तुला विसर पडेल." आपण घरीं पत्र मुळींच पाठविलें नाहीं असें सांगून सेवक साव्वेलियच यानें

कानावर हात ठेवले आणि आपल्या संबंधांतील ही बातमी आपल्या घरीं कळविणारा खबरी म्हणजे श्वाब्रिन हाच असणार असा एकमेव निष्कर्ष प्येत्र यानें काढला.

वडिलांचें अशा प्रकारचें पत्र आल्यानंतर या तरुणाला त्याचें जीवन अगदीं असह्य झालें असतें. पण एक अगदीं अनपेक्षित प्रकार घडला आणि त्यामुळें त्याची या अडचणींतून सुटका झाली. एके दिवशीं सायंकाळीं कॅप्टन मिरोनोव यानें आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना अशी बातमी सांगितली – मयत बादशहा तिसरा पीटर हा मेलेला नसून आपणच तो तिसरा पीटर आहोंत असा दावा येमेल्यान पुगाच्येव यानें मांडला आहे आणि त्याच्या नेतृत्वाखालीं याइकियन कोसाक जमातीनें बंड पुकारलें आहे. हे बंडवाले किल्ल्यांमागून किल्ले सर करीत असून त्यांनीं जिकडे तिकडे अत्याचारांचा धुमाकूळ माजविला आहे. म्हणून कॅप्टननें आपल्या शिबंदीला "सावध राहा आणि तोफा डागण्याची तयारी ठेवा" असा आदेश दिला.

पुगाच्येवच्या उठावाची बातमी हां हां म्हणतां साऱ्या शिबंदींत पसरली. गांवांतील कोसाक जमातीचे अनेक लोक बंडवाल्याला सामील झाले, आणि विश्वास कुणावर ठेवावा व आपल्याला दगा कुणाकडून होण्याचा संभव आहे याचा कॅप्टन मिरोनोव याला कांहींच बोध होईना. बंडवाल्या कोसाकांच्या नेत्यानें काढलेला जाहीरनामा लवकरच कॅप्टनच्या हातीं पडला. त्यांत त्यानें कॅप्टनला शरण येण्याला फर्मावलेलें होतें.

मारीया हिची रवानगी परत ओरेन्बुर्ग या गांवीं करावी असें ठरलें. परंतु दुसऱ्या दिवशीं पहांटे ती तिकडे जायला निघायच्या अगोदरच बंडवाल्यांनीं किल्ल्यावर हल्ला चढविला. कॅप्टन मिरोनोव आणि त्याचे दुय्यम अधिकारी यांनीं गांवाच्या रक्षणार्थ पराक्रमाची शर्थ केली, पण आंतील दगाबाज कोसाकांच्या मदतीनें पुगाच्येव लवकरच किल्ला सर करून बसला.

कॅप्टन मिरोनोव व त्याचे दुय्यम अधिकारी फांसावर लटकले. श्वाब्रिन दगाबाजी करून बंडवाल्यांना सामील झाला. वृद्ध सेवक साव्येलिचच याच्या रदबदलीमुळें पुगाच्येव यानें प्येत्र याला जीवदान दिलें. गांववाले आणि शिबंदींतील सैनिक यांना बंडवाल्या नेत्याशीं निष्ठा दर्शविणारी शपथ घेण्याच्या बाबतींत कसलीच दिक्कत वाटली नाहीं. वासीलिसा येगोरोव्ना

हिनें आपल्या पतीच्या मारेकऱ्याविरुद्ध निषेधाचा आवाज काढतांक्षणीं तिथल्या तिथें तिचा मुडदा पडला.

पुगाच्येव आणि त्याचे अनुयायी घोड्यांवर स्वार होऊन किल्ल्याची पाहणी करण्यासाठीं रवाना झाल्याबरोबर प्येत्र यानें मारीया हिचा शोध आरंभला. गांवच्या उपाध्यीणबाईनें तिला दडवून ठेवलेली असून तिचा ठावठिकाणा माहीत असतांना देखील श्वाब्रिन यानें तिची ओळख उघड करून सांगितलेली नाहीं, हें कळल्यावर त्याचा जीव भांड्यांत पडला. सेवक साव्येल्यिच यानें त्याला अशी बातमी दिली : "धनीसाहेब, मी या पुगाच्येवला ओळखला. कित्येक महिन्यांपूर्वी आपण आपला ससाच्या कातडीचा कोट ज्याला बक्षीस दिलांत, तोच हा." मागाहून या बंडवाल्या नेत्यानें प्येत्र याला भेटीसाठीं बोलावून घेतलें आणि आपली जुनी ओळख मान्य केली.

बंडवाल्यानें आपल्या कोसाक दलांत सामील होण्यासाठीं प्येत्र याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, परंतु ओरेन्बुर्ग येथील सरकारी फौजेंत परत दाखल होण्याच्या त्याच्या इच्छेला त्यानें मान दिला. दुसऱ्या दिवशीं प्येत्र आणि त्याचा सेवक यांना बंडवाल्यांनीं सुखरूपपणें तिथून निघून जाण्याची सोय करून दिली, आणि पुगाच्येवनें त्याला प्रवासासाठीं बसायला घोडा व अंगांत घालायला मेंढीच्या चामड्याचा कोट दिला.

त्यानंतर कित्येक दिवसांनीं कोसाक बंडवाल्यांनीं ओरेन्बुर्ग ठाण्यावर हल्ला चढविला. त्यांच्यावर चढाई करीत असतांना प्येत्र याला बाइलोगोर्स्क येथील कोसाकांपैकीं एकाकडून एक चिंताजनक निरोप आला तो असा : श्वाब्रिननें स्वतःशीं लग्न लावण्यासाठीं मारीयावर जबरदस्ती चालविलेली आहे. प्येत्र ताबडतोब जनरलकडे गेला आणि वेढा उठवून त्या खेड्याच्या मदतीला जाण्यासाठीं त्यानें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. जनरलनें या गोष्टीला नकार दिला. त्याबरोबर प्येत्र आणि त्याचा सेवक साव्येल्यिच हे दोघे पुन्हां एकदां बाइलोगोर्स्क किल्ल्याच्या रोखानें निघाले. त्यांना वाटेंत अटक झाली आणि पुगाच्येवसमोर हजर करण्यांत आलें. मारीयाला अभय मिळावें आणि तिची ओरेन्बुर्गला सुरक्षितपणें रवानगी व्हावी अशी व्यवस्था करण्याच्या बाबतींत प्येत्र यानें या बंडवाल्याचें मन वळविलें.

वाटेंत त्यांना कॅप्टन झूरिच याच्या नेतृत्वाखालील एक सेनादल भेटलें. मारीयाला सेवक साव्येलियेच याच्या संरक्षणानिशीं आपल्या कुटुंबीयांकडे धाडून द्यावें आणि प्येत्र हा स्वतः ओरेन्बुर्ग येथें सेनेसमवेत असेपर्यंत ही व्यवस्था चालू ठेवावी अशी तरतूद करायला झूरिन यानें त्याचें मन वळविलें.

ओरेन्बुर्गचा वेढा अखेरीस उठला. आतां बंडवाल्या दलांचा पाठलाग करून त्यांचा फडशा पाडायचा उद्योग लष्करानें आरंभला. त्यानंतर कांहीं महिन्यांनीं प्येत्र याच्या लष्कराची छावणी त्याच्या गांवाशेजारींच पडली. म्हणून तो आपल्या आई-वडिलांच्या इस्टेटीवर जाऊन यायला एकटाच निघाला. घरीं जाऊन पाहतो तों आपल्या भूदासांनीं बंड केलें असून मारीया-सकट आपल्या कुटुंबांतील सगळीं माणसें कैदेंत आहेत. त्या दिवशीं श्वाब्रिननें आपल्या बंडवाल्या दलानिशीं त्या लोकांवर छापा घातला. मारीया वगळून तो सगळ्यांना फांसावर लटकावायच्या बेतांत होता, येवढ्यांत झूरिनच्या सैनिकांनीं त्यांची सोडवणूक केली. दगलबाज श्वाब्रिन या झटापटींत गोळी लागून जखमी झाला व त्याला कैद करण्यांत आलें.

कॅप्टनच्या कन्येविषयीं प्येत्र याच्या आईवडिलांनी आतां आपली वृत्ति बदलली, आणि मारीयाशीं आपला विवाह एक महिन्याच्या आंत होईल अशा अपेक्षेनें प्येत्र याला कॅप्टन झूरिनसमवेत पुन्हां लष्करी कामगिरीवर जातां आलें. मग त्याच्या अटकेचा हुकूम आला. पुगाच्येव याजकडून पैसे घेणें, त्याच्या वतीनें हेरगिरी करणें आणि त्याच्या हातून बक्षिसें स्वीकारणें,— असे आरोप त्याच्यावर होते. अटक झालेला दगाबाज श्वाब्रिन हाच या आरोपांचा निर्माता होता. मारीयाची साक्ष काढून आपला निरपराधीपणा प्येत्र याला सहज सिद्ध करतां आला असता, परंतु तिला या भानगडींत गुंतवायचें नाहीं असें त्यानें ठरविलें. आपलें उर्वरित आयुष्य सैबेरियांत हद्दपारीवर घालवायची त्याला शिक्षा मिळाली.

परंतु मारीया हें प्रकरण येवढ्यावर राहूं देणारी नव्हती. आपल्या भावी सासू-सासऱ्यांचा निरोप घेऊन ती त्सारस्कोये स्येलो या गांवीं गेली. महाराणीचा मुक्काम तिथेंच होता. एके दिवशीं तिथल्या बागेंत फेरफटका करीत असतांना तिला एक बाई भेटली. "मी प्रसंग विशेषीं महाराणीसाहेबांच्या दरबारांत जात असतें आणि तुझा अर्ज महाराणीसाहेबांच्या हातीं मोठ्या आनंदानं

देईन," असें या बाईनें तिला सांगितलें. त्याच दिवशीं मारीयाला महाराणी-साहेबांसमोर हजर राहण्याचा हुकूम आला. पाहते तों ज्या बाईजवळ आपण बोललों ती दुसरी तिसरी कुणी नसून खुद्द महाराणीच आहे याचा तिला या वेळीं पत्ता लागला. प्येत्र याला शिक्षेचा माफी मिळाली आणि लवकरच त्यानें कॅप्टनच्या कन्यकेशीं लग्न केलें.

कार्मेन

वाङ्मयप्रकार : लघुकादंबरी. लेखक : प्रॉस्पर मेरिमी (१८०३-१८७९). कथानकाचा प्रकार : चित्रविचित्र अद्भुतरम्य कथा. काळ : एकोणिसाव्या शतकाचीं आरंभींचीं वर्षें. स्थळ : स्पेन. प्रथम प्रकाशन : १८४७.

प्रमुख पात्रें : डॉन जोस, एक सैनिक. कार्मेन, विडीवाली. गार्सिया, कार्मेन हिचा पति. लुकास, बैलाशीं झुंज घेणारा मल्ल.

समीक्षण : या छोट्या कादंबरीचें महत्त्व कमी लेखतां कामा नये. सगळ्यांत पहिली गोष्ट म्हणजे ही एक अद्भुतरम्य आणि वाचकाचें समाधान करणारी कलाकृति आहे. जागतिक वाङ्मयांत मेरिमी याला मानाचें स्थान मिळवून देणारे प्रतिभेचे सगळे पैलू हिच्यांत प्रदर्शित झालेले आढळतात. दुसरी गोष्ट म्हणजे या कथेच्या आधारेंच बिझे यानें आपल्या ऑपेराची (सनृत्य संगीतिकेची) उभारणी केली. बिझेनें आपल्या ऑपेराची रचना करतांना मूळ कथानकाच्या कांहीं तपशिलांमध्यें फेरफार केलेला असला तरी या मूळ कथेच्या अभावीं तो ऑपेरा अस्तित्वांतच आला नसता असें म्हणणें धाष्ट्र्याचें ठरणार नाहीं. अशा प्रकारें आपण मेरिमी याचे दुहेरी ऋणाइत आहोंत. एक ऋण चांगल्या कथेचें आणि दुसरें ऋण जगांतील एका अत्यंत लोकप्रिय ऑपेराचें.

कथानक : डॉन जोस हा तरुण देखणा रिसालदार होता. हा नाव्हारचा राहणारा. बास्क प्रांतांतील एका चांगल्या कुळांतला तो असल्यामुळें भराभर बढत्या मिळून लष्करी पेशांत नांव कमावण्याची त्याला उत्तम संधि होती. परंतु येथें आपल्या कामावर हजर झाल्यानंतर लवकरच त्याची चुकून भटक्या जिप्सी जमातींतील एका सुंदर व चलाख तरुणीशीं गांठ पडली. तिचें नांव कार्मेन. तत्काळ तो तिच्या प्रेमांत गुरफटला, आणि विड्यांच्या कारखान्यां-

तील दुसऱ्या एका कामगारावर तिनें सुरीहल्ला केल्यानंतर तिला त्यानें खुशाल जाऊं दिलें.

एके रात्रीं तिनें त्याला गळ घातली : " तूं आपली या वेळची कामगिरी टाकून माझ्याबरोबर चल. " तो कबूल झाला. या अपराधाबद्दल त्याला गार्ड ड्यूटीची शिक्षा मिळाली. ती पुन्हां त्याच्याकडे गेली आणि आपल्याबरोबर दुसऱ्यांदां यायचा त्याला आग्रह करूं लागली. त्यानें नकार दिला. तिनें त्याच्याशीं तासाभरापेक्षां अधिक हुज्जत घातली. संताप व प्रेम या द्वंद्वाच्या कात्रींत सांपडून डॉन जोस हैराण झाला. तो तिचा प्रियकर झाल्यानंतर ती त्याला आलटून पालटून आंजारत गोंजारत राही आणि त्याचा उपहास करी. कार्मेन ही स्वतंत्र वृत्तीची, बंडखोर आणि छळवादी स्त्री होती. तिनें जितका अधिक चंचलपणा दर्शवावा, तितका डॉन जोस अधिक पिसाटपणें तिचा अनुनय करूं लागावा, असा प्रकार चालू झाला.

एके रात्रीं त्यानें कार्मेनला भेटायचें कबूल केलें आणि तो तिच्या बिऱ्हाडीं दाखल झाला. तीं दोघें एकान्तांत असतांना कार्मेनचा दुसरा प्रियकर असलेला एक लेफ्टनंट आंत आला. बाचाबाची झाली. तरवारी तळपल्या. नंतरच्या झटापटींत डॉन जोस यानें लेफ्टनंटला ठार केलें. त्याच्या स्वतःच्या डोक्यावर प्रतिस्पर्ध्याच्या तरवारीचा वार बसून जखम झाली. ही झटापट चालू असतांना कार्मेन सारा वेळ खोलींतच राहिली आणि लेफ्टनंट जमीनदोस्त झाल्यावर " तूं मूर्ख आहेस " असा तिनें डॉन जोस याला शेलका अहेर केला. मग त्याला तिथेंच सोडून ती बाहेर गेली आणि लगेच कांहीं मिनिटांनीं एक ओव्हरकोट घेऊन परत आली. ती त्याला म्हणाली : " हा ओव्हरकोट अंगांत घाल आणि पळ काढ. आतां तुझा पाठलाग झाल्याखेरीज राहणार नाहीं. " वैभवशाली लष्करी कर्तबगारीच्या त्याच्या सगळ्या आकांक्षांचा चक्काचूर झाला. प्रेमापायीं त्याला खुनी व्हावें लागलें आणि एका खिसेकापू आणि चोर स्त्रीच्या सहवासांत बंडवाल्याचें जीवन जगण्याचें त्याच्या नशिबीं आलें.

कार्मेनचे कैक दोस्त आणि परिचित असलेच बंडवाले होते. डॉन जोस याला दुसरा कोणताहि पर्याय उपलब्ध नसल्यामुळें तिच्याबरोबर जाण्याखेरीज त्याला गत्यंतरच उरलें नाहीं. बेकायदा आयात व्यवहार व लुटारूपणा करणाऱ्या एका लहानग्या टोळींत तो सामील झाला. कार्मेनकडे या टोळीच्या

वतीनें हेरगिरी करण्याची कामगिरी होती. दरम्यान डॉन जोस याला पकडून आणण्यासाठीं इनाम जाहीर झालें. दोघें मिळून निघालीं. शेवटीं त्यांना त्या लुटारूंचा अड्डा सांपडला. बराच काळ डॉन जोस त्यांच्या सहवासांत राहिला. या नवीन बेकायदा जीवनामध्यें त्यानें येवढ्या जोमानें व उत्साहानें उडी घेतली कीं जिवावर उदार असलेला निर्घृण बंडवाला अशी त्याची ख्याति झाली. पण या सगळ्या काळांत त्याला सुखी जीवनाचा लाभ मात्र झाला नाहीं. स्वभावतः तो प्रेमळ माणूस होता. त्याच्या मूळ वृत्तींत बेदरकारपणाचा लवलेशहि नव्हता. तो ज्या जीवनाचीं स्वप्नें रंगवीत असे, त्यांत अशा प्रकारच्या रानटी जीवनाला वाव नव्हता. यांत पुन्हां भरीला भर म्हणजे कार्मेन आपल्याशीं इमानानें वागत नाहीं, तिचे इतरहि प्रियकर आहेत, हें त्याला ठाऊक होतें. म्हणून तो मुग्ध आणि दुर्मुखला झाला.

गुंडांच्या टोळीचा एकाक्ष पुढारी गार्सिया हा कार्मेनचा नवरा आहे याचा पत्ता लागल्यावर त्याची चीड व असूया आणखी वाढली. या वेळेपर्यंत टोळींतील सदस्यांची संख्या बरीच घटलेली होती. एके दिवशीं डॉन जोसबरोबर कडाक्याचें भांडण झाल्यामुळें कार्मेन कुठें तरी निघून गेली. तेवढ्यांत डॉन जोस यानें गार्सियाचा मुडदा पाडला. त्याच्या टोळींतला एक बंडवाला यावर त्याला म्हणाला : " तूं भलताच गाढवपणा केलास. अरे, तुला जर कार्मेन हवी होती, तर गार्सियानं मूठभर डॉलरांच्या मोबदल्यांत तुला ती विकत दिली असती. " कार्मेन परत आली. " तूं विधवा झालीस " असें त्यानें तिला सांगितलें. गार्सियाच्या मृत्यूचा आणखीहि एक अर्थ होता. तो हा कीं त्याच्या टोळींत आतां दोघेच शिल्लक राहिलेले होते. एक धोकेबाज दरवडा घालण्याची योजना त्यांनीं अगोदरच आंखून ठेवलेली होती. तिच्यासाठीं हे दोघेच कसे पुरणार, हा प्रश्न होता.

डॉन जोस व बेकायदा आयात व्यवहार करणारा आणखी एक गुंड डान्केअर या दोघांनीं मिळून एका नव्या टोळीची संघटना केली. कार्मेन त्यांना उपयुक्त असें काम करीत राहिली. ती ग्रानाडा या गांवीं गेली. तिथें तिला लुकास नामक एक मल्ल भेटला. बैलाशीं झुंज खेळण्यांत हा प्रवीण होता. आपल्या या प्रतिस्पर्ध्याविषयीं डॉन जोस याला असूया वाटूं लागली. तो तिला म्हणाला : " तूं सदोदित माझ्याच जवळ

राहा. आपण हें जें जीवन जगत आहोंत तें सोडून देऊं या. तूं माझ्याबरोबर अमेरिकेला चल." कार्मेननें या गोष्टीला नकार दिला. ती म्हणाली : "आतां-पर्यंत मला तूं अमुक कर नि तमुक कर असं सांगून माझ्यावर हुकुमशाही गाजविण्यांत कुणीहि कधींहि यशस्वी झालेला नाहीं. मी बोलून चालून भटकणारी जिप्सी बाई. पण मी तुला एक भविष्य सांगून ठेवत्यें. कॉफी गाळल्यानंतर भांड्याच्या तळाशीं जो सांका राहतो त्यांत हें भविष्य मला वाचायला मिळालं. तें असं कीं तूं नि मी एकत्रच आपल्या आयुष्याचा शेवट करूं." तिच्या या उद्‌गारांनीं डॉन जोस याची अर्धवट खात्री पटली कीं आतां आपल्याला चिंता करीत बसायचें कांहीं एक कारण नाहीं.

त्यानंतर थोड्याच अवधींत कार्मेननें त्याचा आदेश पुन्हां धाब्यावर बसविला. आणि ती कॉर्डोवा या गांवीं गेली. तिथें लुकास एका बैलाशीं झुंज घेणार होता. डॉन जोस तिच्या पाठोपाठ तिथें गेला. पण तिथल्या मैदानांत ती त्याला फक्त ओझरती दिसली. लुकासला या झुंजेंत बैलानें जखमी केलें. मैदानाबाहेर डॉन जोस व कार्मेन यांची गांठ पडली. पुन्हां एकदां त्यानें तिला विनविलें : "तूं कायमची माझीच होऊन राहा. तूं माझ्याबरोबर अमेरिकेला चल." त्याच्या या बोलण्यावर ती हंसली आणि तिनें या विनंतीचा उपहास केला.

डॉन जोस एका गोसाव्याकडे गेला आणि त्याला म्हणाला : "एक माणूस मरणाच्या धोक्यांत सांपडणार आहे. त्याच्या अंतिम उद्धारासाठीं तुम्ही प्रार्थना करा." तो कार्मेनकडे परतला. मग त्यानें तिला आपल्या बरोबर यायला सांगितलें. यावर ती म्हणाली : "मी तुझ्याबरोबर हवं तिकडे येईन. त्यांत मला मरण आलं तरी चालेल. तूं मला येवढ्यांत ठार मारणार आहेस हें मी ओळखलंय. पण मी माझ्या नशिबीं येईल तें भोगायला तयार आहें. माझं तुझ्यावर प्रेम मात्र अतःपर राहिलेलं नाहीं येवढं मी तुला निक्षून सांगत्यें. लुकास जरी माझ्यावर प्रेम करीत नसला, तरी तुझ्यावर मला यापुढं प्रेम करतां येणें शक्य नाहीं. तुझं माझं प्रेम संपलं." संतापानें बेभान होऊन डॉन जोस यानें आपला सुरा बाहेर काढला आणि तिला तिथल्या तिथें ठार मारलें. त्याच सुऱ्यानें त्यानें खड्डा खणला आणि झाडांच्या राईत तिचें दफन केलें. मग तो सगळ्यांत जवळच्या पोलिस चौकीवर

गेला आणि पोलिसांच्या स्वाधीन झाला. कार्मेनच्या आत्म्याला चिरशांति मिळण्यासाठीं गोसाव्यानें प्रार्थना म्हटली.

द केस ऑफ सार्जंट ग्रिशा

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : आर्नोल्ड झ्वाइग (१८८७-). कथानकाचा प्रकार : सामाजिक टीका. काळ : १९१७. स्थळ : रशिया. प्रथम प्रकाशन : १९२७.

प्रमुख पात्रें : ग्रिशा, एक रशियन सैनिक. बाबका, त्याची रखेली. फॉन लाइचौ, डिव्हिजनचें आधिपत्य करणारा जनरल. श्रियेफफेन्झान, फौजेचा कारभार पाहणारा जनरल. विन्फ्रिएड, एक जर्मन लेफ्टनंट.

समीक्षण : पहिल्या जागतिक महायुद्धाच्या समाप्तिकाळांतील शेवटल्या कांहीं महिन्यांची चित्तवेधक कहाणी निवेदन करणाऱ्या या कादंबरीचें कथानक पहिल्या प्रथम एक नाटक म्हणून १९२१ सालीं रंगभूमीवर आलें. त्याला फार मोठी व यथायोग्य लोकप्रियता लाभली. तिच्यामुळें झ्वाइगला आपल्या पात्रांची पुनर्रचना कादंबरीच्या अधिक मोठ्या चौकटींत सादर करण्याची प्रेरणा मिळाली. प्रशियन श्रेष्ठकनिष्ठ जातिसंस्था आणि मध्यमवर्गीय संधिसाधूपणा या उभयतांमध्यें चालू असलेल्या लढयांतलें केवळ एक प्यादें—हीच सार्जंट ग्रिशा याची भूमिका आहे. या दोन जर्मन तत्वप्रणालींतल्या झटापटींतून सुटका करून घेण्याला ग्रिशाला मुळींच अवसर मिळत नाहीं याचा सुगावा वाचकाला सुरवातीलाच लागतो.

कथानक : १९१७ सालीं रशियनांचा जवळ जवळ धुव्वा उडालेला होता आणि उत्तरेला बाल्टिक समुद्रावरील रिगा बंदरापासून ते पोलंडमधून दक्षिणेपर्यंत रशियन भूप्रदेशावरील आपला कबजा मजबूत करण्यावर जर्मनांनीं समाधान मानलेलें होतें. खणाखणीच्या लढाया संपल्यावर जर्मन सैनिक व त्यांच्या ताब्यांतले रशियन युद्धकैदी यांच्या दरम्यान बंधुत्वाची भावना वाढीस लागली. असें असतांनाहि सार्जंट ग्रिशा इल्यिच पाप्रोत्किन यानें मात्र पळून जाण्याचा निर्धार केलेला होता. त्याला करावें लागणारें काम विशेष कठीण नव्हतें आणि त्याच्या आनंदी तडफदार वृत्तीमुळें त्याला सक्तमजुरी करणाऱ्या युद्धकैद्यांच्या टोळीचें मुकादमपद मिळालेलें होतें, आणि या

लोकांना कैद करणाऱ्या सगळ्या जर्मनांचा तो आवडता झालेला होता. परंतु दूर अंतरावर पूर्व दिशेला राहत असलेली आपली पत्नी व मुलगा यांचा विचार त्याच्या मनांत सतत येत होता; आणि म्हणून त्यानें रेल्वे साइडिंग-वरील मालाच्या डब्यांत लांकूडफांटा चढविण्याचें काम करतां करतांच आपली पळून जाण्याची योजना आंखली. त्यानें मालाच्या डब्यांतच लांकडें रचतां रचतां साधारणपणें शवपेटिकेच्या आकाराची एक पोकळ गुहा तयार करून ठेवली. त्या रात्रीं या गुहेंत जाऊन लपून बसायची कामगिरी त्यानें यशस्वी रीतीनें पार पाडली. तांबडें फुटायच्या अगोदर गाडी चालू झाली.

पण गाडी पूर्वेला न जातां दूरवर दक्षिणेकडे जात होती हें ग्रिशाला कळलें नाहीं. चार दिवसांनीं गाडी थांबली. चोरलेल्या पकडीनें त्यानें दरवाजा उघडला आणि तो दबकत दबकत रेल्वे लाइनीपासून दूरवर चालत गेला. त्याच्याजवळ लहानसें होकायंत्र होतें. तेंच त्याचा एकमेव वाटाड्या. त्याच्या मदतीनें त्यानें पूर्व दिशा धरली.

दाट झुडुपांमुळें वाटचाल कठीण झाली. वाटेंत कुठें तरी त्याला एक जुनी छत्री मिळाली. तिच्या बऱ्याचशा काड्या दोरीनें एकत्र बांधून आणि एका लांबट दोरखंडानें त्या वांकवून त्यानें एक कामचलाऊ धनुष्य तयार केलें. उरलेल्या काडीचा बाण झाला. धीरानें थबकत थबकत बर्फांतल्या ससांची शिकार त्याला साधतां आली. उपासमारीचा प्रश्न बहुतांशीं मिटला. एके दिवशीं त्याला तोफांच्या गोळ्यांनी उद्ध्वस्त झालेला रणमैदानाचा प्रदेश लागला. उद्ध्वस्त विवरांत त्यानें शेकोटी पेटविली आणि बर्फाचें पाणी आंघोळीसाठीं तापविलें. अंगांतले वरचे कपडे काढून हातपाय ताणून तो आंघोळ करूं लागला.

त्याच्या शेकोटीकडे एका जोडप्याचें लक्ष गेलें. त्यांपैकीं पुरुष हा रणांगण सोडून पळून आलेला रशियन सैनिक. दुसरी बाबका. ही लहानसर घाणेरडी बाई. तिच्या पांढऱ्या केंसांवरून तिचें "आजीबाई" हें नांव सार्थ ठरत होतें. दोघांच्याहि हातीं शस्त्रें. या लोकांचा परिचय झाल्यावर ग्रिशाला आपण भाग्यवान असल्याचें कळून आलें. कारण हे लोक निर्वासितांच्या एका टोळीचे पुढारी होते. त्यांनीं जवळच जुन्या जर्मन लष्करी विवरांतल्या लांकूड सामानाचें एक घर बांधलेलें होतें व त्यांत ही टोळी आरामशीर राहत होती,

हिंवाळ्याचे उरलेले दिवस ग्रिशानें या निर्वासितांच्या सहवासांत काढले. तो मोठ्या तडफेनें लांकडें फोडून आणी आणि आपल्याला अनुकूल अशा शेतकऱ्यांच्या वस्त्या असलेल्या खेडोंपाडीं या लांकडांचा व्यापार करी. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो बाबकाला कुशींत घेऊन झोंपत असे. तिचे कपडे बोंगळ असले तरी ती वयानें तरुण व हवीहवीशी वाटण्याजोगी होती. युद्ध-काळांतल्या तीन वर्षांच्या परिणामीं तिचे केंस तेवढे पांढरे झालेले होते. दिवसा बाबकाच्या हिकमती पुढारीपणाखालीं काम करायचें आणि रात्रीं बिछान्यांत तिची ऊब घ्यायची, या कार्यक्रमामुळें ग्रिशा पुन्हां पूर्ववत पुरुष झाला.

वसंत ऋतु आल्यावर निर्वासितांची ही टोळी विखुरली. ग्रिशा आणि त्याचे दोघे जोडीदार हे पहिल्या प्रथम तिथून निघाले. सुरक्षित प्रवासाची कामचलाऊ तरतूद आपल्या बाबतींत झालेली आहे असें त्याला वाटलें. एका मेलेल्या रशियन सैनिकाचा पासपोर्ट बाबकानें त्याला दिलेला होता. हें नवें नांवच त्यानें धारण केलें. तो आतां युद्धकैद्यांच्या कँपांतून पळालेला ग्रिशा पाप्रोत्किन राहिलेला नसून रशियन फौजेंतून रणांगणावरून पळून आलेला आणि पुन्हां परत रशियन सेनादलांत दाखल होण्यासाठीं चाललेला सार्जंट पावलोविच झ्यूश्चेव झाला होता.

मेर्विन्स्क या शहरीं जर्मनांनीं लष्करी ठाणें बसविलेलें होतें. लढाई जवळ जवळ बंदच असल्यामुळे हे रिकामटेकडे जर्मन फौजी लोक व लष्करी पोलीस यांची आपसांतली चुरस अधिकाधिक विकोपाला जाऊं लागली. वृद्ध जनरल फॉन लायचौ याच्या नेतृत्वाखालील फौजी लोक यांच्याकडे तांत्रिकदृष्ट्या गांवाचा ताबा होता. परंतु जनरल श्रियेफ्फेन्झान याच्या नेतृत्वाखालील लष्करी पोलीस मेर्विन्स्क शहरीं ठाण मांडून बसल्याला इतका काळ लोटलेला होता कीं तेवढ्या अवधींत त्या सगळ्या परगण्यावर श्रियेफ्फेन्झान यानें आपला अंमल पक्का करून ठेवलेला होता. फॉन लाइचौ हा प्रशियन माणूस. शिस्तीचा करडा असला तरी न्यायी व माणुसकीनें वागणारा. श्रियेफ्फेन्झान हा तसा उपऱ्या; आणि म्हणून सत्ता आपल्या हातीं ठेवण्यावर त्याचा अधिक कटाक्ष होता.

शहराबाहेर लहान लहान लांकडी बंगल्यांच्या कित्येक रांगा उभारलेल्या होत्या. त्यांतल्या अनेक बंगल्यांतून आतां जर्मन लष्करी अधिकाऱ्यांचें वास्तव्य असे. एके दिवशीं ग्रिशा हाडाडलेल्या व गलिच्छ अवस्थेंत या बंगल्यांकडे आला आणि त्यांतल्या एका रिकाम्या बंगल्यांत लपून बसला. मागाहून कांहीं दिवसांनीं पाहऱ्यावरील तत्पर लष्करी पोलिसांना तो तिथें सांपडला.

हा झ्यूश्चेव-नामधारी इसम तसा आपल्यावरील खटल्याच्या वेळीं खरोखरी घाबरलेला नव्हता. जर्मन फौजांच्या पिछाडीला ज्या अर्थी यानें इतके अनेक महिने काढले, त्या अर्थी हा रशियन हेर असला पाहिजे, असें त्याच्या बाबतींत जर्मन पोलिस म्हणूं लागले. तरी देखील त्याच्या मनाचा तोल कायम राहिला. फार झालें तर आपल्याला कांहीं काळ मेर्विन्स्क शहरांतील तुरुंगांत हे लोक डांबून ठेवतील, नाहीं तरी युद्ध लवकर नक्कीच संपणार आहे, असें त्याला वाटलें; पण कोर्टानें असें जाहीर केलें कीं रशियन फौजेंतून पळून आलेला हा सैनिक आपण जवळ जवळ दोन वर्षें जर्मन प्रदेशांत भटकत होतों असें स्वतःच कबूल करतो म्हणून तो व्याख्येनुसार हेरच ठरतो. अर्थात सार्जंट झ्यूश्चेव याला प्राणदंडाची शिक्षा मिळाली.

आपल्याला हें काय ऐकायला मिळालें याचा त्याला नीट उमज पडायच्या अगोदरच ग्रिशाची रवानगी परत त्याच्या कोठडींत झाली. सत्य परिस्थितीचा प्रकाश त्याच्या डोक्यांत एकदांचा पडल्यावर तो येवढ्या भयंकर मोठ्यानें ओरडला कीं ही गडबड थांबविण्यासाठीं एक अधिकारी त्याच्या कोठडीकडे आला. त्याला त्यानें आपली सगळी हकीगत सांगितली. रणांतून पळून आलेला झ्यूश्चेव हें आपलें खरें नांव नसून आपण युद्धकैद्यांच्या कँपांतून पळून आलेला ग्रिशा आहोंत असा त्याच्या सांगण्याचा इत्यर्थ होता.

जनरल फॉन लायचौ याचा मदतनीस व सुप्रसिद्ध यहुदी वकील पोन्सान्स्की यानें आरोपीला प्रश्न विचारले. त्यानें नांव कसें बदललें ही हकीगत ऐकून वकीलसाहेब प्रभावित झाले, परंतु या प्रकरणीं त्यांना फक्त कायद्याच्या दृष्टीनेंच लक्ष घालावेंसें वाटलें. म्हणून त्यांनीं जमवितां येईल तेवढा सगळा पुरावा गोळा करून फॉन लायचौ याची भेट घेतली. पूर्वींच्या युद्धकैद्यांच्या कॅंपांत ग्रिशाला ओळखणारे दोन पाहरेकरी होते, त्यांना जनरलच्या परवानगीनें मुद्दाम मेर्विन्स्क शहरीं बोलावून घेण्यांत आलें आणि

त्यांनीं त्याची ओळख पटविली. कायदेशीर तर्कपद्धतीनुसार पोन्सान्स्की वकिलानें अशी मागणी केली कीं लष्करी कोर्टाचा निर्णय बाजूला सारला पाहिजे. सगळा साक्षीपुरावा, जाबजबाब, सहीशिक्क्यांचीं निवेदनें, एका सुव्यवस्थित पाकिटांत घालून श्रियेफ्फेन्झान यांजकडे धाडून देण्यांत आलीं. सोबत त्यांना अशी विनंति होती कीं सार्जंट ग्रिशाच्या या प्रकरणीं आतां कोणत्या लष्करी कोर्टाचा अखत्यार चालतो या बाबतींत कोमान्डान्टूर यांनीं मार्गदर्शन करावें.

ग्रिशा कोणत्या तुरुंगांत आहे याची माहिती कोणत्या तरी मार्गानें बाबका हिला कळली. फेरीवालीचें सोंग घेऊन ती अनवाणी मेर्विन्स्क शहरीं गेली. ग्रिशापासून तिला दिवस राहिलेले होते. तिची योजना साधी होती. जर्मनांना विकण्यासाठीं बोरें व फळें ठाण्यावर आणायचीं. ग्रिशाची भेट घेण्यासाठीं आंत शिरकाव करायचा. नंतर जरा सगळ्यांच्या ओळखीची व नेहमीं भेटीला येणारी ती आहे असा समज निर्माण केल्यावर पाहरेकऱ्यांच्या पिण्याच्या दारूंत विष घालायचें. जर्मन पाहरेकरी मरून पडल्यावर ग्रिशा खुशाल तुरुंगांतून बाहेर येईल व पूर्वीसारखा स्वतंत्र माणूस म्हणून बावरेल.

परंतु ग्रिशा तिच्या या योजनेला मान्यता देईना. आपल्या खटल्याचीं सगळीं कागदपत्रें अंतिम निर्णयासाठीं रवाना झालेलीं आहेत हें त्याला ठाऊक होतें. आणि कांहीं झालें तरी युद्ध तर आतां एवढ्यांतच संपणार होतें.

ग्रिशाचीं कागदपत्रें कोमान्डान्टुरकडे गेलीं आणि त्याचा मदतनीस विल्हेल्मी याजपुढें तीं सादर झालीं. श्रियेफ्फेन्झान साहेबांचा तापट स्वभाव त्याला चांगलाच ठाऊक होता. म्हणून त्यानें अशी शिफारस केली कीं ग्रिशाला फांशी देऊनच टाकावें. हें मतप्रदर्शन मेर्विन्स्क शहरीं कळल्यावर फॉन लायचौ संतापला. श्रियेफ्फेन्झान यांजकडे पुन्हां फेरविचारासाठीं अर्ज रवाना झाला.

या सगळ्या प्रकरणाचा श्रियेफ्फेन्झान साहेबांना आतां जरा कंटाळाच आला. या बाबतींत फॉन लायचौ स्वतः आपली भेट घ्यायला येतो आहे असें कानांवर आल्याबरोबर त्यानें ग्रिशाला चोवीस तासांच्या आंत फांशी देऊन टाकण्याचा हुकूम तारेनें धाडून दिला. फॉन लायचौ यानें

या प्रकाराचा निषेध केला. या वृद्ध प्रशियन जनरलचें सरकारदरबारीं बरेंच वजन असल्यामुळें उगाच आणखी नव्या कटकटी निर्माण व्हायला नकोत म्हणून शेवटीं श्रियेफफेन्झान यानें ग्रिशाची फांशी रद्द करण्याचा नवा हुकूम तारेनें पाठविला.

परंतु बर्फाचें वादळ झाल्यामुळें ती तार मेर्विन्स्क येथें मुळीं पोंचलीच नाहीं. शेवटीं ग्रिशाला कळून चुकलें कीं आपले प्राण वांचत नाहींत. बाबका विष घातलेली दारू घेऊन आली, पण हें मद्य त्यानें मोरींत ओतून टाकलें. श्रियेफफेन्झान याच्या मूळ हुकुमानुसार त्याला गोळी घालण्यांत आली. स्वतःच्या दफनासाठीं स्वतःच्या हातांनीं खड्डा खणून ग्रिशानें सैनिकाला शोभेसें मरण पतकरलें. त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच अवधींत त्याचें बाळ बाबकाच्या पोटीं जन्माला आलें.

बर्लिन शहरीं फॉन लायचौ जळफळत राहिला. त्यानें या प्रकरणाचे सगळे तपशील अहवालरूपानें तयार केले आणि कैसर बादशहाला हा अहवाल सादर केला. श्रियेफफेन्झान याचें वरिष्ठ पद काढून घेऊन त्याला शिक्षा म्हणून खालची जागा देण्याचें कैसरनें अभिवचन दिलें, परंतु तेवढ्यांत एक रत्नखचित पेटिका भेटीदाखल आल्यामुळें कैसरचें चित्त व्यग्र झालें. हें नवें खेळणें पाहून कैसरला जो आनंद झाला, त्या आनंदाच्या भरांत त्यानें श्रियेफफेन्झान याची सौम्य कानउघाडणी करून त्याला सोडून दिलें. सार्जंट ग्रिशा याच्या प्रकरणावर अखेरचा पडदा पडला.

कॅस टिंबरलेन

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : सिंक्लेअर ल्यूईस (१८८५-१९५१). कथानकाचा प्रकार : सामाजिक टीका. काळ : १९४०-१९४९. स्थळ : उत्तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील मिन्नेसोटा राज्यांतलें ग्रँड रिपब्लिक नामक नगर. प्रथम प्रकाशन : १९४५.

प्रमुख पात्रें : कॅस टिंबरलेन, जिल्हा-न्यायाधीश. जिन्नी मार्शलँड टिंबरलेन, त्याची पत्नी. ब्रॅड क्रायली, जिन्नीचा प्रियकर.

समीक्षण : मध्यम वस्तीच्या शहरी जीवनांतील संकुचित आत्मसंतुष्टता व क्रौर्य हे सिंक्लेअर ल्यूईसचे आवडते टीकाविषय. प्रस्तुत कादंबरींत त्यानें

पुन्हां एकदां याच दोषांवर हल्ला चढविलेला आहे. दहा हजार डॉलरपेक्षां कमी उत्पन्न असलेला कुणीहि माणूस क्रांतिकारक आहे असें समजणारे झटपट श्रीमंत झालेले लोक; आदल्याच पिढींत ज्यांचे पूर्वज दारूचे गुत्ते चालवीत होते अगर हातांत थाप्या घेऊन गवंडीकाम करीत होते, अशीं "खानदान" कुटुंबें; समाजांतील आपल्याशीं समकक्ष असलेल्या लोकांच्या भानगडींविषयीं अधिक उदार वृत्ति धारण करायची, परंतु खालच्या वर्गांतील लोकांच्या नीतीवर मात्र कठोर टीकेचे हल्ले चढवायचे, असले नीतिमार्तंड कुटाळ;—अशा मंडळींचीं शब्दचित्रें ल्यूईसनें या कादंबरींत आपल्या सराईत दुधारी लेखणीनें रेखाटलेलीं आहेत. "मेन स्ट्रीट" आणि "बॅबिट" या कादंबऱ्यांतून अमेरिकन शिष्टाचार व नीति यांचें जें समीक्षण ल्यूईसनें आरंभलें, तेंच त्यानें प्रस्तुत कॅस टिंबरलेन याच्या कथेंत चालू ठेवलें आहे.

कथानक : आपली पत्नी ब्लांच हिजपासून काडीमोड घेतल्यानंतर न्यायमूर्ति कॅस टिंबरलेन यांनीं समाजांतील आपल्या जुन्या मित्रमंडळींच्या भेटीगांठी घेणें आणि आपल्या नेहमींच्या प्रामाणिक व परिणामकारक धर्तीनें कोर्टाचें कामकाज पाहणें हा नित्यक्रम व्यवस्थित चालू ठेवला. परंतु एका मामुली खटल्यांत साक्षीदार म्हणून जिन्नी मार्शलँड ही त्यांच्या कोर्टांत आली, त्या दिवसापासून न्यायमूर्तींना आपल्या जीवनांत पुन्हां गोडी निर्माण झाल्यासारखें वाटू लागलें. त्यांची चाळीशी नुकतीच उलटून त्यांना एकेचाळिसावें वर्ष लागलेलें. जिन्नीची विशी संपून तिनें नुकतें कुठें ऐन तारुण्यांत पाऊल टाकलेलें. म्हणून ते स्वतःशीं म्हणाले : "हिच्या बाबतींत मी रोमँटिक विचार मनांत आणायचे म्हणजे हा माझा मूर्खपणाच आहे." परंतु असा तर्कशुद्ध युक्तिवाद करीत असतांनाच न्यायमूर्तीसाहेबांच्या मनांत जिन्नीविषयींचे विचार अधिकाधिक घोळूं लागले. आणि त्यांच्या या पहिल्या मुलाखतीनंतर कांहीं दिवसांच्या आंतच त्यांनीं तिची दुसरी मुलाखत घेण्याचा बनाव घडवून आणला. गंभीर वृत्तीचे न्यायमूर्ति कॅस टिंबरलेन आतां प्रेमांत पडूं लागले.

त्यांचा हा रोमान्स तसा निष्कंटक नव्हता. कामगार वर्गांतील एका तरुणीच्या भानगडींत त्यांच्यासारख्यानें पडणें म्हणजे हा मूर्खपणाचाच प्रकार

आहे असें त्यांच्या मित्रांना वाटलें. आपल्या मित्रांनीं कोणावरहि अशा प्रकारें टीका करायची हिंमत करावी हा विलक्षणच प्रकार म्हटला पाहिजे अशी कॅससाहेबांची धारणा दिसली. त्यांचे मित्र डॉ. रॉय ड्रोव्हर यांचेंच उदाहरण घ्यावें. हे राजेश्री मिळेल त्या एकूण एक सस्त्या पोरीवर उघडपणें प्रेम करीत असत. आपण हे असे गुण उधळत आहोंत ही गोष्ट आपल्या पत्नीपासून लपवून ठेवण्याची दक्षता देखील हा महापुरुष बिलकुल घेत नसे. बूनी आणि क्रिनी हॅव्हॉक यांची गणनाहि याच वर्गांत होत होती. दोन्ही व्यक्ति घमेंडखोर आणि ग्राम्य वृत्तीच्या. तसाच तो जे लॅव्हेरिक; श्रीमंत, उल्लू आणि दारुडा. ब्रॅड क्रायली याची तर आपल्याच जिवलग मित्रांच्या बायकांशीं लफडीं असल्या-बद्दल कुप्रसिद्धी होती. आणि न्यायाधीशसाहेबांचे स्नेहीच तेवढे या या प्रकरणाला प्रतिकूल होते अशांतलाहि प्रकार नव्हता. खुद्द जिन्नी हिच्या तरुण जहालमतवादी मित्रांच्या मतें कॅससाहेब हे बुरसट प्रतिगामी विचारांचे गृहस्थ ठरत होते. नाहीं म्हणायला त्यांच्याविषयीं या बाबतींत सहानुभूति असणाऱ्या अशा व्यक्ति केवळ दोनच : पहिली म्हणजे खिस गाऊ; हिला स्वतःलाहि त्यांच्याशीं लग्न करायची इच्छा होती. आणि दुसरी त्यांच्या घराची देखभाल करणारी मिसेस हिग्वी.

त्यांच्या मित्रांना जिन्नीविषयीं काय वाटत होतें या गोष्टीला तितकेंसें महत्त्व नव्हतें. जिन्नीला या लोकांविषयीं काय वाटेल याच काळजीनें त्यांच्या लग्नाच्या वेळीं न्यायाधीशसाहेबांना पुष्कळसें बेचैन केलें. मधु-चन्द्रानिमित्त प्रवास करून आल्यानंतर या जोडप्यानें साहेबांच्या वडिलार्जित घरांत बिऱ्हाड थाटलें. मात्र शहराजवळच्या ग्रामीण विभागांत एखादें नवें घर राहायला मिळालें असतें तर तें जिन्नीला अधिक पसंत पडलें असतें. उभयतां क्वचितच बाहेर जात असत. कारण एकत्र घरीं राहण्यांत त्यांना पुरेसें सुख लाभत होतें. हें महायुद्धाचें पहिलेंच वर्ष. निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रांमध्यें जिन्नीला काम करायला मिळत होतें. या कामामुळें तिचा उत्साह ताजा राहील अशी कॅससाहेबांची अपेक्षा होती. पुढें तिला या कामाचा कंटाळा येऊं लागलेला आहे हें लक्षांत आल्यावर त्यांनीं तिला एका लहानशा नाटकाच्या प्रयोगांत भूमिका करायला उत्तेजन दिलें. आपण तिला या बाबतींत उत्तेजन दिल्याबद्दल मागाहून त्यांना वाईट वाटलें. कारण त्या

नाटकांत पुरुषभूमिका करणारे निरनिराळे लोक आणि विशेषतः जे लॅव्हेरिक यांच्या बाबतींत गांव भलभलतें बोलूं लागला. या जननिंदेला अनुलक्षून कॅस-साहेब तिला कांहीं सांगूं लागले, त्याबरोबर जिन्नीनें त्यांच्यावर फाजील हेवेखोरपणाचा आरोप केला, आणि मग मात्र तिनें त्यांची क्षमा मागितली. या प्रकारामुळें त्यांच्या तिच्यावरील प्रेमाला अभूतपूर्व भरती आली.

कॅससाहेबांनीं आपली थोडीशी घरजमीन भलत्याच चढलेल्या भावांत विकली आणि त्या पैशांतून शहराजवळच्या ग्रामीण भागांतलें नवें घर खरेदी केलें. या नव्या घराचें काम पूर्ण होईपर्यंतच्या मधल्या काळांत उभयतांनीं न्यूयॉर्क शहराची सफर केली. शहराचा विस्तार आणि झगझगाट बघून सुरवातीला जिन्नी मंत्रमुग्ध झाली, परंतु आपल्याला भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या स्नेहशून्यतेमुळें तिला लवकरच या शहराचा कंटाळा आला. मग ब्रॅड क्रायली न्यूयॉर्कला आला आणि त्यानें या जोडप्याला आपल्या छत्राखालीं घेतलें. तेव्हां मात्र जिन्नीची कळी खुलली. कॅससाहेबांना तरीहि तितकें सुख लागलें नाहीं तें नाहींच.

परत आल्यानंतर लवकरच उभयतांना कळून आलें कीं जिन्नीला दिवस गेले आहेत. पण तिला मधुमेहाचा विकार जडला असल्याचें कळल्यावर त्यांच्या या सुखाच्या दुधांत मिठाचा खडा पडला. तिचा डॉक्टर, रॉय ड्रोव्हर, यानें काळजी करायचें कांहींच कारण नाहीं असें आश्वासन दिलें. मात्र तिनें पथ्य नीट संभाळलें पाहिजे व तिला भरपूर विश्रांति मिळायला हवी, येवढेंच काय तें. ब्रॅड क्रायलीच्या सहवासांत तिची चांगली करमणूक होत असलेली दिसली, म्हणून कॅससाहेब त्याला वारंवार घरीं बोलावून घेत असत.

तिचें बाळंतपण नीट पार पडलें, पण मूल मात्र दगावलें. त्यानंतर कित्येक आठवडे ती कॅससाहेबांखेरीज कुणालाच भेटायला राजी नसे. मग तिला अचानक अशी हुक्की आली कीं जवळ जवळ दररोज रात्रीं पार्टीला माणसें बोलवायचीं. याचें कारण काय असावें, त्याचा कांहींच उलगडा होईना. कॅससाहेबांनीं तिच्या बाबतींत समजूतदारपणा पतकरण्याचा प्रयत्न केला. कारण आपल्या बाळाच्या निधनाचें दुःख तिला अजून तीव्रतेनें जाणवत होतें; आणि आजारीपणामुळें तिच्यावर लादलेल्या खाण्यापिण्याच्या निर्बंधांची तिला चीड वाटत होती. ब्रॅड व जिन्नी यांच्या गांठीभेटी फार

होऊं देऊं नयेत असा इशारा मित्रमंडळींनीं पुन्हां कॅससाहेबांना दिला. तेव्हां मात्र साहेबांचा धीर जवळ जवळ संपला. "तूं जिन्नीपासून दूर राहा" असें त्यांनीं ब्रॅडला चक्क सांगूनच टाकलें. मागाहून ब्रॅडनें साहेबांची माफी मागितली आणि त्या तिघांची गट्टी पुन्हां पूर्ववत चालू झाली. ब्रॅड यानंतर न्यूयॉर्कला राहायला गेल्यावर कॅससाहेब व जिन्नी या उभयतांमधील रस्सीखेंच कांहीं काळ बंद झाल्यासारखी दिसली. मग जिन्नी पुन्हां अस्वस्थ झाली आणि आपण याहून मोठ्या शहरीं राहायला जाऊं या असें म्हणूं लागली. कॅससाहेबांना आपल्या न्यायाधीशपदाचा लोभ फार वाटे. हें पद सोडून द्यायचें त्यांच्या जिवावर येत होतें. परंतु आपल्या पत्नीसाठीं कांहींहि करावें लागलें तरी तें करायला त्यांची ना नव्हती. उभयतांनीं पुन्हां न्यूयॉर्कची सफर केली. तिथें एका सुस्थितींतल्या सॉलिसिटर कंपनींत आपल्याला भागीदारी मिळेल असें कॅससाहेबांना वाटत होतें. या सफरींत दोघांनीं ब्रॅडची भेट घेतली. पत्नीवर कॅससाहेबांचा विश्वास असला तरी "मला न्यूयॉर्क शहरीं राहणं खरोखरी आवडायचं नाहीं हें मी जाणून होत्यें, आतां आपण परत आपल्या गांवीं जाऊं या," असें जिन्नीनें सांगितल्यावर त्यांना आपल्या छातीवरचें दडपण उतरल्यासारखें वाटलें. जाण्यापूर्वीं पुन्हां ब्रॅडची भेट घ्यायच्या भानगडींत न पडतां दोघें घाईघाईनें तिथून परतलीं.

घरीं आल्यानंतरच्या पहिल्या रात्रीं जिन्नी म्हणाली: "माझं ब्रॅडवर प्रेम बसलंय. आपण न्यू यॉर्क शहरीं असतांना तो माझा प्रियकर झाला." यावर कॅससाहेब उत्तरले: "तुझ्या खरोखरी मनांत काय आहे याचा तूं भरपूर वेळ घेऊन नीट विचार कर. तोंपर्यंत मी तुला घाईघाईनं काडीमोड देत नाहीं." तेव्हां कॅससाहेबांकडून काडीमोड मिळेपर्यंत ती ब्रॅडच्या बहिणीकडे राहण्यासाठीं परत न्यूयॉर्कला निघून गेली. आतां आपलें गांव, आपलें घर, आपला मित्र परिवार, आणि आपला उद्योग या गोष्टींना कॅससाहेबांच्या दृष्टीनें कांहीं अर्थच उरला नाहीं. त्यांच्या डोक्यांत एकट्या जिन्नीचाच विचार येऊं शकत होता. मग त्यांना तिकडून एक तार आली. पथ्यपाणी संभाळण्यांत हयगय केल्यामुळें ती खूप आजारी झाली असून तिला त्यांच्यावांचून चैन पडत नव्हतें. त्याच रात्रीं त्यांनीं न्यूयॉर्ककडे धांव घेतली. ते तिला भेटले त्या वेळीं ती ग्लानींत

होती. पण "मला परत घरीं घेऊन जा" असें सांगण्याइतकी शुद्ध तिला आली.

तिला तिथून हालविण्याइतकी शक्ति तिच्या अंगीं आल्यावर कॅस-साहेबांनीं तिला समुद्रकांठच्या एका हॉटेलांत राहायला नेलें आणि मग तिथून तिला घेऊन ते घरीं गेले. त्यांनीं तिला सपशेल माफी दिली. पण त्याचबरोबर त्यांनीं तिला इशारा देऊन ठेवला कीं : "आपल्या मित्रांचा विश्वास पूर्ववत संपादन करण्यासाठीं तुला फार कष्ट घ्यावे लागतील." अजून त्यांना आप-सांतली दिलजमाई साधायची होतीच. या ग्रँड रिपब्लिक गांवीं ब्रॅड पुन्हां परत आला तेव्हां कुठें या उल्लूभाई मशालजीचें खरें स्वरूप जिन्नीच्या नजरेला येऊं शकलें. त्या रात्रीं ती कॅससाहेबांच्या खोलींत गेली. ती जणूं काय आपल्यापासून कधीं दूर गेलीच नव्हती अशा थाटांत त्यांनीं तिचें स्वागत केलें.

द कॅसल : किल्ला

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : फ्रॅन्झ काफ्का (१८८३-१९२४). कथानकाचा प्रकार : तत्त्वचिंतनपर व धर्मपर रूपककथा. काळ : कोणताहि. स्थळ : अनिश्चित. प्रथम प्रकाशन : १९२६.

प्रमुख पात्रें : के., एक साधक. फ्रेडा, गुत्त्यांतल्या गिऱ्हाइकांना मद्य देणारी सेविका. बार्नाबास, एक तरुण इसम. ओल्गा आणि आमालिया, त्याच्या बहिणी. आर्थर आणि जेरेमिया, के. याचे मदतनीस.

समीक्षण : या अपुऱ्या कादंबरीला सोळाव्या शतकांतील सुप्रसिद्ध इंग्रज लेखक जॉन बन्यन याच्या "पिल्ग्रिम्स प्रोग्रेस" (यात्रिकाची प्रगति) या ग्रंथाचा आधुनिक अवतार असें नांव देतात. आपल्या जीवनाला पूर्तता लाभावी म्हणून के. ईश्वरी कृपेचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो, परंतु आधुनिक जगांतील सांवळा गोंधळ त्याच्या मार्गांत आडवा येतो. किल्ल्याला गराडा देऊन बसलेल्या सांवळ्या गोंधळावर के. चा सरळसोट हल्ला आणि आपल्यापुढील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठीं त्यानें धरलेली दुर्दम्य ईर्ष्या, यांचें त्याला शेवटीं फळ मिळतें खरें, पण तें त्याच्या मृत्यूच्या वेळींच मिळतें. काफ्काच्या या रूपकांतील अपूर्वाई म्हणजे त्यांत अथपासून

इतिपर्यंत आढळणारा विनोद. खुद्द कथानकहि भावनात्मक व बौद्धिकदृष्ट्या चित्तवेधक आहे.

कथानक : कौंट वेस्ट-वेस्ट यांच्या किल्ल्यासमोर पसरलेल्या गांवीं के. दाखल झाला त्या वेळीं तीनीसांजा टळून गेल्या होत्या. गुडघा गुडघा सांचलेल्या हिमांतून बरीच पायपीट केल्यामुळें के. याला झोंपी जायचेंच काम पहिल्या प्रथम करायला हवें होतें. तो एका खानावळींत गेला आणि शेकोटीशेजारीं गाढ झोंपला. तेवढ्यांत एका इसमानें त्याचा गांवांत राहायचा परवाना तपासण्यासाठीं त्याला उठविलें. "मी हा येवढ्यांतच आलोंय, आणि नवा मोजणीदार म्हणून कामावर यायची विनंति कौंटसाहेबांनीं केली म्हणून मी इथं हजर झालों" असा खुलासा के. यानें केला. किल्ल्यावर फोन करून नवा मोजणीदार येणार असल्याबद्दलची खातरजमा झाल्यावर के. याला निवांतपणीं आराम करायची मुभा मिळाली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपले मदतनीस अजून आलेले नसतांनाच के. यानें किल्ल्यावर जाऊन आपण कामावर आल्याची वर्दी देण्याचें ठरविलें. हिमानें रबरबलेल्या रस्त्यांतून तो किल्ल्याकडे निघाला. तो जसजसा चालूं लागला तसतसा किल्ला अधिकाधिक दूर जात आहे असें त्याला वाटलें. अंमळशानें त्याला थकवा आला, आणि ताजेंतवानें व्हावें व मार्गदर्शनहि घ्यावें म्हणून त्यानें एका घरांत मुक्काम केला. घरांतून बाहेर पडल्यावर त्याला किल्ल्यावरून दोन इसम येत असलेले दिसले. त्यानें त्यांच्याशीं बोलायचा प्रयत्न केला, परंतु त्यांनीं थांबायला नकार दिला. संध्याकाळ होऊं लागल्यावर के. याला एका घसरगाडींत बसून खानावळींत परत यायला मिळालें.

किल्ल्यावरून परत येत असलेले जे दोघे इसम त्याला दिसले होते, ते त्याला खानावळींत भेटले. आपलीं नांवें आर्थर व जेरेमिया अशीं असून आपण तुमच्या हाताखालीं काम केलेले जुने नोकर आहोंत असा त्यांनीं आपला परिचय करून दिला. वस्तुतः त्यांनीं त्याच्या हाताखालीं काम केलेलें नव्हतें. मात्र ते किल्ल्यावरून आलेले आहेत हें त्याला ठाऊक होतें, आणि म्हणून आपल्याला मदत करायला त्यांची रवानगी झाली असली पाहिजे हें तो जाणून होता, आणि या कारणास्तव त्यानें दोघांना आपल्या हाताखालीं काम करायला घेतलें. दोघांमध्यें येवढें विलक्षण साम्य होतें कीं हा कोण व तो

कोण असा दोघांतला फरकच त्याला करतां करतां येईना. म्हणून त्यानें दोघांनाहि आर्थर हेंच नांव दिलें. सकाळीं किल्ल्यावर जाण्यासाठीं एक घसरगाडी घेऊन येण्याचा आदेश त्यानें त्यांना दिला. हें काम करण्याचें त्यांनी नाकारलें. तेव्हां के. यानें किल्ल्यावर टेलिफोन केला. कुणाच्या तरी आवाजानें त्याला सांगितलें कीं तुम्हांला किल्ल्यावर कधींच येतां येणार नाहीं. त्यानंतर लवकरच बार्नाबास नामक एक हरकारा किल्ल्याचा एक प्रमुख क्लाम्म याचें पत्र घेऊन आला. गांवच्या सुपरिंटेंडंटसमोर हजर राहण्याचा आदेश के. याला या पत्रांतून मिळाला.

के. यानें खानावळींत एक खोली घेण्याची व्यवस्था केली. तो बार्नाबासला म्हणाला: "तूं मला आपल्याबरोबर फिरायला घेऊन चल." बार्नाबास प्रेमळ तरुण होता. तो या गोष्टीला कबूल झाला. तो के. याला आपल्या घरीं घेऊन गेला. आपल्या दोघी बहिणी ओल्गा आणि आमालिया आणि वयोवृद्ध रोगजर्जर मातापितरें यांचा त्यानें के. याशीं परिचय करून दिला. परंतु के. याच्या मनाला स्वस्थता वाटेना. नाहीं तरी के. थोडाच आपल्या घरीं आलेला होता ? वस्तुतः बार्नाबास आपल्या घरीं आलेला होता. जवळच्या खानावळींतून बीयर आणायला ओल्गा बाहेर चालली. के. तिच्या सोबत गेला. खानावळींत त्याला असें स्पष्ट सांगण्यांत आलें कीं, "तुला फक्त मद्य पिण्याच्या जागेंत यायला मिळेल. बाकीच्या सगळ्या खोल्या किल्ल्यावरील सभ्य गृहस्थांसाठीं राखून ठेवलेल्या आहेत."

त्या मद्य पिण्याच्या जागीं के. यानें चटकन् तिथली मद्य देणारी सेविका फ्रेडा हिच्याशीं दोस्ती केली. ओल्गा आणि तिच्या कुटुंबांतील माणसें यांच्या तावडींतून त्याला वांचवावें अशी या मैत्रिणीची इच्छा दिसली म्हणून तिनें के. याला काउंटरखालीं दडवून ठेवलें. हा प्रकार काय आहे याचा त्याला कांहींच उलगडा होईना. फ्रेडा ही किल्ल्याचा एक प्रमुख क्लाम्म याची पूर्वीं रखेली होती असें त्याला कळलें.

फ्रेडा त्याला म्हणाली : "तुझी तशी तयारी असली तर यापुढं तुझ्याच संगतींत राहायचा मी निर्धार केलेला आहे." के. आपल्या मनाशीं म्हणाला : "मी हिच्याशीं लग्नच करावं म्हणतों. कांहीं झालं तरी किल्ल्यांत शिरकाव

करून घ्यायचा मी निश्चय केलेला आहेच. तिथल्या प्रमुखाची रखेली असलेल्या अशा या तरुणीशीं जर मी लग्न केलं तर माझा पुढचा मार्ग अधिक सुकर होईल." तेवढ्यांत आर्थर आणि जेरेमिया त्या खोलींत आले आणि त्यांच्यावर पाळत ठेवूं लागले. के. यानें त्या दोघां इसमांना तिथून बाहेर पाठविलें. के. ज्या खानावळींत राहत होता तिथें जायचें फ्रेडानें ठरविलें.

पूर्वी मिळालेल्या आदेशानुसार के. हा गांवच्या सुपरिंटेंडंटला भेटायला गेला. हा इसम संधिवातानें अंथरुणाला खिळलेला आढळला. तो के. याला म्हणाला : "कित्येक वर्षांपूर्वी मोजणीदाराची जरूर होती खरी. परंतु आतां या अनवश्यक जागेवर काम करायला तूं कां आलास हें कुणालाच ठाऊक नाहीं." के. यानें क्लाम्म याचें पत्र त्याला दाखविलें. यावर तो म्हणाला : "या पत्राला कांहींच महत्त्व नाहीं. कांहीं तरी घोंटाळा झाला असला पाहिजे. एरव्हीं तुझ्या या गांवीं येण्याचा कांहीं उलगडाच होत नाहीं." तरी पण के. यानें तिथेंच राहून कांहीं तरी काम शोधायचें ठरविलें. हेतु हा कीं तसें केल्यामुळें गांवाची मान्यता असलेला गांवकरी होण्याची संधि आपल्याला मिळेल.

के. आपल्या खानावळींत परत आला तोंपर्यंत फ्रेडानें त्याची खोली चांगली आरामशीर सजवून ठेवलेली होती. गांवचा शाळामास्तर त्याला भेटायला आला. त्यानें त्याला शाळेच्या देवडीवाल्याची नोकरी देऊं केली. फ्रेडाच्या आग्रहाखातर के. यानें ही नोकरी पतकरली. त्या रात्रीं के., फ्रेडा आणि त्याचे दोघे मदतनीस अशीं चौघें त्या शाळेंत राहायला गेलीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या मदतनिसांनीं कांहीं तरी क्लृप्त्या लढवून के. याला तिथल्या मास्तर लोकांशीं वादावादी करायला प्रवृत्त केलें तेव्हां के. यानें या दोघांहि मदतनिसांना कामावरून काढून टाकलें. दिवसाचें काम करून झाल्यावर त्यानें फ्रेडाला गुंगारा दिला आणि बार्नाबासचें घर गांठलें. किल्ल्यावरून एखादा संदेश आपल्याला आला असला तर पाहावा हा त्याचा हेतु.

बार्नाबास घरांत नव्हता. ओल्गानें त्याच्याजवळ असा खुलासा केला: "आमच्या कुटुंबावर बहिष्कार पडलाय. कारण किल्ल्यावरील कुणा सभ्य

गृहस्थाची रखेली व्हायला आमालियानं नकार दिला. त्यानं तिला उद्देशून एक फारच रासवट आणि अश्लील पत्र लिहिलं होतं. तें तिनं फाडून टाकलं. मागाहून सगळा गांव आमच्यावर उलटला." ही सगळी हकीकत ऐकून घेण्यांत के. इतका दंग होऊन गेला कीं आपल्याला तिथें येऊन किती वेळ लोटला याचें त्याला भानच राहिलें नाहीं. तो शेवटीं जायला निघाला तेव्हां जेरेमिया बाहेर आपल्यावर टेहेळणी करीत उभा असलेला त्याला दिसला.

तेव्हां के. मागच्या दारानें सटकला, पण पुन्हां पुढच्या रस्त्यावर आला आणि त्यानें जेरेमियाला विचारलें: " तूं इथं कां ?" जेरेमिया दुर्मुखला चेहरा करून उत्तरला : " मला फ्रेडानं इथं धाडलं. ती परत गुत्त्यांतल्या आपल्या जुन्या नोकरीवर हजर झाली. आतां तुला पुन्हां कधींहि भेटायचं नाहीं असं तिनं ठरवलंय." तेवढ्यांत बार्नाबास अशी बातमी घेऊन आला कीं " किल्ल्या-वरील अत्यंत महत्वाच्या व्यक्तींपैकीं एक जण तुझी भेट घेण्यासाठीं खानावळींत वाट पाहतोय."

के. खानावळींत जाऊन पाहतो तों तो गृहस्थ झोंपीं गेल्याचें त्याला कळलें. तो हॉलमध्यें उभा होता येवढ्यांत फ्रेडा दुसऱ्या बोळांतून जात अस-लेली त्याला दिसली. त्यानें तिच्या पाठोपाठ धांव घेतली. आपण इतका काळ ओल्गासमवेत कां काढला याचा त्यानें खुलासा केला आणि " तूं परत माझ्याकडे ये " असें तिला सांगितलें. तिचें मन विरघळायच्या अगदीं बेतांत होतें, येवढ्यांत तिथल्या एका खोलींतून जेरेमिया बाहेर आला आणि आपल्या बरोबर जाण्यासाठीं त्यानें तिचें मन वळविलें. के. याला फ्रेडा कायमची सोडून गेली.

(कादंबरीचा प्रकाशित भाग येथेंच संपतो. पुढचा कथाभाग कसा सजविला जाणार होता याविषयीं काफ्कानें आपल्या स्नेह्यांशीं केलेल्या संभा-षणांतील त्याच्या तोंडचीं म्हणून थोडीशीं विधानें उपलब्ध आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं त्या गावांत राहणें, आपला चरितार्थ चालविणें आणि शेवटीं किल्ल्यावर दाखल होणें, या गोष्टींसाटीं के. हा आपला लढा चालूच ठेवणार होता. तो मरायला टेंकल्यावर त्याला किल्ल्यावरून बोलावणें यायचें होतें आणि त्या गांवांत निवांतपणें राहण्याचा त्याचा हक्क मान्य करणारा संदेश त्याला मिळायचा होता.)

द कॅसल ऑफ ओट्रान्टो

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : होरेस वॉल्पोल (१७१७-१७९७). कथानकाचा प्रकार : गॉथिक धर्तीची अद्भुतरम्य कथा. काळ : बारावें शतक. स्थळ : इटली. प्रथम प्रकाशन : १७६४.

प्रमुख पात्रें : मॅन्फ्रेड, ओट्रान्टो किल्ल्याचा राजा. मटिल्डा, मॅन्फ्रेड याची कन्या. कॉन्रॅड, मॅन्फ्रेड याचा पुत्र. इसाबेल्ला, कॉन्रॅड याची वाग्दत्त वधू. फादर जिरोम, एक धर्मोपदेशक. थिओडोर, एक तरुण शेतकरी; हा ओट्रान्टो किल्ल्याचा खरा वारसदार असतो.

समीक्षण : अतिमानुष घटना आणि रहस्यमय वा अशुभसूचक वातावरण अशीं वैशिष्ट्यें असलेला जो वाङ्मयीन नमुना, त्या गॉथिक धर्तीच्या कादंबऱ्यांपैकीं अगदीं प्रारंभींच्या व अत्यंत प्रख्यात अशा कादंबऱ्यांमध्यें प्रस्तुत ग्रंथाची गणना होते. या अतिमानुष घटनांमुळें आधुनिक वाचकाच्या अंगावर फारसे शहारे येत नाहींत किंवा त्याला धसकाहि बसत नाहीं. कारण वाचकाच्या मनांत गोडी निर्माण करण्यासाठीं लेखकानें या कल्पल्या योजिलेल्या उघडच दिसतात. 'द कॅसल ऑफ ओट्रान्टो' ही कादंबरी तिचें तंत्र व शैली यांमुळें साहित्यसेवकांना विशेष अभ्यसनीय वाटते.

कथानक : ओट्रान्टोचा राजा मॅन्फ्रेड यानें आपला पंधरा वर्षें वयाचा पुत्र कॉन्रॅड याचा विवाह व्हिसेन्झाचा मार्क्विस याची कन्या इसाबेल्ला हिच्याशीं करण्याचें योजिलें. परंतु विवाहाच्या दिवशीं एक विलक्षण प्रकार घडला. एक नोकर धांवतच दिवाणखान्यांत आला आणि त्यानें जमलेल्या मंडळींना अशी बातमी दिली कीं किल्ल्याच्या आवारांत एक प्रचंड शिरस्त्राण रहस्यमय रीतीनें प्रकट झालें आहे.

कौंट मॅन्फ्रेड आणि त्याची पाहुणे मंडळी यांनीं आवाराकडे धांव घेतली. पाहतात तों एका प्रचंड शिरस्त्राणाखालीं कॉन्रॅड चेंगरून ठार झालेला आहे. तें शिरस्त्राण काळ्याभोर पंखांनीं सुशोभित केलेलें असून तीं पंखें वाऱ्यावर डुलत होतीं. थिओडोर हा तरुण शेतकरी तिथेंच उभा होता. तो म्हणाला: "प्रार्थनामंदिरांतल्या प्रिन्स आल्फोन्झो द गुड याच्या पुतळ्यावरील शिरस्त्राणासारखेंच हें दिसतंय." आणखी एक बघ्या ओरडून म्हणाला: "त्या

पुतळ्यावरचं शिरस्त्राण जाग्यावर नाहीं." प्रिन्स मॅन्फ्रेड यानें त्या शेतकऱ्याला जादुगार समजून तुरुंगांत टाकलें आणि ओट्रान्टो किल्ल्याच्या वारसदाराचा खून केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला.

त्याच दिवशीं संध्याकाळीं मॅन्फ्रेड यानें इसाबेल्ला हिला बोलावणें धाडलें. तो तिला म्हणाला: "मी माझ्या पत्नीशीं काडीमोड करूं इच्छितों. म्हणजे मग मीच तुझ्याशीं लग्न करीन आणि तुझ्या पोटीं माझ्या गादीचा वारस जन्माला येईल." हें ऐकून इसाबेल्ला घाबरली आणि तिथून जी पळाली ती किल्ल्याखालील चोरवाटांमध्यें अडकून बसली. तिथें तिला थिओडोर भेटला. त्यानें तिला एका भुयारांतून जवळच्या प्रार्थनामंदिरांत पळून जायला मदत केली. मॅन्फ्रेड तिचा शोध करीत होता. त्यानें त्या तरुणावर तिला मदत केल्याचा आरोप केला. तो थिओडोरला धमकावण्या देत होता येवढ्यांत नोकर लोक वर धांवत आले आणि म्हणाले: "महाराज, किल्ल्यांतील मोठ्या दालनांत एक राक्षस झोंपलाय." मॅन्फ्रेड दालनांत जाऊन पाहतो तों राक्षस बेपत्ता!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं फादर जिरोम आला आणि मॅन्फ्रेडला व त्याच्या पत्नीला म्हणाला: "इसाबेल्लानं माझ्या प्रार्थनामंदिरांतील देवजागेंत आश्रय घेतलाय." मॅन्फ्रेड यानें आपल्या पत्नीला तिथून जायला सांगितलें आणि तो त्या धर्मोपदेशकाला म्हणाला: "गुरुजी, मला माझ्या पत्नीपासून काडीमोड घ्यायला व इसाबेल्लाशीं लग्न करायला मदत करा." या गोष्टीला नकार देऊन फादर जिरोम म्हणाला: "राजा, असले विचार मनांत आणल्याबद्दल परमेश्वर तुझा सूड घेईल." आणि मागचा पुढचा विचार न करतां त्यानें राजाला असेंहि सांगून टाकलें: "इसाबेल्लाला पळून जायला ज्या देखण्या तरुण शेतकऱ्यानं मदत केली, त्याच्यावरच तिचं प्रेम जडलेलं असावं."

या संभाव्य घटनेचा मॅन्फ्रेड याला राग आला आणि त्यानें थिओडोरला याचा जाब मागितला. राजकन्येला पळून जायला मदत केल्याचें त्यानें नाकबूल केलें नाहीं. परंतु तिला आपण पूर्वी कधींच भेटलेलों नव्हतों असा त्यानें निर्वाळा दिला. मॅन्फ्रेड याचा आशाभंग झाला आणि त्यानें थिओडोरला फांसावर लटकण्यासाठीं किल्ल्याच्या आवारांत जायला फर्माविलें.

फांशीं जाणाऱ्या या इसमाला मुक्ति मिळावी म्हणून फादर जिरोम याला प्रार्थना म्हणण्यासाठीं बोलावणें गेलें. परंतु या तरुणाच्या गळ्याभोंवतालचा फांस ढिला केल्यावर या उपाध्येबुवाला तिथें एक जन्मखूण दिसली. तीवरून असें सिद्ध झालें कीं हा तरुण शेतकरी फादर जिरोम याचाच पुत्र आहे. फादर जिरोम यानें देवसेवेची दीक्षा घेण्यापूर्वी हा मुलगा जन्माला आलेला होता. हा प्रकार कळल्यावर मॅन्फ्रेड म्हणाला : " गुरुजी, मी तुमच्या या पुत्राची फांशी रद्द करतों. परंतु तुम्ही इसाबेल्ला हिला माझ्या स्वाधीन केलं पाहिजे. " त्याच क्षणीं किल्ल्याच्या दरवाज्यांपाशीं तुतारी वाजली.

इसाबेल्लाचे वडील व ओट्रान्टोच्या गादीचे हक्कदार वारस यांचा पुरस्कर्ता द नाइट ऑफ द जायगॅन्टिक सेबर या सरदाराचा जासूद आला आहे याची खूण म्हणूनच ही तुतारी ललकारली. हा जासूद मॅन्फ्रेड याला म्हणाला: " राजा, ही गादी तूं जबरदस्तीनं बळकावलेली आहेस. तूं ताबडतोब इसाबेल्ला हिला सोडून दे आणि तुझ्या गादीचा त्याग कर. नाहीं तर प्राणांतिक युद्धाला तयार हो. " मॅन्फ्रेड यानें त्या सरदाराला किल्ल्यावर बोलावून घेतलें. त्याच्यामार्फत आपण इसाबेल्लाशीं लग्न करायची परवानगी मिळवूं आणि आपली गादीहि संभाळूं अशी मॅन्फ्रेड याला आशा वाटत होती. पांचशें सशस्त्र सैनिक व एक प्रचंड तरवार वाहून आणणारे आणखी शंभर लोक अशा शस्त्रास्त्रांनिशीं हा सरदार किल्ल्यांत दाखल झाला.

मग मोठी मेजवानी झाली. त्या वेळीं हा विलक्षण सरदार गप्पच राहिला. तोंडांत घांस घेण्यापुरताच तो आपल्या शिरस्त्राणाचा पुढचा भाग खोलत होता. मेजवानीनंतर मॅन्फ्रेडनें इसाबेल्लाशीं लग्न करण्याचा विषय काढला. तो म्हणाला : "सरदारसाहेब, गादीला हमखास वारस मिळावा या एकाच हेतूनं मी हें दुसरं लग्न करूं इच्छितों." परंतु त्याचें बोलणें पुरें व्हायच्या अगोदरच फादर जिरोमनें अशी बातमी आणली कीं " इसाबेल्ला प्रार्थनामंदिरांतून बेपत्ता झाली." इसाबेल्लाच्या शोधार्थ सगळे लोक निघून गेल्यावर मटिल्डा हिनें थिओडोर याला किल्ल्यांतून पळून जायला मदत केली.

जंगलांत थिओडोर व इसाबेल्ला यांची भेट झाली: " मी तुझं संरक्षण करीन " असें त्यानें तिला वचन दिलें. त्यानंतर लवकरच या दोघांना द नाइट ऑफ द जायगॅन्टिक सेबर हा सरदार भेटला. या सरदारानें इसाबेल्लाची

नुकसानी करायचा बेत केलेला आहे असें समजून थिओडोरनें त्याच्याशीं लढाई केली व त्याला काबूंत आणलें. आपण आतां लवकरच मरणार अशा समजुतीनें त्या सरदारानें आपलें खरें स्वरूप इसाबेल्लाला उघड करून सांगितलें. खुद्द इसाबेल्लाचे वडीलच या सरदाराचें सोंग घेऊन आलेले होते.

ही सगळी मंडळी किल्ल्यावर परत आली. तिथें इसाबेल्लाच्या वडिलांनीं तिला विश्वासांत घेऊन एक गुप्त रहस्य सांगितलें: "मी ही प्रचंड तरवार आणलेली आहे ना, ती मला प्रभु येशू ख्रिस्ताच्या पवित्र जन्मभूमींत सांपडली. हें एक अजब हत्यार आहे. कारण त्याच्या पात्यावर असं लिहूनच ठेवलेलं आहे कीं ओट्रान्टोच्या खऱ्या राजाच्या कुटुंबावर झालेल्या अन्यायाचं परिमार्जन केवळ मॅन्फ्रेडच्या रक्तानंच होऊं शकेल." मॅन्फ्रेड किल्ल्यावर परत आला तेव्हां थिओडोरनें अंगावर चिलखत चढविलें आहे असें त्याला आढळून आलें. आपण ज्या राजाची गादी बळकावली आहे त्याच्यासारखाच हा तरुण इसम दिसतो असें मॅन्फ्रेड याला दिसूं लागलें.

मॅन्फ्रेड यानें अजूनहि इसाबेल्लाशीं लग्न करण्याचा नाद सोडलेला नव्हता. त्यानें हिकमत लढवून आपली बहीण मटिल्डा हिचा वाङ्निश्चय इसाबेल्लाच्या वडिलांशीं घडवून आणला आणि त्याच्या मोबदल्यांत त्यांच्याकडून इसाबेल्लाशीं लग्न करायला अनुमति मिळविली. त्याच क्षणीं जवळच्या एका पुतळ्याच्या नाकांतून रक्त ठिबकूं लागलें. होऊं घातलेल्या या दोन्ही लग्नांनंतर सर्वनाश ओढवणार अशी अशुभ सूचना या घटनेनें दिली.

आतां मॅन्फ्रेड याला आपल्यापुढें दोनच मार्ग असलेले दिसले. एक म्हणजे ओन्ट्रान्टोच्या गादीवरील सगळ्या हक्कांवर पाणी सोडावें. दुसरा म्हणजे इसाबेल्लाशीं लग्न करण्याचा आपला बेत पार पाडावा. यांपैकीं कोणत्याहि बाबतींत नशीब त्याला यश मिळवून द्यायला प्रतिकूल असलेलें दिसलें. किल्ल्यांत तो राक्षस दुसऱ्यांदा प्रगट झाला तरीहि त्याला वाटणारी चिंता कमी होईना. राक्षसासंबंधींची बातमी इसाबेल्लाच्या वडिलांना कळली तेव्हां त्यांनीं असें ठरविलें कीं मटिल्डाशीं लग्न करून वा मॅन्फ्रेड याला आपला जांवई करून घेऊन आपल्यावर सर्वनाश ओढवून घ्यायचा नाहीं. तेवढ्यांत गोसाव्याचीं लक्तरें अंगावर असलेला एक हाडांचा

सांपळा त्यांना भेटायला आला आणि "मटिल्डाचा नाद सोडून दे" असें त्यांना सांगून गेला. यामुळें तर त्यांचा हा निश्चय आणखीच बळकट झाला.

यानंतर कांहीं तासांनीं मॅन्फ्रेड याला कुणी तरी सांगितलें कीं "थिओडोर एका स्त्रीला घेऊन प्रार्थनामंदिरांत आलेला आहे." हें ऐकून त्याला असूयेचा झटका आला आणि तो प्रार्थनामंदिरांत गेला आणि तिथल्या तिथें त्यानें त्या स्त्रीला सुरा भोंसकून ठार केलें. पाहतो तों ती स्त्री म्हणजे आपली कन्या मटिल्डा हीच आहे. मटिल्डाच्या शवावर हात ठेवून थिओडोर यानें जाहीर केलें कीं "ओन्ट्रान्टोचा खरा राजा मीच आहे." अचानक त्या ठिकाणीं मृत राजा आल्फोन्सो याची राक्षसी आकृति प्रगट झाली. या आकृतीनें जाहीर केलें कीं "थिओडोर हाच या गादीचा खरा वारस आहे." मग हा मृतात्मा उड्डाण करून स्वर्गांत गेला आणि तिथें सेंट निकोलस यानें त्याचें स्वागत केलें.

खरा प्रकार आतां जाहीर झाला. फादर जिरोम हा जेव्हां फाल्कनारा या राज्याचा राजा होता, त्या वेळीं आल्फोन्सो याच्या कन्येच्या पोटीं त्याला थिओडोर हा पुत्र झाला. आपण ती गादी जबरदस्तीनें बळकावल्याचें मॅन्फ्रेड यानें कबूल केलें, त्यानें सपत्नीक संन्यास घेतला, आणि दोघें शेजारच्या वेगवेगळ्या मठांत दाखल झालीं. थिओडोर यानें इसाबेल्लाशीं लग्न केलें आणि तो ओट्रान्टोचा नवा राजा झाला.

कॅसल रॅकरेंट

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : मारिया एजवर्थ (१७६७-१८४९). कथानकाचा प्रकार : सामाजिक टीका. काळ : अठरावें शतक. स्थळ : आयर्लंड. प्रथम प्रकाशन : १८००.

प्रमुख पात्रें : ऑनेस्ट थाडी क्कर्क, निवेदक. सर किट रॅकरेंट, कॅसल रॅकरेंट या इस्टेटीचा मालक. सर कॉन्डी रॅकरेंट, सर किट यांचा वारस. इसाबेल्ला, कॉन्डी याची पत्नी. ज्युडी मॅक्कायर, थाडी याची भाची. जेसन, थाडी याचा पुत्र.

समीक्षण : अंशतः कल्पनाविलासात्मक आणि अंशतः टीकात्मक अशा प्रस्तुत 'कॅसल रॅकरेंट' या कथेचें निवेदन करतांना कथानायकाच्या कुटुंबाचा

आयरिश नोकर थाडी कर्क यानें आपला मूळ राष्ट्रीय मनमोकळेपणा संपूर्ण स्वरूपांत प्रगट केलेला आढळतो. या कथेला शैलीची सजावट अशी कसलीच नाहीं. घडलेल्या प्रसंगांचें सरळसोट कथन असें तिचें स्वरूप आहे. नाहीं म्हणायला निवेदकाचा अस्सल देशी घाटाचा आयरिश कोटिबाजपणा व भाषेचा थाट यांच्यामुळें कथेला जो काय रंग चढत असेल तेवढाच. या ग्रंथाला जर तळटीपा दिल्या असत्या तर आधुनिक वाचकाला थाडीच्या भाषेंतील गर्भितार्थाचा कांहींसा आस्वाद घेतां आला असता.

कथानक : आपला उमदा व उदार धनी सर पॅट्रिक ओशाफ्लिन याच्या निधनानंतर कॅसल रॅकरेंट या इस्टेटीचा नवा वारस सर मुर्ताघ याच्या घरीं ऑनेस्ट थाडी कर्क हा कामाला लागला. हा नवा मालक कवडीचुंबक व भयंकर संतापी होता. लेडी मुर्ताघ हिला देखील आपल्या कुळांपेक्षां पैसेच जास्त प्रिय वाटत होते. सर मुर्ताघ असाच एकदां संतापाच्या झटक्यांत मरण पावल्यानंतर तिनें कॅसल रॅकरेंट येथील सगळी संपत्ति धुवून काढली आणि ती लंडन शहरीं राहायला गेली. इस्टेटीचा कारभार तिचा धाकटा दीर सर किट रॅकरेंट याच्या हातीं आला. हा पिसाट व बेफिकीर माणूस होता. इस्टेटीवर खूप कर्ज असून ती फार मोठ्या प्रमाणांत गहाण पडलेली आहे असें आढळून आल्यावर तो इंग्लंडला गेला. एखाद्या श्रीमंत बाईशीं लग्न करावें, तिच्या पैशांतून इस्टेटीची डागडुजी करावी आणि आपल्या चरितार्थासाठीं भरपूर हुंडा उकळावा, असा तिकडे जाण्यांत त्याचा बेत होता.

बाथ येथील मुक्कामीं एका श्रीमंत ज्यू बाईशीं त्यानें खरोखरीच लग्न केलें. तिला घेऊन तो एकदांचा परत आला. मधुचंद्रासाठीं घरीं आलेल्या या जोडप्याला एकमेकांविषयीं मुळींच प्रेम वाटत नव्हतें हें ऑनेस्ट थाडी याला लवकरच दिसून आलें. जेवायच्या वेळीं डुकराचें मांस वाढण्यावरून एक गंभीर अडचण निर्माण झाली. असलें मांस मुळींच वाढायचें नाहीं असा लेडी किट हिनें आग्रह धरला. परंतु सर किट यानें तिचा हा हुकुम धाब्यावर बसविला. डुकराचें मांस वाढलेलें बघतांक्षणीं लेडी किट आपल्या महालांत निघून गेली आणि तिच्या पतिराजांनीं तिला कोंडून ठेवलें. सात वर्षें तिनें त्या कैदेंत काढलीं. ती खूप आजारी पडली आणि आतां मरणार असा रागरंग दिसूं लागला. तेव्हां तिनें आपले दागदागिने आपल्या पतीसाठीं ठेवावेत म्हणून सर किट यानें

तिच्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला, परंतु तिनें या गोष्टीला साफ नकार दिला. ती लवकरच मरणार असें गृहीत धरून आजूबाजूच्या सगळ्याच उपवर महिला किट रॅकरेंट याचें द्वितीय कुटुंब होण्यासाठीं प्रयत्नाला लागल्या. तो कोणती वधू निवडणार या विषयावर येवढें प्रचंड रण माजलें कीं शेवटीं सर किट याला द्वंद्व युद्धाचें आव्हान मिळालें आणि त्या झटापटींत तो ठार झाला. चमत्कार असा कीं लेडी किट आजारांतून ठणठणीत बरी झाली आणि लंडनला निघून गेली. इस्टेटीचा नवा वारस सर कॉन्डी रॅकरेंट हा सर किट याचा एक लांबचा चुलत भाऊ अधिकारपदावर आला.

सर कॉन्डी रॅकरेंट हा उधळ्या असला तरी सुस्वभावी धनी होता. इस्टेटीवर न भूतो न भविष्यति येवढा मोठा कर्जाचा डोंगर चढला असूनहि या नव्या धन्यानें आपल्या जमीनजुमल्याची कंगाल दशा सुधारण्याचा कसलाच प्रयत्न केला नाहीं. शेजारच्या इस्टेटीवर एक कुटुंब राहत होतें, त्याच्याशीं सर कॉन्डी यानें सततचा घरोबा जोडला. या कुटुंबांतील कनिष्ठ कन्यका इसाबेल्ला हिच्या मनांत सर कॉन्डी भरला, परंतु तिच्या वडिलांनीं आपलें कुटुंब व कॅसल रॅकरेंट या इस्टेटीचा धनी यांच्या दरम्यान सोयरीक व्हायचें नांव देखील काढूं दिलें नाहीं. सर कॉन्डी याचें खरें प्रेम ऑनेस्ट थाडी याच्या पुतण्याची कन्या ज्युडी हिच्यावर होतें. कोणत्या मुलीशीं लग्न करावें हें ठरविण्यासाठीं सर कॉन्डी यानें एके दिवशीं थाडी याच्या देखत एक नाणें टिचकीनें उडवून ओलीसुकी केली. यांत ज्युडी हरली आणि सर कॉन्डी लवकरच इसाबेल्ला हिला घेऊन पळून गेला.

इसाबेल्ला आपल्याबरोबर इस्टेटीच्या मदतीसाठीं कांहीं तरी धन घेऊन येईल अशी अपेक्षा होती. परंतु तिनें सर कॉन्डी याजबरोबर लग्न करतांक्षणीं तिच्या वडिलांनीं तिचा वडिलोपार्जित मिळकतीवरचा वारसाहक्क रद्द केला. हें नवविवाहित दंपत्य बेफिकीर ख्यालीखुशालींत दंग झालें, आणि इकडे त्यांचें घर आणि जमीनजुमला यांची धुळधाण चालली, नोकर-चाकर आणि कुळें दुःखांत चूर झालीं. शेवटीं आगामी निवडणुकींत एक जागा खालीं आहे असें कळल्यावरून सर कॉन्डी यानें पार्लमेंटसाठीं उमेदवार म्हणून उभा राहण्याचें ठरविलें. तो निवडणुकींत विजयी झाला खरा, परंतु सावकारांच्या तावडींतून सुटका करून घ्यायची वेळ त्या दरम्यान टळून गेली.

ऑनेस्ट थाडी याचा पुत्र जेसन हा तोंवर कायद्याचा कारभारी झालेला होता. त्यानें सर कॉन्डी याच्या सगळ्या कर्जांचें बेचनपत्र करून घ्यायला एका शेजाऱ्याला मदत केली. आपल्या पतिराजांचे कर्जदार त्यांच्या सगळ्या इस्टेटीचें हरण करायला टपले आहेत हें कळल्यावर लेडी कॉन्डी हिनें आपल्या कुटुंबियांचें मागणें मान्य केलें आणि ती आपल्या वडिलांकडे परत निघून गेली. सर कॉन्डी यानें आपल्या सुस्वभावी औदार्याला जागून आपलें मृत्युपत्र करून ठेवलें आणि त्यांत आपल्या पश्चात् आपली जमीन व सालिना पांचशें पौंड आपल्या पत्नीला मिळावेत अशी तरतूद करून ठेवली. रॅकरेंट इस्टेटीवरील देणीं चुकतीं करण्यासाठीं जेसन यानें मागणी केली, तेव्हां सर कॉन्डी त्याला म्हणाला : " हीं देणीं चुकती करायला माझ्याजवळ कांहींएक साधन नाहीं. लेडी कॉन्डी हिला मी सालिना पांचशें पौंड उत्पन्नाची सोय करून दिली आहे. " जेसन यानें आग्रह धरला कीं : " तुम्ही तुमच्या सावकारांचीं देणीं भागविण्यासाठीं कॅसल रॅकरेंट आणि सगळ्या इस्टेटी विकून टाका." अन्य मार्गच नसल्यामुळें सर कॉन्डी या गोष्टीला कबूल झाला. इसाबेल्ला हिला सालिना पांचशें पौंड मिळण्याची हमी देण्यांत आली. सर कॉन्डी याजविरुद्ध अशा प्रकारची बदमाषगिरीची कारवाई आपल्या पुत्रानें करावी याचें थाडी याला फार दुःख झालें. जेसन यानें आतां आपल्याला आपले वडील ऑनेस्ट थाडी यांच्याशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं असें ठरवून टाकलें.

वडिलांच्या घरीं गाडींतून परत जात असतां इसाबेल्ला हिची गाडी उलटली आणि या अपघातांतून ती मरतां मरतां वांचली. ती नक्की मरणारच असें गृहीत धरून जेसन लगबगीनें सर कॉन्डी यांजकडे गेला आणि म्हणाला : " लेडी कॉन्डी हिचं वर्षासन मला विकून टाका. " सर कॉन्डी याला रोख रकमेची जरूरी होती म्हणून त्यानें जेसन याची ही सूचना मान्य केली.

ज्युडी मॅक्कर्क हिचें लग्न झालें आणि तिचा नवरा वारला. ती सर कॉन्डी याला भेटायला आली. या वेळीं तो थाडी याच्या बिऱ्हाडीं राहत होता. आतां ज्युडी नक्कीच लेडी रॅकरेंट होणार असें त्या वृद्ध नोकराला वाटलें. परंतु ज्युडी आपल्या चुलत आजोबाला म्हणाली : "सरदारकीच्या पदवीला जर किल्ल्याची जोड नसेल तर लेडी होण्यांत कांहीं अर्थच नाहीं. यापेक्षां जेसन याजबरोबर लग्न केलेलं अधिक बरं नव्हे का ? त्याच्या मालकीच्या निदान जमिनी तरी

आहेत." तिनें आपला विचार मनांतून काढून टाकावा म्हणून थाडी यानें तिला खूप समजावण्याचा प्रयत्न केला परंतु ज्युडीनें तर पैशाच्या पाठीमागें लागायचा निर्धारच केलेला होता.

सर कॉन्डी यानें खाण्यापिण्याचा येवढा अतिरेक चालविलेला होता कीं त्याला यापायीं संधिवाताचा विकार जडला. एके रात्रीं एका मद्यपानाच्या मैफलींत त्यानें दारूचा फार मोठा डोस फाजील घाईनें घशाखालीं उतरविला आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत त्याला मृत्यु आला. त्याच्या मृत्यूनंतर जेसन आणि आतां बरी झालेली लेडी कॉन्डी यांनीं इस्टेटीच्या हक्कासंबंधांत एकमेकांवर कोर्टांत दावे लावले. कुणी म्हणाले: "जेसन यालाच जमीन मिळणार." आणखी कुणी म्हणाले: "लेडी कॉन्डी हिचीच या दाव्यांत जीत होणार." दाव्याचा निकाल कसा काय लागणार याचा फक्त अंदाज करीत बसणें येवढेंच थाडी याच्या हातीं राहिलें.

कॅज्युअल्स ऑफ द सी : यथा काष्ठंच काष्ठंच

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : विल्यम मॅकफी (१८८१-). कथानकाचा प्रकार : घरगुती वास्तववाद. काळ : विसाव्या शतकाच्या आरंभींचा काळ. स्थळ : इंग्लंड. प्रथम प्रकाशन : १९१६.

प्रमुख पात्रें : बर्ट गुडेरिच, यंत्र चालवणारा कामगार. मेरी, त्याची पत्नी. यंग बर्ट, त्याचा पुत्र. हन्नीबाल, त्याचा आणखी एक पुत्र. मिन्नी, मेरीची कन्या. ब्रिस्को, जहाजाचा कप्तान. नेल्ली, हन्नीबाल याची पत्नी.

समीक्षण : 'कॅज्युअल्स ऑफ द सी' हा एका कुटुंबाचा अभ्यास आहे. स्वतःला जें करायला हवें होतें तें करून दाखविणाऱ्या तीन मुलांची ही कहाणी. विल्यम मॅकफी हा सागराविषयीं लेखन करणारा विशेष अधिकारी लेखक. म्हणूनच 'कॅरिॲटिड' या जहाजावर या कादंबरींतला जो कथाभाग घडतो तो त्यांतल्या त्यांत ठसठशीत वठलेला आढळतो.

कथानक : बेकरीवाल्याच्या हाताखालीं काम करणाऱ्या पोऱ्यावर मेरीचें प्रेम जडलें. त्यानें तिला टाकून दिल्यावर ग्रामीण जीवनांत मुरलेल्या माणसाच्या धर्यानिशीं ती आई व्हायला आपल्या घरीं गेली. मिन्नीचा जन्म झाल्यानंतर मेरीला थंड प्रकृतीचा मशीनिस्ट (यंत्र चालविणारा कामगार) बर्ट गुडेरिच यानें

लग्नाची मागणी घातली. बर्ट यानें रंगेल संसारी जीवन जगण्याची कसलींच सुखस्वप्नें तिच्यापुढें उभी केली नाहींत, तरी देखील तिनें त्याला साभार हो म्हटलें. हें जोडपें लंडन शहराच्या उपनगरांत स्थाइक झालें. यथाकाल यंग बर्ट जन्माला आणि आणि मग हन्नीबाल याचा जन्म झाला.

यंग बर्ट याचे लढाऊपणाचे गुण बालवयांतच दिसूं लागले. तो धिप्पाड आणि दणकट होता. बोर्डिंगांतले विद्यार्थी व गांवांतील मुलें यांच्याशीं मारामाऱ्या करतांना तो आपल्या वर्गातल्या मुलांचें नेतृत्व करी. या चकमकींची आंखणी तो किती काळजीपूर्वक करतो हें बघून शाळाइन्स्पेक्टरनें याचें नांव लक्षांत ठेवायचें ठरविलें. हा शाळा इन्स्पेक्टर लष्करांतून निवृत्त झालेला इसम होता. आपण सैनिक होणार अशी यंग बर्ट यानें शाळेंत बढाई मारलेली ऐकल्यावर तर या इन्स्पेक्टरचा विचार आणखी पक्का झाला. कांहीं वर्षांनंतर या मुलाला लष्करांत नांव दाखल करायला इन्स्पेक्टरनें उत्तेजन दिलें. परंतु यंग बर्ट याची लष्करांतील कर्तबगारी अल्पजीवी ठरली. प्रिटोरिया येथें तो कामास आला.

मिन्नी ही एक कठीण समस्या होती. ती अंगानें किरकोळ व वृत्तीनें भिडस्त होती. आपल्याला हवें तसें हिला वळण लावायचें बळ आपल्या अंगांत नाहीं असें तिच्या आईला वाटलें. आणि आईनें तिला मन मानेल तसें वागायची मोकळीक दिली. मिन्नीचा वाङ्निश्चय दगडी कोळशाच्या खाणींतील एका कारकुनाशीं झाला. पण तिच्या वाग्दत्त वरानें एके दिवशीं तिला विचारलें: " तूं धूम्रपान करतेस का ? " त्यासरशीं तिनें हा वाङ्निश्चय जाहीर रीतीनें मोडून टाकला.

मिन्नी एका दुकानांत कामावर होती. फोटोंच्या रीटचिंगचें काम ती करी. एके दिवशीं एका अमेरिकन कंपनीनें हें दुकान आपल्या ताब्यांत घेतलें व तिथें हें काम यंत्राच्या सहाय्यानें चालू केलें. कांहीं काळ नोकरीवरून अलग झाल्यावर जुन्याच अटींनुसार परत कामावर जायला तिनें नकार दिला. मेरीनें तिला त्या कोळसेवाल्या कारकुनाशीं परत मिळतें घ्यायला विनवून सांगितलें, पण मिन्नीनें आपला हट्ट कायम ठेवला.

गुडेरिच कुटुंबाच्या शेजारीं एका अमेरिकन बाईचें बिऱ्हाड होतें. हिचें नांव मिसेस गेनॉर. हिला एक छोटासा मुलगा होता. त्याचें नांव हिराम.

मिसेस गेनॉर हिनें मिन्नीसाठीं एक विलक्षण शिफारसपत्र लिहून दिलें. ही मुलगी अभिमानी, हेकट आणि चढेल आहे असा या शिफारसपत्राचा आशय होता. हें पत्र देऊन तिनें तिला मिसेस विल्फ्री हिच्याकडे धाडलें. मिन्नी दाराशीं आली त्या वेळीं तिथें एक पार्टी चाललेली होती. मनाची मजबुती असूनहि मिन्नी आंत जायला भ्याली. परंतु मध्यम वयस्क ॲन्थनी गिल्फिल्लान यानें तिला भिडस्तपणावर मात करायला मदत केली. मिन्नी या पार्टीला हजर राहिली, तिनें तिथें स्पॅनिश संगीताचें श्रवण केलें आणि कांकडीचे सँडविच खाल्ले. तिनें ॲन्थनीची पाठ सोडली नाहीं.

पाहुणे मंडळी निघून गेल्यावर मिसेस विल्फ्ली हिनें मिन्नीला आपली सेक्रेटरी म्हणून कामावर घेतलें. एके रात्रीं बर्ट गुडेरिच पुलावरून पडला आणि बुडून मेला. मिसेस विल्फ्ली हिनें या निराधार कुटुंबाच्या मदतीसाठीं संगीताची मैफल भरविली. या कार्यक्रमाचें ठोकळ उत्पन्न चौऱ्याहत्तर पौंड झालें. मिसेस विल्फ्ली हिनें सदुसष्ट पौंड आपली फी म्हणून काढून घेतले आणि त्या निराधार कुटुंबाला सात पौंड मिळाले. या प्रकारामुळें मिन्नीच्या मनांत कटुता निर्माण झाली.

एके दिवशीं ॲन्थनी गिल्फिल्लान यानें मिन्नीला आपल्या कचेरींत भेटायला तारेनें बोलावणें धाडलें. तिला ज्या जीवनाचा वीट आलेला होता त्यांतून मुक्त होण्याचा मार्ग त्यानें सुचविला. दोघें मिळून युरोपला निघून गेलीं.

पांच वर्षांनीं मिन्नीचा मुक्काम रुआँ येथील एका लहानशा हॉटेलांत होता. आतां तिनें मेबल हें नवें नांव धारण केलेलें होतें. कप्टन ब्रिस्को याची रखेली या नात्यानें गांवांतल्या प्रासंगिक रंगढंग करणाऱ्या महिलावर्गात तिला मान मिळाला इतकेंच नव्हे तर या महिलांना तिचा हेवाहि वाटूं लागला. परंतु मिन्नीनें धास्ती घेतली. जहाजाचा कप्तान सफरीवर गेल्याला तीन आठवडे लोटले. त्यानें तर एका आठवड्यांत परत यायचें वचन दिलें होतें. कॅप्टन ब्रिस्को शेवटीं एकदांचा परत आला खरा, पण आल्या आल्या त्यानें तिचा शेवटचा निरोपच घेतला. त्यानें असा खुलासा केला : " यापुढं तुला माझी रखेली म्हणून ठेवायची मला हिंमत होणार नाहीं. कारण माझा दुय्यम (फर्स्ट मेट) हा माझा गांववाला आहे." कसलेंहि भांडण न करतां उभय-

त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला. मिन्नी आतां लंडनला परत आली आणि शिंपीण झाली. परंतु लवकरच तिच्या प्रेमानें वेडा झालेला हा कप्तान तिचा शोध घेत लंडनला आला आणि त्यानें तिला लग्नाची मागणी घातली. तिला या प्रकाराची जराशी मौज वाटली, आणि तिनें अनुमति दिली.

हन्नीबाल आतां अठरा वर्षें वयाचा उडाणटप्पू दांडगेश्वर झालेला होता. आईला तो त्रास देई. त्याच्या मूर्खपणाच्या उचापतींतून त्याला सोडवितां सोडवितां तिच्या नाकीं नऊ यायचे. त्याची कारखान्यांतली नोकरी सुटली. एके दिवशीं मिसेस गेनॉर व हिराम ही जोडी या मंडळींना भेटायला आली. हिरामच्या अंगांत व्यापारी जहाज वहातूक नोकराचा गणवेष होता. हन्नीबाल याला धड बोलतांहि येत नव्हतें, वृत्तीनें तो वेंधळ्या होता, तरीहि त्याला जहाजावर काम करायच्या कल्पनेचें आकर्षण वाटलें आणि हिराम याचें जहाज बघायला जाण्यापर्यंत त्याची मजल गेली. मागाहून त्या एस्. एस. कॅरिॲटिड जहाजावर वाढप्याची जागा भरायची आहे असें त्याला कळलें, आणि त्यानें ती नोकरी पतकरली.

दरम्यान मिन्नी आपल्या आईला म्हणाली : "माझे यजमान कॅप्टन ब्रिस्को दूरदूरच्या सफरीवर जातात. त्यांच्या गैरहजेरींत तूं माझ्याकडे येऊन राहा." ही व्यवस्था ब्रिस्को याला समाधानकारक वाटली. तो स्वान्से बंदरांत एस्. एस्. कॅरिॲटिड या जहाजाचा कप्तान म्हणून कामावर गेला.

बंदर लागलें कीं हन्नीबाल पंख पसरूं लागला. अगदीं योगायोगानें त्याला नेल्ली भेटली. ही गुटगुटीत आनंदी तरुणी होती. हिचा मामा खाद्य-पेयांचे दुकान चालवी, आणि त्याच्याचकडे ही काम करायला त्या गांवांत आलेली होती. एकंदर प्रकार कसा काय घडला हें ध्यानांत यायच्या अगोदरच जहाज त्या बंदरांतून निघायच्या आधीं हन्नीबालनें तिच्याशीं लग्न ठरविलें. सागरी जीवनाशीं तो सहज समरस झाला. कालांतरानें त्याला वाढप्याच्या कामाचा कंटाळा आला आणि पनामा येथें तो कोळसेवाला झाला. लाडसांतून दगडी कोळसा भरून न्यायचें काम कष्टाचें होतें, पण थोड्याच अवधीनंतर हन्नीबाल याला आपल्या शरीरबळाच्या पराक्रमाचा अभिमान वाटूं लागला.

जपानमध्यें त्याला हिराम भेटला. दोघे मिळून किनाऱ्यावर गेले. लव-

करच हें जहाज मायदेशीं लांबच्या परत प्रवासाला निघालें. हन्नीबाल तापानें आजारी पडला.

कॅप्टन ब्रिस्को याला आपल्या तरुण मेव्हण्याच्या शुश्रूषेवर देखरेख करायला हवी असली तरी त्याला इतरहि अनेक व्यवधानें होतीं. बंदरांत त्यानें एक इंग्रजी वर्तमानपत्र वाचायला घेतलें तेव्हां त्याला कळलें कीं स्त्रियांच्या मताधिकाराची मागणी करणाऱ्या निदर्शनांत भाग घेतल्याबद्दल मिन्नोला अटक झाली असून ती तुरुंगांत आहे. त्याच्या मनाच्या गोंधळांत आणखी भर पडायला कारण म्हणजे मिन्नीचीं पत्रें अगदींच त्रोटक व निराशाजनक असत हें होतें. मग डच ईस्ट इंडीजच्या (इंडोनेशियाच्या) प्रदेशालगत त्याचें जहाज प्रवाळाच्या खडपांत अडकून बसलें आणि बऱ्याच दिरंगाईनंतर तें पुन्हां चालू करतां आलें. जहाज कसें बसें नाताळ गांठायच्या बेतानें इंग्लंडला पोंचलें.

कॅप्टन ब्रिस्को याला बंदरांत हन्नीबाल भेटला. मिन्नी ज्या हॉटेलांत वाट पाहत होती तिथें आपल्याबरोबर यायला त्यानें हन्नीबालचें मन वळविलें. नेल्लीमुळें तो अगोदर तिकडे यायला नाखूष होता. हॉटेलांत त्याला मिन्नी व आपली आई अशा दोघीहि भेटल्या. पतीच्या गैरहजेरींत मिन्नीनें खोकल्याच्या औषधाच्या जाहिराती लिहून देण्याचें काम करून खूप पैसे मिळविले होते. तिनें आणि तिच्या आईनें हन्नीबाल याला आपल्याचकडे राहण्याचा आग्रह केला, पण त्यानें या गोष्टीला नकार दिला.

स्वान्से येथें त्याला कळलें कीं, नेल्ली आतां त्या खाद्यपेयांच्या दुकानाची मालकीण झालेली असून अजूनहि आपल्याशीं लग्न करूं इच्छिते. म्हणून हन्नीबाल त्या दुकानांत स्थाइक झाला. त्याला स्थिरता व कार्यक्षम पत्नीचे भरपूर प्रेम यांचा लाभ झाला.

त्याचा खोकला त्याला त्रास देत राहिला. शेवटीं खोकल्यावरचें पेटंट औषध निरुपयोगी ठरल्यावर नेल्लीनें डॉक्टर बोलावला. हन्नीबाल याला 'लोबार न्युमोनिया' झाल्याचें डॉक्टरनें निदान केलें. कोळशाचा भुगा त्याच्या फुफ्फुसांत घर करून बसलेला होता आणि मिन्नीनें लिहिलेली एक जाहिरात पाहून नेल्लीनें विकत आणलेलें कफनाशक पेय घेतल्यामुळें त्याचे प्राण कंठाशीं आले. डॉक्टरी इलाजानें त्याला अंमळ बरें वाटलें, पण थोड्याच

दिवसांत तो दगावला. जगणें जसें त्याच्या बाबतींत सतत मामुली ठरलें तसें त्याला मरणहि मामुलीच आलें.

कॉडर

वाङ्मयप्रकार : काव्य. लेखक : रॉबिन्सन जेफर्स (१८८७-). कथानकाचा प्रकार : मानसशास्त्रीय वास्तववाद. काळ : १९००. स्थळ : अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतल्या कॅलिफोर्निया राज्यांतील कार्मेल कोस्ट रेंज ('किनाऱ्यावरील डोंगरांची रांग). प्रथम प्रकाशन : १९२८.

प्रमुख पात्रें : कॉडर, एक शेतकरी. हूड कॉडर, त्याचा पुत्र. जॉर्ज कॉडर, आणखी एक पुत्र. मिचाल कॉडर, कन्या. मार्टियाल, शेजारी. फेरा, मार्टियाल याची कन्या. कोन्चा रोझास, कॉडर याची रेड इंडियन मोलकरीण.

समीक्षण : 'कॉडर' या कवितेंतील सगळीं पात्रें आपलें जीवन स्वतः-साठीं आत्मनिष्ठपणें जगलीं; वस्तुनिष्ठपणें व निर्मितिक्षम रीतीनें जगलीं नाहींत; म्हणूनच ही कविता शोकान्त ठरली. अत्याचार व स्वतःवर लादलेल्या हाल-अपेष्टा यांच्या या चित्रणांतून कवि जेफर्स आपल्याला हें दाखवून देतो कीं या मार्गानें जीवन व मरण यांचें रहस्य नायक कॉडर याला अधिक व्यापक स्वरूपांत उमगूं लागलें. मरणाच्या योगानें आपली मुक्तता होईतोंवर माणसानें जगण्याचें सामर्थ्य व धीर धरणें यांसाठीं स्वतःवरच भिस्त ठेवली पाहिजे. कवीच्या बेफाट लेखनशैलीशीं या कवितेचा तोंडवळा ठीक जुळतो. त्याचें निराशावादी जीवनविषयक तत्वज्ञान ही कलाकृति पुन्हां प्रत्ययाला आणून देते.

कथानक : १८९९ सालीं एक भयंकर वणवा पेटून त्यांत कार्मेल किनाऱ्यावरील सगळ्या शेतीवाड्या उद्ध्वस्त झाल्या. मात्र कॉडर याची शेती-वाडी तेवढी त्यांतून सहीसलामत वांचली. एके दिवशीं भल्या पहांटेस दोन आकृति आपल्या घराकडे येत असलेल्या त्याला दिसल्या. एका आंधळ्या म्हाताऱ्याला घेऊन एक तरुणी येत होती. हें मार्टियाल कुटुंब. त्याच्या शेतीला लागूनच या लोकांची शेती होती. या लोकांशीं कॉडर याचा फार पूर्वीपासून झगडा चाललेला होता. मार्टियाल याचे डोळे वणव्यामुळें गेले आणि त्याची शेती जळून खाक झाली. त्याची कन्या फेरा हिला मदत मागायला कॉडरखेरीज अन्य कोण असणार ?

कॉडरनें त्यांना आश्रय दिला आणि आपली मोलकरीण कोन्चा रोझास हिला एका झोंपडींत राहायला पाठवून दिलें. म्हातारा जरा बरा होऊन हिंडूं फिरूं लागल्यावर कॉडर त्याला म्हणालाः "फेरानं माझ्याशीं लग्न केलं पाहिजे. नाहीं तर तुम्ही दोघं तुमची सोय अन्यत्र करून घ्या." फेरा लग्नाला कबूल झाली.

वडिलांशीं भांडून हूड कॉडर घरांतून निघून गेला होता. लग्नाच्याच रात्रीं त्याला असें स्वप्न पडलें कीं आपले वडील वारले. म्हणून त्यानें आपल्या शेतीवाडीकडे परत जावें व सर्व कांहीं ठीकठाक असल्याचें पाहून घ्यावें असें ठरविलें. एका टेंकडीवरून त्याची शेतीवाडी दृष्टीच्या टप्प्यांत आली. तिथेंच त्यानें मुक्काम ठोकला आणि शेकोटी पेटविली. त्याची बहीण मिन्नाल हिनें त्याला पाहिलें. आणि आपल्या वडिलांचें लग्न झाल्याचें सांगायला ती त्याच्याकडे गेली. कॉडरनें आपल्या पुत्राचें स्वागत मित्रभावानें केलें. लग्नाचा अहेर म्हणून हूड यानें आपली सावत्र आई फेरा हिला सिंहाचें कातडें दिलें.

ज्या कणखरपणाच्या गुणामुळें फेरा प्रथम कॉडरकडे आकर्षित झाली तोच गुण हूड याच्या अंगीं असल्याचें तिला आढळलें. तिनें उघडपणें हूडजवळ कबूलच केलें कीं "लग्नाच्या वेळीं जरी तुझ्या वडिलांवर माझं प्रेम होतं तरी अतःपर मला त्यांची पर्वा नाहीं." तिला कोन्चा रोझास हिच्याविषयीं असूयाहि वाटत होती. कारण फेराशीं लग्न होण्यापूर्वीं कोन्चा ही कॉडरची रखेली होती; आणि लग्नानंतर देखील त्याला आपल्या पत्नीपेक्षां तीच अधिक आवडत असल्याचें दिसलें. फेराची लगट बघून हूड बैचन झाला आणि त्यानें निघून जाण्याचा निश्चय केला. परंतु एका सिंहानें त्या शेतीवाडीवरील एक कुत्रें मारलें, तेव्हां त्या सिंहाला ठार करीपर्यंत त्यानें तिथेंच राहायचें ठरविलें. दरम्यान एक प्रचंड वादळ झालें आणि त्याचें हें शिकारीचें काम कित्येक दिवस अडून पडलें.

फेराचे वडील मरायला टेंकले. आपले वडील मार्टियाल यांना हूड बरोबर बोलायला हवें आहे अशी सबब सांगून तिनें त्याला वडिलांच्या खोलींत बोलावून घेतलें. आपल्या बेशुद्ध वडिलांच्या देखत तिनें उघडपणें आपल्या प्रेमाचा कबुलीजबाब दिला. त्या रात्रीं तिनें वडिलांची शुश्रूषा करण्यासाठीं कोन्चा हिला आपल्या सोबतीला बोलावलें. सकाळच्या सुमारास तिचे वडील वारले.

परंतु वडिलांचे अंत्यसंस्कार करण्यासाठीं पतीला बोलावण्याऐवजीं फेरा थेट हूडकडे गेली. तिथेंच ती कॉडरल सांपडली. पतीला आपल्याविषयीं संशय येऊं नये म्हणून ती म्हणाली : "मी तुम्हांला हांक मारून जाग आणायचा प्रयत्न केला. पण तुम्ही जागे झालां नाहींत. म्हणून मी इकडे हूडला उठवायला आल्यें."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं या लोकांनीं म्हाताऱ्याचें दफन करण्यासाठीं खड्डा खणला. फेरा हें काम बघत उभी होती. तिनें वडिलांच्या कबरीवर घालायला फुलें वेचून आणण्यासाठीं हूडला आपल्याबरोबर मदतनीस म्हणून जंगलांत यायला पाचारण केलें. पुन्हां तिनें त्याच्याजवळ प्रेमयाचना केली. त्यानें अचानक सुरा काढला व स्वतःच्या मांडीवर खोल जखम करून घेतली. तिचा दुसऱ्यांदा प्रतिकार करणें त्याला जमूं शकलें. तिच्या वडिलांच्या अंत्यसंस्कारा-निमित्त प्रार्थनेचा कार्यक्रम थोडक्यांत पण दुःखदायक रीतीनें आटोपला. मागाहून फेरा एकटीच घरीं परतली.

आतां ती बेफाम झाली. हूडकडून अहेर म्हणून मिळालेलें सिंहाचें कातडें पांघरून ती झुडुपांत दडून बसली. हूड यानें तिलाच सिंह समजून गोळी झाडली, ती तिच्या खांद्यांत घुसली. तो फेराला उचलून तिच्या खोलींत घेऊन गेला. तिथें कॉडरनें तिचीं मोडलेलीं हाडें बसविण्याचा प्रयत्न केला. फेरानें त्याला विनविलें : "माझा हा छळ बंद करा." मग जणूं काय पोटांतलें रहस्य जखमेच्या वेदनांमुळें बाहेर पडल्यागत ती म्हणाली : "हूडनं माझ्यावर बळजोरी करून मला भ्रष्ट केलं." हूडनें निघून जाऊं नये यासाठीं निर्वाणीचा इलाज म्हणून तिनें त्याच्यावर हा खोटा आरोप केला. परंतु हूड अगोदरच तिथून निघून गेला आणि पुन्हां टेकडीच्या माथ्या-वर मुक्काम करून राहिला. तिथें त्याच्या संतापलेल्या वडिलांनीं त्याला गांठलें. दोघांची मारामारी झाली. तींत वडिलांनीं हूडला कड्यावरून खालीं लोटून दिलें. हूडचा देह पायथ्याच्या खडकांवर आपटला. कड्यावरून खालीं उतरतांना कॉडरला वाटेंत त्याची कन्या मिचाल ही भेटली. तिला त्यानें सांगितलें : "हूड पळून गेला." दरम्यान फेरानें पाणी आणण्यासाठीं कोन्चाला खोलींतून बाहेर धाडलें. तिनें झटकन् आपल्या हाताचा पट्टा काढला आणि बिछान्याच्या वरच्या अंगाला व आपल्या गळ्याभोंवतीं लटका-

वून दिला. कोन्वा परत येऊन पाहते तोंवर फेरा जवळ जवळ मरायच्या पंथाला लागलेली होती. अनेक दिवस ती बिछान्यांत पडून होती. हळूहळू ती बरी झाली. जॉर्ज अगर मिचाल यांच्यापैकीं कुणीच तिला भेटायला जात नसे. हूडवर तिनें केलेले आरोप खोटे असले पाहिजेत हें तीं दोघें जाणून होतीं आणि म्हणून तीं तिचा द्वेष करीत असत.

आपल्या गुप्त पापाची टोंचणी कॉडरला सतावूं लागली. फेरा स्वतःच मरायचा प्रयत्न करून त्याचा नायनाट करायला बघत होती. तिनें त्याला हूडच्या बाबतींतील खरी हकीकत सांगितली. ती म्हणाली : "वडिलांशीं दगाबाजी करण्यापेक्षां मरण बरं असं म्हणून त्यानं स्वतःवर सुरा मारून घेतला." हें ऐकल्यावर कॉडरच्या दुःखाचा कडेलोट झाला. त्यांतच फेरा त्याला टोमणे मारूं लागली आणि म्हणाली : "मला पण मारून टाका." त्यानें तिचा गळा दाबला. पण ती धडपडायला लागली तेव्हां त्यानें तिला सोडून दिलें आणि हूडच्या खोलीकडे धांव घेतली. तिथें त्याला असें वाटलें कीं हूड बिछान्यावर आडवा झालेला आहे; आणि दरम्यानच्या काळांत घडलेल्या सगळ्या घडामोडी म्हणजे केवळ स्वप्नवत् आहेत अशी त्याची क्षणभर कल्पना झाली.

तेवढ्यांत फेरा त्याला कांहीं तरी सांगायला आली म्हणून तो तंद्रींतून जागा झाला. ती म्हणाली: "तुम्हीच हूडचा खून केला हें सगळ्यांना कळलंय. तुमच्या गुन्ह्याची बातमी लवकरच पोलिसांच्या कानावर नक्की जाणार. म्हणून तुम्ही मरणाच्या मार्गानं मनाला शांति प्राप्त करून घ्या." तीं दोघें तिच्या वडिलांच्या कबरीजवळून चाललीं होतीं. जॉर्ज व मिचाल हीं भाऊबहीण जवळच होतीं. कॉडरनें त्यांच्यासमोर अचानक जाहीर करून टाकलें: "तुमचा संशय खरा आहे. मीच हूडचा खून केला. तुम्ही पोलिसांना बोलावणं धाडा." मग तो खालीं वांकला आणि त्यानें एक गारगोटी उचलून घेतली. कुणाला कांहींएक इशारा न देतां त्यानें ती गारगोटी आपल्या दोन्ही डोळ्यांत खुपसली. मग त्यानें शांतपणें त्यांना सांगितलें: "मला परत घरीं घेऊन चला. तिथं नशिबानं माझ्या कृत्याचं जें काय फळ मला द्यायचं ठरवलं असेल तें घ्यायची मी वाट बघत बसेन." फेरा रडत रडत त्याच्या पाठोपाठ चालली. तिला पुन्हां एकदां असें वाटलें कीं "माझ्या हातून कसूर झाली. कॉडर

साहेबांनीं मला अगोदर ठार करावं आणि मग आत्महत्या करावी असा माझा प्रयत्न होता. त्याऐवजीं त्यांनीं आपल्या गुन्ह्याचा कबुलीजबाब देण्याचं आणि माणुसकीला योग्य तें मोल त्याबद्दल देण्याचं धैर्य दाखवलं."

द कौंट ऑफ मॉन्टी-क्रिस्टो

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : अलेक्झांडर ड्युमा, थोरला (१८०२–१८७०). कथानकाचा प्रकार : ऐतिहासिक अद्भुतरम्य कथा. काळ : एकोणिसावें शतक. स्थळ : फ्रान्स. प्रथम प्रकाशन : १८४४.

प्रमुख पात्रें : एडमंड डान्टेस, एक तरुण खलाशी. मर्सिडीस, त्याची प्रियतमा. फर्डिनान्ड मॉन्डेगो, एक प्रतिस्पर्धी. मशूर डांग्लर्स, जहाजावरील एक महत्त्वाकांक्षी अधिकारी. मशूर विल्लेफोर्त्, एक खासदार. वालेन्तिनी, त्याची कन्या. ॲबे फारिया, शॅतो द' इल्फ या किल्ल्यांतील एक कैदी. कादेरुस्से, एक हॉटेल मालक. मशूर मोरेल, जहाजाचा मालक. मॅक्झिमिलियन, त्याचा पुत्र. आल्बर्ट, मॉन्डेगो याचा पुत्र. हायडी, एक अल्बानियन तरुणी.

समीक्षण : 'द कौंट ऑफ मॉन्टी-क्रिस्टो' ही एक छानशी कथा आहे, आणि हाच तिच्यांतला एक मुख्य गुण दिसतो. हिच्यांतील पात्रें आहेत आपलीं अशींतशींच; लेखकानें त्यांना संकेतानुसार ज्या साच्यांत बसविलें, तद्नुसार तीं धैर्यशाली, लोभी, प्रेमळ, निष्ठावंत, स्वार्थी वा दगलबाज बनून राहतात. परंतु या कादंबरींत अनेक दोष असून देखील ती साहित्यांतील एक महान कलाकृति ठरली. कारण कौंट ऑफ मॉन्टी-क्रिस्टो याची ही रहस्यांनीं व व कारस्थानांनीं गजबजलेली नाट्यपूर्ण साहसकथा जे जे कोणी वाचतात त्या त्या सगळ्यांना अजूनहि ती वाचतांना आश्चर्यानें तोंडांत बोट घालावेंसें वाटावें असाच अनुभव येतो.

कथानक : १८१५ सालांतील त्या दिवशीं एडमंड डान्टेस आपलें जहाज घेऊन मार्सेलिस बंदरांत दाखल झाला. त्याच्या भोंवतालीं शत्रूंचा गराडा पडलेला होता. त्याच्या हाताखालचा अधिकारी डांग्लर्स याला 'फाराओ' जहाजाचें त्याचें कॅप्टन पदच हवें होतें. त्याची वाग्दत्त वधू मर्सिडीस हिच्याशीं लग्न करावें अशी फर्डिनान्ड मॉन्डेगो याची मनीषा होती.

डांग्लर्स आणि फर्डिनान्ड या दोघांनीं मिळून एक कारस्थान रचलें. पॅरिस शहरांतील बोनापार्टवादी समितीला उद्देशून एल्बा बेटावरून एक पत्र आणल्याचा आरोप त्यांनीं एडमंडवर केला. कादेरुस्से या शेजाऱ्याला या कारस्थानाची बातमी कळली. पण तो गप्पच बसला. लग्नाच्याच दिवशीं एडमंडला अटक झाली आणि त्याला विल्लेफोर्त् नामक खासदारासमोर उभें करण्यांत आलें. या खासदारानें स्वतःच्या राजकीय पक्षाशीं दगाबाजी केलेली होती. आपला बचाव करून घेण्यासाठीं त्यानें एडमंडला गुप्तपणें "शॅतो द' इल्फ" या किल्ल्याच्या तळघरांत डांबवून ठेवविलें. तुरुंगाबाहेरच्या त्याच्या शत्रूंनीं कारस्थान करून त्याचा हा तुरुंगवास पक्का करविला. या कारस्थानांत विल्लेफोर्त् याचा विशेष पुढाकार होता. कारण बोनापार्टवाद्यांशीं त्याच्या वडिलांचा असलेला संबंध छपवून ठेवायला त्याला ही आयती सबब मिळाली.

नेपोलियन एल्बा बेटावरून फ्रान्सला आला, परंतु एडमंडचा सगळ्यांनाच विसर पडल्यामुळें तो तसाच तुरुंगांत एका कोठडींत खितपत राहिला. वॉटर्लूच्या लढाईतील तोफांचा गडगडाट वाऱ्यावर विरून गेला. वर्षांमागून वर्षें लोटलीं. मग एके रात्रीं शेजारच्या कोठडींतून कुणी तरी खणत असल्याचा आवाज त्याला ऐकूं आला. यानंतर चार दिवसांनीं कोठडीच्या तळाचा एक भाग खचला आणि खालच्या अरुंद बोगद्यांत एक म्हातारा इसम एडमंडला दिसला. त्याचें नांव ॲबे फारिया. बोगदा खणून तुरुंगांतून पळून जायचा प्रयत्न करतां करतां बिचारा एडमंडच्या कोठडींतच येऊन पोंचला. त्यानंतर दररोज दोघांच्या भेटीगांठीं होऊं लागल्या. त्या म्हाताऱ्यानें एडमंडला इतिहास, गणितशास्त्र आणि अनेक भाषा शिकविल्या. एडमंडच्या तुरुंगवासाचें चौदावें वर्ष चालूं असतांना फारिया अंतकाळच्या दुखण्यानें आजारी पडला. मरण्यापूर्वीं तो एडमंडला म्हणाला : "मी मेल्यावर जर तूं तुरुंगांतून पळालास तर तुला एक ठिकाण सांगून ठेवतों तिथं तूं जा. तिथं तुला खूप मोठा खजिना मिळेल." ॲबेला प्रत्यक्ष मरण आल्यानंतर त्याचें शव पोत्यांत भरून ठेवण्यांत आलें. यावरून एडमंडला त्या प्रेताच्या जागीं आपण पोत्यांत बसावें अशी शक्कल सुचली. त्यानें तें प्रेत बोगद्यांतून ओढत आपल्या बिछान्यात आणून टाकलें आणि तो स्वतः पोत्यांत बसला. तुरुंगाच्या वार्डरांनीं तें पोतें समुद्रांत फेंकून दिलें. पोत्याचें कापड टरकावून एडमंड अंधारांतून पोहत पोहत उपसागरांतील एका चिमुकल्या बेटावर पोंचला.

परदेशी मालाची चोरटी आयात करणाऱ्या एका टोळीनें त्याला सूर्योदयाच्या सुमारास उचलून आणलें. या टोळींतच त्यानें काम केलें. त्याचा दैवयोग बलवत्तर, म्हणूनच तो मॉन्टी-क्रिस्टो या बेटावर दाखल झाला. फारियानें पत्ता दिलेला खजिना याच ठिकाणीं होता. जहाजाच्या खलाशांसमवेत तो या बेटावर आलेला होता. आपण पडल्यामुळें जायबंदी झालों आहोंत असा त्यानें बहाणा केला आणि खलाशांना सांगितलें: "तुम्ही मला इथंच सोडून जा आणि पुन्हां परत याल तेव्हां मला आपल्याबरोबर न्या." अशा प्रकारें त्याला एकट्यालाच त्या बेटावरील खजिन्याचा शोध घेतां आला. भुईखालच्या एका गुहेंत लपवून ठेवलेला हा खजिना त्याला सांपडला. तो मुख्य भूमीवर परत आला आणि मॉन्टी-क्रिस्टो बेटावरून हा आपला खजिना आणण्याची आपली योजना पार पाडण्यासाठीं पुरेसे पैसे उभे करतां यावेत म्हणून त्यानें आपल्या जवळचीं कांहीं लहान लहान रत्नें तिथें विकलीं. तिथें त्याला असें कळलें कीं आपले वडील निधन पावले असून आपण परत येण्याच्या बाबतींत निराश होऊन मर्सिडीस या आपल्या प्रियतमेनें फर्डिनान्डशीं लग्न केलें आहे.

त्यानें एका ॲबेचें (धर्मपरायण साधूचें) सोंग घेतलें आणि आपल्याला तुरुंगांत डांबायला जे जे कारणीभूत झाले त्यांची माहिती मिळविण्यासाठीं मशूर कादेरुस्से याची भेट घेतली. मशूर विल्लेफोर्त् आतां चांगलाच गब्बर झालेला असून त्याला लोकांत चांगलीच मानमान्यता लाभली होती. डांग्लर्स हा श्रीमंत बँकर झालेला होता. फर्डिनान्ड यानें ग्रीक युद्धांत मर्दुमकी गाजवून पैका व बहुमानाची पदवी संपादन केलेली होती. ही सगळी माहिती दिल्याबद्दल कादेरुस्से याला पन्नास हजार फ्रँक किंमतीचा हिरा एडमंडनें बक्षीस दिला.

आपल्या जहाजाचा मालक मशूर मोरेल याचें दिवाळें वाजायच्या बेतांत आहे असेंहि त्याला कळलें. मोरेलनें त्याच्या वडिलांना पैसे देऊन उपासमारींतून वांचविलें होतें. या उपकाराची परतफेड कृतज्ञताबुद्धीनें करावी म्हणून एडमंडनें पैसे भरून मोरेलचा जहाज-धंदा दिवाळखोरींतून वांचविला.

एडमंडनें आपल्या खजिन्याच्या बेटाचेंच नांव धारण केलें. तो कौंट ऑफ मॉन्टी-क्रिस्टो झाला. आपल्या अवाढव्य संपत्तीनें व समाजाशीं सौजन्य-

शीलपणें वागण्यानें त्यानें साऱ्या पॅरिस शहराचे डोळे दिपवले. तो आणि त्यानें ग्रीसच्या प्रवासांत खरेदी केलेली त्याची रहस्यमय आश्रित तरुणी हायडी हीं दोघें शहराच्या राजरस्त्यांवरील चर्चेचा विषय झालीं.

दरम्यान, ज्या चौघांनीं त्याला शॅतो द'इल्फ या किल्ल्यांतील तुरुंगांत रवाना करविलें होतें, त्यांचें वाटोळें करण्याचा डाव रचायचें काम त्यानें संथपणें चालविलें. पहिल्या सपाट्यासरशीं त्यानें कादेरुस्से याचा कांटा काढला. त्याला एक हिरा बक्षिस देऊन त्याचा लोभीपणा मॉन्टी-क्रिस्टोनें चाळविला. मागाहून आपल्या पत्नीच्या आग्रहावरून कादेरुस्से यानें दरोडे-खोरी व खून केला. या गुन्ह्यांबद्दल त्याला तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यानें मॉन्टी-क्रिस्टो याच्या घरावर दरोडा घालायचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या एका साथीदारानें पळतां पळतां झाडलेली गोळी लागून त्याला प्राणांतिक दुखापत झाली. तो अखेरची घटका मोजीत पडलेला असतांना मॉन्टी-क्रिस्टोनें त्याला आपली खरी ओळख दिली—" एडमंड डान्टेस तो मीच " असें त्यानें त्याला सांगितलें.

पॅरिस शहरीं बँकर डांग्लर्स याच्या पोटांत शिरून त्याचा विश्वास संपादन करण्यांत मॉन्टी-क्रिस्टोनें यश मिळविलें. मग त्याची आर्थिक हानि करण्याच्या गुप्त कारवाया त्यानें चालू ठेवल्या. यानंतरचा त्याच्या यादींतला तिसरा इसम म्हणजे फर्डिनान्ड. यानें १८२३ सालीं ग्रीसच्या क्रांतींत पाशा अलीशीं दगलबाजी करून खूप पैसे मिळविले होते. बँकर डांग्लर्स याच्यापुढें मॉन्टी-क्रिस्टो यानें अशी योजना सादर केली : " मला तुम्ही ग्रीसला धाडून द्या. म्हणजे तिथं फर्डिनान्डनं काय काय केलंय त्याचा मी छडा लावून येतों. " अशा प्रकारें त्यानें फर्डिनान्डच्या तिथल्या नीच कारवाया उघडकीस आणल्या. पाशा अलीची कन्या हायडी पुढें सरसावली आणि आपल्या वडिलांना फर्डिनान्डनें कसा दगा दिला याची समग्र कहाणी तिनें त्याच्या तोंडावर सुनावली. आपल्या वडिलांच्या या बेअब्रूचा बदला घेण्यासाठीं फर्डिनान्ड व मर्सीडीस यांचा पुत्र आल्बर्ट यानें मॉन्टी-क्रिस्टोला द्वंद्व युद्धाचें आव्हान दिलें. या तरुणाला ठार करून आपला सूड पुरा करावा असा मॉन्टी-क्रिस्टोचा बेत होता. परंतु मर्सीडीस त्याला येऊन भेटली आणि त्याच्यापुढें पदर पसरून आपल्या पुत्राचे प्राण वांचवायसाठीं तिनें त्याची

विनवणी केली. मॉन्टी-क्रिस्टो खरा कोण आहे हें तिला ठाऊक असल्यामुळें तिनें आपल्या पुत्राजवळहि रदबदली केली. आणि द्वंद्व युद्धाच्या ठरलेल्या ठिकाणीं खुद्द आल्बर्टनेंच जाहीर केलें कीं, "माझ्या वडिलांची जी दुर्दशा झाली ती न्यायाला धरूनच होती." यानंतर त्या मायलेकरांनीं पॅरिस शहराला रामराम ठोकला आणि फर्डिनान्डनें स्वतःवर गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली.

मशूर विल्लेफोर्त् याची पत्नी मादाम विल्लेफोर्त् हिच्याशींहि मॉन्टी-क्रिस्टोनें चांगलीच सलगी करून ठेवलेली होती. तिची सावत्र कन्या वालेन्तिनी हिच्या संपत्तीचा अपहार करायला त्यानें तिला उत्तेजन दिलें. जहाज-मालक मोरेल याचा पुत्र मॅक्झिमिलियन याचें या वालेन्तिनीवर प्रेम होतें. कौंटनें मोठ्या हिकमतीनें मादाम विल्लेफोर्त् हिला विषप्रयोगाची विद्या शिकवून ठेवली. त्या बेफाट बयेनें विषप्रयोग करून तीन माणसें ठार मारलीं. खुद्द वालेन्तिनी हिच्यावरच विषप्रयोग झाला, तेव्हां मॉन्टी-क्रिस्टोची मदत मागायला मॅक्झिमिलियन गेला. वालेन्तिनी ही आपला मित्र मॅक्झिमिलियन याची प्रेयसी आहे हें कळल्यावर मॉन्टी-क्रिस्टोनें या तरुणीचे प्राण वांचविण्याची प्रतिज्ञा केली. परंतु वरकरणीं तरी वालेन्तिनी मेलेलीच दिसत होती. तरी देखील मॅक्झिमिलियनला भावी सुखाचें आश्वासन मॉन्टी-क्रिस्टोनें देऊन टाकलें.

इकडे डांग्लरची कन्या युजीनी स्वतंत्रपणें आपलें नशीब काढायला घरांतून पळून गेली, आणि आपलें दिवाळें वाजलें आहे असें डांग्लरला आढळून आलें. तो आपल्या पत्नीला तशीच टाकून देऊन स्वदेशांतून परागंदा झाला. मशूर विल्लेफोर्त् याला आपल्या पत्नीच्या दगाबाजीचा व गुन्ह्यांचा पत्ता लागला आणि "तुझीं हीं बिंगें मीच चव्हाट्यावर आणतों" अशी त्यानें तिला धमकी दिली. त्याबरोबर तिनें स्वतःवर आणि आपला पुत्र एडवर्ड याच्यावर विषप्रयोग केला. वस्तुतः या एडवर्डसाठींच तिनें इतरांवर विषप्रयोग केलेले होते. मॉन्टी–क्रिस्टोनें मशूर विल्लेफोर्त् याला आपलें खरें नांव उघड करून सांगितलें. तें ऐकल्यावर मागाहून त्याला वेडच लागलें.

परंतु मॉन्टी-क्रिस्टोनें आपला स्नेही मॅक्झिमिलियन याला मात्र मुळींच फसविलें नाहीं. वालेन्तिनी आपल्या कबरींत विषाराच्या अमलामुळें बेशुद्ध पडलेली होती. तशा अवस्थेंत त्यानें तिला बाहेर काढवून वांचविली. त्यानें या

प्रणयी युग्माचें पुनर्मीलन आपल्या मॉन्टी-क्रिस्टो बेटावरच घडवून आणलें. या जोडप्याला त्यानें आपली संपत्ति देऊन टाकली. यानंतर हायडीला आपल्या समवेत घेऊन मॉन्टी-क्रिस्टो जो जहाजांत बसून निघून गेला, तो पुन्हां कधींहि दृष्टीस पडला नाहीं.

द काउंटरफीटर्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : आन्द्री जीद (१८६९-१९५१). कथानकाचा प्रकार : मानसशास्त्रीय वास्तववाद. काळ : १९२० ते १९२९ या काळांतील आरंभींचीं वर्षें. स्थळ : पॅरिस. प्रथम प्रकाशन : १९२५.

प्रमुख पात्रें : एडुआर्ड, एक लेखक. ऑलिव्हियेर मॉलिनियेर, त्याचा भाचा. जॉर्ज मॉलिनियेर, ऑलिव्हियेर याचा धाकटा भाऊ. व्हिन्सेन्त मॉलिनियेर, ऑलिव्हियेर याचा थोरला भाऊ. बर्नार्ड प्रॉफितेन्दियू, ऑलिव्हियेर याचा मित्र आणि एडुआर्ड याचा सेक्रेटरी. लॉरा दूव्हियेर्स, एडुआर्ड याची मैत्रीण. कॉंते द पासाव्हांत, एक उल्लूभाई मशालजी. आर्मां वेदेल, लॉरा हिचा भाऊ आणि ऑलिव्हियेर याचा मित्र.

समीक्षण : तरुणांच्या एका गटाची वागणूक विशिष्ट प्रकारें कशी परिणत होत गेली याचें निदर्शन 'द काउंटरफीटर्स' या कादंबरींत आढळतें. या तरुणांपैकीं प्रत्येकाचा आपल्यापेक्षां वयस्कर अशा व्यक्तीशीं घनिष्ट संबंध असून या संबंधांतूनच त्याला कृतीची प्रेरणा मिळते. ही कादंबरी म्हणजे जीडची सर्वोत्कृष्ट कलाकृति असून समकालीन कादंबरीवाङ्मयांतील विशेष उल्लेखनीय अशा कादंबऱ्यांमध्यें हिची गणना होते असें सर्वसाधारणपणें समजतात. खरींखुरीं स्वभावचित्रें निर्माण करणें, त्यांची वृत्ति समजून घेणें आणि आम्हां वाचकांना त्यांची वृत्ति समजावी अशा रीतीनें तीं सादर करणें—या बाबतींतील लेखकाचें कर्तृत्व उल्लेखनीय आहे. माणसाला जर आपल्या व्यक्तित्वाची संपूर्ण अभिव्यक्ति व्हायला व सुख मिळवायला हवें असेल तर त्यानें रूढ संकेतांकडे दुर्लक्ष करून आपल्या स्वतःच्या अन्तःकरणाच्या आदेशाचेंच पालन केलें पाहिजे, हें दाखवून देण्याचा उद्देश ही कादंबरी लिहितांना लेखकानें स्वतः-पुढें ठेवला.

कथानक : सतरा वर्षे वयाचा बर्नार्ड प्रॉफितेन्दियु याला आपल्या आईचें एक जुनें प्रेमपत्र सांपडलें. त्यावरून आपण अनैतिक संबंधापासून झालेला पुत्र आहोंत हें त्याच्या ध्यानांत आलें. त्याच्या मतें त्याचा जनक पिता असलेल्या इसमाला उद्देशून त्यानें एक जळजळीत पत्र लिहून ठेवलें आणि घरांतून पळ काढला. ती रात्र त्यानें आपला मित्र ऑलिव्हियेर मॉलिनियेर याच्या संगतींत काढली. ऑलिव्हियेर त्याला म्हणाला : "माझा मामा एडुआर्ड हा लेखक आहे. उद्यां तो इंग्लंडहून इथं यायचाय." त्याचप्रमाणें आपला थोरला भाऊ व्हिन्सेन्त ज्या बाईच्या भानगडींत गुंतलेला होता, तिचीहि हकीकत ऑलिव्हियेरनें त्याला सांगितली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ऑलिव्हियेर जागा व्हायच्या अगोदरच बर्नार्ड घरांतून बाहेर पडला. काय करावें हें कांहीं काळ त्याला सुचेचना. मग त्यानें आळसटपणें असें ठरविलें कीं स्टेशनावर जावें आणि ऑलिव्हियेर व एडुआर्ड या मामा-भाच्यांची भेट कशी काय होते याचें निरीक्षण करावें.

त्याच दिवशीं सकाळीं व्हिन्सेन्त हा आपला मित्र कुप्रसिद्ध समसंभोगी काँते द पासाव्हांत याला भेटला. लॉरा दूव्हियेर्स या विवाहित स्त्रीच्या संबंधांत त्याची भानगड झालेली होती. यामुळें तो बैचेन झालेला होता. एका आरोग्य-भुवनांत तो व ती अशीं दोघें एकाच वेळीं उपचारार्थ राहिलेलीं असतांना तिथें उभयतांची गांठ पडली. तिथून तिला मोकळीक मिळाल्यावर ती व्हिन्सेन्तच्या पाठोपाठ पॅरिसला येऊन दाखल झाली.

लॉराला दिलेल्या वचनानुसार एडुआर्ड पॅरिसला परत येत होता. तिच्या लग्नाअगोदर पासूनची त्याची ओळख. "तुला जेव्हां आवश्यकता वाटेल तेव्हां मला भेटायला येत जा" असें त्यानें तिला सांगूनच ठेवलें होतें. आपला अत्यंत लाडका भाचा ऑलिव्हियेर याचीहि या वेळीं भेट होईल अशी त्याची अपेक्षा. या आगामी भेटीच्या विचारानें त्याची उत्सुकता इतकी शिगेला पोंचली कीं आपली बॅग तपासल्यावर त्यानें आपलें लगेज तिकीटच फेंकून दिलें. परंतु भाच्याशीं झालेली भेट त्याला अगदींच असमाधानकारक वाटली.

उभयतांच्या भेटीचा हा प्रसंग बर्नार्ड त्यांच्या दृष्टीस न पडतां बघत उभा होता. एडुआर्डच्या हातून पडलेलें लगेज तिकीट त्यानें उचलून घेतलें

आणि तें दाखवून बॅग ताब्यांत घेतली. तींत त्याला बरीच मोठी रक्कम सांपडली. ती त्यानें लगेच आपल्या खिशांत कोंबून ठेवली. एडुआर्डची डायरीहि त्याच्या हातीं लागली. ती त्यानें बिनदिक्कत वाचून काढली. आणि लॉराचें विनवण्या करणारें पत्रहि त्याला मिळालें.

मनाशीं कसलीहि निश्चित योजना न ठरवितां तो लॉराला भेटायला गेला. या तरुणाला आपल्या इतक्या सगळ्या भानगडी ठाऊक असलेल्या पाहून ती त्याच्या भेटीमुळें बरीच अस्वस्थ झाली. परंतु तेवढ्यांत एडुआर्ड तिथें आला आणि त्याची बॅग आपण चोरल्याचें बर्नार्डनें कबूल केलें, तेव्हां तिला या तरुणाच्या सगळ्या वागण्याचा नीट उलगडा झाला. बर्नार्ड म्हणाला: " तुमच्या भेटीचा योग जुळवून आणायचं साधन म्हणून मी तुमची बॅग चोरली. " या तरुणाचा बेदरकार मोहकपणा एडुआर्डला फारच आवडला. बर्नार्डनें सुचविलें: " मला तुमचा सेक्रेटरी म्हणून काम करायला हवंय. " एडुआर्डनें हें मान्य केलें.

यानंतर कांहीं दिवसांनीं लॉराला बरोबर घेऊन एडुआर्ड स्विट्झर्लंडला गेला. त्याच्या समवेत बर्नार्ड त्याचा सेक्रेटरी म्हणून होताच. बर्नार्डनें आपल्या या नव्या नोकरीचें खूप कौतुक करणारें पत्र ऑलिव्हियेरला लिहिलें. तें वाचून ऑलिव्हियेर मनाशीं म्हणाला : " या बर्नार्डनं मला बाजूला सारून एडुआर्डचा जिव्हाळा आपल्याकडे ओढून घेतला." यामुळें बर्नार्डविषयींच्या मत्सरानें तो जळूं लागला. तेवढ्यांत कॉंते द पासाव्हांत यानें त्याला एक संपादकीय काम देऊं केलें. तें स्वीकारायचें असें त्यानें ठरविलें.

दरम्यान बर्नार्डच्या मनांत लॉराविषयीं प्रेमभावना जागृत झाली. त्यानें आपल्या प्रेमाचा कबुलीजबाब तिच्याजवळ देऊनहि टाकला. यावर तिनें त्याला आपल्या पतीकडून आलेलें एक पत्र दाखविलें. त्यांत तिच्या पतीनें लिहिलें होतें : " तूं कसंहि करून माझ्याकडे परत निघून ये. येतांना तुझं आणि व्हिन्सेन्तचं बाळहि बरोबर घेऊन ये. " म्हणून ती म्हणाली : " मी माझ्या पतीकडे परत जायचं ठरवलंय. " मग बर्नार्ड व एडुआर्ड हे दोघे पॅरिसला परत आले.

बर्नार्डला एक पत्र ऑलिव्हियेरकडून आलें. हें पत्र इटलीहून आलेलें होतें. द पासाव्हांत याजबरोबर तो इटलीला गेलेला होता. ते दोघे जें आकर्षक नियतकालिक प्रसिद्ध करणार होते त्याविषयीं त्यानें या पत्रांत आत्मसंतोषपर असा मजकूर लिहिलेला होता. बर्नार्डनें हें पत्र एडुआर्डला दाखविलें. परंतु ऑलिव्हिएरला वाटणारा मत्सर व त्याचें दुखावलेलें मन, ही वस्तुस्थिति लपवून ठेवण्यासाठीं या पत्रांत त्यानें हा कांहीं तरी मजकूर लिहिलेला असेल ही गोष्ट एडुआर्डच्या ध्यानांतच आली नाहीं.

बर्नार्ड अजून एडुआर्डचा सेक्रेटरी म्हणून काम करीत असला तरी त्यानें वेदेल विद्यालयांत आपलें नांव दाखल केलेलें होतें आणि तो वेदेल कुटुंबाच्या घरींच राहत होता. ही वेदेल मंडळी म्हणजे लॉराचे आई-वडील. एडुआर्डचा यांच्याशीं खूप घरोबा. त्यांतल्या त्यांत लॉराची वडील बहीण रॅचेल हिच्या-विषयीं त्याला फार आपुलकी वाटे. शाळा चालविण्याच्या कामांत ती आपला सगळा वेळ खर्च करीत असलेली बघून त्याला फार खेद होई.

बर्नार्डनें कांहीं मुलांविषयींची माहिती एडुआर्डला सांगितली. या मुलांत ऑलिव्हियेरचा धाकटा भाऊ जॉर्ज मॉलिनियेर हाहि होता. हीं मुलें कसला तरी चोरटा व्यवहार करीत होतीं. खोटीं नाणीं खपविणें हा यांचा गुप्त उपद्व्याप असल्याचें बर्नार्डला लवकरच कळून आलें.

बर्नार्डला भेटायला म्हणून ऑलिव्हियेर पॅरिसला परत आला. या भेटीच्या वेळीं उभयतांमध्यें बरीच तेढ असलेली दिसली. एकमेकांचा निरोप घेतेवेळीं ऑलिव्हियेर म्हणाला : " द पासाव्हान्त आज सायंकाळीं एक मेजवानी देणार आहे. या मेजवानीला तुला आणि एडुआर्डला मी त्याच्या वतीनं आमंत्रण देतों. तुम्ही दोघे जरूर या. " मग ऑलिव्हियेर आणखी एका जुन्या स्नेह्याला भेटायला गेला. हा स्नेही म्हणजे लॉराचा धाकटा भाऊ आर्मांद वेदेल. यालाहि ऑलिव्हियेरनें मेजवानीचें आमंत्रण दिलें. परंतु आर्मांद म्हणाला : " या मेजवानीचं निमंत्रण मी स्वीकारीत नाहीं. माझ्या ऐवजीं माझी बहीण सारा हिला बोलावणं कर. बर्नार्ड तिच्या शाळेंतच राहतो. तो तिच्या सोबतीला येईल. "

या मेजवानीच्या वेळीं सगळ्याच गोष्टींचा अतिरेक झाला. ऑलिव्हि-येर दारू पिऊन बेहोष झाला आणि भांडण उकरून काढूं लागला. एडुआर्ड

त्याला खोलींतून बाहेर घेऊन गेला. ऑलिव्हियेरला आपल्या वागणुकीची शरम वाटली. त्यानें एडुआर्डला विनविलें : " मामा, तूं मला इथून कुठं तरी घेऊन जा. "

साराला घरीं पोंचवायला बर्नार्ड तिच्या सोबत गेला. तिची खोली आर्मांदच्या खोलीपलीकडे होती. आर्मांदनें तिला दिवा दाखविण्यासाठीं मेणबत्ती त्याच्या हातीं दिली. बर्नार्ड तिच्या खोलींत शिरतांक्षणीं आर्मांदनें बाहेरून दरवाजा बंद केला. ती रात्र साराच्या संगतींत बर्नार्डनें काढली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो पाहतो तों ऑलिव्हियेरला शुद्धीवर आणायची खटपट एडुआर्ड करीत आहे. रात्रीं मामाच्या खोलींत तो झोंपला होता. सकाळीं लवकर उठला आणि आपल्याला कोंचावर आराम करायचा आहे अशी सबब सांगून बाहेर आला. एडुआर्ड मागाहून उठल्यावर पाहतो तों ऑलिव्हियेर न्हाणीघरांत बेशुद्ध पडलेला आणि तिथला गॅस सोडून ठेवलेला ! ऑलिव्हियेरची शुश्रूषा करून एडुआर्डनें त्याला शुद्धीवर आणलें. ऑलिव्हियेरची आई त्याच्या समाचाराला आली. ती एडुआर्डला म्हणाली : " याचा धाकटा भाऊ जॉर्ज याची मला फार काळजी वाटते. त्याला कसल्या तरी विक्षिप्त संवयी लागलेल्या आहेत. " एडुआर्ड म्हणाला : " मी या बाबतींत जॉर्जशीं बोलून पाहीन. " या वेळीं त्याला असेंहि कळलें कीं द पासाव्हांत याची एक मैत्रीण लेडी ग्रिफिथ हिच्याबरोबर व्हिन्सेन्त कुठें तरी निघून गेला आहे.

आणखी कांहीं दिवसांनीं बर्नार्डचा पालक-पिता मशूर प्रॉफितेन्दियू हा एडुआर्डला भेटायला आला. एडुआर्डचा भाचा जॉर्ज हा खोटीं नाणीं खपवितो असा पोलिसांना संशय आलेला होता आणि म्हणून एडुआर्डनें या भाच्याला चार गोष्टी सांगाव्यात यासाठीं बाह्यात्कारी त्याची भेट मॅजिस्ट्रेट या नात्यानें होती. परंतु त्याच्या भेटीचा खरा उद्देश बर्नार्डविषयीं चौकशी करणें हा असल्याचें लवकरच स्पष्ट दिसून आलें. बर्नार्ड घर सोडून गेल्यापासून प्रॉफितेन्दियूला त्याची फार काळजी वाटत होती. त्यानें पुन्हां पूर्ववत घरीं येऊन राहावें असें त्याचें आग्रहाचें सांगणें होतें.

इकडे बर्नार्ड आणि सारा यांचे जे प्रेमचाळे चाललेले होते, ते रॅचेलच्या ध्यानांत आले आणि तिनें त्याला शाळेंतून निघून जायला सांगितलें. बर्नार्ड

तिथून एडुआर्डला भेटायला गेला. एडुआर्डनें त्याला प्रॉफितेन्दियूच्या भेटीचा वृत्तांत सांगितला. आपण जें जळजळीत पत्र लिहिलें, त्याबद्दल बर्नार्डला कांहीं काळ वाईट वाटलें होतें आणि आपल्या पालक-पित्याविषयीं त्याला जो द्वेष वाटत होता, ती द्वेषभावना नष्ट होऊन आतां त्याला त्याच्याविषयीं सहानुभूति व आपुलकी वाटूं लागली. अतःपर एडुआर्डचा सेक्रेटरी या नात्यानें बर्नार्डला कांहींच काम नव्हतें हें उघड दिसत होतें. म्हणून त्यानें घरीं परत जायचें ठरविलें.

ऑलिव्हियेरच्या जागीं आर्मोद आतां द पासाव्हान्त याच्या नियतकालिकाचा संपादक झाला. तो ऑलिव्हियेरला भेटायला गेला आणि ईजिप्तमधील आपल्या एका थोरल्या भावाकडून आलेलें पत्र त्यानें त्याला दाखविलें. या पत्रांत लिहिलें होतें: “ हल्लीं मी ज्याच्या सहवासांत राहतों, त्या इसमाचें डोकें जवळ जवळ फिरलें आहे असें दिसतें. त्याच्या एकंदर बरळण्यावरून मला येवढाच बोध झाला कीं त्याच्या सहचारिणीच्या मृत्यूला तो कारणीभूत झाला असावा. ” हा इसम म्हणजे ऑलिव्हियेरचा भाऊ व्हिन्सेन्त असेल याची कल्पना आर्मोद अगर ऑलिव्हियेर या दोघांपैकीं कुणालाच आली नाहीं.

जॉर्ज आणि त्याचे दोस्त यांच्या शाळेंत त्यांच्या उपद्व्यापांपायीं एक शोककारक घटना घडली. एडुआर्ड याच्या एका जुन्या मित्राचा तरुण नातू बोरिस याला या मुलांनीं एका गुप्त मंडळाचा सभासद होण्यास पाचारण केलें. सभासद होण्याची प्राथमिक अट अशी होती कीं त्यानें वर्गासमोर उभें राहावें आणि स्वतःच्या कपाळावर स्वतःच्या हातानें गोळी झाडून घ्यावी. ही गोळी झाडतेवेळीं काडतूस रिकामें असेल असें सगळ्यांनीं गृहीत धरलें. परंतु एका खोडकर मुलानें रिकामें काडतूस काढून घेऊन त्याच्या जागीं खरोखरीची गोळी भरून तें रिव्हॉल्व्हर बोरिसच्या हातीं दिलें. बोरिस निर्धारयुक्त उग्र चेहरा करून वर्गासमोर येऊन उभा राहिला आणि त्यानें स्वतःच्या कपाळावर गोळी झाडली. अशा प्रकारें या विनोदापायीं बिचाऱ्याचा प्राण गेला. या भयंकर अनुभवामुळें जॉर्ज चांगलाच शुद्धीवर आला.

ऑलिव्हियेर पूर्ण बरा झाल्यावर एडुआर्ड आपल्या पुस्तकाच्या लेखनकार्यांत शांत मनानें व स्वस्थपणें पुन्हां मग्न झाला.

द कन्ट्री ऑफ द पॉइन्टेड फर्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखिका : सारा ऑर्न ज्यूएट (१८४९-१९०९). कथानकाचा प्रकार : प्रादेशिक अद्भुतरम्य कथा. काळ : एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध. स्थळ : युनायटेड स्टेट्समधील मेन राज्याचा समुद्र किनारा. प्रथम प्रकाशन : १८९६.

प्रमुख पात्रें : मिसेस टॉड, न्यू इंग्लंडमधील वनस्पति-वैद्यक-व्यवसायी महिला. मिसेस ब्लॅकेट, तिची आई. विल्यम, तिचा भाऊ. द बोर्डर, एक लेखिका. एस्थर, विल्यमची प्रेयसी. मिसेस हाइट, एस्थरची आई.

समीक्षण : ज्यांना खळबळजनक असें म्हणतां येईल असे प्रसंग या पुस्तकांत जवळ जवळ नाहींतच. त्यांऐवजीं स्वभावचित्रण आणि निसर्गवर्णन हेंच याचें आकर्षण. प्रत्येक प्रकरण हें आपापल्या परी प्रादेशिक वर्णनाचें स्वतंत्र चित्र व स्वयंपूर्ण ठरूं शकेल. न्यू इंग्लंडच्या विशिष्ट स्वभावाची घडण ज्या खोल स्रोतांमधून झालेली आहे, त्यांचा शोध लावूं इच्छिणाऱ्या वाचकाला हें पुस्तक मजेंत व आरामांत वाचण्याजोगें वाटेल.

कथानक : मेन राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील डन्नेट लँडिंग या गांवीं उन्हाळ्याच्या दिवसांत एक लेखिका आली. तिला लेखनासाठीं एकान्त हवा होता. मिसेस आल्मिरा टॉड या विधवा मैत्रिणीकडे ती जेवी. ही बाई या गांवीं वनस्पति वैद्यक व्यवसाय करी. तिच्या बागेंत वनस्पती भरपूर होत्याच. आणि दुर्मिळ वनस्पतींच्या शोधार्थ ती अनेकदां दूरवर भटकत असे. ती बाहेरगांवीं गेलेली असली म्हणजे कधीं कधीं तिचें वनस्पती विकायचें व बर्च-बीयर विक्रीचें काम ही लेखिका करी.

शेवटीं या लेखिकेच्या ध्यानांत आलें कीं आपण आतां पुस्तक लिहायच्या कामाला लागलें पाहिजे आणि दिवसाच्या वेळीं मिसेस टॉड हिचा सहवास सोडला पाहिजे. खेड्यांतील शाळेची इमारत ही या लेखिकेला लेखनासाठीं निवांत जागा असल्याचें आढळून आलें आणि दिवसाचा बहुतेक वेळ ती तिथेंच घालवूं लागली. एके दिवशीं सकाळीं वयोवृद्ध कॅप्टन लिटलपेज हा सेवानिवृत्त नाविक आपल्याला भेटायला आलेला बघून तिला आश्चर्य वाटलें. हा कॅप्टन आपलें घर सोडून क्वचितच बाहेर जात असे. कांहीं काळ तो लेखिकेशीं थोर

थोर इंग्रज कवींविषयीं गंभीरपणें बोलला. ती त्याच्या बोलण्याला हंसली नाहीं असें बघून त्याला अधिक अवसान चढलें आणि एक लांबलचक कहाणी सांगायला त्यानें सुरवात केली. तो म्हणालाः " माझं जहाज फुटून मी एका लहानशा बेटावर अडकून पडलों. तिथं मला एक खलाशी भेटला. तो उत्तर ध्रुवापर्यंत जाऊन आलेला होता. भुतं असलेल्या एका गांवाचा त्याला पत्ता लागला. परलोकाला जाण्यासाठीं आपल्याला मोका केव्हां मिळतो याची वाट बघत असलेले मृतात्मे या गांवांतले रहिवासी असावेत असं मला वाटतं." बोलतां बोलतां म्हाताऱ्याचें मन वर्तमान काळाकडे वळल्याबरोबर त्यानें अचानक पुढची हकीगत सांगायचें बंदच केलें. लेखिकेनें त्याला परत स्वगृहीं जायला मदत केली आणि त्यानें सांगितलेल्या या विलक्षण कहाणीचा कुणा-जवळहि निर्देश केला नाहीं.

आणखी एके दिवशीं मिसेस टॉड लेखिकेला ग्रीन आयलंड या बेटावर आपल्याबरोबर घेऊन गेली. तिथें मिसेस टॉडची आई राहत होती. या मिसेस ब्लॅकेटचें वय ऐंशीच्या वर होतें. तिची कन्या मिसेस टॉड हिची साठी उलटलेली होती. येवढी वयस्क असूनहि मिसेस ब्लॅकेट अजूनहि स्वतःचीं कामें स्वतः करी आणि आपला पुत्र विल्यम याच्यासाठीं घरकामेंहि करी. या विल्यमची पन्नाशी उलटलेली होती. हा लाजाळू स्वभावाचा असला तरी लेखिका त्याला मैत्रीण म्हणून आवडली. बेटावरून परत जाण्यापूर्वीं मिसेस टॉड व लेखिका या दोघींनीं कांहीं वनस्पती गोळा केल्या. आपले पति ज्या ठिकाणीं होडीसकट बुडाले, ती जागा मिसेस टॉड हिनें लेखिकेला किनाऱ्या-वरून दाखविली.

मिसेस टॉड हिला भेटायला मिसेस फॉसडिक आली. या दोघी वृद्ध महिला आणि लेखिका अशा तिघी जणी अनेकदां संध्याकाळीं एकत्र बसून गप्पा मारीत असत. एके रात्रीं मिसेस टॉड हिनें आपली चुलत नणंद जोआन्ना हिची हकीगत सांगितली. ती म्हणाली : " ही माझी नणंद शेल-हीप आयलंड या बेटावर राहत असे. तिचा प्रेमभंग झाला आणि तेव्हांपासून ती या लहानशा बेटावर एकटीच राहायला गेली. कोळी लोक मासे पकडायला जातां येतां तिच्यासाठीं भेटीदाखल कांहीं वस्तु किनाऱ्यावर ठेवून येतात. परंतु तिला कुणी भेटायला मात्र कधींहि गेलं नाहीं. शेवटीं मी उपाध्येबुवांसह तिला

भेटायला गेल्यें. कारण उपाध्येबुवांना तिचा आत्मा कोणत्या अवस्थेंत असेल याची काळजी वाटूं लागली. ती तिथं आरामशीर पण साधेपणानं राहत आहे असं आम्हांला आढळून आलं. तिला आपल्या एकलकोंड्या जीवनांतच समाधान वाटत होतं. म्हणून मुख्य भूमीवर परत यायला आम्हांला तिचं मन वळवतां आलं नाहीं. ती मरेपर्यंत त्या बेटावरच राहिली आणि आम्ही तिथंच तिचं दफन केलं."

ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या पंध्रवड्यांत मिसेस टॉड आपली आई व व लेखिका या दोघींना बरोबर घेऊन बोडेन कुटुंबाच्या संमेलनाला गेली. या तिघी भाड्याच्या गाडींतून किनाऱ्यापासून खूप आंतल्या भागांत या कुटुंबाच्या मूळ घरीं दाखल झाल्या. आसपासच्या कित्येक मैल अंतरावरून सगळी बोडेन मंडळी या संमेलनाला आली. मिसेस टॉडची आई मिसेस ब्लॅकेट हिची गणना, तिच्या वयामुळें, विशेष पाहुणचाराला पात्र असलेल्या पाहुण्यां-मध्यें झाली. हा एक दिवस तरी मिसेस टॉड आपल्या वनस्पती साफ विसरून गेली आणि आपल्या मित्रमंडळींच्या सहवासाचा आनंद घेण्यांत तिनें सारा दिवस घालविला. विल्यम लाजाळू स्वभावामुळें या संमेलनाला आला नाहीं. मिसेस ब्लॅकेटनें या दिवसाचा प्रत्येक क्षण जसा कांहीं अत्यंत काळजीपूर्वक खर्च केला. आणि अशा प्रकारच्या संमेलनाला हजर राहण्याची ही बहुधा शेवटचीच संधि ठरणार हें ती जाणून होती.

एके दिवशीं डुन्नेट लॅंडिंग गांवाच्या खालच्या अंगाकडील चौपाटीवर लेखिका उभी होती. तिथें तिला गांवांतल्या सगळ्यांत वयस्कर कोळ्यांपैकीं मिस्टर टिल्ली हा भेटला. त्रयस्थांशीं तो फारसें बोलणारांपैकीं नव्हता. परंतु लेखिकेला त्यानें एकदांची मैत्रीण म्हणून मान्यता दिली आणि तिला त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं आपल्याकडे यायचें आमंत्रण दिलें. लेखिका त्याच्या घरीं दाखल झाली त्या वेळीं तो पायमोजे विणीत होता. दोघें स्वयंपाकघरांत बसलीं. तो तिला आपल्या पत्नीची हकीगत सांगूं लागला: "तिला मरून आठ वर्षें झालीं. परंतु मला तिचं वियोगदुःख कधींच आवरतां आलेलं नाहीं. तिनं हें घर सोडलं त्या वेळीं जशी इथली मांडामांड होती तशीच मी अजूनहि कायम ठेवलेली आहे." आपली क्वचितच वापरांत असलेली बैठकीची खोली आणि मिसेस टिल्लीचा कपबशांचा सेट त्यानें मोठ्या अभिमानानें लेखिकेला

दाखविला. हा वयोवृद्ध कोळी ज्या एकाकीपणांत गढून गेलेला होता त्याची आठवण बरोबर घेऊन ती त्याच्या झोंपडींतून बाहेर पडली.

निर्मळ, शीतल पावसाळा आला. लेखिकेची परत स्वगृहीं जाण्याची वेळ झाली. मिसेस टॉडनें तिच्या सामानाची बांधाबांध करायला आणि तें बोटीवर चढविण्यासाठीं धक्क्यावर पोंचवून द्यायला मदत केली. लेखिकेनें घर सोडण्यापूर्वीं मिसेस टॉडनें तिला निरोप दिला. डुन्नेट लँडिंग दूरवर दृष्टीआड होईपर्यंत लेखिका बोटीच्या डेकवरून बघत राहिली. आदल्या उन्हाळ्यांत विल्यम मुख्य भूमीवर आला होता त्या वेळचा प्रसंग तिला आठवला. तो ट्राउट मासे पकडायला नदींतील बोटींतून जाणार होता. त्यानें तिला आपल्या बरोबर येतेस का म्हणून बिचकत बिचकत विचारलें. या दौऱ्यांत त्यांनीं मासे मुळींच पकडले नाहींत. पण मागाहून तो तिला बरोबर घेऊन मिसेस हाइट आणि तिची कन्या एस्थर यांना भेटायला गेला. लेखिका मिसेस हाइटशीं बोलत बसली आणि एस्थरशीं बोलणें करायला विल्यम तिला बाहेर घेऊन गेला. एस्थर मेंढ्या पाळायचें काम करून आपल्या वयोवृद्ध पांगळ्या आईला संभाळत होती. विल्यम आणि लेखिका तिथून परत आलीं त्या वेळीं लेखिकेच्या ध्यानांत आलें कीं विल्यम आणि एस्थर हें प्रेमिकांचें जोडपें आहे.

वसंत ऋतूंत लेखिका डुन्नेट लँडिंग गांवीं परत आली, तेव्हां मिसेस टॉड तिला म्हणाली : "मिसेस हाइट नुकतीच वारली. आतां एस्थर आणि विल्यम ताबडतोब चतुर्भुज होणार आहेत. हवा चांगली असली तर तो उद्यांच मुख्य भूमीवर येईल."

मिसेस टॉड भल्या पहांटे उठली आणि ग्रीन आयलंड बेटावरून येत असलेल्या होडीचें शीड दिसतें का हें बघत उभी राहिली. शेवटीं होडी जवळ येऊं लागलेली तिला दिसली. मग शेजारी येऊन चौकशी करूं लागले : "विल्यम मुख्य भूमीवर कशासाठीं येतोय ?" विवाह समारंभ उरकला. बेटावर परत जाण्यापूर्वीं विल्यम आणि एस्थर यांनीं थोडा वेळ मिसेस टॉडच्या घरीं मुक्काम केला. या जोडप्याला धक्क्यापर्यंत पोंचवायला मिसेस टॉड आणि लेखिका अशा दोघी जणी गेल्या. त्यांना निरोप देतांना मिसेस टॉडनें भावनांचें प्रदर्शन अजिबात केलें नाहीं. परंतु दोघी घरीं परत यायला निघाल्या, त्या वेळीं सुरवातीपासून शेवटपर्यंत एकमेकींच्या हातांत हात घालून चालत आल्या.

द कोर्टशिप ऑफ माइल्स स्टँडिश : प्रियाराधन

वाङ्मयप्रकार : काव्य. लेखक : हेन्री वॅड्स्वर्थ लाँगफेलो (१८०७-१८८२). कथानकाचा प्रकार : भावनाप्रधान अद्‌भुतरम्य कथा. काळ : १६२१. स्थळ : मॅसाचुसेट्स. प्रथम प्रकाशन : १८५८.

प्रमुख पात्रें : माइल्स स्टँडिश, एक सैनिक. जॉन आल्डेन, माइल्स स्टँडिश याचा मित्र. प्रिसिल्ला, स्टँडिश आणि आल्डेन या दोघांच्या प्रेमाचा विषय झालेली तरुणी.

समीक्षण : आपल्या अनुनयाचें प्रिसिल्लासमोर समर्थन करण्यासाठीं जॉन आल्डेन याला आपला प्रतिनिधी म्हणून माइल्स स्टँडिशनें धाडलें तेव्हां मोठा उपरोधपूर्ण प्रसंग उद्भवला. या कवितेंत जो खेळकर प्रशांत सूर आढळतो, त्यामुळें हा उपरोध सुसह्य होतो. साध्यासुध्या व सफाईदार शैलींत लिहिलेलें हें काव्य अमेरिकन अद्‌भुतरम्य काव्य वाङ्मयांत फार पूर्वींपासून वाचकांचें विशेष आवडतें ठरलें.

कथानक : इंग्लंड देश सोडून देऊन अमेरिकेंत स्थाइक झालेल्या आद्य इंग्रज वसाहतवाल्यांच्या पिल्ग्रिम कॉलनींत माइल्स स्टँडिश आणि जॉन आल्डेन हे दोघे एकाच केबिनमध्यें राहत होते. आल्डेन हा एक तरुण विद्यार्थी. स्टँडिश हा फौजेंतला हडेलहप्पी वृत्तीचा कॅप्टन. आदल्या पावसाळ्यांत 'मे फ्लॉवर' हें पहिलें इंग्रज वसाहतवाल्यांचें जहाज अमेरिकेच्या किनाऱ्याला लागल्यानंतर स्टँडिशची पत्नी वारली आणि तो विधुर झाला. एके रात्रीं 'सीझर्स कॉमेंटरीज' हें पुस्तक स्टँडिश वाचीत होता. हें पुस्तक बंद करून तो आल्डेनकडे वळला. त्या वेळीं आल्डेन त्या वसाहतींतील तरुण मुलींपैकीं प्रीसिल्ला या तरुणीला उद्देशून तिचा भरपूर गौरव करणारें पत्र लिहीत होता. स्टँडिश म्हणाला: "मित्रा, मला माझ्या आयुष्यांतल्या या एकलकोंडेपणाचा अगदीं वीट आलाय. ही प्रीसिल्ला देखील माझ्यासारखीच एकाकी आहे बघ. हिंवाळ्यांत तिचे आईबाप वारले आणि बिचारी उघडी पडली. माझं एक काम करतोस ? मी कांहीं तुझ्यासारखा विद्वान माणूस नव्हे. मी आपला सरळसोट शिपाई गडी. म्हणून तूंच माझ्या वतीनं प्रीसिल्ला हिला भेट आणि माझी लग्नाची मागणी तिला निवेदन कर."

स्टँडिशची ही विनंति ऐकून आल्डेन चांगलाच हादरला. कांहीं तरी बोलायचें म्हणून त–त–त प–प–प करीत तो म्हणाला : "तुझी बाजू तूं स्वतःच मांडलीस तर तें अधिक शहाणपणाचं ठरेल." पण कॅप्टननें त्याला मित्रत्वाच्या नात्यानें आपल्यावर येवढी मेहेरबानी करायची गळ घातली, तेव्हां त्याला नकार देणें आल्डेनच्या जिवावर आलें.

आल्डेन तिच्या केबिनजवळ आला त्या वेळीं ती 'शंभरावें स्तोत्र' गात होती. त्यानें दार उघडलें. ती सूतकताई करण्यांत गढून गेलेली त्याला दिसली. आपल्यावर काय हा प्रसंग आला, या विषादपूर्ण विचारानें भारलेल्या मनःस्थितींत त्यानें निर्धारानें खोलींत पाऊल तर टाकलें. बोलणें करायला योग्य असा क्षण आला आहे असें दिसतांच आल्डेननें घडाघडा कॅप्टनची मागणी तिला सांगून टाकली. प्रीसिल्लानें ही मागणी सपशेल धुडकावून लावली. ती म्हणाली : "मी जर येवढा अनुनय करायला लायक होत्यें, तर स्टँडिश स्वतःच कां नाहीं आला मला मागणी घालायला ? आणि काय रे, तूं स्वतःच्या वतीनं कां नाहीं मागणी घालत ?" तिचा हा दुसरा प्रश्न ऐकून तर बिचारा आल्डेन चांगलाच गोंधळला.

प्रीसिल्लाविषयीं त्याला स्वतःला वाटणारें प्रेम आणि स्टँडिशविषयीं त्याला असलेला आदर या दोहोंच्या कात्रींत आल्डेन सांपडला. म्हणून दुसऱ्या दिवशीं 'मे फ्लावर' जहाज इंग्लंडला परत जायला निघालें होतें, त्यांतून स्वदेशीं जायचें त्यानें ठरवून टाकलें.

आल्डेनच्या प्रियाराधनाची परिणति ऐकून घेतल्यावर स्टँडिश चिडला. पण तेवढ्यांत रेड इंडियन लोक लढाईला उद्युक्त झाले असल्याची बातमी आली. यामुळें कॅप्टनच्या रागाचा परिस्फोट तेवढ्यावरच थांबला. तो कॉलनीच्या नियंत्रण मंडळाच्या बैठकीला गेला. तिथें बाणांनीं भरलेली सापाच्या कातड्याची पिशवी त्याला दिसली. रेड इंडियनांनीं युद्धाचें आव्हान म्हणून हें प्रतीक धाडून दिलेलें होतें. त्या पिशवींतून त्यानें बाण काढून टाकले आणि तींत बंदुकीची दारू व गोळ्या भरल्या. आव्हानाचा स्वीकार केल्याचें निदर्शक म्हणून त्यानें ही पिशवी रेड इंडियनांच्या जासुदाला दिली. ती घेऊन तो जासूद लगबगीनें जंगलांत निघून गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं

बाकीचीं माणसें जागीं व्हायच्या अगोदर स्टॅंडिश आपल्याबरोबर आठ सैनिक व एक रेड इंडियन वाटाड्या असा सरंजाम घेऊन गांव सोडून निघाला.

त्या दिवशीं आल्डेन जहाजांतून रवाना झाला नाहीं. समुद्रकिनाऱ्यावरील गर्दीत त्याला प्रीसिल्ला दिसली. ती इतकी उदास आणि काकुळतीला आलेली दिसत होती कीं आपण इथेंच राहून हिचें संरक्षण करावें असा त्यानें नवा निर्णय घेतला. दोघें बरोबरच पायीं पायीं गांवाकडे परतलीं. तिच्या प्रश्नाची प्रतिक्रिया स्टॅंडिशवर काय झाली याचें वर्णन त्यानें तिच्याजवळ केलें. आणि तिला विश्वासांत घेऊन तो म्हणाला : " मी ही कॉलनी सोडून स्वदेशीं परत जायचा बेत केलेला होता. परंतु मी गेलों नाहीं. तुझी देखभाल करायला इथंच राहिलों. "

स्टॅंडिश किनाऱ्या किनाऱ्यानें उत्तरेकडे चाल करून जात होता. प्रियाराधनांत आपला जो पराभव झाला त्याविषयींचें काहूर त्याच्या मनांत माजून राहिलें. परंतु शेवटीं त्यानें असा निष्कर्ष काढला कीं आपण शिपाई-गिरीवरच सारें लक्ष केंद्रित करावें आणि प्रियाराधन विसरून जावें. रेड इंडियनांच्या छावणीवर हल्ला करून तो गांवीं परत आला. या हल्ल्यांत ठार झालेल्या एका रेड इंडियनाचें मुंडकें त्यानें बरोबर आणलें होतें. तें त्यानें किल्ल्याच्या छपरावर टांगून ठेवलें. त्याच्या अनुनयाचा आपण स्वीकार केला नाहीं याबद्दल या प्रकारानंतर प्रीसिल्लाला आनंदच झाला.

त्या पावसाळ्यांत रेड इंडियनांशीं गांवकऱ्यांनीं कसलीहि कटकट केली नाहीं. कॅप्टन स्टॅंडिश आसपासच्या ग्रामीण विभागांतून पाहणी करीत फिरत होता. आल्डेननें आपलें घर बांधलें. अधून मधून प्रीसिल्लाला भेटायला तो जंगलांतून पायीं जात असे. एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं ती कांड्या भरत होती आणि धाग्याचा फाळका त्यानें आपल्या हातीं धरलेला होता. त्यांच्या गप्पा चाललेल्या होत्या. तेवढ्यांत एक जासूद धांवत धांवत तिथें आला आणि सांगूं लागला : " स्टॅंडिशसाहेब विषारी बाण लागून ठार झाले. त्यांच्या तुकडीला रेड इंडियनांनीं अचानक गांठल्यामुळं ते तिच्यापासून अलग पडले. "

आपल्या प्रेमाचा परिस्फोट करायला आतां आपल्याला मोकळीक मिळाली असें आल्डेनला वाटलें. गांवांतल्या प्रार्थनामंदिरांत त्याचें प्रीसिल्लाशीं

लग्न झालें. सगळे गांवकरी या समारंभाला हजर होते. मॅजिस्ट्रेटनें प्रार्थना वाचून दाखविली. पाटलाचें आशीर्वादपर भाषण समाप्त झालें. तेवढ्यांत एक अनपेक्षित पाहुणा मंदिराच्या दाराशीं हजर झाला. हा दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द माइल्स स्टॅंडिशच होता. त्याची जखम भरून आली आणि खडखडीत बरा झाल्यावर तो कबरस्तानांतून एखादें भूत बाहेर यावें तसा तिथें आला.

सगळ्या वऱ्हाडी मंडळीसमोर या उग्र शिपाईगड्यानें नवरदेवाशीं दिलजमाई करून टाकली. मग हळुवार स्वरांत स्टॅंडिशनें वधूवरांना "नांदा सौख्यभरें" असा तोंड भरून आशीर्वाद दिला. हंसत खिदळत वरात निघाली. सगळ्या मंडळींनीं जंगलांतून मिरवत मिरवत प्रीसिल्लाच्या नव्या घरीं तिची पाठवणी केली.

कझिन बेट्टी

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : ऑनोर द बाल्झॅक (१७९९-१८५०). कथानकाचा प्रकार : सामाजिक टीका. काळ : एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध. स्थळ : फ्रान्स. प्रथम प्रकाशन : १८४७-१८४८.

प्रमुख पात्रें : बॅरन हूलो. आदेलीन, त्याची पत्नी. हॉर्टेन्स, त्यांची कन्या. वितोरिन, त्यांचा पुत्र. लिस्बेथ, आदेलीन हिची कझिन बेट्टी. मशूर क्रेवेल, बॅरन हूलो याचा वैरी. सेलेस्तीन, वितोरिन याची पत्नी आणि मशूर क्रेवेल याची कन्या. कर्नल हूलो, बॅरनचा थोरला भाऊ. मादाम मार्नीफी, बॅरन हूलो याची रखेली. मशूर मार्नीफी, मादाम मार्नीफी हिचा पति. कौंट स्टीनबॉक, हॉर्टेन्स हिचा पति. बॅरन मॉंती, मादाम मार्नीफी हिचा प्रियकर.

समीक्षण : या ग्रंथाचें कथानक गुंतागुंतीचें आहे. नवीन लग्न झालेल्या क्रेवेल दंपत्याचा मृत्यु आणि गलिच्छ वस्तींतून बॅरन हूलो याची सोडवणूक यांसारख्या यांतल्या अनेक घटना मुद्दाम जुळवून आणल्यासारख्या दिसतात. असें असूनहि पात्रांवर प्रभाव पाडणाऱ्या शक्तींच्या योगानें ग्रंथाला एकजिनसीपणा आला आहे. यांतलीं स्वभावचित्रें हेंच या कथेचें सर्वश्रेष्ठ आकर्षण. मानवी स्वभावाचें चित्रण करण्यांत बाल्झॅकचा हातखंडा आहे. सत्कर्में आणि दुष्कर्में यांच्या पाठीशीं कोणती प्रेरक शक्ति असते याविषयीं त्याला

मार्मिक ज्ञान आहे. या कथेंतील इतर सगळ्या तपशिलांचा वाचकाला एक वेळ विसर पडेल, परंतु द्वेषबुद्धीच्या संपूर्ण आहारीं गेलेल्या व्यक्तीचें चित्रण सादर करण्याचा ज्या पात्राच्या द्वारां लेखकानें प्रयत्न केलेला आहे, ती कझिन बेट्टी मात्र वाचकाच्या मनांत दीर्घकाळ वास्तव्य करील.

कथानक: १८३८चा उन्हाळा. एके दिवशीं मशूर क्रेवलेची स्वारी बॅरन हूलो याची पत्नी आदेलीन हिला भेटायला आली. त्यानें तिला विचारलें: “मी तुला माझी रखेली करूं इच्छितों. तुझी तयारी आहे का?” तिनें त्याला नकार दिला. तेव्हां मशूर क्रेवेल म्हणाला: “माझी अगोदरची रखेली बॅरन हूलोनं पळवून नेली आहे. या गोष्टीचा सूड घेतल्याखेरीज मी राहणार नाहीं अशी मी तुझ्यासमोर प्रतिज्ञा करतों.” या रखेलीला वश करण्यापायीं बॅरन हूलोनें आपली सगळी इस्टेट खर्ची घातली. आतां आपली कन्या हॉर्टेन्स हिच्या लग्नांत समाधानकारक हुंडा द्यायला त्याच्याजवळ पैसे नव्हते. आपल्या लग्नाचा योग हुंड्याअभावीं जुळत नाहीं याबद्दल हॉर्टेन्सला जें दुःख झालें तें विसरायची तिनें नामी युक्ति काढली. ती म्हणजे आपली मावशी लिस्बेथ हिच्या प्रियकरासंबंधांत तिला चिडविणें. लिस्बेथ — म्हणजेच कझिन बेट्टी—ही त्या घरांतली एक घोडनवरी होती, आणि तिचा प्रियकर होता एक निर्वासित पोलिश शिल्पकार कौंट स्टीनब्रॉक. त्या प्रेमाचें स्वरूप खरें म्हटलें म्हणजे मायलेकरांचें असलें तरी कझिन बेट्टी हिचा स्वभाव मात्र कमालीचा मत्सरी होता.

त्या दिवशीं सायंकाळीं बॅरनचा थोरला भाऊ कर्नल हूलो, त्याचा मुलगा वितोरिन आणि त्याची सून सेलेस्तीन अशीं तिघें बॅरनच्या घरीं जेवायला आलीं. सेलेस्तीन ही मशूर क्रेवेल याची कन्या. तिच्या वडिलांचा बॅरन हूलो-विषयीं जो वाईट ग्रह झालेला होता तो तिला मान्य नव्हता. भोजनानंतर बॅरन हूलो अगोदर कझिन बेट्टी हिला तिच्या घरीं पोंचवायला गेला आणि तिथून आपल्या रखेलीला भेटायला गेला. पाहतो तों ती त्याला सोडून एका श्रीमंत ड्यूककडे निघून गेलेली!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बॅरन हूलोनें एक नवा डाव रचला. त्याच्याकडे मशूर मार्नीफी नामक एक कारकून कामावर होता. या कारकुनाची पत्नी मादाम मार्नीफी हिला फशीं पाडायचें, हा तो डाव होता. दरम्यान कौंट स्टीन-

बॉक याची एक शिल्पकृति खरेदी करून हॉर्टेन्सनें या शिल्पकाराशीं आपल्याला चार गोष्टी बोलायला मिळतील असा योग जुळवून आणला. हूलो मंडळींना यावरून असें वाटलें कीं या निर्धन तरुण सरदाराचें स्थळ हॉर्टेन्सला ठीक आहे. परंतु या बेताचा थांगपत्ता त्यांनीं कझिन बेट्टी हिला अजिबात लागूं दिला नाहीं.

कझिन बेट्टी हिच्या बिऱ्हाडीं मादाम मार्नीफी हिची भेट बॅरन हूलोनें ठरविली. मागाहून या मार्नीफी कुटुंबाला त्यानें रू वारेन्नेस या रस्त्यावरील अधिक आरामशीर जागेंत राहायची सोय करून दिली. आणि कझिन बेट्टी ही देखील त्यांच्याचकडे राहायला गेली. तिथें तिची ही नवी मैत्रीण मादाम मार्नीफी हिच्याकडूनच तिला हॉर्टेन्स व कौंट स्टीनबॉक यांच्या संकल्पित लग्नाची बातमी कळली. कारण मादाम मार्नीफी हिच्यापासून बॅरन हूलो कांहींहि छपवून ठेवीत नसे. कझिन बेट्टी ही चक्रम घोडनवरी व कुरूप बाई म्हणून हूलो कुटुंबांत एक कायमचा थट्टेचा विषय होऊन राहिलेली होती. आपला प्रियकर या कुटुंबानें आपल्यापासून चोरून घेतला, हा तिच्या मतें आपल्या मानहानीचा कळस ठरला. म्हणून तिनें या सगळ्या हूलो कुटुंबावर सूड उगवायची घोर प्रतिज्ञा केली, आणि या कामीं तिला मदत करायला मादाम मार्नीफी कबूल झाली.

मादाम मार्नीफी हिचा परिचय मशूर क्रेवेल याजबरोबर घडवून आणून तिनें या सूडप्रकरणाचा प्रारंभ केला. कर्जापायीं कौंट स्टीनबॉक याला तुरुंगांत डांबवून ठेवविणें ही तिची या क्षेत्रांतली दुसरी कृति. मग तिनें हॉर्टेन्सला सांगितलें : " कौंट स्टीनबॉक स्वदेशीं पोलंडला परत गेला." कांहीं मित्रांच्या मदतीनें कौंट तुरुंगांतून सुटून आला. पुन्हां तो व हॉर्टेन्स यांच्या लग्नाची तयारी जोरांत चालू झाली. कझिन बेट्टी हिच्या कारवायांमुळेंच तो तुरुंगांत गेला असेल असा कुणालाहि संशय आला नाहीं. दरम्यान बॅरन हूलोनें कांहीं तरी लटपटी करून हॉर्टेन्सच्या हुंड्यासाठीं पैसे जमा केले. याशिवाय आदेलीन हिच्या चुलत्याला अल्जीयर्स येथें कामगिरीवर पाठवून त्यानें आपली पत सांवरण्याचा बेत योजिला. अल्जीयर्सला गेल्यावर या चुलत सासऱ्यानें लष्कराच्या पुरवठाखात्याशीं व्यवहार करून सरकारी पैसा चोरायचा अशी व्यवस्था बॅरन हूलोनें करून ठेवलेली होती. या चुलत सासऱ्याला

बिचाऱ्याला यांतलें कांहींच ठाऊक नव्हतें. तो मधल्यामध्येंच बनविला जाणार होता.

हॉर्टेन्सचें लग्न झाल्याबरोबर बॅरन हूलोनें आपली पत्नी आदेलीन हिचें बिऱ्हाड जरा स्वस्त भाड्याच्या घरांत नेलें. हेतु हा कीं मादाम मार्नीफी हिच्या सुखसोईवर अधिक पैसे खर्च करतां यावेत. बॅरनचा हा गुप्त संबंध फार सावधपणें चाललेला होता; त्यामुळें त्यांच्याकडे कुणाचें लक्ष जवळ जवळ मुळींच गेलें नाहीं. त्याच वेळीं मशूर क्रेवेल याजबरोबरहि तिनें घनिष्ठ सलगी चालू ठेवली. मशूर मार्नीफी याला या दोघां गृहस्थाकडून जोंपर्यंत पैशाचा पुरवठा चालू होता व युद्ध खात्यांत त्याला एक चांगली नोकरी होती, तोंपर्यंत त्यानें या दोघांनाहि विशेष त्रास असा कसलाच दिला नाहीं.

एके संध्याकाळीं मादाम मार्नीफी हिचा एक जुना प्रियकर बॅरन मॉंती हा तिच्या घरीं आला. यामुळें बॅरन हूलो व मशूर क्रेवेल या दोघांनाहि काळजी वाटूं लागली. त्याच रात्रीं मादाम मार्नीफी हिनें आपल्या जागेंत यायला बॅरन हूलो याला मज्जाव केला. आपणहि मादाम मार्नीफी हिचे प्रियकर कसे झालों हें आपलें गुपित बॅरन हूलो याजजवळ मशूर क्रेवेल यानें उघड करून सांगितलें. या दोघां जुन्या प्रतिस्पर्ध्यांची दिलजमाई झाली. दुसऱ्या दिवशीं दोघे मिळून मादाम मार्नीफी हिच्या घरीं गेले. आपल्या पतीच्या मृत्यूनंतर मशूर क्रेवेल आपल्याशीं लग्न करायला तयार आहे या गोष्टीचा विचार करायचें तिनें कबूल केलें. परंतु तिनें बॅरन हूलो याला मात्र सांगून टाकलें कीं "माझे प्रियकर होण्याची आशा यापुढें तुम्ही मुळींच धरूं नका." हे दोघे म्हातारे निघून गेल्यावर ती कझिन बेट्टी हिला म्हणाली : "कौंट स्टीनबॉक माझ्याकडे येईल अशी खटपट तूं कर." त्याला जिंकायची मनीषा तिनें सतत धरलेली होती. कारण त्याचा अधःपात झाला कीं हॉर्टेन्सवर पुरता सूड उगविल्याचें समाधानहि कझिन बेट्टी हिला लाभणार होतें.

कौंट स्टीनबॉक याला पैशाची जरूर होती. म्हणून कझिन बेट्टी हिनें हिकमतीनें सुचविलें : "मादाम मार्नीफीकडे पैसे उसने मिळतात का पाहा." त्या प्रमाणें कौंट गुप्तपणें तिला भेटायला गेला. मादाम मार्नीफी हिनें त्याला पूर्णपणें आपल्या कह्यांत घेऊन टाकला.

पुढें आपल्याला दिवस गेले आहेत असें मादाम मार्नीफी हिला जाणवलें. तिनें आपल्या प्रत्येक प्रियकराला अलग अलग गांठून सांगितलें : "तूंच माझ्या भावी बाळाचा जनक पिता आहेस." कौंट स्टीनबॉक याच्याकडेच खरें जनकत्व असलें पाहिजे असा हॉर्टेन्सचा समज होता. म्हणून ती त्याला सोडून देऊन आपल्या आईकडे राहायला गेली. हॉर्टेन्सला भेटून तिला आपल्या पतीकडे परत जायला सांगण्यासाठीं बॅरन हूलो याला आपली पत्नी आदेलीन हिची भेट घेणें भाग पडलें. हॉर्टेन्सनें या गोष्टीला साफ नकार दिला आणि खूपच तारांगण घातलें. या वेळीं कझिन बेट्टी तिथें आली आणि तिनें हॉर्टेन्सची कड घेतली. ती म्हणाली : "मला अतःपर मादाम मार्नीफी हिच्या घरीं राहतां येणार नाहीं. मी आतां वयोवृद्ध कर्नल हूलो यांच्या घरचा कारभार संभाळेन." त्या कुटुंबांतल्या मंडळीपैकीं पैसा जवळ बाळगून असलेला असा एकटा तोच काय तो होता. त्याच्याशीं लग्न करून त्या पैशावर ताबा मिळवावा अशी तिची योजना होती.

बॅरनचे सगळेच कारभार त्याच्या अंगलट येण्याचा रंग दिसूं लागला. अल्जीयर्सहून त्याच्या चुलत सासऱ्याचें पत्र आलें कीं "सरकारी पैशाची चोरी करायचं आपलं कारस्थान उघडकीस आलं. आतां ही चौकशी बंद पाडायसाठीं लांच द्यायला पैसे हवेत." इकडे मादाम मार्नीफी हिचा आपल्या भावी बाळासाठीं पैशाचा लकडा चालूच होता. तिच्या पतीलाहि अधिक वरची जागा मिळावी असें टुमणेंहि तिनें लावलें. एके रात्रीं मशूर मार्नीफी पोलिसांना बरोबर घेऊन या दोघां प्रियकरांच्या घरीं गेला आणि म्हणाला : "युद्धखात्यांत मला वरची जागा जर मिळाली नाहीं तर मी तुमच्यावर खटला भरीन." मादाम मार्नीफी हिनें बॅरन हूलो याला कोंडींत पकडलें आणि तिच्या पतीला वरची जागा मिळाली.

शेवटीं अल्जेरियांतील सरकारी अफरातफरीचा मामला उजेडांत आला आणि बॅरन हूलो याच्या चुलत सासऱ्यानें आत्महत्त्या केली. आपल्या भावाच्या कृष्णकारस्थानाची बातमी कर्नल हूलो याला कळली तेव्हां कुटुंबाच्या इभ्रतीला बसलेल्या या धक्क्यामुळें बिचारा कर्नल खचून गेला. आपल्या शिलकेंतून जरूर तेवढे पैसे त्यानें काढून दिले आणि ही मानहानि मनाला लावून

घेतल्यामुळें थोडयाच दिवसांत त्यानेंहि राम म्हटलें. कझिन बेट्टी हिचा सूड पूर्ण झाला. बॅरन हूलो धुळीला मिळाला.

शेवटीं मुठींत नाक धरून तो आपल्या जुन्या रखेलीकडे आश्रय मागायला गेला. त्याला सोडून डयूककडे पळून गेलेली तीच ही. तिनें त्याला थोडेसें भांडवल दिलें आणि सोबतीला एक सुंदर शिंपीण दिली. तो खोटें नांव धारण करून गलिच्छ वस्तींत राहिला. त्याचा मुलगा वितोरिन हा आतां यशस्वी वकील झालेला होता. या वकिलाच्या प्रयत्नानें त्या कुटुंबाची सांपत्तिक स्थिति हळूहळू सुधारून पूर्ववत् ठीकठाक झाली. दरम्यान मादाम मार्नीफी ही बाळंत होऊन तिचें मूल जन्मतःच मेलें. तिचा पतीहि मेला. आपल्या सासऱ्याला त्या नतद्रष्ट बाईच्या नादीं लागून स्वतःची हानि करून घेऊं द्यायची नाहीं असा वितोरिनचा निर्धार होता. म्हणून त्यानें एका गुंड इसमाला हाताशीं धरून त्याच्याकरवीं बॅरन मॉंती याला अशी बातमी देवविली कीं "मादाम मार्नीफी हिचें कौंट स्टीनबॉक याच्याशीं लफडें चालू असून ती मशूर क्रेवेल याजबरोबर लग्न करणार आहे." बॅरन मॉंती यानें सूडबुद्धीनें मादाम मार्नीफी व मशूर क्रेवेल यांना उष्णकटिबंधांतल्या प्राणघातक रोगाचा संसर्ग बाधेल अशी तरतूद केली. यामुळें लग्नानंतर लवकरच तीं दोघें मरून गेलीं.

आदेलीन हिनें गलिच्छ वस्त्यांतून लोकहिताचें कार्य आरंभलें. अशाच एका वस्तींत ती फिरत असतांना तिला आपल्या पतीचा पत्ता लागला. तिनें त्याला आपल्या घरीं राहायला आणलें. दरम्यान कझिन बेट्टी क्षयानें आजारी झाली. बॅरन हूलो घरीं परत आल्यावर लवकरच ती वारली.

बॅरन हूलो आतां आदर्श पति म्हणून कालक्रमणा करूं लागला. मग एके दिवशीं त्याच्या पत्नीनें आगाथे ही शेतकरी तरुणी स्वयंपाकीण म्हणून कामावर ठेवली. त्यानंतर आणखी कांहीं दिवस गेल्यावर ती पाहते तों आपले यजमान या स्वयंपाकिणीच्या खोलींत हजर! आणखी तीन दिवसांनीं आदेलीन वारली. पत्नीचे अंत्यसंस्कार उरकल्यानंतर लवकरच बॅरन हूलोनें पॅरिस शहराला रामराम ठोकला आणि मग शक्य तितक्या लवकर त्यानें आगाथे हिच्याशीं लग्न केलें. या अतिप्रसंगाला अनुलक्षून वितोरिन उद्गारलाः "आईबापांना आपल्या मुलांच्या लग्नांना अटकाव करतां येतो; परंतु साठी बुद्धि नाठी

झालेल्या आईबापांचे चाळे बंद पाडायच्या बाबतींत मुलांना मात्र कांहीं एक करतां येत नाहीं. "

कॉन्सुएलो

वाङ्‌मयप्रकार : कादंबरी. लेखिका : जॉर्ज सँड (मादाम ऑरोर दूदेव्हां, १८०४-१८७६). कथानकाचा प्रकार : ऐतिहासिक अद्‌भुतरम्य कथा. काळ : अठरावें शतक. स्थळ : व्हेनिस, बोहेमिया, व्हिएन्ना. प्रथम प्रकाशन : १८४२.

प्रमुख पात्रें : कॉन्सुएलो, एक गायिका. आन्झोलेटो, तिचा वाग्दत्त वर. पॉर्पोरा, तिचा संगीत-शिक्षक आणि पालक-पिता. कौंट रुडोल्स्टाड्ट, एक बोहेमियन सरदार. आल्बर्ट, त्याचा पुत्र. कॉरिल्ला, कॉन्सुएलो हिची प्रतिस्पर्धी गायिका. जोसेफ हेडन, एक संगीत-रचनाकार.

समीक्षण : एकोणिसाव्या शतकांतील अत्यंत लोकप्रिय कादंबरीकारांमध्यें जॉर्ज सँड हिची गणना होत असली तरी तिची शैली आजच्या वाचकांना कांहींशी कंटाळवाणी वाटते. प्रस्तुत " कॉन्सुएलो " या कादंबरीचें कथानक चटकदार असूनहि तींत अधून मधून प्रमुख पात्रांच्या विचारांचें आणि हालचालींचें जें अत्यंत तपशीलवार चित्रण केलेलें आढळतें, त्यामुळें तिच्या कलापूर्णतेला बाध येतो. तथापि या कादंबरींत लेखिकेच्या अनेक साहित्यिक कलागुणांचें प्रदर्शन आपल्याला आढळून येतें. तिच्यांतील वर्णनपर भाग सुंदर आणि हृदय हालवून सोडणारे असे आहेत. संगीत आणि संगीतकार यांजविषयीं लेखिका चांगलीच मर्मज्ञ असल्यामुळें नायिका कॉन्सुएलो हिला तिच्या प्रवासांत भेटलेल्या अनेक लोकांचें स्वभावचित्रण तिला यथार्थ स्वरूपांत रेखाटतां आलें. एकंदरीनें पाहतां ही कादंबरी वाचण्याच्या कामीं लावलेला वेळ सत्कारणीं लागेल. कारण तिच्यांतील गुण तिच्यांतील दोषांना भारी होत नसले तरी त्यांचा समतोल नक्कीच साधतात.

कथानक : व्हेनिस नगरींतील मेन्डिकान्टी या प्रार्थनामंदिरांतील प्रख्यात संगीत-शिक्षक पॉर्पोरा याच्या सगळ्या शिष्यमंडळांत कॉन्सुएलो ही आपल्या अंगच्या गुणांनीं श्रेष्ठ ठरली. ती एक गरीब अनाथ बालिका होती. पॉर्पोरा यानें तिला आपली कन्या मानून तिचें पालन केलें. व्हेनिस नगरींतील आणखी एक गरीब संगीतकार आन्झोलेटो याची आपण पुढेंमागें वाग्दत्त वधू

होऊं असें कॉन्सुएलो हिनें आपल्या आईच्या मरणापूर्वी तिला वचन देऊन ठेवलेलें होतें.

कौंट झुस्टिनियानी याच्या नाटककंपनींत प्रमुख गायिका म्हणून आन्झोलेटो याच्या खटपटीनें कॉन्सुएलो हिला नोकरी मिळाली. कॉरिल्ला या गायिकेच्या ऐवजीं तिची ही नेमणूक झाली. कॉरिल्ला देखील पॉर्पोरा याचीच शिष्या होती. कॉन्सुएलो हिला फार मोठें यश लाभलें. परंतु तिच्याच आग्रहाखातर त्या कंपनींत नेमलेला आन्झोलेटो या संगीतकाराचें विशेष कौतुक झालें नाहीं. तसें म्हटलें तर संगीतकार या नात्यानें त्याची तेवढी योग्यताहि नव्हती. आपल्याला या नोकरींतून अर्धचन्द्र मिळेल अशी त्याला आतां धास्ती वाटली. म्हणून त्यानें कॉरिल्ला हिचा आपण प्रियकर आहोंत अशी बतावणी चालविली. दोघी गायिका आपल्या प्रेमांत सांपडल्या आहेत अशी परिस्थिति असल्यास आपल्याला नोकरीची शाश्वती लाभेल असें त्याला वाटलें.

आन्झोलेटो हा संगीतकार पॉर्पोरा याला कधींच आवडलेला नव्हता. त्याची ब्याद टाळण्यासाठीं त्यानें शेवटीं एक क्लृप्ति लढविली. कॉरिल्ला हिच्या घरीं कॉन्सुएलो हिनें जावें असा योग त्यानें जुळवून आणला. या दोघांना तिथें आन्झोलेटो नेमका सांपडला. त्याबरोबर कॉन्सुएलो हिच्या भावना येवढ्या दुखावल्या कीं तिनें तत्काळ व्हेनिस नगरीला रामराम ठोकला आणि रंगभूमीवर पुन्हां पाऊल न ठेवण्याची प्रतिज्ञा केली. खोटाड्या आन्झोलेटोचा संबंध तिनें कायमचा तोडून टाकला.

व्हेनिस नगरी सोडून कॉन्सुएलो गेली बोहेमियाला. तिथें कौंट रुडोल्स्टाड्ट यानें आपली भाची ॲमेलिया हिची सहचरी म्हणून तिला कामावर घेतलें. या तरुण सरदारकन्येचा साखरपुडा तरुण कौंट आल्बर्ट रुडोल्स्टाड्ट याजबरोबर झालेला होता. परंतु तो वेड्यासारखा वागत असलेला दिसे, म्हणून तिनें त्याची धास्ती घेतली. आल्बर्ट याला वारंवार दिव्य साक्षात्कार होत असत. त्यांत त्याला प्राचीन काळचीं दृश्यें दिसत. फार पूर्वी मरून गेलेल्या कुणा तरी माणसाचा पुनर्जन्मांतला अवतार आपण धारण केलेला आहे अशी कित्येकदां तो स्वतःच्या बाबतींत कल्पना करी.

कॉन्सुएलो हिचें गायन पहिल्यांदा आल्बर्टनें ऐकलें तेव्हां त्यानें तिला तिच्या खऱ्या नांवानें हांक मारली. वस्तुतः व्हेनिस नगरींतील आपल्या दुःखी जीवनावर पडदा टाकण्यासाठीं तिनें नवें नांव धारण केलेलें होतें. आल्बर्टनें तिला आपल्या सगळ्या घरच्या माणसांदेखत सांगून टाकलें कीं "तूंच माझ्या मोक्षाचं स्थान आहेस. माझ्या बोकांडीं बसलेल्या शापाचं निराकरण करायला परमेश्वरानं तुला इथं धाडलंय." हें ऐकून बिचारी कॉन्सुएलो चांगलीच गांगरली.

एकेकदां अनेक दिवस आल्बर्ट बेपत्ता होई. तो कुठें जात असे हें कुणालाच ठाऊक नसे. कॉन्सुएलो हिनें त्याचा पाठलाग चालविला. परंतु तिला त्याचें गुप्त ठिकाण कधीं सांपडेचना. शेवटीं एके रात्रीं ती एका खोल विहिरींत उतरली. तींतून एक दगडी जिना लागला. त्या पायऱ्या चढून गेल्यावर आंत एक ओवरी सांपडली. या ठिकाणीं झदेन्को नामक एका वेडपटाच्या संगतींत आल्बर्ट दिवसच्या दिवस घालवीत असे. या वेडपटाचें आल्बर्टवर आपल्या प्राणांपलीकडे प्रेम होतें. कॉन्सुएलो विहिरींत उतरत असलेली पाहून त्याला असें वाटलें कीं ही आल्बर्टला इजा करणार. म्हणून त्यानें तिला जवळ जवळ ठारच केलें. तिनें त्याच्या तावडींतून आपली कशीबशी सुटका करून घेतली आणि आल्बर्ट तिला एकदांचा सांपडला. तिनें त्याला समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्यावर त्यानें आपलें वेडसर बोलणें थांबविलें आणि तो पूर्ववत् चारचौघांसारखा वागूं लागलेला दिसला. तिनें त्याला आपल्या घरच्या माणसांकडे परत यायला प्रवृत्त केलें आणि आपण बरोबर असल्याखेरीज त्या ओवरींत परत जायचें नाहीं असें त्याच्याकडून कबूल करून घेतलें. आल्बर्ट तिला म्हणाला : "माझं तुझ्यावर प्रेम आहे. तुझ्यावांचून माझं चालायचं नाहीं." परंतु तिचें अतःपर आन्झोलेटो याजवर प्रेम राहिलेलें नसलें तरी एका काळीं आपण त्याच्यावर केवढें प्रगाढ प्रेम करीत होतों याचा तिला विसर पडेना. म्हणून ती आल्बर्टला म्हणाली : "तुम्ही मला जरा सवड द्या. मग मी तुम्हांला काय तें सांगेन."

आल्बर्टचें डोकें परत ठिकाणावर आणायला मदत केल्याबद्दल त्याचे वडील आणि कुटुंबांतील इतर माणसें यांना कॉन्सुएलोविषयीं कृतज्ञता वाटली. त्याचे वडील म्हणजे कौंट रुडोल्स्टाड्ट यांची मजल तर येवढी पुढें गेली कीं

"तुला माझी सून व्हायला मी संमति देतों" असें त्यांनीं तिला सांगून टाकलें. कारण केवळ कॉन्सुएलो हीच आपल्या मुलाचें डोकें ठिकाणावर ठेवूं शकेल असा त्या म्हाताऱ्याचा दृढ समज झाला. आपलें आल्बर्टवर प्रेम आहे का नाहीं, आपल्याला सरदाराची सून होण्याचा हा बहुमान स्वीकारतां येईल का नाहीं, याविषयीं ती मनांतल्या मनांत भवति न भवति करीत होती, येवढ्यांत आन्झोलेटो तिला शोधत शोधत येऊन दाखल झाला. त्यानें कॉरिल्ला हिला आतां टाकून दिलेलें होतें. आल्बर्टला उद्देशून एक चिठी ठेवून देऊन कॉन्सुएलो किल्ल्यांतून सटकली. तिनें आपला गुरु पॉर्पोरा याच्या सेवेला पुन्हां हजर होण्यासाठीं सरळ व्हिएन्ना शहराचा रस्ता धरला.

जवळ पैसे नसल्यामुळें व्हिएन्ना गांठेपर्यंत तिला फार त्रास झाला. बहुतेक अंतर तिला पायींच चालावें लागलें. या प्रवासांत जोसेफ हेडन या तरुण संगीतरचनाकाराशीं तिची गांठ पडली. तो तिलाच शोधायला उलट दिशेनें किल्ल्याकडे चाललेला होता. पॉर्पोरा गुरुजींच्या हाताखालीं त्याला संगीताचा अभ्यास करायला हवा होता आणि आपल्याला त्यांच्याकडे घेऊन जायला आपण हिचें मन वळवूं शकूं अशी त्याला उमेद वाटली. कॉन्सुएलोनें वेष पालटून शेतकरी पोऱ्याचें सोंग घेतलें आणि ती हेडन याजबरोबर व्हिएन्ना नगरीकडे चालली. एका रात्रीं त्यांनीं प्रार्थनामंदिरांतील उपाध्यायाच्या घरीं आसरा घेतला. तीं दोघें तिथें असतांना कॉरिल्ला दाराशीं आली. बाळंतीण होण्यासाठीं ती सुरक्षित जागेच्या शोधांत होती. आपल्या जुन्या वैरिणीची कॉन्सुएलो हिला दया आली. ती तिला एका खानावळींत घेऊन गेली आणि तिथें तिनें तिला बाळंतीण व्हायला मदत केली. या बालकाचा पिता आन्झुएलो असल्याचें तिला एका मोलकरणीकडून कळलें. कॉन्सुएलोनें अजून शेतकरी पोऱ्याचेंच सोंग चालू ठेवलें असल्यामुळें कॉरिल्लानें तिला ओळखलें नाहीं.

शेवटीं जोसेफ आणि कॉन्सुएलो हीं दोघें एकदांचीं व्हिएन्ना नगरींत पोंचलीं. तिची पुन्हां भेट झाल्यावर पॉर्पोरा गुरुजींना असीम आनंद झाल्याचें तिला दिसून आलें. हेडन यानें पॉर्पोरा गुरुजींचा गंडा बांधला, आणि कॉन्सुएलोच्या गायनाचा कार्यक्रम महाराणीसमोर झाला. तेवढ्यांत कॉरिल्ला ही देखील व्हिएन्ना नगरींत आली आणि मग तिला कळलें कीं कॉन्सुएलो हिनेंच

आपल्याला बाळंतपणांत स्नेहभावनेनें मदत केली. तिनें तिथल्या नाट्यमंदिरांत कॉन्सुएलो हिच्या गायनाचा कार्यक्रम करण्याची व्यवस्था केली. कॉरिल्ला हिला अनैतिक संबंधापासून अपत्य झालेलें असून हिनें आपलें बाळ, ज्या उपाध्यायाच्या घरीं आपण व जोसेफनें आसरा घेतला होता, त्याच्याचकडे ठेवून दिलें आहे, ही गोष्ट कॉन्सुएलो हिला ठाऊक होती. या प्रकाराची वाच्यता तिनें कुणाजवळहि करूं नये अशी आशा धरून कॉरिल्लानें तिला पुढें आणण्याची ही खटपट केली. आन्झोलेटोचें पुढें काय झालें हें यानंतर कुणालाच कळलें नाहीं.

कॉन्सुएलो हिनें एक पत्र लिहून आल्बर्टला कळविलें कीं " मी परत तुमच्याकडे यायची तयारी बहुतेक करून ठेवलेली आहे." परंतु पॉर्पोरा गुरुजींनीं हें पत्र त्याच्याकडे रवाना होण्यापूर्वींच हस्तगत करून फाडून टाकलें. आल्बर्टचें उत्तर येईल म्हणून कॉन्सुएलो बिचारी व्यर्थ वाट बघत राहिली. शेवटीं पॉर्पोरा गुरुजींनीं तिला सांगून टाकलें कीं " कौंट साहेबांचं मला पत्र आलंय. आपल्या पुत्रानं एका नटीशीं लग्न करावं हें आपल्याला पसंत नाहीं असं त्यांनीं कळवलंय. त्यांचा हा निर्णय आल्बर्टला मान्य आहे." आपल्या पालक-पित्यावर कॉन्सुएलो हिचा येवढा जबरदस्त विश्वास होता कीं तिनें गुरुजींचें हें म्हणणें खरें मानलें. वस्तुतः तिच्या संगीत क्षेत्रांतील प्रगतीविषयीं पॉर्पोरा गुरुजींनीं केवढी तरी मोठी महत्वाकांक्षा धरलेली होती, म्हणून त्यांनीं ही बनवाबनवी केलेली असेल, ही गोष्ट तिच्या ध्यानांतच आली नाहीं.

कॉन्सुएलो हिला बरोबर घेऊन पॉर्पोरा गुरुजी नाट्यमंदिरांतील एका कार्यक्रमाच्या निमंत्रणानुसार बर्लिनला रवाना झाले. वाटेंत या दोघांना कौंट रुडोल्स्टाइट यांचा भाऊ भेटला. आल्बर्टनें आपल्या वडिलांना सांगून ठेवलेलें होतें कीं " वाटेंतील एका विशिष्ट ठिकाणीं विशिष्ट दिवशीं विशिष्ट वेळीं कुणाला तरी धाडून द्या. तिथं भेटलेल्या प्रवाशांना ताबडतोब किल्ल्यावर घेऊन यायची कामगिरी या हरकाऱ्यानं करायची आहे." आल्बर्ट फार आजारी होता. म्हणून आपल्याला त्याची भेट घ्यायला जाऊं द्यावें अशी कॉन्सुएलो हिनें गुरुजींना गळ घातली आणि ती त्यांनीं मान्य केली. ती किल्ल्यावर दाखल झाली त्या वेळीं तिला कळलें कीं आल्बर्टच्या वडिलांना पॉर्पोरा गुरुजींचें एक पत्र आलें असून त्यांत त्यांनीं लिहिलें आहे : " कॉन्सु-

एलो आणि आल्बर्ट यांच्या विवाहाला मी कधींहि संमति देणार नाहीं. किंबहुना खुद्द कॉन्सुएलो हिनेंच आल्बर्टचें नांव टाकलें आहे." या पत्राचा परिणाम प्राणघातक ठरला. आल्बर्ट अत्यंत क्षीण झाला आणि त्यानें कॉन्सुएलो हिला विनवून सांगितलें : "मी मरायच्या अगोदर तूं माझ्याशीं लग्न कर म्हणजे माझ्या आत्म्याला चिरशांतीचा लाभ होऊं शकेल. केवळ तुझ्या मार्फतच मला मोक्ष मिळायची शक्यता आहे असं अजूनहि मला वाटतंय." म्हणून लग्नाच्या आणाभाकांचा उभयतांनीं पुनरुच्चार केला आणि "आतां माझी मुक्तता आली" असा उद्घोष करीत कॉन्सुएलो हिच्या बाहुपाशांत पडल्या पडल्याच आल्बर्टनें प्राण सोडला.

सारी रात्र कॉन्सुएलो हिनें आपल्या पतीच्या समवेत जागून काढली. त्याला उचलून शवपेटिकेंत ठेवायला नेलें तेव्हांच तिनें त्याला सोडलें. तिनें आल्बर्टच्या घरच्या माणसांचा अखेरचा निरोप घेतला. वारसाहक्कानें तिच्या कडे चालून आलेल्या कसल्याहि दौलतीचा तिनें स्वीकार केला नाहीं. मग ती किल्ल्यावरून निघाली आणि बर्लिन शहरीं पॉर्पोरा गुरुजींच्या सेवेला हजर झाली. तिथें खुद्द जर्मन बादशहा फ्रेडरिक द ग्रेट यानें तिचें सौन्दर्य आणि तिची गायनकला या दोन्ही गुणांची भक्तिभावानें वाहवा केली.

अ कनेक्टिकट यँकी ॲट किंग आर्थर्स कोर्ट

वाङ्मयप्रकार : कादंबरी. लेखक : मार्क ट्वेन (सॅम्युएल एल्. क्लेमेन्स, १८३५-१९१०). कथानकाचा प्रकार : सामाजिक उपहासिका. काळ : सहावें शतक. स्थळ : इंग्लंड. प्रथम प्रकाशन : १८८९.

प्रमुख पात्रें : द कनेक्टिकट यँकी, "मालक." क्लॅरेन्स, हुजऱ्या. किंग आर्थर, इंग्लंडचा राजा आर्थर. सँडी, "मालका"ची पत्नी. मेर्लिन, जादुगार.

समीक्षण : मार्क ट्वेनच्या कल्पनाविलासानें सजलेली ही बखर म्हणजे कोटिक्रमयुक्त लेखनाच्या थराखालीं गाडलेली गंभीर सामाजिक उपहासिका आहे. नाइट एरन्ट्रीचें (परोपकारी भटक्या शिलेदारीचें) युग म्हणून गौरविलेला काळ म्हणजे पोरकट बर्बरतेचा एक प्रकार असल्याचें या कथेनें उघड करून दाखविलें. परंपरेनें चालत आलेल्या दंतकथांतून शौर्य आणि

स्त्रीदाक्षिण्य या गुणांचा बडिवार माजविणाऱ्या त्या काळांत त्या गुणांऐवजीं या कनेक्टिकट-निवासी यँकीला (अमेरिकनाला) सरंजामशाहीची क्रूर समाजव्यवस्था रूढ असल्याचें आढळतें. शिव्यागाळी आणि दारिद्र्य हेंच त्या काळांत सामान्य जनांच्या पांचवीला पुजलेलें होतें. या कथेच्या यँकी नायकाचे लोकशाहीविषयींचे विचार तपासले, तर त्यांत आपल्याला मार्क ट्वेनची तत्त्वप्रणाली दिसून येते. ज्या प्रमाणांत एखाद्या सरकाकडून बहुजनसमाजाचा फायदा होईल त्याच प्रमाणांत तें सरकार चांगलें ठरतें, ही गोष्ट तो या कथेच्या रूपानें सोदाहरण पटवून देतो.

कथानक : न्यू इंग्लंडमधील (अमेरिकेंतील) हत्यारांच्या कारखान्यांत कामावर असलेल्या एका कुशल यंत्रज्ञाचें कुणाशीं तरी भांडण झालें. त्या भांडणांत त्याच्या डोक्यावर ठोसा बसला. तो बेशुद्ध झाला. शुद्धीवर येऊन पाहतो तों एक चिलखतधारी अश्वारूढ सरदार स्वतःच्या भाल्यानें आपल्याला ढोंसतो आहे! हा सरदार होता राजा आर्थरच्या सुप्रसिद्ध गोलमेजाभोंवतीं बसणाऱ्या मानकऱ्यांपैकीं. याचें नांव सर के. आणि हा काळ म्हणजे रंगेल इंग्लंडमधील इ. स. ५२८ चा जून महिना. हा एकंदर प्रकार बघून तो यँकी (अमेरिकन) भलताच चकरावला. झकपक पोशाख केलेल्या क्लॅरेन्स नामक तरुण हुजऱ्यानें त्याला अटक करून पांढरे शुभ्र मनोरे असलेल्या कॅमेलॉट या किल्लावजा वाड्याकडे चालवीत नेलें. वाटेंत त्या हुजऱ्यानेंच वरील स्थळकाळाची हकीकत त्या यँकीला सांगितली. मग त्या यँकीला एका घटनेची आठवण झाली. तारीख २१ जून इ. स. ५२८ रोजीं सूर्याला खग्रास ग्रहण लागलेलें होतें, ही ती घटना. हें ग्रहण जर लागलें, तर आपण काळाच्या दृष्टीनें वाट चुकलेले प्रवासी खरोखरीच ठरलों आहोंत आणि आपण फिरत फिरत शिव्हल्रीच्या [स्त्रीदाक्षिण्याच्या] जुन्या युगांत परत दाखल झालों आहोंत, अशी त्याची खात्री होणार होती.

कॅमेलॉट किल्ल्यांत राजा आर्थरच्या दरबारांतील सरदार लोक आपल्या प्रचंड पराक्रमांच्या हकीगती सांगत होते. त्या या यँकीनें ऐकून घेतल्या. जादुगार मेर्लिन यानें राजा आर्थर येणार असल्याचें पुन्हां सांगितलें. शेवटीं सर के यानें आपल्याला हा यँकी कसा भेटला ती हकीगत निवेदन केली. आणि मेर्लिन यानें सल्ला दिला कीं "या कैद्याला तारीख २१ जून रोजीं

सुळाला बांधून जिवंत जाळायचंय. तोंपर्यंत याला अंधारकोठडींत डांबून ठेवा."

तुरुंगांत बसल्या बसल्या तो आगामी सूर्यग्रहणाचा विचार करूं लागला. या गोष्टीला अनुलक्षून तो क्लॅरेन्स या हुजऱ्याला म्हणालाः " हा जादुगार मेर्लिन थापाड्या इसम आहे. माझा एक निरोप दरबारांत घेऊन जा. त्यांना म्हणावें कीं माझ्या मृत्यूच्या दिवशीं सूर्यावर अंधार येईल आणि हें राज्य नष्ट होऊन जाईल." त्याप्रमाणें ठरलेल्या वेळीं सूर्याला खग्रास ग्रहण लागलें. कारण आकाशांतला प्रकाश मंद मंद होऊं लागला, त्याच वेळीं त्या यँकीला जिवंत जाळायचा कार्यक्रम पार पडायचा होता. ग्रहण लागलेलें पाहून राजा दबकला आणि त्यानें " या कैद्याला सोडून द्या. " असें फर्माविलें. " हा माणूस मेर्लिन-पेक्षां श्रेष्ठ जादुगार आहे," असा लोकांनीं एकच गिल्ला केला.

या यँकीनें आपल्या जादुगिरीचें आणखी एखादें प्रदर्शन करावें अशी दरबाराकडून मागणी आली. म्हणून त्यानें कांहीं गांवठी स्फोटक द्रव्यें तयार केलीं आणि हुजऱ्या क्लॅरेन्स याची मदत घेऊन हीं स्फोटक द्रव्यें जादुगार मेर्लिन याच्या मनोऱ्यांत तळाला ठेवून दिलीं. मग त्यानें सगळ्या मंडळींना सांगितलें: " हा मनोरा मी पाडून जमीनदोस्त करून दाखवितों. " स्फोट झाल्यावर त्यानें म्हटल्याप्रमाणें घडलें. त्याबरोबर त्याला दरबारचा नवा जादुगार म्हणून हक्काची जागा मिळाली. मेर्लिन याला तुरुंगांत डांबण्यांत आलें.

राजा आर्थर याच्या किल्ल्यांत यांत्रिक साधनांचा अभाव पाहून हा कल्पक न्यू इंग्लंडवाला बेचैन झाला. जनतेची निरक्षरता पाहून तर शिक्षणाच्या बाबतींतील त्याचा अमेरिकन स्वाभिमान चांगलाच दुखावला. म्हणून त्यानें असें ठरविलें कीं सध्यां सरदार वर्गाचे गुलाम असलेल्या सामान्य लोकांना थोडा तरी वरचा दर्जा मिळवून द्यावा. या वेळेपर्यंत त्याला स्वतःला एक स्वतंत्र पद प्राप्त झालें. सगळे लोक त्याला " मालक " या नांवानें संबोधूं लागले. " मालक " या नात्यानें आपण या राज्याचें आधुनिकीकरण करावें असा त्यानें बेत योजिला.

त्यानें पहिली कामगिरी केली ती अशी : साऱ्या देशभर लहान लहान वस्त्यांतून त्यानें शाळा स्थापन केल्या. त्याला हें काम गुप्तपणें करावें लागलें. कारण धर्मपीठ आपल्या या उद्योगांत ढवळाढवळ करील अशी त्याला

धास्ती वाटली. त्यानें कामगारांना यंत्रविद्या शिकवून तरबेज केलें. राष्ट्राला स्वतंत्र वृत्तपत्रव्यवसाय पाहिजे असें त्याचें मत होतें. म्हणून त्यानें हुजऱ्या क्लॅरेन्स याला वृत्तपत्र व्यवसायाची कला शिकविली. त्यानें गांवांगांवांच्या दरम्यान टेलिफोनच्या तारा लावून घेतल्या. मात्र हें काम जरा अव्यवस्थितपणेंच झालें. कारण तारा लावण्याच्या कामीं मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडणारे नकाशे त्या काळीं मुळीं उपलब्धच नव्हते.

सर सॅग्रॅमोर यानें मालकाला द्वंद्व युद्धाचें आव्हान दिलें. त्याबरोबर दरबारानें असें ठरविलें कीं या युद्धाची तयारी म्हणून त्यानें सरदारी दर्जाला शोभेल अशी कसली तरी कामगिरी करून यावें. ॲलिसॅन्डे नामक एका तरुणीला मदत करण्याची कामगिरी त्याला मिळाली. या तरुणीची भानगड काय होती, याचा उलगडा त्याला होऊं शकला नाहीं. त्याच्या मनांत अनेक विकल्प निर्माण झाले. तशाच अवस्थेंत त्यानें अंगावर अवजड चिलखत चढविलें आणि आपल्या धष्टपुष्ट घोड्यावर स्वार होऊन तो सँडीला घेऊन निघाला. ॲलिसॅन्डे हिला त्यानें सँडी असें नांव दिलें. सँडी ही फार बोलघेवडी होती. दोघांचा प्रवास चाललेला असतांना तिनें ना शेंडा ना बुडखा अशा लांबलचक भाकडकथा त्याला सांगितल्या. सरंजामी अमदानींत जनतेची किती अनुकंपनीय दशा झालेली आहे हें या प्रवासांत समक्ष पाहून त्याला मोठा अचंबा वाटला. त्याला कुणी असामान्य चमक असलेला माणूस वाटेंत आढळला रे आढळला कीं त्याची रवानगी तो कॅमेलॉट किल्ल्यांत हुजऱ्या क्लॅरेन्स याजकडे करी. तिथें त्या इसमाला वाचन, लेखन आणि एखादा उपयुक्त व्यवसाय शिकवायची सोय त्यानें करून ठेवलेली होती. ज्या ज्या किल्ल्यांतून तो मुक्काम करी, तेथील तुरुंगांची तो पाहणी करी आणि क्रूर धन्यांनीं अन्यायानें तुरुंगांत डांबलेल्या कैद्यांची तो सुटका करी.

पावित्र्याच्या खोऱ्यांत त्याला आपल्या जादुगिरीचें कौशल्य सिद्ध करून दाखवायला आणखी एक संधि मिळाली. त्या ठिकाणची एक पवित्र विहीर कोरडी ठणठणीत पडलेली होती. कोणी तरी तिच्यांत आंघोळ केली आणि म्हणून तिच्यांतलें पाणी आटून गेलें, असा एक लोकप्रवाद या बाबतींत ऐकूं आला. तो त्या ठिकाणीं येऊन पोंचला, त्याच वेळीं मेर्लिन कांहीं तरी जादूटोणा

करून या विहिरींतला पाण्याचा झरा परत वाहायला लावण्याच्या खटपटींत होता. आतां त्याची तुरुंगांतून सुटका झालेली होती आणि म्हणून या कामगिरीवर तो आला. मेर्लिनला कांहीं हें काम साधेना. मग मालकानें खूप मोठें अवडंबर माजविलें आणि विहिरीच्या तळांतील बांधकामाला पडलेली एक भेग बुजवून काढली. ही दुरुस्ती झाल्याबरोबर विहीर पाण्यानें तुडुंब भरली. मेर्लिन शरमेनें खालीं मान घालून आपल्या घरीं चालता झाला.

योगायोग असा कीं जवळच्याच एका गुहेंत मालकाला आपण उभारलेल्या टेलिफोन स्टेशनांपैकीं एक स्टेशन सांपडलें. तिथून त्यानें हुजऱ्या क्लॅरेन्स याजबरोबर संभाषण केलें. हुजऱ्यानें त्याला सांगितलें: "राजा आर्थर इथून पावित्र्याच्या खोऱ्याकडे वाहता झरा पाहण्यासाठीं निघालेला आहे." मालक त्या झऱ्याकडे परत आला. पाहतो तों एक बनावट जादुगार तिथें आ वासून उभ्या असलेल्या यात्रेकरूंना छातीठोकपणें सांगतो आहे कीं "या क्षणीं कोण काय करीत असेल हें मी अंतर्ज्ञानानें निवेदन करूं शकतों." मालकानें त्याला तिथल्या तिथें विचारलें: "या वेळीं राजा आर्थर काय करींत असेल तें सांग बघूं?" हा जादुगार म्हणाला: "या वेळीं राजा आर्थर आपल्या कॅमेलॉट किल्ल्यांतील शयन मंदिरांत गाढ झोंपलेला आहे." मालकाला आतां चांगलेंच अवसान चढलें. आपलें हातखंडा भविष्य म्हणून त्यानें सांगून टाकलें कीं "राजा आर्थर हा या वेळीं पावित्र्याच्या खोऱ्याकडे येत असून तो येवढ्यांत इथं दाखल होईल." त्याप्रमाणें राजा खरोखरीच तिथें हजर झालेला बघून मालकाच्या या जादुगिरीनें सगळे लोक पुन्हां एकदां चांगलेच स्तिमित झाले.

आपल्या प्रजेच्या हालअपेष्टांविषयीं राजा आर्थर याची खात्री पटवून द्यावी असा मालकाला ध्यास लागलेला होता. म्हणून त्यानें राजाला असें सुचविलें कीं "महाराज, आपण आणि मी असे दोघे वेष पालटून सामान्य माणसं असल्याचा बहाणा करूं या, आणि यात्रेकरू म्हणून सारा देशभर प्रवास करून येऊं या." राजा आर्थर याच्या स्वतःच्या सामाजिक मतप्रणालीबद्दल त्याला दोष देतां येण्याजोगा नाहीं; समाजांतील त्याचें जें स्थान आहे, त्या स्थानामुळें तो या मतप्राणालीच्या आहारीं गेलेला आहे;—ही गोष्ट मालक जाणून होता. राजा कसा धैर्यशाली आणि दयाळू आहे ही गोष्ट उभयतांच्या या प्रवासांत चांगलीच सिद्ध झाली.

लवकरच या दोघांना दुर्दैवानें गांठलें. एका सरदारानें त्यांना पकडलें आणि गुलाम म्हणून विकून टाकलें. कारण आपण स्वतंत्र माणसें आहोत ही गोष्ट त्यांना सिद्ध करतां आली नाहीं. या दोघां गुलामांची लंडनला रवानगी झाली. या ठिकाणीं मालकाला ज्या कोठडींत ठेवलेलें होतें त्या कोठडीचें कुलूप खोलून तो पसार झाला. तो पळून गेल्यानंतर बाकीच्या सगळ्या गुलामांना फांशीं द्यावें असें फर्मान सुटलें. परंतु तेवढ्यांत मालकानें आपण उभारलेल्यांपैकीं एक टेलिफोन स्टेशन गांठलें आणि तेथून कॅमेलॉट किल्ल्यावर टेलिफोन करून हुजऱ्या क्लॅरेन्स याला सांगितलें: "तुमचा राजा फांशीं जातो आहे. त्याला वांचवण्यासाठीं सरदारांच्या फौजेसह सर लॅन्सेलॉट याला ताबडतोब लंडनला धाडून दे."

विजयानंदांत दंग होऊन मालक कॅमेलॉट किल्ल्यावर परत आला खरा, परंतु त्याचा हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. त्याला अजून सर सॅग्रमोर याजबरोबर द्वंद्व युद्ध करायचें राहिलेलेंच होते. खरें म्हटलें म्हणजे ही लढाई मेर्लिन आणि मालक या दोघांचीच होती. आपण सर सॅग्रमोर यांना एक अदृश्य चिलखत धारण करण्यास दिलें आहे अशी मेर्लिन यानें बढाई मारली. परंतु भोळा बिचारा तो सरदार फक्त स्वतःपुरताच अदृश्य होता; बाकी सर्वांना तो दिसत होता. मालकानें चिलखत वगैरे कांहींच अंगावर चढवलें नाहीं. यामुळें मैदानावर उभयतांची झुंपली त्या वेळीं सरदाराचा हल्ला येतांक्षणीं मालक तो हल्ला हुकवून सहज बाजूला सटकूं शकत होता. शेवटीं या झटापटींत सर सॅग्रमोर अगदीं थकून गेला. मग मालकानें त्याच्या अंगावर दोराचा फांस फेंकून त्याला घोड्यावरून खालीं खेंचलें. सर सॅग्रमोर पुन्हां लढ्याच्या मैदानांत उतरला, तेव्हां मेर्लिन यानें मालकाजवळचा फांसाचा दोर चोरून नेला. आतां मालकाला अन्य पर्याय शिल्लक राहिला नाहीं; त्यानें आपलें पिस्तूल सरसावून सर सॅग्रमोर यांजवर गोळी झाडली. मग त्यानें आर्थर राजाच्या गोल मेजाभोंवतीं बसणाऱ्या सगळ्या मानकरी सरदारांना द्वंद्व युद्धाचें आव्हान दिलें. या वेळीं त्याच्या जवळच्या दोन पिस्तुलांमध्यें मिळून अवघ्या बारा गोळ्या शिल्लक होत्या. परंतु त्याचें सुदैव असें कीं त्याच्यावर हल्ला करून येणाऱ्या सरदारांपैकीं

अकरा जणांना ठार केल्यावर बाकीच्या सर्वांनीं कच खाल्ली आणि शरणागति पतकरली.

आणखी तीन वर्षें लोटलीं. या दरम्यान मालकानें सँडीशीं लग्न केलें आणि या जोडप्याला एक छोटीशी कन्या झाली. तो आणि हुजऱ्या क्लॅरेन्स या उभयतांनीं राजा आर्थर याच्या मृत्यूनंतर या देशांत प्रजासत्ताक राज्याची ग्वाही फिरवण्याचा बेत चालविलेला होता. कारण त्या सहाव्या शतकांतल्या राज्याला आतां एकोणिसाव्या शतकांतल्या देशाचें स्वरूप प्राप्त झालेलें होतें. शाळा, आगगाड्या, कारखाने, वृत्तपत्रें, टेलिफोन आणि तारायंत्र या सगळ्या सोई त्या देशांत उपलब्ध झालेल्या होत्या, तेथील सरदारगिरीचे स्त्रीदाक्षिण्यादि सगळे नियम रद्द झालेले असले तरी अजूनहि सरदारांनीं आपलीं चिलखतें अंगावर चढवून मिरविण्याचा आपला हट्ट तसाच चालू ठेवला. नंतर मालकाची कन्या छोटी हेल्लो-सेंट्रल ही आजारी पडली. तो आणि सँडी अशीं दोघें आपल्या बाळीला हवा पालटण्यासाठीं समुद्रकांठीं घेऊन गेलीं. ही मंडळी तिकडून परत आल्यावर पाहतात तों कॅमेलॉट किल्ल्याची धुळधाण झालेली! या एकंदर प्रकाराची हकीगत सांगायला हुजऱ्या क्लॅरेन्स हाच तेवढा शिल्लक होता. प्रकार असा झाला: राणी ग्वीनेव्हेरे हिच्यावरून राजा आर्थर आणि सर लॅन्सेलॉट या उभयतांची आपसांत लढाई झाली. या लढाईत राजा ठार झाला. त्याबरोबर धर्मपीठानें खास वटहुकूम काढून मालकाच्या सगळ्या कामगिरीचा सत्यानाश केला. निर्वाणीचा उपाय म्हणून हुजऱ्या क्लॅरेन्स आणि मालक यांनीं एक किल्ला उभारला आणि त्याच्या भोवतालीं जिवंत वीज खेळत असलेल्या तारा लावून ठेवल्या. इंग्लंडच्या अवशिष्ट सरदारवर्गाशीं झालेल्या लढाईत मालक सुऱ्याचा वार लागून जखमी झाला. शत्रूच्या छावणीकडून एक म्हातारी बाई किल्ल्यावर आली आणि म्हणाली: "मी मालकाची शुश्रूषा करत्यें." जादुगार मेर्लिन हाच त्या म्हातारीचें सोंग घेऊन आलेला आहे हें कुणालाच उमगलें नाहीं. या जादुगारानें मालकावर जादूचा प्रयोग केला आणि छातीठोकपणें सांगितलें कीं "हा तेराशें वर्षें झोंपून राहील." आणि खरोखरीच हा यँकी एकोणिसाव्या शतकांत पुन्हां व्यवस्थित जागा झाला.

ऋण निर्देश

पुढील कॉपीराइट ग्रंथांचा या भागांत उपयोग करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्या त्या ग्रंथांच्या लेखकांचे वा प्रकाशकांचे आभारी आहोत :

'बुड्नब्रूक्स', लेखक थॉमस मॅन; अनुवादक एच्. टी. लोव पोर्टर; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२४, आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'द कबाला', लेखक थॉर्नटन वाइल्डर; खुद्द लेखकाच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२६, आल्बर्ट अँड चार्ल्स बोनी, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'सीझर ऑर नथिंग', लेखक पायो बारोजा; अनुवादक लुई हो; प्रकाशक आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९१९, १९४७, आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'केक्स अँड एल', लेखक डब्ल्यू. सॉमरसेट मॉम; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक डबलडे अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट १९३०, डब्ल्यू. सॉमरसेट मॉम यांचा. 'द कॉल ऑफ द वाइल्ड', लेखक जॅक लंडन; प्रकाशक द मॅकमिलन कंपनी यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९०३, १९१२, द मॅकमिलन कंपनी यांचा; पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९३१, द मॅकमिलन कंपनी यांचा. 'कॅप्टन होरॅशियो हॉर्नब्लोअर', लेखक सी. एस्. फॉरेस्टर; हॅरोल्ड मॅटसन यांच्या परवानगीनें; प्रकाशक लिटल, ब्राऊन अँड कंपनी; कॉपीराइट, १९३९, सेसिल स्कॉट फॉरेस्टर यांचा. कॅप्टन्स करेजियस, लेखक रुडयार्ड किप्लिंग; मिसेस जॉर्ज बाम्ब्रिज यांच्या आणि प्रकाशक डबलडे अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीरइट, १८९६, १८९७, रुडयार्ड किप्लिंग यांचा पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९२३, रुडयार्ड किप्लिंग यांचा. 'द केस ऑफ सार्जंट ग्रिशा', लेखक आर्नोल्ड झ्वाइग; अनुवादक एरिक सट्टन; प्रकाशक द व्हाइकिंग प्रेस, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२८, द व्हाइकिंग प्रेस, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'कॅस टिंबरलेन', लेखक सिंक्लेअर ल्यूईस; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक रँडम हाऊस, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९४५, सिंक्लेअर ल्यूईस यांचा. 'द कॅसल', लेखक फ्रॅन्झ काफ्का; अनुवादक एडविन

आणि विला मूर; प्रकाशक आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३०, आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'कॅज्युअल्स ऑफ द सी', लेखक विल्यम मॅकफी; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक रँडम हाऊस, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें. 'कॉडर', लेखक रॉबिन्सन जेफर्स; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक रँडम हाऊस, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२८, रॉबिन्सन जेफर्स यांचा. 'अ कनेक्टिकट यँकी ॲट किंग आर्थर्स कोर्ट', लेखक मार्क ट्वेन; प्रकाशक हार्पर अँड ब्रदर्स. 'द काउंटरफीटर्स', लेखक आन्द्री जीड; अनुवादिका डॉरॉथी बुस्सी; प्रकाशक आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२७, आल्फ्रेड ए. नॉफ, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. 'द कंट्री ऑफ द पॉइंटेड फर्स', लेखिका सारा ऑर्न ज्यूएट; प्रकाशक हौटन मिफ्फिन कंपनी यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १८९६, सारा ऑर्न ज्यूएट यांचा, १९२४, मेरी आर्. ज्यूएट यांचा.

भारतीय ग्रंथ भवन

जगप्रसिद्ध अशा ७६० लेखकांच्या (यांत ३१ लेखक ' नोबेल प्राइझ ' विजेते आहेत) उत्कृष्ट अशा १६०० कलाकृतींचा सारांशरूप परिचय **अमर विश्व साहित्य** मालेंतून क्रमशः आपणांस सादर होईल.

या निवडक कलाकृतींत कादंबरी, कथा, नाटक, काव्य, चरित्र, इतिहास, तत्वज्ञान, प्रवास, निबंध, लोककथा इत्यादि सर्व साहित्य–प्रकार आढळतील.

प्रस्तुत सहाव्या भागांत द ब्रदर्स कारामाझोव, द कॅप्टन्स डॉटर, कार्मेन, कॅस टिंबरलेन, कॅप्टन्स करेजियस, इत्यादि इंग्लिश, अमेरिकन, रशियन, जर्मन, स्पॅनिश, झेक, फ्रेंच, आयरीश अशा अठरा कादंबऱ्या आणि एक अमेरिकन काव्य अशा एकंदर एकोणीस जगप्रसिद्ध ग्रंथांचे सारांश दिले आहेत.

मूल्य रु. ३–५०



अमर विश्व साहित्य